The cash monthly payment was a system bor rowed from the East India Company Formerly the Jagirdar and Faslanadar Systems had been more general The harvest-time payment however steadily disappeared But the monthly payments were not regularly made The army as a rule were in arrears for five to six months The troops were normally paid five times a year Merit did not go unrewarded Neglect of duty did not go un punished Men served so long as they were physi cally fit There was no regular pension But thirty per cent of the vacancies were filled from the mem bers of the family of the retiring soldiers A kind of allowance was sometimes granted to the families of the dead and the wounded *

	Rs.	A	P
Bhowani Singh Kumidan	90	0	0
Bhim Singh Kumidan ..	138	8	0
Dewan Singh Kumidan	90	0	0
Abdur Rahim Kumidan ..	90	0	0
Mongal Singh Kumidan ..	60	0	0
Golab Singh Kumidan	50	0	0

* In the pay rolls we come across a section entitled Dharmarth in which is recorded payment to the families of the dead and wounded soldiers. A specimen is given here. In the first few pages of the *Hisabnama* we find recorded payments to 135 men under Atar Singh Man Kumidan. Then under the heading Dharmarth we have the following payments recorded —

	Rs.	A.	P
Gurdit Singh wif	2	0	0
Ram Singh widow	3	8	0
Sobha Singh mother	3	8	0
Kharan Singh mother	3	8	0
Bhag Singh	4	0	0

In this way we find payment on the principle of Dharmarth throughout the entire *Hisabnama*

In view of these facts and figures, the following criticism of Lawrence seems exaggerated Lawrence says, 'The building completed, the Maharaja does not think the same care necessary for its preservation, as for its construction The keystone of an army is wanting There is no undisputed punctual pay ' The average monthly pay of the infantry and artillery was 7 8 in 1811, when service in the regular army was not at all popular and recruits were very difficult to find The average for the infantry and artillery was 7 7 and 7 2 in 1838 when service in the regular army had become very popular and recruits were so easy to find Ranjit Singh had not taken advantage of the popularity of the service to lower the pay to any considerable extent The salary from the commandant to the sepoy in the Sikh service compared very favourably with the corresponding ranks in the Company's service It was not a pitiless organisation Some consideration was shown to the family of the dead and the wounded

It must, certainly, be acknowledged that the irregularity of payment was one of the greatest defects of Ranjit's military organisation He had introduced the monthly payment system in imitation of the British But this was absolutely an innovation It demanded such a high order of administration and revenue system as the Sikh monarchy had not yet attained Therefore his Mahdar system became practically a compromise between the old faslanadar system and the monthly system of

payment The Maharaja was also most probably of opinion that to keep his soldiers at least several months in arrears would ensure a better discipline in the army

---

INDEX

H

I

J

K

L

M

N

O

P

भ्रंश करूं लागले. तेव्हां भवानीपंतास सेनाबहादरानी येकांती हा मजकूर सांगून याचा बंदोबस्त तुम्ही करावा, माझें नांव कळूं न द्यावे, मजसुधा सर्वास रागें भरून वरकडाचा बंदोबस्त चांगला करावा याप्रो करून आपण निराले राहिले. त्यावर भवानीपंतानी विश्वंभर व राजारामपंत वगैरे आणिखी कोणी होते त्यास फजित करून सर्व मनसबा मोडून टाकला. हे वर्तमान भवानीपंतानी येथें लिहिलें नव्हतें. त्यावर दोन महिन्यानी इंग्रजापासू-

श्री २

प. क्र. १५२

पुरवणी सेवेसी विज्ञापना

—न पैका घ्यावयाचें बोलणें लागलें. तेव्हां मागील मनसबा मनास यांच्या आला नाहीं. याजकरितां दोन हजार फौज द्यावी हे बोलणें राजारामपंतासी बोलून बेणीराम याच्या विद्यमाने करार करून घेतला. त्यांवर राजारामपंत व इंद्रसेन कलकत्याहून आल्यावर भवानीपंतास फौज देण्याचे सांगताच याणी तुटक गोष्ट सांगितली. त्यावर राजाराम व इंद्रसेन याणी व विश्वंभर याणी काय विचार केला तो भवानीपंत व सेनाबहादर यांस न सांगता फौजेची गोष्ट गाळून यैवज मात्र दिल्हा. तो हे घेऊन देशास आल्यावर पाठीमागे कटकास भवानीपंत यांणी राजारामपंताच्या स्वाधीन सुभा व सर्व काजकाम तिकडील वोडसे प्रांतचे करून खावंदी त्यास दिल्ही. त्या वेलेस राजारामपंताने भवानीपंतास सांगितले जे, तुम्ही जातां, मजला काजकाम सांगतां, रजवाडे व जमीदार मवास आहेत, फंदफितूर करितील त्या वेलेस पारपत्य करावे लागेल. तेव्हां फौज घेऊन जाणे लागल्यास निसबतीचे किल्याच्या लोक आहेत हे माझें ऐकणार नाहीत. याजकरितां त्यांस ताकीद करून माझ्या सांगितल्याप्रमाणे वर्तावे असें करून द्याल तर ठीक पडेल. त्यावरून भवानीपंतानी तेथील किलेदार वगैरे जे होते त्यांस राजारामपंताच्या स्वाधीन करून दिल्हे. हे तुमचे खावंद आहेत सांगतील त्याप्रो करावें. याप्रो सांगून आपण फौजसुद्धा देशास आले. छतीसगडास भवानीपंत व सेनाबहादर आल्यावर राजारामपंताचे पत्र उभयतास आले होते, विश्वंभर सिवभद्र पैक्याच्या जाबसालाकरितां आला आहे. वरकड लिहिलें नाहीं. परंतु तो फौज पाठवावयास आला होता. त्याणे राजारामासी बोलून फौज व राजारामाचा भाऊ येसे करनाटकांत रवाना करून दिल्हे. ही बातनी कटकच्या जासुदांनी लिहून पाठविली. याउपर राजश्री सेनाधुरंधर यांणी सेनाबहादर व भवानी काळो यांस शफत घालून काय मनसबा तुम्ही केला होता, हें कसें घडले याचा तपसील सांगणें म्हणून शफत घालून पुसल्यावर त्याणी शफत करून उभयतानी जाहाला मजकूर तो सांगितला. यांत अन्यथा नाही. याहून अधिक किंवा न्यून नाही म्हणून शफत वाहिली. सर्व मात्रागमनपण

राजारामपतांचे व विश्वंभर याचें, आम्हासी याप्रमाणे बोलत होते, आम्ही मान्य न केलें म्हणून सांगितले त्याप्रमाणे शेवेसी लिहिले आहे इंग्रज राजकारण करावयास चुकले नाहींत परंतु आपण त्यास वचन दिल्हे नाही त्यांचे सांगितले मान्य केले नाही नादारीस फौजेच्या गलाट्यामुलें आल्यावर त्यांजपासून पैका मात्र घेतला हें खरे आहे अन्यथा नाही म्हणून शफत उभयेतानी सेनाधुरंधर याजवल केली तेव्हां मजला सेनाधुरंधर यांणी बोलाऊन नेऊन मागती त्या उभयतांकरवी बोलाऊन शफत केली आपणहि सेनाधुरंधर याणी शफत केली जे, पतप्रधान याच्या दौलतीविसी विरुध आचरण करूं तर, त्यावरून लि॥ आहे शेवेसी श्रुत होय नारोपत काले बगाल्यात या॥ होते त्याणी हे वर्तमान पेसजी सेवेसी लि॥ च असेल मजला इतके दिवस कललें नव्हते व सेनाधुरधर यांसही कलले नव्हते त्यास कलतांच त्याणी मजला सांगितले त्यावरून लि॥ आहे हे विज्ञापना

क. म ८८
का म १४
प क. १५३

१५७

सप्टेंबर १७८१

श्री

पो छ ८ जाखर इहिद

सेवेसी विज्ञापना राजश्री सेनाधुरधर याणी पत्रें स्वामीस पाठविली व मीही विनती पत्रें लिहिली होती त्यात सेनाधुरधर मजपासी बोलले होते रा बलवनराव यास समागमे देऊन तुमची रवानगी पुण्यास करूं त्यावरून माझ्या लिहिण्यांत बलवतराव यांस घेऊन येईन म्हणून होते त्यावरून स्वामीनी तानकोपताजवल आज्ञा केली जे, या उभयतांस सेनाधुरंधर पाठविणार आहेत परंतु बलवंतरायानी यावे व सदाशिव राम याणी तेथेंच राहमें कशास यावें ? त्यावरून तानकोपतानी यांस याप्रो लिहिलें. त्यावरून सेनाधुरधर याणी दिकत घेतली आजून आमचा विश्वास नाही याजकरितां सदाशिव राम याणी न यावे म्हणून तानकोपतापासी बोलणें जाहालें. त्याजवर मी उतरें करावयाची त्या रीतीने केली जे, बल्वतराव व मी स्वामीकडे आलों तरी मागें सेनाधुरधर यांजकडून कोणेहीविसी अंतर पडावयाचे नाहीं यांची कायम मिजाज आहे दिवाकरपत गेले म्हणून याचें आचरण जे आज साहा वर्षे चालले आहे त्यांत दुसरे रीतीचें व्हावयाचे नाहीं दिवाकरपंतदादा गेले याजकरितां बल्वंतराव यास घेऊन मी येकवेल स्वामीचे चरण पाहून विनती करून येईन तेव्हां यांची खातरजमा राहील त्याजविना यांचे चीत निखाल्स येकटेच बल्वतराव गेल्याने होत नाही याजकरितां मजला बलवतराव यास घेऊन यावयाची आज्ञा यावी आम्ही उभयता येऊन विनती करून माघारें येथें येऊन नतर सेनाधुरंधर श्रीमताच्या भेटीस येतील मी येथून आलो असतां येथें विलग पडणार नाही असेच आचरण,याचे आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

रु. नं. ८८
फा. नं. १४
प. क्र. १५४

१५८

सप्टेंबर १७८१

श्री

सेवेसी विज्ञापना. सेनाधुरंधर याणी सांगितले जे, आमचे लक्ष पंतप्रधान यांच्या दौलतीच्या वृद्धीविसी अकृतीमपणें आहे यांत संदेह नाही. म्हणून प्रमाणे करून सांगितले आहे. तुम्ही म्हणाल कीं असे म्हणतां तर तुमची संधानें इंग्रजाकडे व नवाबाकडे कां आहे? तर याचे कारण इंग्रजाकडून व नवावाकडून आमचा नाश न व्हावा. आमची दौलत नवावाच्या पेचांत फार आहे व कटक तालुका लांव इंग्रजाच्या संनिध याजमुळे मात्र स्नेहाचा सिलसिला आहे. वरकड इंग्रजाची किंवा नवावासी मिळून पंतप्रधान यांच्या दौलतीवर विरुध चाल धरू ही मात्रागमीनी चाल आम्हापासून घडणार नाही. आमच्या वंशात जालें नाही. पुढे होणार नाही. आमचा नाश त्या उभयेताकडून होईल तो न व्हावा म्हणून मात्र सिलसिला ठेविला आहे. ज्या काली पंतप्रधान याणी त्याजवर जरब ठेवली त्याकाली आम्ही पंतप्रधान याची हरोली करूं. परंतु सध्या दिवस नाहीत. आमचा मुलुक नवावाने घ्यावा आणि आम्ही उगेच वसून राहावें हे सुख आम्हास आहे असे नाहीं. परंतु आम्हीच आपला गेला मुलुक सोडऊ म्हटल्यास आमच्याने घडावयाचे नाही. आमची दौलत पंतप्रधान यांच्या दौलतीच्या पोटांत आहे. त्याच्या दौलतीची वृद्धि होईल त्यासमई आमचीही दौलत आम्हास मिळेल. हे बोलणें आम्ही स्थाईभावाने वोलतो. यांत अंतर नाहीं. म्हणून मोठे प्रमाण करून सांगितले. त्यावरून शेवेसी विनंती लि॥ आहे. श्रुत होय हे विज्ञापना.

रु. नं. ८८
फा. नं. १४
प. क्र. १३८ व १५५

१५९

सप्टेंबर १७८१

श्री

पो छ २९ रमजान

सेवेसी विज्ञापना. नवाबाकडील मजकूर सेनाधुरंधर याणी सांगितला जे, नवाबाच्या चित्तात पंतप्रधान याच्या दौलतीची वृद्धि असावी हे नाही. कोणत्याही तऱ्हेने आपल्या कावूत यावी, आपण सांगू त्याप्रमाणे त्याणी आइकून वर्तत असावे, ही योजना पहात आहे. ये विसीचे उद्गार निघत आहेत. सलुख दाखवावा, विघाडाचे बोलणे बोलू नये, मसलत दाखवून आपण येकेकच साधून घ्यावे, ही चाल मांडली आहे. कृष्णराव बलाल यास बलाविले आहे. त्याजवळ काय मसलत सांगून काय मागून घेईल कलत नाही. कृष्णरायांचे लिहिले पुण्यास गेल्यावर मान्यच पडेल. नवाब फौजेने व मुलकाने व पैक्याने भारी जाहला

आहे त्याजवळ मसलतगार मायनुद्दौला जाहला आहे तो सुमनुष्य नाही त्याची बुधी मराठे यांचे दौलतीचे हरण जसे घडेल तसे करावे ही आहे तो नवाबास मसलत देतो त्याप्रमाणे नवाब जातीने करितो हैदरखान याच्या सलुखामुळे नवाबास निपमता फार आहे आम्हा कडील्ही मुलुक स्नेहानेच दाबला आहे वराडात पहिला अमल अलजपुरच्या सुम्याचा होता तेव्हां आम्ही प्रांतात पैका खास जागिरीचा नवाबांच्या निम्मे व जागीरदार होते त्याजपासून दर सेकडा साठ रुपयेप्रमाणे घेत होतो आलीकडे नवाबानी सुम्याकडून अमल काढून तमाम सरदारांस दिल्हा वराडात कोणी नवाबाचा सरदार नव्हता हली सरदारच पाच सात करून नेहमी ठेविले. वराड त्यांनी आटोपिले आहे ते सरदार आमच्या अमलास घसघस करितात नवाबासी बोलल्यास ताकीद करितो म्हणतात, सरदारावर रागे भरतात, बेकैदी म्हणतात, परंतु अमल पहिल्याप्रमाणे देवीत नाहीत आम्ही जबरदस्तीने घ्यावा, तर कटकट पडते सुरलित देत नाहीत याजमुळे आमची नुकसानी आहे साबाजी भोसले यांच्या नांवचा सरंजाम होता तो व रायाजी भोसले याजकडे होता तो व आमनेर व गंगथडीचा घासदाणा दाबून बसले जाबीतजंगाने तीन लक्षांचा मुलुख ठेविला त्याचा फडशा आज उद्या करितो म्हणत असता तसाच रहात गेला सेवटी जाबीतजग मेला आता नवाब म्हणतात, त्याणी केले आहे तसे आम्ही करू. ज्याबीतजंग नवाबाच्या घरात आग होती, ती विझाली त्याचे पुत्र आहेत. परंतु त्यांच्या अंगी वैवज नाही कारभारी कोणी शहाणा नाही. चुलत्यापुतण्यात कलह लागला आहे निर्मलेस मारे बहुत जहाले, याजमुळे तोही संदर्भ तुटला त्याज कडून मुलुख येत नाही नवाबाच्या मनात ती सरदारी हलकी करावी हे आहे स्नेह ममता दाखवून घेणार. यास्तव याचा विचार जो करणे असेल तो नानानी करावा आम्हास सांगतील तसे आम्ही करू. सांप्रतकाली नवाबासी विघाडाचा विचार करावयाचे दिवस नाहीत. इंग्रजासी विघाड असता नवाबासी विघाड करावा हे ठीक सलाह नाही इंग्रजासी सलुख पक्का जाल्यावर मग नवाबास जे लिहिणे ते लिहून व सांगणे ते सांगावयास चिंता नाही नवाबाच्या मनांत इंग्रज आपल्या हातीं घ्यावे म्हणजे दादासाहेब आपल्या हातीं सहजच

श्री २

पुरवणी सेवेसी विज्ञापना

राहिले. पुढे आपण दाबून जसें सांगू तसे पतप्रधान व कारभारी आइकतील, न आइकल्यास जरबेनें सांगून आइकावयास येईल इंग्रजांचा स्नेह नवाबाने ध्यान हालून याच्या मध्यस्तीने रासद्र ठेऊन ध्यान हालून आपल्याजवळ ठेऊन घेतला आहे आम्हास

आपल्या मिलणीत मिळऊन घ्यावे या योजनेत आहेत. परंतु स्पष्ट गोष्टीने बोलत नाहीत. द्रष्टांते करून दर्शवीतात. आम्ही नवाबाच्या मिलणीत मिलतों असे जाहाल्यास उघडच बोलतील. तोपर्यंत बोलत नाहीत. स्वराज्याचें हरण करून घ्यावें हीच रात्रंदिवस कल्पना त्यांची आहे. अदी पंतप्रधान याजकडून चौथ व सरदेशमुखी सोडऊन घ्यावी. पुढे खिसारा म्हणून कांही घ्यावें. मलसल करू नये. लौकिकांत दाखवावयापुरती फौज मसलतीवर पाठवितील. आंतून इंग्रजासी तोडीत नाहीत. यास्तव समजून जसें करणे असेल तसें करावें. स्वराज्यांत बाकी राहिली नाही. आठ वर्षे दौलत पेंचात, दरसाल लढाई, स्नेहाने नवाबाने मुलुक घेतला व पुढे घेणार. लढाईने इंग्रजाने घेतला. तहाने हैदरखान याने घेतला. याचा विचार आम्ही सांगावा असें नाही. आमचे मोठेपण द्रष्टीस मात्र बाहेर दिसतें. परंतु बंगाल्याच्या मसलतीमुले बाकी राहिली नाहीं. इंग्रापासून च्यार रु॥ घेतले हा लौकिक मात्र जाहाला. त्याणे फौज फिटत नाही. पुढें घेण्यास जागा नाही. याच कालजीने हैराण आहों. रात्रदिवस दुसरे सुचत नाहीं. मुख्य गोष्ट नवाबास याउपर वाढू देऊ नये. सध्या विरुधही करु नये. अदी इंग्रजाचा सलुख आपण करावा. बाह्यात्कारे नवाब हैदरखान यांस घ्यावें. आंतून इंग्रजासी आपलें पकेपण करावे. नंतर येक दोन साले जाल्यावर इंग्रजासी नवाबासी कटकट लावून द्यावी. त्यांत आपला मुलुक गेला तो आपण घ्यावा. इंग्रजास सिकाकोलीकडे देवावा. हैदरखान याजकडून स्नेहाने गेला मुलुक तो स्नेहानेच घ्यावा. न आल्यास जसें बनेल तसें करावयास येईल. परंतु नवाबास हलकें या रीतीने करावें. नवाबाचें वाकडेपण फार आहे. आम्हास समजलें आहे त्यावरून सांगतों म्हणून सांगितले, त्यावरून लि॥ आहे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

र. नं. ८८
फा. नं. १४
प. क्र. १६०

१६०

सप्टेंबर १७८१

श्री

सेवेसी विज्ञापना. रा नारोपंत काले बंगाल्याच्या मुलुखगीरीहून आले. त्याच्या शरीरी समाधान फारच नाहीसे जाहाले आहे. कफक्षय जाहाला आहे म्हणून सांगतात. पालखीतून बसून येत आहेत. अद्यापि नागपुरांस आले नाहीत. मार्गी पवनीस राहिले आहेत. पर्जन्य वारा थंडी बहुत. शरीरास न सोसे म्हणून राजश्री भवानीपंत आबा यांणी तेथे ठेविले आहेत. वैद्याकरवी औषध देविले आहे. घरजागा निवाऱ्याची चांगली सोय करून दिल्ही आहे. पवनी येथून तीस कोस आहे. नारोपंताची पत्रें येका दो दिवसी येत असतात. गुण येत नाहीं म्हणून लिहितात. आठ पंधरा दीस पाहून नागपुरास येईन म्हणून लिहिलें

आहे फागद लिहावयास सामर्थ्य नाही पालखीत बसावयाचेही सामर्थ्य नाही, म्हणून पत्र त्याचे येते हर कोणाकडून पत्र लिहवितात स्वामीचे कृपेकरून आरोग्य होतील येथें आल्यावर पुण्यास जावयाचा मार्गीचा निभाव पडे असे सामर्थ्य आल्यास पुण्यास पाठवावे किंवा येथेंच ठेवावे येविसीची आज्ञा येईल त्याप्रो फकीन नारोपताकडे येका दों दिवसी जासूद समाचारास पाठवीत असतो शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

र. मं ८८
फा मं १४
प क्र. १६४

१६१ सप्टेंबर १७८१

श्री

सेवेसी विज्ञापना राजश्री सेनाधुरधर याणी पुण्यास यावें श्रीमतास भेटावें. पाहावे पुढें कितीक मसलतीचे ठराव करणे ते बोलणे व्हावें म्हणून स्वामीनी यांस लि॥ व मजला ही पत्री आज्ञा येविसी लिहिली त्यास पुण्यास आपल्या लि॥प्रमाणे यावे हे मानस याचे आहे परतु हे दिवस यावयास प्रतिकूल यगाल्याच्या फौजेचा राडा व दिवाकरपंत वारले माणूस खासा पुण्यास गेले तेव्हां पुढें काय मनसवा करितात हा संशय नवाबास वाटेल नवाबानीही तुम्हीच यावें म्हणून यास लिहिलें आहे याजकरितां मात्र सन्या यावयाचा अनमान चितापासून यावें हा उल्हास आहे यास प्रतिबंध फौज व नवाब दोन आहेत हे उलगडून मग यावें हे मानस सर्वथैव आहे तोपर्यंत दसरा जाहल्यावर बलवंतराव विष्णु व मजला स्वामीकडे रवाना करून द्यावे येथील विचार स्वामीस निवेदन करावा पुढे स्वामीचा मनोदय काय आहे तो घेऊन नागपुरास यावें नंतर याणी स्वामीच्या भेटीस यावे हा विचार आहे. सेनाधुरंधर याच्या चितात आणिखी कल्पना किमपि नाही स्वछ अंतःकरण स्वामीकडे आहे दुसरीकडे नाही शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

र मं, ८८
फा मं १४
प क्र. १७५

१६२ सप्टेंबर १७८१

श्री

सेवेसी विज्ञापना नवाबाच्या चितात श्रीमताची दौलत ज्या गोष्टीने आपल्या जरबेत राहील ती गोष्ट अगत्यरूप करावी हे पुर्तेपणे आहे त्यांत संशय नाही बगाजी रघुनाथ याजबल बोलण्यांत नवाबानीच भाव आणिले स्वामीच्या ठाई अनेक प्रकारचे दोष ठेवितात इंग्रजाचा सलुक आपण करून द्यावा म्हणजे इंग्रज आपले जाहाले दादासाहेब आपले हाती घ्यावे, आपण त्यांचा बदोबस्त करून द्यावा सखारामपत बापू यांस प्रतिबंध आहे, येणे करून चित्तांत परम विषाद मानीत आहेत त्यांची सुटका कोणत्या तऱ्हेने घडेल तसी करून पुन्हा कामांत आणावें, हे मानस फार करून आहे हैदरखान यासी स्वामीनी वह

करून घेतला, याचा विषाद मोठा आहे. तोंडाने कचेरीत मात्र पंतप्रधान यांचे दौलतीचे साहित्य आपणास करणे जरूर आहे म्हणून म्हणतात. अंतरीं जितकी जरबेत येईल तितकी आणावी, हेच मानस, त्याप्रो चालही धरितात. चौथाईच्या तहाकरितां प्रांतात अंमल बंद करीवला आहे. खिसाऱ्याचे बोलणे घातले आहे. त्यास कांही प्रांत (फाटलें आहे.) लाभ तर निमित्य टालावयाकरितां मोहीम साहेबजाद्या करवी (फाटलें) सरदार पाठऊन सिकाकोलच्या रूखावर घावे करवावी. परंतु त्याणी इंग्रजासी बिघाड करू नये लढाई पाडूं नये. उगेच दिवसगत लावून जात असावें. सेवटी आपण तह करावा, नाहीतर फौज माघारे आणवावी, खिसारा व चौथाईचे निमित्य टलले, हे मानस आहे. निखालस चित नाही. खोटाई चीतात पुरती भरली आहे. गनीमाचे अधिक असू नये हाच संकल्प आहे. कृष्णराव यांच्या ठाई लोभ चांगला आहे. दिवाकरपंतदादानी बगाजीपंताबा। सांगून पा। होते, आम्हास अलजपूरच्या तलावर आपण करार करून दिल्हा, त्याप्रो आम्ही पंतप्रधान यासी दुसरा विचार धरिला नाही. आजपर्यंत त्याच निष्टेने चाललो, आपल्यासी करार केला त्यांत अंतर केले नाही. आम्हास बंगाल्याच्या मसलतीच्या पेचांत आणिले. मंडले दिल्हे नाही. असो. ते थोर आहेत. पुढें अम्हास काय सांगणार ? आमचे मध्यस्त आपण आहेत जसें सांगाल तसें चालूं. आम्हास आपली मर्जी दरकार आहे. याचे कारण असें नवाबासी बोलल्याखेरीज त्यांच्या मनात रावसाहेबांच्या दौलतीविसी काय भाव आहे तो मनांतून निघणार नाही. याजकरितां याप्रो बोलून मनांतील खुलासा काय नघतो तो काढून लिहून पाठविणें म्हणून त्यावरून बगाजीपंताने नवाबासी त्यांच्या सांगण्याप्रो बोलून जे बोलणे त्यांचे जाहाले ते लिहून दिवाकरपंतदादा यांस पाा. त्यावरून दिवाकरपंतदादा गेले. ती पत्रें आहेत त्यावरून मजकूर कलला तो विनंति लिहिली आहे. याजखेरीज नवाबानी बगाजीपंताजवल बोलण्यात आणिले. आम्ही तुम्हासी बोलतों ते तुम्ही नागपुरास लिहितां तो कचा मजकूर पुण्यास कलतो हें काय आहे ? आम्हास पुण्याची कची वातमी येत आहे. पुणेकरास नागपुराहून इतला होत नाही कीं म्हणून नेटून पुसले. त्यावरून बगाजीपंतानी निराकरण केले. तेंही बगाजीपंताने लिहिले होते. त्यावरून रा। सेनाधुरंधर पुसत होते आम्ही तुम्हास पत्रे दाखवितो. तुम्ही लिहून पाठविता ती पत्रें पुण्यांत कृष्णराव बलाल अगर गोविंदराव यास कलत असतील. तेव्हां नवाबास त्याजकडून इतला होत असेल. तुम्ही तर कोणास तिसऱ्यास नानातात्याखेरीज कलत नाही म्हणता तर हे लिहिले कशावरून ? आम्ही तुमच्या विश्वासावर आहों येणेकरून...

नवाब आम्हास बरे पाहाणार नाहीत व बोलणारही नाहीत. तेव्हा नवाबाचे चितातील

भाव कळणार नाहीत आम्ही त्यांच्या पोटात सिरून त्याचे भाव घेतों याचे कारण पंतप्रधान यांच्या दौलतीचे कल्याण व वृधी कोणत्या तऱ्हेने होईल ती चाल समजून धरावी पंतप्रधान याच्या दौलतीचे कल्याण जाले म्हणजे त्यांत आमचे कल्याण आहे. निराळे आम्ही मोजीत नाही हीच आमची क्रिया आम्हास कामास येईल म्हणून त्यावरून मी उतर केले कोणास लिहिण्यास असी नाजूक बातमीची पत्रें कळत नाहीत येविसी संशय न घ्यावा मजला दोन तीन वेळ लिहिलें आलें तेच तुम्हास दाखविलें. त्यावरून खातरजमा जाहाली, परंतु स्वामीस कळावे याजकरितां लिहिलें आहे तेथें वर्तमान कोणापासून नवाबाच्या घरीं जाते याचा शोध व्हावा स्वामी म्हणतील कीं नवाब उगेच बगाजीपंतासी बोलले असतील त्याचा शोध करावयास तर तसें नाही खुणेच्या गोष्टी दोनचार नवाबानी बगाजीपतास ज्या स्वामीस मी मागे विनंती पत्री लिहिल्या त्या विचारल्या त्यावरून विनती लि॥ आहे कृष्णराव पुरते नवाबाचें, अर्धे सरकारचे, यांत गुता नाहीं सशय धरूच नये हे विनंतीपत्र आपण व ताश्यानीच पाहावें नबाबाची वर्तणूक या रीतीची आहे सेनाधुरधर याची निष्ठा फार चांगली आहे शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

क. मं ८८
फा मं १४
पं क्र. १७७

१६३

सप्टेंबर १७८१

श्री

सेवेसी विज्ञापना राजश्री कृष्णा बाबुराव ब्रह्मस्त सिंघाकडील बहाणा करून कलकत्यास जाऊन राजश्री सेनाबहादर यांच्या सैन्यांत आला आहे त्याचा शोध करून राजश्री सेनाधुरंधर यांस सांगून दस्त करून पाठवून देणे म्हणून आज्ञा त्यावरून शोध करीत आहे, ठिकाण लागल्यावर आज्ञेप्रमाणे पाठवून देईन राजश्री नारोपत काल्ये समाधान नाही याजकरितां पवनीस राहिली आहेत औषध घेत असतात कांही गुण आहे समाधान जाल्यावरपरी निघोन येतो म्हणून पत्रें हमेशा त्यांची येतात स्वामींची पत्रें मशारनिल्हेस आली तीं मुनरद पवनीस पाठविली आहेत. त्याजकडूनही या ब्रह्मस्ताचा पता लिहून आणविला आहे व येथेहि शोध बारकाईने करीत आहे सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना

क. मं ८८
फा मं १४
प क्र. ८१

१६४

डिसेंबर अखेर १७८१

श्री

सेवेसी विज्ञापना इंग्रज वाराणसीस आहे त्याणें वेणीरामाचा भाऊ विश्वंभर सिवभट व आणीखी दोन मातबर इंग्रज समागमे देऊन नागपुरास रवाना केले आहेत म्हणून वेणीराम याचे पत्र छ ५ जिल्हेजचे येथे छ ६ मोहरमी आले त्यांत मजकूर

तुमच्या लिहिल्यावरून इमादुदौला याणी विश्वंभर व दोन साहेब यांस तुम्हाकडे पाठविले आहेत. तेथे आल्यावर सविस्तर निवेदन करीतील म्हणून मोघम लि॥ आहे. तपसील कोणत्या मजकुरास कार्य सांगून पाठविले हे लिहिले नाही. चुटियानागपूरच्या मार्गे छत्तीसगडाहून येत आहेत. शेवेसी श्रुत होय. येथें येऊन पोंहचल्यावर मजकूर कलेल त्याप्रो लिहून पाठवीन. हे विज्ञापना.

रु. नं. ८८ **१६५** **नोव्हेंबर १७८२**
फा. नं. १४
प. क्र. १५६

श्री

सेवेसी विज्ञापना. जाबीतजंग यांच्या पुत्राचा गौर आपण करून बाहलीची वस्त्रे व जव्हाहीर पाठवून देऊन सर्फराज त्यास केलें, हें आपण युक्त केलें. फरूक मिर्जाची नालीस कोणी हजरतीजवल करील तें ध्यानांत न यावी. त्यांजपासून शेवेत अंतर पडणार नाहीं. त्याजविसी आम्हास विनंति करावी लागली. याचे कारण आपली खासा स्वारी नागपुरावरच चालून आली, त्या कालीं जाबीतजंग याणी आमचे प्राण रक्षिले आहेत. इस्माईलखान व महमद ईसफ याच्या तिढणीतून सोडविलें आणि हजरतीची भेट करून दिल्ही. त्यावर हजरतीची ममता आमच्या ठाई होऊन बंदोबस्त जाहाला. ते उपकार जाबीतजंग याचे आम्हावर आहेत. यार्जकरितां त्याच्या मुलासाठी आम्हास विनंति लिहावी लागली म्हणून नवाबासी बोलावे, याप्रमाणे बगाजीपंतास लिहून पाठविले आहे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

रु. नं. ८८ **१६६** **१७८२ अखेर**
फा. नं. १४
प. क्र. ३६

श्री

सेवेसी विज्ञापना. सुभानराव यादव जोगोजी यादव व सरूपजी यादव हे जानोजी भोसले यांच्या कारकीर्दीपासून चाकरीस येथे आहेत. साबाजी भोंसले यांच्या लढाईत त्याजवल होते. नंतर घरास गेले. जोगोजी यादव मृत्यु पावले. सरूपजी यादव घरी होते. मारनीले व जोगोजीचा दत्तपुत्र यैसे राजश्री सेनाधुरंधर याजपासी चारसे स्वारानिसी चाकरीस आले. सरूपजी आपल्या सरकारांत राहिले होते. याणी इतके दिवस चाकरी नागपुरी केली. यंदा नवाबाकडे फौज पाठवावयाचा विचार योजिला तेव्हां राजश्री भवानी कालो यांणी जावे ही योजना करून फौजेची नेमणूक करून याद लिहून जितके यांजवल मानकरी आहेत त्यास ताकीद कारकून बलाऊन केली. त्यासमई यादवाकडील कारकुनानी उतर सांगितले, खासा कोणी जाईल त्यासमागमे आपण जाऊ. भवानीपंताव॥ जात नाही. म्हणून

सेनाधुरंधर यास फललीयावर रागास येऊन उतर कारकुनास जाले जे, तुम्ही जात नाही तर निरोप घेणें, तुम्हास ठेवीत नाहीं, हेच बोलणे दोहीकडून यावत चाललें. तटास गोष्ट आली यादवानी निरोप घेतला हिसेबाचा पैका निघाला तो न द्यावा असें सेनाधुरंधर याचे मानस होते यादवानी उतर सांगून पा॥ जे बंगाल्यावून फौज जाऊन आली, त्याणी तुमचें करणे मानिले त्याप्रमाणे आम्ही मानीत नाही रुपया घेऊन जाऊ. आठच्यार दिवस सेना धुरंधर यांणी दाब देऊन पाहिले परतु इलाज चालला नाही सेवटी हिसेबाप्रमाणे रुपया घेतला, निरगत लावून दिल्ही यादव निघून जाणार आहेत शहरांतील गुता देणेघेणेयाचा उरकून जातील यादवाजवल माणूस चांगले आहे चाकरीचा धुरा व दाब ठेऊन निरोप घेतला, यांचा दाव सोसला नाही याप्रमाणें वर्तमान जाले. येक महिना दिढमहिना हा गरगशा पडला होता, परतु पेशजी न लिहिले, याचे कारण परिणाम कसा होतो तो पाहून लिहून पाठवावें कोणे दिवसी ठेवावे, कोणे दिवसी निरोप द्यावा, कोणे दिवसी हिसेब जाला तो पैका द्यावा, कोणे दिवसी पैका न देता जरबेने लाऊन द्यावे, असा विचार होत होता, तेव्हां कोणता लिहून पाठवावा ? ठरावांत कोणताही आला नव्हता हल्ली निश्चयांत येऊन सेवटास जी गोष्ट पोहचली ती लिहिली आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

रु.	मे	८८
का	मे	१४
प	क्र.	२७

१६७

१७८२ अखेर

श्री

सेवेसी विज्ञापना यादवाचे पथक पहिल्यापासून जानोजी बाबाच्या वेलेपासून राजश्री भवानी काळो यांच्या ममतेचे साबाजी भोसले याचा काल लढाईत जाहाला त्याजवर पुन्हा यादवांची चाकरी भवानीपतानीच घडविली बंगाल्यावून भवानीपत आले अगोधर दिवाकरपत मृत्यु पावले नंतर सेनाधुरंधर मनसी वर्तणूकेस निरभय जाहाले. दिवाकरपताच्या भयामुले भवानीपंताचे अगत्य सेनाधुरंधर यास फार होते दिवाकरपत जाताच भवानीपतावर रोष धरिला याचे कारण बंगाल्याच्या फौजेस पैका देणे आला म्हणून रोषाखालीच हा कालवर चालत आहे कवी रुष्ट आपण करितात, कवी सर्वस्वे तुम्हीच आहा असेंही म्हणतात यांवून कोणती गोष्ट धरावी असी नाही बंगाल्याच्या फौजेपैकी जाधव व ढमढेरे व किरकोल हजार पांचशे येकून सा हजार फौजेस पैका दिल्हा बरकड लोक सहासात हजार लोक तसेच राहिले आहेत पैका देत नाहीत कोणे दिवसी पैका लोकांस तुम्ही देणे म्हणतात, कोणे दिवसी आपण देतो म्हणतात, येकही करीत नाहीत तेव्हां लिहावयास ठिकाण नाही परंतु येक गोष्ट आता दिसण्यांत चांगली यावयास लागली भवानीपंताच्या

ममतेची फौज असेल त्यास ठेऊ नये, निरोप द्यावा, हे मनापासून आहे. यादवास निरोप गुदस्तांपासून घेणे म्हणत होते. येक दोन वेल तटही पडला. मागती समजाविसी जाली. त्याकाली निमित्य दूर करण्यास मोठे नव्हतें. प्रस्तुत मोठे निमित्य जाले, भवानीपंताबा। जात नाहीत. याजमुले भवानीपंतासही बोलतां येत नाही. मागे लहानसान निमित्ये ठेऊन तट पडला, तेव्हा भवानीपंतानी रदबदल करून निमित्यें दूर करून समजाविसी केली. हली भवानीपंतास बोलताच नये असे जाले, म्हणून निरोप दिल्हा. परंतु आंतील भाव भवानीपंताच्या ममतेचा म्हणून ठेऊ नये, या अर्थे निरोप दिल्हा. भवानीपंताच्या ठाई सेनाधुरंधर यांची अप्रीत चिरकाल आहे. बाहेर निदर्शनासही येत आहे. येक दोन कामाचे प्रयोजन भवानीपंतास पडले, त्या वेलेस भवानीपंताकडून आलस घडला. त्यासमई भवानीपंतास पुसले जें, श्रीमंत तुम्हास विनंती उपरी म्हणून लिहितात, त्याचे फल हेच आहे कीं काय? त्यावर दुसरे दिवसी माझ्या घरी येऊन बहुत नम्रतेने बोलोन सांगितले जे, श्रीमंताचा आज्ञाधारक आहे, मजकडून आलस घडणार नाहीं सांगून कामही करून दिल्हे. त्या दिवसापासून लक्ष सरकारचाकरीवर भवानीपंत ठेवीत आहेत. भवानीपंतास नवाबाकडे पाठवित होते. सर्व सिधता जाहली असतां, न जावे ही मसलत भवानीपंतानीच सेनाधुरंधर यास समजाविली. त्यावरून आपण राहून येशवंतराव यास पाठविलें. तीन हजार फौजेची नेमणूक जाहली आहे. हजार बारासे गेले आहेत. वर्धेवर आहेत. पुढें गेले नाहीत. भवानीपंताच्या चितांत पुर्ते समजले आहे, जर श्रीमंताची कृपा आपल्यावर राहिली तर येजमानही आपल्या ठाई प्रीत ठेवितील. याअर्थे श्रीमंताच्या लक्षीं राहावे जाणून सरकार लक्षी आहेत असे वरकड नाहीत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

रु. नं. ८८
फा. नं. १४
प. क्र. १७६

१६८

१७८३ आरंभ

श्री

पु॥ सेवेसी विज्ञापना. धोंडो महादेव, बिंबाजी भोसले यांचे कारभारी, पुत्राच्या लग्नास्तव निरोप घेऊन रतनपुराहून स्त्री व पुत्रसुधा येथें आले आहेत. देशास पेडगांव नजीक गांव वतनाचा आहे तेथे घर आहे. घरीं बंधू जगंनाथ महादेव आहे. त्यांस पूर्वसूचना लग्नाच्या साहित्याविषई पेशजीं जाली त्यावरून सिध्धता करून मार्गे यांच्या

येण्याचा पाहात आहेस हे येथें आले, च्यार दिवस जाले राजश्री सेनाधुरंधर यांची भेट घेतली येका दो दिवसीं आज्ञा घेऊन देशास जाणार. समागमें हत्ती दोन व स्वार शंभर व पायांची माणसें खास वारदार जासूद वगैरे शंभर विंबाजी भोसले याणी दिले आहेत. लग्न करून लौकर आषाढ श्रावणात माघारे यावयाची आज्ञा आहे म्हणून मशारनिले यांच्या सांगण्यात आहे यानंतर सेनाधुरंधर याची प्रकृत छ ८ रोजी व्यत्यास पावोन पूर्वपर्यंत मुत्रास उपद्रव जाला ते समई औषध नयाबाकडील म्लेंछ वैद्य दोघे आले आहेत, त्याणी उपाय केला साहा घटिकांनी मूत्र मोकले जालें. तदनंतर (ज्वर) आला तो च्यार प्रहर अंगात ठरला, मध्यरात्रीनंतर निघाला. छ ९ रोजी प्रातःकाली प्रकृत बरी स्वच्छ जाहाली. त्यापासून आजपर्यंत चांगली आहे औषध त्याच वैद्यांचें घेत असतात. यांचे वैद्य श्रीमानशास्त्री आहेत त्यांस दाखऊन दुकानची औषधें विद्या रानातीलें समक्ष आणून सिध्द करऊन समक्षीस आणून देतात. याप्रमाणे औषध सेवीत आहेत सेवेसी श्रुत व्हावें हे विज्ञापना

इ. सं. ८८ | १६९ | १८ जानेवारी १७८९
फा. सं. १४
प. क्र. ३५ | श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसी

सेवक सदाशिव राम कृतानेक साष्टांग नमस्कार विनती येथील कुशल तागायत छ १४ सफर यथास्थीत असे विशेष राजश्री सेनाधुरंधर यांच्या शरीरी आरोग्यता दिवसेंदिवस होत आहे श्रीमतांच्या लग्नसमारंभास यावे हा दृढ निश्चय आहे पालखीत बसून मार्गसंमधी श्रम साहावयास पुर्ते सामर्थ्य आल्यावर निघतात असी योजना आहे रामटेकी विड्याची पाने सेनाधुरंधर यांजकडून येत आहेत, त्याअर्थी खरेदी करून न पाठवणे म्हणून आज्ञा त्याप्रमाणे खरेदी करून पाठविली नाहीत धुरंधर याणी बेवीस लक्ष पान भरून २४ बैल सरकारात यावयाकरितां पाठविले आहेत बरोबर तात्रोली येथून देऊन माफबत्तीने यावयाविसी व माघ शुध्दांत जाऊन जलदीनें पोहचावयाविसी ताकीद केली आहे येथून राजश्री बल्वतराव व जिवाजीपत यास लिहिले आहे त्याप्रमाणें पाने सरकारात प्रविष्ट करितील सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

रु. नं. ८८
फा. नं. १४
प. क्र. ६१

१७०

२० जानेवारी १७८३

श्री

सेवेसी विज्ञापना. राजश्री तानकोपंत याणी छ १६ सफरची बातनी लिहिली. त्यांत कर्नाटकची बातनी लिहिली आहे जे, हैदरखान यास पाठीस पुळी होऊन छ १ मोहरमी मृत्यु पावला. अगोदर टिपूमियां इंग्रजांवर मोहिमेस फौज सुधा गेला होता. मागें यांस व्यथा जाली, तेव्हां कारभारी आप्त मातबर यांस सांगोन ठेविले जे, हे व्यथा मजला सेवटची जाली आहे. टिपू मोहिमेवर आहे. शत्रूच्या निकट मुकाम आहे. याकरिता कदाचित आपला काल जाला, तरी कलेवर रक्षून ठेवावें. मृत्यूचे वर्तमान परिस्फुट न होतां कारभारी यांस मात्र कलेल. तितक्यांतच दाबून ठेऊन टिपू कार्य करून येई, येथील फौजेचा वगैरे आला करील, तदोतर शरीरास संस्कार करावा याप्रमाणे सांगोन ठेविलें होतें. त्याप्रमाणे काल जाल्याउपरी बंदोबस्त राखून टिपूसहि सूचना कलऊन तेथील कार्य शत्रुपराभवाचें करून टिपू छ २३ मोहरमी सैन्यात आला. नंतर हैदरखान मृत्यु पावला हे लोकांस कलले, बंदोबस्त टिपूने आपल्या मुछधांचा व सैन्याचा उतम प्रकारें केला आहे. आणि हे वर्तमान टिपूने नूरमहमदखान यास लिहिले. त्यावरून श्रीमंत नाना व तात्या नूरमहमदखान यांच्या बिराडास समाधान करावे म्हणून गेले होते. वर्तमान तथ्य आलें तें लिहिलें आहे, म्हणून बातनीत लिहिलें आलें. त्यावरून राजश्री सेनाधुरंधर याणी बोलण्यात आणिलें जे, तीन च्यार वर्षे इंग्रजांची थोप हैदरखानानी राखिली होती, दुसऱ्याची ताकद नाही. साऱ्या दक्षिणेचा बचाव तिकडील मसलतेमुलें होता. पुढें टिपू आहे, याचा दाब शत्रूवर पडोन कामकाज होईल तेव्हां खरें. हे वर्तमान नाना व तात्या याणी न लिहिलें, कारण काय म्हणून पुसलें. त्याचे उतर मी केले जे, वर्तमान खरेंच आहे तर लिहिले येईल. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

रु. नं. ८८
फा. नं. १४
प. नं. ३९

१७१

२४ जानेवारी १७८३

श्री

पो छ. ३० सफर सन सलास
माघ मास समानीन

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

सेवक सदाशिव राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ २० सफर यथास्थीत असे विशेष. स्वामीनी श्रीमंत राजश्री रावसाहेब यांच्या लग्नाचें

आमत्रण राजश्री सेनाधुरधर यांस करून, राजश्री सेनासाहेबसुभासहित सकुटुंब न्यावयासी लग्नपत्रे देऊन राजश्री माधवराव गंगाधर यांस पाठविले, ते काल छ १९ रोजी दोन प्रहरा येथे देऊन पोहचले म॥ निले यास आणावयास सेनासाहेबसुभा व सेनाबहादर पुढे दोन कोस जाऊन भेटून घेऊन शहरांत आले घाम्यांत सेनाधुरंधर यांची भेट करविली लग्नपत्रें आज्ञेप्रमाणे सर्वांची याणी प्रविष्ट केली पत्रें वाचून बहुत संतोषास पावले. सेनाधुरधर यांच्या आरोग्यतेकरितां नवस केला होता पीरांच्या दर्शनास जावें, काही देवाजवळ ठेवावें स्तायरून काल प्रात काली प्रहर दिवसास निघून शहराबाहेर पीर होते, तेथे जाऊन दर्शन घेतलें नंतर सीताबरडीवर पीर आहे, तेथे जाऊन दर्शन करून माघारे दोन प्रहरा वाड्यात आले शरीरांत सामर्थ्य किमपि राहिले नाही चौघानी धरून पालखीत बसऊन नेऊन दर्शनें करून आले समागमे तिघे पुत्र वा॥ साह्यकारी होते सध्या शरीरास आरोग्य आहे याप्रमाणे दिवसेंदिवस निभावल्यास येका मासात सामर्थ्य पालखीत बसून मार्गसंबधी श्रम साहातील याप्रमाणे वर्तमान आहे सेवेसी श्रुत होय सेवकास आमत्रणाचे लग्न पत्र पावले वाचून पाहून सनाय जाहालो हे विज्ञापना

ऐ. सं. ८८
फा. सं १४
प क्र. २१

१७२ जानेवारी १७८२

श्री

सेवेसी विज्ञापना राजश्री जिवाजी महादेव काणे राजश्री सेनासाहेब सुभा यांचे फडणीस, यांच्या ठाई राजश्री सेनाधुरंधर याची अप्रीत होती याजकरिता त्याची फडणीसी काढून मनाजीपत यास सांगितली होती त्या वेळेस दिवाकरपत होते, त्याणी धुरंधर यास सांगून चालती केली होती परंतु पूर्ववत प्रो सारी मालनिलेकडे चालविली नाही दिवाकरपंतानी आपला दाब धुरंधर यांजवर ठेविला होता त्याजमुळें त्यांचे सांगणें मान्य करावे लागत होतें दिवाकरपतानी पुण्याकडील दाब धुरधर याजवर मोठा ठेविला होता ते दिवगत जाहाल्यावर धुरंधर याणी भय सोडलें जिवाजीपंत पूर्ववत फडणीसी चालवावी म्हणून धुरधर याजवळ हटकीत होतें, परंतु मानिले नाही. म्हणून जिवाजीपंत आपल्या घरी रुसून वसले होते फडणीसीचे काम थोडे दिवाकरपताच्या वेळेप्रमाणे चालत होतें तेव्हा मजकरवी धुरंधर यास हटकिले मी धुरंधरास हटकावें म्हणून स्वामीची पत्रें मजला जिवाजीपंतानी आणून दिल्ही. परंतु धुरंधराची रीत पाहून मी जिवाजीपंतास सांगितलें,

माझें बोलणें त्यास रुचणार नाहीं. चालल्या कामास नाश पडेल. त्यावर जिवाजीपंतानी मजला सांगितले, माझी फडणीसी धुरंधर जानोजीबावाच्या वेळेप्रो चालवीत नाहीत तर मी राहाणार नाही. पुण्यास जाईन. मजला श्रीमंताची पत्रें पुण्याहून आली आहेत, तुम्हास आली आहेत. मजला निरोप देवणें, मी पुण्यास जातो, म्हणून निग्रह मजपासीं केला. त्यावरून धुरंधर यांस विचारले. जिवाजीपंताची फडणीसी पहिल्याप्रमाणे चालवावी किंवा मा।।रनीलेस पुण्यास श्रीमंतानी बलाविलें आहे त्यास निरोप द्यावा, मार्गीचे निभावणीस स्वार द्यावे. इतकें म्हणताच जिवाजीपंतावर रागे भरून भाषणे केली, ती लिहावयाची नाहीत. त्याच वेळेस मा।। रनीलेकडे फडणीसी चालत होती ती बंद केली. ते मजला संकट प्राप्त जाहालें. माझ्या बोलण्याने काम याचे नासले. त्याजवर मोठ्या प्रयत्नाने फडणीसी चालावी असें करून धुरंधर याचे व जिवाजीपंताचे येकचित करून दिल्हें. रा।। बलवंतराव याजसमागमें मा।।निलेची रवानगी करून देविली. तेव्हां फडणीसीचे काम दिवाकरपंताच्यावेळेप्रो चालतें जाहालें. ते हा कालवर चालत आलें. हली जिवाजीपंत यास दसरियाची वस्त्रे धुरंधर याणी पा। होती. ती वस्त्रे मा।।निलेच्या चितास न आली, म्हणून पुण्याहून नागपुरास धुरंधर यांजकडे मा।।रनिले यांणी पाठविली, ती येऊन पोंहचली. त्यावेलेस मनस्वी भाषणे करून फडणीसीचे काम मा।।रनिलेचा कारकून येथे करीत होता, ते बंद केले. त्यास महिना होत आला आहे. जिवाजीपंताच्या नांवे पत्रही आतां लिहीत नाहीत. येक वेल मुनसी यांणी लिहिलें, त्यास रागें भरले. याप्रो वर्तमान जिवाजीपंत याच्या फडणीसीचें जाहाले आहे. जिवाजीपंत तिकडील उपर दाखवितात, हा रोष मोठा आहे. धुरंधर यांचा रोष जिवाजीपंतावर आहे. कचे वर्तमान जाहालें तसें लिहिलें आहे. याजवरून माझी विनंतीपत्रें मा।।रनिलेस दाखवावयाची नाहीत. मा।।रनिले सांगतील तितके श्रवण करावें. माझ्या विनंतीपैकी त्यास कलवावयाचें नाही. त्याची प्रकृत मजला माहीत आहे याजकरिता विनंती लिहिली आहे. तानकोपंत तेथून बातनी लिहितो. मन मानेल तशा गोष्टी लिहितो. त्याजपैकी कांही खऱ्या असेही नाहीं. सिंदे येथील कारभारियास मोजीत नाहीत. टिपूच्या मसलतीकरितां पलटणे घेऊन येतात. सिंद्याच्या आज्ञेत यांस चालणे प्राप्त आहे. होलकर चितात खटे आहेत. टिपू यांचे लिहिले मानीत नाही. नवाब तर खातरेस आणीत नाही. कारभारी आपला भ्रम राखून घेतात. लोकास पैका फौजेस देत नाहीत. वतनीमनसुब्याचे कजिये लाऊन ठेविले आहेत, त्या दाबाने फौज जमा करितात. लोक बेदिल आहेत. दादासाहेबाकडे नवाबाकडून कोणी अहस्त येऊन बोलून

गेला त्यास दादासाहेबानी वस्त्रें दिल्ही. त्याउपर जासुद पत्रें घेऊन आले होते ते जात होते त्यास धरून पुण्यास आणून फैदेत ठेविले ते, वर्तमान नबाबाकडील, वकीलास कळलें त्यावरून वकीलाने जासुदास मागून घेतले याप्रो वर्तमाने मन मानेल तसी दहा बारा वद स्थानगीस लिहितो. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

ऐ. सं. ८८
फा नं १४
प क ४१

१७३

जानेवारी १७८२

श्री

सेवेसी विज्ञापना राजश्री बलवंतराव व जिवाजीपंत याणी पुण्याहून येथें राजश्री सेनाधुरंधर यास लिहून पाठविले जे, आतसबाजीया तयार करावयाचा सरंजाम येथें तलाश केला व सरकारांतही विनंती केली परंतु सरंजाम मिळत नाही याजकरिता तोटे व फटेचुर व हासन्या व भिल्या जरूर जलद पाठवून देयावे त्यावरून काल पत्र पावले त्याच क्षणी त्याच्या लिहिण्याप्रमाणें सरंजाम येथें तयार होता तोच सांडणीवरून पाठविला आहे जलद जावयाची ताकीद जाली आहे त्याप्रो पोहचतील सेनाधुरंधर व राजश्री सेनासाहेब यांचे येणे वहत नाही लग्नसमारंभाकरितां लग्नाचा अहेर श्रीमंतास करावा म्हणून बलवंतराव व जिवाजीपंत यास लिहिले आहे पोषाखी सगगे अहेरास येथून पाठवीत होते परंतु मर्जीस न आली याजकरितां तेथें जसी पाहिजेत तसी खरेदी करून, धावी म्हणून लि॥ आहे जव्हाहीर दागीने ४ पो मर्दानी दोन येक कंठी पांचव मोत्यांची वा॥ देणे पानडी हिऱ्या लोलक मोती व सिरपेच हिऱ्याचा येक मदनाइक येक पुष्पराग लोलक पाचेचा व जनानी दोन पैकी येक टीका लोलक मोती व तनमणी हिऱ्याचा येणे प्रमाणे पा॥ आहेत गडगनेर करावयाविसी उभयतानी परवानगीविसी लि॥ त्यावरून येथून गडगनेर श्रीमंतास करावें म्हणून परवानगी उभयतास लिहून पाठविले आहे त्याप्रमाणें तेथें उभयता गडगनेर करितील व अहेरही करितील आतसबाजीचा सरंजाम पोहचल्यावर तयार करितील धुरंधर याची प्रकृत येक सारखी चांगली आठ दिवस राहात नाही आठा दिवसात दोन वेळ विकार मूत्रास जाला ज्या वेळेस उपद्रव होतो त्यावेळेस वेदना मोठी होते असी स्थित आहे रामक्षेत्रास देवदर्शनास धुरंधर जाणार होते त्यास प्रकृतीमुळें न जावे असें निश्चयांत येऊन जाणे राहतें केले प्रकृत येकसारिखी पधरा दिवस पाहून पथ्य सुटून चांगलेपण दिसल्यास जावें असे ठरलें आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

र. नं. ८८ **१७४** जानेवारी १७८३
फा. नं. १४
प. क्र. नं. ४२

श्री

सेवेसी विज्ञापना. स्वामीनी मजला राजश्री सेनासाहेब सुभा श्रीमंताच्या लग्नास येतील त्यांजसमागमें येणें, राजश्री सेनाधुरंधर यांच्या शरीरी सावकास नसल्यास तुम्ही बोलून सेनासाहेबसुभा यांची रवानगी घडे तें करणे, डाकेची पत्रें साहावे दिवसीं येतात, लग्नास दिवस थोडे राहिले, परंतु निघाले असे वर्तमान येत नाही याचे कारण काय आहे किंवा रंगमेजीच आहे ते लिहून पाठवणे, म्हणजे आपली हौस येकीकडे ठेऊ म्हणून आज्ञा. त्यास सेनाधुरंधर याणी आपण जावें सेनासाहेबास येथें ठेवावे या प्रो यांचा मनसबा होता. त्यास शरीरव्यथा जाली यामुले सेनाधुरंधर यांचा विचार निघण्याचा राहिला. दोन तीन दिवस प्रकृत येकसारखी राहात नाही. तेव्हां पालखीत बसून अडीचशे कोस येतात ते कसें घडेल? अशक्तता येक व दुसरी व्यथा, तेव्हां पालखीचा हिसका कसा सोसतो. तेव्हां यांचे येणे घडत नाही. सेनासाहेबाची रवानगी करावी हा यांचा मनसबाच नव्हता. स्वामीचे पत्र येऊन पोहचले त्या दिवसी मुहूर्ताचा विचार करिवला. त्यास वसंतपंचमीपर्यंत मुहूर्त नाही. पंचमीस निघावे तेव्हां नवमी लग्नाची तीथ आटोपेत नाहीं. याजकरितां पंचमी पर्यंत शरीर प्रकृत नीट जाल्यास आपणच निघावें, मग सेनासाहेब कशास पुढें पाठवावे? लग्न आटोपते तर सेनासाहेबाची परवानगी करिते ही विनंती लि॥च आहे. आम्ही पुष्कल बोललों व बोलत आहों. दुखणे आम्हीच पाहातो. जेव्हां पुण्याकडील लग्नाची गोष्ट निघाली त्या वेलेस सेनाधुरंधर याणी आपल्या प्रकृतीस आराम नाही म्हणून श्रमी होऊन दोन दोन घटिका डोल्यानी पाणी काढावें हे आम्ही पाहात आहों. तेव्हां रंगामेजी कशावरून जाणावी. सेनासाहेब तर लग्नतीथ आटोपत नाही तेव्हां त्यास कशास पुढे पाठवावे? ही विनंती लिहिली आहे. तथापि पहिल्याने लग्नाची योजना कार्तिक मासी पुण्यांत जाली हे वर्तमान तानकोपंतानी येथें लिहिलें, त्यावरून मी विनंती मागेंच शेवेसी लिहिली आहे. त्यांत माघमासी श्रीमंताचे लग्न असेल तर आपल्या कन्येचे लग्न कर्तव्य आहे तेव्हां आमचें जाणे कसे घडेल हे भाषण याणी केले, ते मी उतरे करावयाची केली. त्यावरून यांचे येणे घडेल लग्नास असे दिसत नाही ही विनंती लि॥ होती. त्याचें उतरही आले जे, परीक्षा लग्नास आल्यावर कलेल म्हणून आले. येणे याचे घडत नाही म्हणून विनंती पूर्वीच मजला समजल्यावरून लि॥ आहे. मोठीच अडचण सेनाधुरंधर यास दुखण्याची व सेनासाहेबास मुहूर्ताची जाली म्हणून येणे घडत नाही. तशांत मुख्त्यार कारभारी

येथील स्वामीच्या जवल आहेत ते विनंती करीत असतील त्याजवरून ध्यानास येतच असेल तेव्हां रगामेजी कशावरून कलण्यांत येईल या प्रो वर्तमान आहे हे पत्र तात्यास मात्र कलवावे तिसऱ्यास कळू नये सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

क. मं ८८
फा मं १४
प क्र. ४६

१७५

जानेवारी १७८३

श्री

सेवेसी विज्ञापना मंडल्याकडील मजकूर तेजगडास ल्दाई जाली त्यासमई गोसावी व नरहरसा यांचा मोड होऊन पठाण सादतखान ठार जाहाला सर्व पळून तेजगडात गेले. बाहेरून मोर्चे रा॥ बापूजी नारायण व केसोपत यांणी लाविले बारा दिवस होते. नंतर रात्रीस गोसावी वगैर सारे पळून गेले तो मार्ग निराला होता मोरच्यावर बातमी कलताच पाठीवर फौज गेली त्यासी साहादतखान यांच्या भायाची गांठ पडली च्यार घटिका ल्दाई जालि यांवरून पाडाव आला घोडी बुनगे गव्यठले माणसे मारली गोसावी व नरहरसा व पासवानीन व लक्ष्मणसिंग यास फुरसत सांपडली याजमुळें त्यास जिकडे रात्री मार्ग मिलाला तिकडे पलाली गोसावी नर्मदेअलीकडे छपाऱ्यानजीक लछमदोडेस येऊन राहिला सिवदीच्या लोकानी गवंगवा केला तेथून सर्व टाकून देऊन रेवामुकुदपुराकडे गेला होता वरकड सर्व हेकटपणे धौरागडास येऊन राहिली किल्याची मजबुती करून आहेत तेजगडास अजितसिंग लोधी होता त्याणे सलूख करून ठाणे दिल्यावर केसोपंत व बापूजीपंत गव्यास आले मोरो विश्वनाथ यास वातनी कलताच वाहेर निघून गोंडासी लढाई करून मारून काढिले. नंतर मंडल्यातील बंदोबस्त करून आपण व रातगडवाला पठाण निघून गव्यास गेले विल्हेरीच्या ठाण्यास फौज पा॥ त्याजवा॥ नागे गोसावी याणी पा॥ होते. त्यांजकडे सिंधान करून गगागिरीच्या चेल्यानी मागिती फंद मांडला त्यांत गगागीरही येऊन सामील जाहला पंधरा दिवस राहून फिरून रेवामुकुंदपुराकडे पैका आणावयास व कुमक आणावयास गेला जमीयतीत चेले दोघे ठेविले. त्यांजवर केसोपंत व मोरोपंत जाऊन लढाई केली चार सा घटिका लढाई जाली. गोसावी मारले, मोड जाला दोन तीनशें ठार जाले. कांही जखमी जाले, बाकी झाडीत पलाले घोड्याचा लाग नाही म्हणून बाचून गेले येक चेला ठार जाहाला येकास गोसावी घेऊन गेले विल्हेरीचे ठाणें याणी कायम करून गोसावी यांच्या पाठलागास फौज पाठविली आहे. याप्रो पत्रें केसोपत व मोरोपंत याची

छ १ सफरची आली. रा॥ रघुनाथराव बलाल दमोईस आहेत. वरकड गोंडाचे पारपत्यास लागले आहेत. चेवरागडास मात्र खूल राहिले आहे. वरकड बंदोबस्त चांगला जाहला आहे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

रु. नं. ८८
फा. नं. १४
प. क्र. ५०

१७६

फेब्रुवारी १७८३

श्री

सेवेसी विज्ञापना. निरमलवाल्याने इंग्रज चाकरीस ठेविले होते. त्यातून येक इंग्रज सिकाकोलीकडे काही इंग्रजी पलटणें चाकर ठेऊन आणावयास पाठविला. यैवजाची हुंडी लाख दोन लाख रुपयाची बा॥ दिल्ही. त्यास पाच सात महिने जाहाले. इंग्रजाची बायको निरमलेस राहिली. आणिखीं आप्तविसी इंग्रज त्यांच्याही बाईका चार पांच व इंग्रज ठेविले ते चाकरीवर होते. त्यांजकडे चापम्यन इंग्रज येथें आला आहे याणे संधान केलें. कागद-पत्र चोरून याचे निर्मलेस व निर्मलेहून नागपुरास जात येत राहिले. निरमलवाल्याचा कारखाना तोफांचा निघून बाहीर लढाईची फौज राहिली, त्याचे मागें दोन कोसावर आहे. तेथें बायका व इंग्रज होते तेथून रात्रीस बाईकांस डोल्यांत बसऊन येके दिवसी काढून दिल्या. दुसरे दिवसीं इंग्रज च्यार पांच होते त्याणी फौजेत जातो म्हणून सांगून आपणहि बाडबिसादसुधा निघाले. ते चंद्रपूरच्या मार्गें पळून आले. हे वर्तमान निरमलवाल्यास कळतांच शेंभर स्वार व बुचणाचा भाऊ व्यंकटी यास धरून आणावयास पाठविले. पाठलाग करीत आले तो मार्गी पडताले वोझ्याची सांपडली व येक इंग्रज सापडला. तो धरून येका ठाण्यांत ठेऊन निमर्लेस लिहून पाठऊन आपण पुढे शोधास चालला. तो वणी म्हणून ठाणें चंद्रपूरचे नागपूरचे रस्त्यावर पंधरा वीस कोस आहे, नागपुराहून चालीस पंचेचालीस कोस आहे, तेथें वस्तीस संध्याकाली इंग्रज बायकास घेऊन आले. मागाहून स्वारही पता लावीत आले. त्यांची त्याची कटकट वाढली. हे वर्तमान कमाविसदार राजश्री सेनासाहेबसुभा यांजकडील आहे त्यास कललियावर त्याणे स्वारांस धुडाऊन काढिले. इतकियांत व्यंकटी मागून आला त्याणे कमाविसदारास बहुतप्रकारे सांगितले जे बायका व इंग्रज आमचे गुन्हेगार आहेत, आमच्या स्वाधीन करून देणें म्हणून आग्रह बहुत केला. का॥दार याणे उतर सांगितले जे कोणीही असली तरी आमच्या जाग्यांत आली. आम्ही तुमच्या स्वाधीन करीत नाही. आम्ही आपल्या खावंदास लिहून नागपुरास पाठऊन

उतर येईल त्या प्रो करू. तुमच्या स्वाधीन करीत नाहीं म्हणून सांगून माईका व इंग्रज गर्दीत ठेविली. नागपुरास पत्र सविस्तर लिहून पाठविलें. व्यंकटी नागपुरास आला त्याणे वर्तमान सांगितले सेनाधुरंधर यास सांगितले. मागाहून फत्तादारापासून येक इंग्रज चापम्यन याजकडे पत्रें वायकांची व इंग्रजाची घेऊन आला त्यावरून चापम्यन याणें सेनाधुरंधर यास सांगून पा॥ जे इंग्रज व वायका येथे आणवाव्या व त्यास कांही सरंजाम डेरा व राहुटी व खर्चास पाठवितों त्यावरून सेनाधुरंधर याणी उतर दिल्हे तुम्ही खर्चास व कांही डेरा राहुटी व माणूस येकंदर न पाठवणे, निरमलयाल्याच्या घरची गुन्हेगार आहेत ती माणसें तुमच्या स्वाधीन करावयाची नाही, म्हणून सांगितल्यावरून च्यापमन खटे जाले आहेत, व्यंकटी वायका व इंग्रज निर्मलेस न्याययावकरितां मागत होता त्याच्याहि स्वाधीन करीत नाही म्हणून उतर सांगितले. निरमलवाल्याची पत्रेंही वायका व इंग्रज याविसी आली आहेत, पाठऊन द्यावी, म्हणून, त्याचे उतर काय लिहितील व करितील ते जाहाल्यावर लिहून पाठवीन चापम्यन याणे फितूर करून निर्मलेहून वाहून आणिली असें जालें आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

क. नं ८८ **१७७** **फेब्रुवारी १७८३**
का नं १४
प. क्र. ८७ व १२४

श्री

सेवेसी विज्ञापना सोळा महाल प्रांत मडले येथील नर्मदा दक्षणतीरचे भोसले आपले म्हणतात त्यास सोळा महाल भोसल्यास दिल्हे कधीं, त्यापासून भोसल्याचा अमल तेथें राहिला न राहिला याची माहितगारी मजला नाही तीन महालचा अमल भोसले याजकडे चालत आहे ते महाल लांझी व खैरागड दरोबस्त हस्तगुत अमल व पसरिया जोरतलबी ऐसें तीन महाला चालत आहेत, बाकी राहिले महाल चालत नाहीत त्याचा उद्योग जानोजीबावानी फौज पाठवून केला होता, परंतु सिद्दीस गेला नाही संस्थानीक मजबूत होता याजमुळे संस्थानिकाने बाजपे कारभारी पाठऊन पनास हजार रुपये करार केले. या प्रो पाचसात सालें याजकडे निभावली नंतर खासा राजश्री सेनाधुरंधर फौज घेऊन गेले. उपाय ना चालला तेव्हां काही दरसाल साडेतीन लक्ष रुपयांचा करार करून घेतला व आपण पत्र कोणत्या अर्थे त्यास पाठविले असेल ते मजला माहीतगीरी नाही, त्या प्रमाणरूज मसलत ठेरून नागपुरास आले, इतक्याच पर्याय सोळा

महालच्या अमलाचा आहे. त्याअलीकडे विंसाजी गोविंद यांजकडे संधान लागले, यांचा इतला कांहीं जाहला नाही. विसाजीपंत मारले गेले. त्यावर फौज पाठवितों म्हणून रा॥ बलवंतराव विष्णु व भवानीपंत मुनसी मजपासी सांगावयास आले. आम्ही उतम आहे म्हणून सेनाधुरंधर यासी सांगितले. त्यावर फौजेची रवानगीची याद लिहून, लोकास बलांवणी पाठवणें म्हणून सांगून, तयारी करविली. तिसरे दिवसी फौजेस पोटास तुम्ही द्याल तर फौज जाईल, पोटावीना फौजेचे जाणे बरसातीत होत नाही, लोकाचे देणे तीन सालाचे राहिले आहे, पैक्या वाचून लोक निघत नाहीत, म्हणून सेनाधुरंधर यांचा निरोप बलवंतराव व मुनसी घेऊन आले. त्या वेलेस उभयतास मी विचारले जे, तुम्ही अगोधर काय बोलत होता, आता निरोप काय घेऊन आला; हे तुम्हास चांगले दिसते की काय? तेव्हा उभयेतानी उतर केले जे, आम्ही काय करावे? आमच्या शक्तीनुरूप आम्ही येजमानासी बहुता रीतीने बोलावयास ठेविले नाही. परंतु खाविंदाची मर्जी, आम्ही चाकर लोक, म्हणून सांगावयास लागले. तेव्हां या गोष्टीचा शोध मनास आणितां, गोसावि याजकडून महमद अमीखान याजकडून संधान धुरंधर याजकडे आले जे, तुम्ही कुमक सागरवाल्याची न करावी, तुम्हास आम्ही कांही पैका देऊ. किती देऊ याचे आंखाची बेरीज कलली नाही. हे गोष्ट जाल्यावर धुरंधर यांणी फौज पाठवावयाची योजना केली होती, त्या गोष्टीचा आलस केला. फौजेस पोटास पाहिजे, तुम्ही करार करून पैका देवावा म्हणजे फौज जाईल, याप्रमाणें टालाटाल करावयास लागले. धुरंधर यासी बहुता रीतीने सांगितले व मंडल्याहून कागद मोरोपंताचे आले तेही दाखविले. परंतु गोसावियाच्या बोलण्यावरून यांच्या खातरेस कांही आले नाही, सागरवाले बुडाले हीच समज यांची होती. सेवटीचे पत्र मोरोपंताचे आले, त्यावेलेस धुरंधर यांजवल पनास राऊत पागेचे मात्र मागीतले, तेही अनकूल जाहाले नाहीत. यास कारण गोसांवी यांचा इतबार मोठा मानिला होता. त्याउपरी खावंदाच्या प्रतापे करून गोसावि याचे पारपत्य जाहालें, तेव्हां सारे मनसबे यांचे राहिले. मग सागरवाल्याचा स्तव, श्रीमंतांचे दैव, वर्णावयास लागले. त्याउपरी चौरागडास सागरकरांची फौज येऊन पोहचली. तेव्हां सोला महाल आमचे अम्हास द्यावे म्हणून मजपासी बोलावयास लागले. तुम्ही लिहून सोला महालचे काम घडऊन द्यात्रे व आम्ही बलवंतराव यास लिहितों, परंतु तुमच्या लिहिल्याने काम घडेल. तेव्हां मी उतर केले जे, आमच्या लिहिण्याने वडिलाच्या लिहिण्याने सोला माहालाचे काम होणे, ते तुम्ही खासां पुण्यास जाणार आहा, तेथे गेल्यावर परस्परे भेटी जाहाल्यावर आणिखी कितीयेक मजकूर मनसब्याचे घरगती व इतर बोलण्यांत येतील, त्या समई सोला महालचे काम सहजात होईल, या वेलेस सर्वथैव घडत नाही, म्हणून

सांगितल्यावर मर्जी दिक जाहाली त्याउपरी बळवंतराव यास वारंवार पत्रें सोळा महाला-
मिसी लिहावयास लागले आहेत बलवंतराव याची पत्रें यांस येतात कीं काम करून घेतो
मुनसीनी धुरधर याजवळ हंमी घरली आहे जे, सदाशिवपंतानी आपल्या जाण्यावर सोळा
माहालचे काम ठेविले आहे, तर चिंता काय आहे, मी पत्र लिहून सोळा महालच्या सनदा
येथें आणवितों आपल्या जाण्यावर सोळा महाल मिळावें ही काय गोष्ट आहे ? याप्रमाणे
भरंवसा घेऊन पत्रें लिहावयास लागले आहेत दिवाकरपतदादा होते त्या वेळेचा कारभार
अलीकडे शतांश प्रमाणीकतेचा नाही क्रिया व शफता व लिहिलीयाचा विधिनिशेष
धुरधर यांस तिळप्राय नाहीं आपला मतलब सिधीस गेला, म्हणजे जाहाली गोष्ट तिचा
उचारही नाही प्रसंग पडल्यास शफत जसी पाहिजे तसी करितात पुढे निभाव्णी शफतेची
कसी होइल, याची काळजी वाळगीत नाहीत जर शफतेची काळजी वाणी बाळगावी, तर
दिवसातून दहावीस वेळ कामामुळे शफतेचे प्रयोजन पडते तेव्हां कराबी लागते कामावर
द्रष्ट आहे, शफतेच्या निभावणीवर नाही मलवंतराव व जिवाजीपंत तेथून यास लिहितात
ते सारे यांस प्रमाण वाटत नाही स्वार्थाची गोष्ट असेल ती खरी मानितात तिचा उपयोगहि
करितात परार्थाची गोष्ट असेल तिचे कालहरण करून उपहास करितात हे सर्वास येथें
दिसत आहे दिवाकरपंतदादाच्या अंगी यांस वर्तवावयाचे सामर्थ्य होतें त्याप्रमाणे तो
पुरुष करीत होता आलीकडे कारभारी आहेत याचे सामर्थ्य धुरंधर यास मार्गाने चालवा-
वयाचे तिळप्राय नाही आज्ञाधारक खुशामतीरितीने वर्तणूक करून कारभारी म्हणवितात
कोणाच्या आंगी कांही सामर्थ्य नाहीं सोळा महाल भोसल्यास देणे तर सेनाधुरंधर पुण्यास
येऊन पोहचतील, आपली भेट होऊन बोलणी होतील, नंतर सोळा महाल यांस द्यावे हे
चांगले आहे किंवा मजला यांचे अंतःकरण शुध आहे असें दिसेल, तेव्हा विनती लिहून
पाठविन त्याकाळी द्यावें ते चांगले व उपयोगास पडेल मलवंतराव व जिवाजीपत तेथें
बोलतात व येथून धुरधर व मुनसी उभयेतास लिहितात व स्वामीस लिहितात, याजवरून
सोळा महाल दिल्यास याजकडून बोलण्याप्रमाणे व लिहिण्याप्रमाणे उपयोग सर्वैव पडा
वयाचा नाही याहीवर स्वामीची मर्जी असेल तसें करण्यांत येईल मजला येथें अनुभवास
व दिसण्यात आले व येत आहे, त्याप्रमाणें विनती लिहिली आहे पुढें कर्णे स्वामीचे
मर्जीचे आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

रु. नं. ८८
फा. नं. १४
प. क्र. १८०

१७८

फेब्रुआरी १७८३

श्री

सेवेसी विज्ञापना. इंग्रजी व फरासीसी जाहाजाची लढाई गंजामाकडे समुद्रांत जाहाली. फरासीसानी इंग्रजाची सिकस्ती केली. कांही जाहाजे फोडून पाण्यांत बुडविली. कांही धरून घेतली. इंग्रज मारले धरून घेतले. पुढें कलकत्याकडे जावयाची वदंता आहे. बंगालाप्रांती गडवड बहुत जाहाली आहे. कलकत्यासहि गडवड जाहाली आहे. म्हणून सावकारी लिहिली नागपुरांत आली आहेत. इंग्रजाच्या घरी इंग्रज येथें बोलतात जे, फरासीस आले होते त्याची जहाजे घेतली, बुडविली, फरासीस मारले, म्हणतात. यांतून सत्य कोणती गोष्ट कलत नाही. सावकारी लिहिलें तर या प्रमाणें आहे. कटकास व गंजामास अंतर थोडा आहे. राजारामपंत कटकचे सुभेदार नागपुरास गुदस्तां आले. येक वरीषपर्यंत हिसेबास लागला. फडशा होऊन दोन महिने निरोप जाला होता. कांही किरकोल जाबसालाकरितां अटकले होते. काल सर्व गुंते त्यांचे उरकून देऊन राजश्री सेनाधुरंधर यानी निरोप दिल्हा. येकादों दिवसी जातील. प्रस्थानाने कोसावर राहुट्या देऊन राहिले आहेत. राजश्री माधवराव गंगाधर यांस निरोप जाहाला. छ १२ रा॥वली निघून गेले आहेत. त्याणी धुरंधर याची प्रकृत पाहिली आहे. निवेदितील त्यावरून ध्यानास येईल. त्याजवल भाषणे कितीक स्वराज्याच्या कलकलीची धुरंधर यांणी आपल्यास निवेदन करावें म्हणून केली आहेत, तीं सर्व सांगतील त्यावरून ध्यानास येईल. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

रु. नं. ८८
फा. नं. १४
प. क्र. ६६

१७९

२७ मार्च १७८३

श्री

पो छ २९ रा॥खर चैत्र सलास

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

सेवक सदाशिव राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायेत छ २३ रबिलाखर यथास्थीत असे विशेष. राजश्री सेनाधुरंधर यांची शरीरप्रकृत नीट

आरोग्यतेस येत नाही उपाय करावयाचे ते करीत आहेत. चौदियसी दोदियसी मूत्राचा अवरोध होतो याप्रमाणे आहे चापमन इंग्रजाचा वकील येथे आहे त्याणे सेनाधुरंधर यांस सागून पाठविले आपला वकील कलकत्यास इमादुदौलाजवल होता तो विलायतेस गेला. दोन तीन महिने जाहाले आपल्या साधीन मामलत पनास लक्षाची आहे जावसाल काम काज तेथे करावयास कोणी कलकत्यास नाही काम बुडते याजकरितां आपल्याजवल छोटासाहेब यास पाठवावे लागतें, तुम्ही निरोप द्यावा त्यावरून धुरधर याणी उतर दिल्हे जे, या समई न पाठयावे पुढें सांगू तेव्हां पाठऊन देणें. त्यावर चापमन याणे येऊन सांगितले, तुम्ही निरोप दिल्हा तर उतम आहे, पाठवितो न दिल्हा तरी माझे घर बुडते. तेव्हां मजला पाठविणे प्राप्त आहे, मी पाठवितो. असा आग्रह त्याचा पाहून धुरंधर याणी छोटासाहेब यास कलकत्यास जावयास निरोप छ २१ तारखेस रात्री दिल्हा निरोप समई वस्त्रें चार सणगे व सिरपेच व घोडा येक सामान्य प्रतीचा व खर्चास दोन हजार रुपये देऊन विदाई केली छ २२ रोजी प्रात काली छोटासाहेब निघून आपला सरंजाम येक हती बसावयाचा व पाल्खी बीस ऊट तेलंगे गारदी दोनसे घेऊन निघून दाहा कोस गेला पुढें कटकावरून बालेसर बंदरास जाणार. तेथून जाहाजात बसून कलकत्यास जाणार आहे छोटासाहेब यास निरोपसमई धुरंधर यांणी इमादुदौलाजवल बोल्णे म्हणून सांगितले आहे जे, तुम्ही सलुख करीत नाही ही गोष्ट चांगली नाही हैदरअलीखान मारला, बीदरूर तुम्हास दग्याने मिलालें म्हणून हांवभरी व्हाल तर न होणे. नवाबाच्या घरातील फिसाद आठ दहा वर्षे होती, ती हलीं तुटली नवाब मोकले जाहाले आहेत आजपर्यंत या फिसादीमुले नवाव मागे पुढें पाहात होते. आतां पाहाणार नाहीत सारी दक्षण या उपरी येक होऊ पाहल्े, असे आम्हास समजले आहे याजकरितां तुम्ही मतलबी मनसबा कराल तर परिणाम तुमचा चांगला नाही म्हणून व पत्रेंही कलकत्यास वेणीराम सिवभद्र यास व इमादुदौलास याचप्रो लिहून पाठविली आहेत धुरंधर यांच्या दुखण्यामुलें सिमग्याचा रागरंग या सालात अगदी येथें जहाला नाहीं पचमीच्या दिवसी शास्त्रार्थ राजश्री सेनासाहेबसुभा व राजश्री सेनाबहादर व राजश्री व्यकोजी भोसले याजकरवी वाड्याजवल डेराचांदणी देऊन सिलेदार घोडेसे बलाऊन च्यार घटिका संध्याकाली रग करिवला इतकेच जाले. त्याच रात्रीस धुरंधरास मूत्राचा उपद्रव जाहाला रंगास धुरंधर आले नव्हते. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

रु. नं. ८८
फा. नं. १४
प. क्र. १३४

१८०

२५ मे १७८३

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

सेवक सदाशिव राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायेत छ २३ जमादिलाखर यथास्थीत असे विशेष. प्रांत गढेंपैकी नर्मदा दक्षणतीरचे सोला महाल राजश्री सेनासाहेबसुभा यांस दिल्हे आहेत. त्याजविसी पेशजी दोनतीन पत्रीं विनंती तपसिलें लिहीलीच आहे, त्यावरून ध्यानांत आलें असेल. अलीकडे राजश्री बलवंतरावजी याणी लिहून पाठविले जे, श्रीमंतानी बोलण्यांत आणिले तुम्हास सोला महाल दिल्हे याच्या सनदा कशा आहेत त्या आणवाव्या त्यावरून लिहिले आहे तर सनदा पाठवून द्याव्या म्हणून. त्यावरून राजश्री सेनाधुरंधर याणी सनदा काढून पाहिल्या. मजला दाखविल्या त्याच्या नकला करून मा।रनिलेकडे पाठविल्या आहेत. नानासाहेबानी रघोजीबावा यांस सोला महालाच्या सनदा करून दिल्ह्या आहेत त्या दिवसापासून यांचा अमल तेथे लागू व्हावा. तो स्वराज्याच्या मसलतीमुळें फावले नाहीं. संस्थानीक मवासी जाह्ला, मोहीमेखेरीज अमल न बसे. देसीं मसलती पडल्या याजमुले यासही जावयास बनले नाही. दोनच्यार वेल मोहीम आजपर्यंत मागे त्या प्रांती केली. संस्थानीकानी करारमदारही केला होता. फिरून बदमामली केली. जानोजीबावांच्या वेलेस संस्थानीकांनी करार पंनास हजार रुपयांचा करून दिल्हा त्याप्रों पांच सात वर्षे निभावणी केली. त्याउपरी बदमामलीस आले. नंतर सेनाधुरंधर यांणी स्वारी केली. तेव्हां साडेतीन लक्ष रुपये मागील बाकीच्या यैवजी करार केला असता स्वारी जाल्यावर बदमामलीस आले. जोरतलबी मुलुक याजमुलें अमल सनदाप्रमाणें चालला नाहीं. व संस्थानीक बदमामली होता. सरकारांतून यांस सोला महाल मिलाले असतां संस्थानिकाने अमल दिल्हा नाही. सरकारात ज्या वेलेस याणी ताकीदपत्रें संस्थानिकास मागितली त्या वेलेस दिल्हींच आहेत. सोला महालाविसी सेनाधुरंधर यांचे बोलणे मजसी जाहाले. त्याचा विस्तार पेसजी दोन तीन वेल विनंतीपत्री लिहिला आहे. त्यावरून विदित असेल. हली बलवंतराव व जिवाजीपंत येविसी विनंती करीत आहेत ते ध्यानास येऊन सोला माहालचा अमल यांजकडे चाले असें करणें स्वामीकडे आहे. सेनाधुरंधर याची प्रकृत बरी आहे. उपद्रव कोणताही नाही. सामर्थ्य शरीरांत न्यून आहे ते दिवसेंदिवस येईल. नवाब निर्मलेसच आहेत. येतेशामजंग याची रवानगी आलजपुरास करून नंतर आपण जावें ही योजना आहे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

ना० भो० २५

र मं ८८
फा मं १४
प क्र. ६७

१८१

४ जुलै १७८३

श्री

पो छ १६ सावान भार्या समानीन

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

सेवक सदाशिव राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना, येथील कुशल तागायत छ ३ शावान यथास्थीत असे विशेष स्वामीनी श्रीमताचा विवाह जाल्याची वर्खे राजश्री मुधोजी भोसले सेनाधुरंधर व राजश्री रघोजी भोसले सेनासाहेबसुभा व राजश्री खंडोजी भोसले सेनाबहादर, राजश्री व्यंकोजी भोसले व राजश्री परसोजी भोसले व बायका जानोजी भोसले यांच्या स्त्रिया सगुणाबाई व गुणवताबाइ व धुरंधर यांच्या स्त्रिया सौभाग्यवती चिमाबाई व सौ कमलजाबाइ व सेनासाहेबसुभा याची स्त्री सौ गजराबाई व सेनाबहादर याची स्त्री सौ गंगाबाइ व व्यंकाजी भोसले यांची स्त्री सौ कृष्णाबाई व कन्या बालाबाई व ठकुबाई व येमुनाबाई व कारभारी राजश्री भवानी नागनाथ व राजश्री भवानी काळो यांस व पत्रें सुतरस्वारजोडीवा। सेवकास येसी पाठविली ती येऊन पोहचली पत्रें नेऊन धुरंधर यांच्यासमक्ष सर्वांस दिल्ही वाचून पाहून बहुत संतोपास पावले व वर्खे सदरहू नावनिसीप्रमाणे ज्याची त्यास दिल्ही ती घेऊन स्वीकार केला त्या समई धुरधर याणी बोलण्यांत आणिलें, ही वखे आम्ही पुण्यांत घ्यावी असा हेत आमचा होता, परंतु शरीरप्रकृतीमुळे तेथे जाणे न घडलें याजकरितां चिताचा उल्हास राहिला आहे तो कोणे दिवसी घडतो हे गोष्ट मनांत निख राहिली आहे ती घडविणे देवाच्या स्वाधीन म्हणून त्याउपर धुरंधर याची परवानगी घेऊन सेनासाहेबसुभा यांस समागमे घेऊन वाड्यातील बायकांची वर्खे सदरहू नावनिसीप्रमाणें दिल्ही त्याणी घेऊन संतोपास पावली उतरे सर्वांची घेऊन वर्खे पावल्याची रवाना केली आहेत सेवकाने वर्खे घेऊन मस्तकी वंदन करून कृतार्थ जाहालो सुतरस्वार जोडी रवाना करून दिल्ही आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

र. मं ८८
फा मं १४
प क्र ६९

१८२

१९ जुलै १७८३

श्री

पो छ २८ सावान सन आर्बा
मापाढमास

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

सेवक सदाशिव राम कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायेत छ १८ सावान यथास्थीत असे विशेष राजश्री सेनाधुरंधर यांची शरीर प्रकृत चांगली

जाली आहे. स्वारी सिकार जाणें येणे घडत असतें. निरमलवाला अलजपुरास सुभ्याचे काम करून घेऊन येऊन राहिला आहे. त्याची वर्तणूक चांगली नाही. मागाहून साबितजंगाचा पुत्र येत आहे. त्याणे उमरखेडास उपसर्ग दिल्हा व आणिखी गावगना उपद्रव देतच येत आहे म्हणून वर्तमान तिकडील लिहिले आले. त्यावरून धुरंधर याणी वहुत विस्मय मानिला. याउपरी पुढें कसें करावे येविसी कितिक अर्थ बोलण्यात आणिले, ते अलाहिदा पुरवणी-पत्री विनंती लिहिली आहे त्यावरून ध्यानास येईल. स्वराज्याची कलकल सार्वकाल धुरंधर यांस आहे. कोणत्या उपायें करून वृधीस पावेल ही योजना करीत असतात. राजश्री बलवंतराव व जिवाजीपंत यांस लिहिले आहे त्याप्रमाणें उभयता विनंती करितील त्यावरून ध्यानात येईल. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

र. नं. ८८
फा. नं. १४
प. क्र. १७३

१८३

नोव्हेंबर १७८३

श्री

सेवेसी विज्ञापना. मिस्तर॰ च्यापम्यन यास नागपुरीं आल्यास दोन वर्षें होत आलीं. ज्या अर्थी येणे तो अर्थ परस्परें सिद्ध जाहाला. तेंव्हां येथील निरोप जाला म्हणजे जावें हें मिस्तर मजकुराचें मानस व निरोप द्यावा हें राजश्री सेनाधुरंधर यांचेंही मानस. परंतु कलकत्याहून लिहिलें आल्याविना निरोप मागतां नये म्हणून राहिले होते. सांप्रत कलकत्याहून पत्रें इंग्रजास आलीं जे, निरोप घेऊन येणे. त्यावरून निरोप मागित-ला. सेनाधुरंधर याणी निरोप दिल्हा. निरोपसमई च्यापम्यनास पैठणी सेला व तिवट व जामेवार व किमखाप येकून च्यार सणगें व सिरपेंच व जीगा व हती १ व घोडे २ या-प्रमाणे दिले. दुसरा डांकथर समागमे होता त्यासही च्यार सणगें व सिरपेंच व घोडा दिला. आणिखी दोघे संभावित होते त्यांस वस्त्रें दिलीं व मिस्तर यास खर्चीस दिले. छ ५ रोजीं निघोन गढ्याच्या मार्गे गेले. आधी कासीस जाऊन जलमार्गें पुढें जाणार. मिस्तर मजकूर यांसीं धुरंधर याणी आपल्या बंगाल्यांतील अमलाविसी मागील व पुढें चालता व्हावा हें बोलण्यांत आणिलें. त्याचें उतर केलें जे, कलकत्यास जाऊन इमादुदौला यांस सर्व सांगोन उतरें होतील त्याप्रमाणे लिहून पाठवितों म्हणून बोलोन गेले. आणिखी दोघे-जण यासमागमें मातबर होते. त्यांत छोटा साहेब वैशाखमासी गेला. दुसरा होट साहेब बालाबाई यात्रेस गेलीं त्यांसमागमे पाठविला. आतां कोणी त्याजपैकीं येथें राहिला नाही. राजश्री भवानी कालो याचे ज्येष्ठ पुत्र बलवंतराव याच्या नेत्रांस पीडा जाहाली आहे. येक वरीश जाहाले. येथें वैद्यानी उपाय केले परंतु गुणावह जाहाले नाही. याजकरितां हणम-

कुंडा हैदराबादकडे आहे तेथें वैद्य कोणी आहे, त्याजकडे उपाय करावयाकरितां आज निघून गेले आहेत सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

क. म ८८
फा मं १४
प क्र २६

१८४

१७८३ अखेर

श्री

सेवेसी विज्ञापना का॥ सिरसगाव प्रांत वऱ्हाड हा गांव दियाकरपतदादा यांस सरकारातून होता, तो हाली सरकारात आहे सरकार तर्फेचे कमाविसदार का॥ मजकुरी आहेत तेथें येतेशामजंग यांणी पागा राहावयास पाठविली आहे महिपतराव माजी कमाविसदार आपला अमल करीत होते त्यास येक कुलकर्णीयाजकडे पैका महिपतराव याजकडील अमलाचा येणे होता म्हणून माणूस पाठीमागें लाविला होता कुलकर्णीयास घेऊन माणूस महिपतरायाचा॥ वाड्यांत यांच्या आणीत असतां पागेवाले कुलकर्णी यास न्यावयास आले नेऊ लागले यांच्या माणसाने दिल्हा नाही तेव्हां जबरदस्ती करू लागले. माणसाने मानिले नाही तेव्हां कलागतीस येऊन माणसास हाणमार केली त्या माणसाने जेथपर्यंत सोसले तेथपर्यंत साहिले. न सोसे ऐसें जाहाले, काठ्या लागून हात मार्या जाहाला, तेव्हां तरवार काढून त्याजकडील माणसें दोन चार जखमी करून मार्गे सारले. माणसासही जखम त्याजकडून आगोधर लागली होती त्याउपरी याणे त्याजकडील चार पांच जखमी करुन त्यास मागे सारून आपण वाड्यांत आला पागेवाले सेपनास मिळून महिपतरायाच्या वाड्यावर चालून आले मनस्वी भापणें करू लागले याणी दहावीस माणसें दरवाज्यावर उभी केली. चार सहा घटिका त्याणी दबावणी करून पाहिली हे भय पावले नाहीत झुंजावयास सिध जाहाले असें पाहून माघारें गेले त्याउपरी सलुखाचे बोलणें करून करारमदार करून मध्यस्त देऊन ज्या माणसावर तरवार धरिली त्यांस कांही करीत नाही असें सांगून संतोषाने त्यास पहावयास म्हणून याजपासून मागून घेऊन पागेत नेला तो अळजपुरास जंगाकडे लाऊन दिल्हा आपण आणखी जमीयत करून याच्या वाड्यावर चालून आले तेव्हां महिपतराव याणी मागती दरवाजाची खबरदारी करून त्यांस आत येऊ दिल्हे नाहीत चारसहा घटिका पावेतों राहून माघारे गेले. त्याउपरी अळजपुराहून जंगाने स्वारी महिपतराव याजवर पाठविली हें वर्तमान महिपतराव यास कळतांच वाड्यांतून सवा येक ब्राह्मण व येक घोडे व येक माणूस घेऊन रात्रीच देऊरवाडे गाव सलाबतखान यांचे ठाणे आहे तेथें गढीत येऊन राहिला . दुसरे दिवसी दोनसे माणसें व स्वार देऊन वाड्यास महिपतराव यास धरून न्यावयास आले. सलाबतखान

याजकडील लोकांनी हाती दिल्हा नाही. कलागत मोठी जंगाकडील व खानाकडील लोकांची वाडावी हे वर्तमान आलजपुरास सलावतखानास कललें तेव्हां जंगास सांगून माणसें व स्वार माघारे आपल्या गांवातून नेवविले. महिपतराव याजविसी सलावतखान याणी जंगास बहुत प्रकारे समजाविले. श्रीमंताचा कमाविसदार आहे, यासी तुम्ही दुसरा प्रकार धरूं नये, तुमचा स्नेह त्यांसी चालला आहे. जावितजंग याणी स्नेह संपादिला असतां तुम्ही त्यांच्या कमाविसदाराचे पारपत्य करूं म्हणतां हे ठीक नाही. पुढें गोष्ट दूरवर लागेल, स्नेहात तुमच्याकडून अंतर पडेल, म्हणजे तिकडून वदला घडेल, इतके सांगितले असतां मानिले नाही. कमाविसदाराकरतां सलावतखानासी विरुद्धता करावी असें मानस जंगाचे पाहिले. तेव्हा जंगाने महिपतराव यास आपल्या गांवातून काढून दिल्हें. समागमे सेपनास माणुस दाहापांच कोस काढून दिल्हा. हे वर्तमान महिपतराव याणे येथें लि।। ते राजश्री सेनाधुरंधर यांस सांगितले. त्यावरून जंगाकडील वकील लुतफलिखान होता त्यास याणी सागितले, ही गोष्ट वरी नाही. तुम्ही आमच्यासी खटला करितां व कमावीसदारास राहू देत नाही तरी आम्ही कमाविसदार राही असें करूं. तेव्हां तुमची आमची कटकट वाढेल. यात चांगले नाहीं. याजकरितां जंगास सांगून आम्हास पत्र पाठऊन देणे. जंगाचे पत्र आम्हास का।दारास प।। देणे म्हणून आल्यावर का।दार पाठऊन देऊ म्हणून सांगून वकील अलजापुरास जात होता त्यास रवाना केला आहे. वकीलाने कवूल करून गेला आहे. महिपतराव नागपुरांत आहे. चीजवस्त घोडी पागेवाले याणी सिरसगांवीहून यांच्या वाड्यातून महिपतरायाची नेली, याप्रो वर्तमान आले आहे. जग शरावी आहे. याचे पारपत्य कोणीकडून घडते तर मार्गावर येता. ते गोष्ट घडत नाही. गुदस्ता उमरखेडची गत केली ती पचली. काही जाले नाही याजमुले जे करीन ते चालतें जाणून मनस्वी करीत आहे. हुंडाभाडा याचाही अमल चालू देत नाही. नवावाच्या पत्रास मानीत नाही. महिपतराव पळून आला म्हणून वांचला. सापडता तर जिवे मारला जाता. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

रु. नं. ८८
फा. नं. १४
प. क्र. ७५

१८५

जानेवारी १७८४

श्री

सेवेसी विज्ञापना. वस्तरचे राज्य अव्यवस्थीत जाहालें. राजा कर्ता होता तो मृत्य पावला. त्यास बहुत दिवस जाहाले. मवासानी किले व संस्थान बलकाऊन बसले. राणी व राज्याचा पुत्र आहे त्यास मानीत नाहीत. याजकरितां राणी येथे येऊन वरीषभर राहिली आहे. धुरंधर यांस तुम्ही आपली फौज देऊन आपले राज्य कायम करून द्यावें म्हणजे

तुम्हांस निमे राज्य देऊं याप्रमाणे म्हणत आहे त्यावरून धुरंधर याणी राणीचें लिहिले करून घेतले जे, तीन हिसे राज्याचा मुलुक यांस द्यावा व चौथाई मुलुक राणीस द्यावा राणीचा पुत्र आहे त्यास राज्यावर बसवावा याप्रों करार करून घेऊन गोविंदराव मुगुटराय सरदार नवाबाकडे चाकरीस होता, तिकडून याजकडेस आला, पहिला साबाजीबाबाच्या लढाइच्या वेलेस यांजवल चाकरीस होता आटोले यांच्या प्रांतात राहात असतो त्यास वस्तरची मोहीम सांगून रवाना करीत आहेत व्यंकटराव कासी परसु दादासाहेबांच्या वेलेस वकीलीस होता त्यास दिवाणगिरी सांगितली छ १० सफरी गोविंदराव व व्यंकटराव यासी वस्रें दिल्हीं गोविंदराव यास सिरपेच दोन अडीचशांचा दिल्हा समागमें कांही पागेची घोडी येथून देणार आहेत वरकड फौज गोविंदराव याणे तिकडे ठेवावी, पैका तिकडेच मेलवावा, फौजेस देऊन मुलुक सोडवावा, फौजेचें देणें इकडे आणू नये याप्रमाणें करार आहे वस्तरचा मुलुक गव्यामपर्यंत आहे सिकाकोल्ची सरद मेंढा आहे कटक जवलच आहे चालीस पनास लक्षाचा मुलुक आबादी जाल्हाली तर आहे गोविंदराव मुगुटराव लगान्या चांगला आहे. आठा चौ दिवसानी रवानगी येथून होईल राणीचा कारभारी गोविंदराव याजसमागमे दिल्हा आहे राणीस नागपुरात ठेऊन घेतली आहे खर्चास धुरधर दरमहा देत आहेत. भुपाल्कर पठाण गुदस्ता मृत्यु पावला त्याचे गुलाम होते त्यांणी संस्थान बल्काऊन पठाणीण खासी होती तिजला अटकेत ठेविली आहे पठाणणीकडून संधान धुरधर याजकडे आले जे, तुम्ही कुमक आपली करून संस्थान आपल्या जिमे करून द्यावे. गुलामास मारून काढावें म्हणजे तुम्हास संस्थान पैकी कांही मुलुक देऊं त्यास धुरंधर याणी चितावर घेतले नाही अहिल्याबाईकडे पठाणणीने सांगून पाठविले होतें त्यावरून अहिल्याबाईनी कांही स्वार जो संधान घेऊन गेला त्याज बा। दिल्हे होते, त्याची लढाई भुपालकरासी जाली तेव्हां स्वार घेऊन गेला होता त्याचा मोड जाहाला तेव्हां पळून अहिल्याबाईकडे गेला त्याउपरी पेंढारी पांच हजार अहिल्याबाईनी त्याच्या समागमे दिल्हे ते घेऊन भुपालाकडे जावे या अर्थे मकडाइकडून जात आहे मकडाई परगणियाचे गांव सिंदे याजकडील पेंढारी याणी लुटले भुपालच्या मुलुकात पेंढारी जाणार आहेत गेले असतील सिवनी हुसंगाबाद येथें अमल भुपालकराचा आहे तेथें सेनासाहेबसुभा याजकडील हिसा आहे. तो अमल माल मजकुरी त्याणी दिल्हा नाही व भूपालकराच्या घरांत कटकट लागली आहे याजमुळें हुसंगाबादची गढी हस्तगत करावी; गढीचे संधान यांजकडे आले आहे या कामाकरितां रा। महिपतराव दिनकर परसु यांस पांच सातशे स्वार देऊन हुसंगाबादेकडे आपला अमल बसवायास म्हणून जाहिराणा करून पाठवीत आहेत

आंतील संधान हुसंगाबादची गढीच घ्यावी असें आहे. भुपालचे माहीत पठाण राहाणारे यांजवल चाकर आहेत व हलीही भूपालाकडून गुलाम अधिकारी जाहला आहे, त्याणे दूर केले ते येथें आले. त्याणी या कामाचा भर यांस वहुत दिल्हा आहे. त्याजवरून भूपालचे संस्थान साधलें तर हस्तगत करावे हा मनसबा योजून महिपतराव यास पाठवीत आहेत. आटाचौ दिवसाआलीकडेच जातील. गेल्यानंतर काय सिधीस जाईल ते लिहून पाठवीन. हे विज्ञापना.

रु. नं. ८८
फा. नं. १४
प. क्र. १८२

१८६

फेब्रुवारी १७८४

श्री

सेवेसी विज्ञापना. राजश्री सेनाधुरंधर यांचे येणे पुण्यास होत आहे म्हणून दोन साले बोलण्यांत व लिहिण्यांत व तेथें यांचे कारभारी गेले आहेत त्यांच्या सांगण्यांत येतें, व कारभारी तेथून यांस लिहितात व धुरंधर स्वामीस येण्याच्या निश्चयाची पत्रे लिहितात. त्यास दिवाकरपंत वारले तेव्हां धुरंधर यास फारच अवघड वाटले होते जे, नवाबाकडील संधान व श्रीमंताकडील संधान कसें राखावें? आपली पत दिवाकरपंत याणी राखिली होती तो गेला, याउपर कसें करावें हे चिंता मोठी होती व बंगाल्याची फौज आली त्या लोकांचे देणे कसे वारेल, तीनी संकटे मोठी होती. तेव्हा बलवंतराव व मुनसी नवाबाकडे पाठविले. तेणेकरून नवाबाचा स्नेह विशेष जाहाला. उभयतानी येते समई व्यंकोजी भोंसले याच्या नावचा तैनातजाबता करून आणीला, त्यावेलेस श्रीमंताचे लग्न होणार होते. परंतु त्या दिवसात जाहले नाही म्हणून यांचे राहाणें जाहाले. बंगाल्याच्या फौजेचा पेच जाधव व ढमढेरे याचा गुता उरकला येका सालावर. त्याउपर किरकोल राहिले लोक त्यांस कांहीच दिले नाही. दोन पतकें भारी होती, त्याजमुले साऱ्या फौजेचा पेच मानीत होते. जाधवास दसमाही दिल्ही व ढमढेरे यास बारमाही दिल्ही. दोन्ही पतकें पांच हजार फौज गेली. त्याउपरी राहिली पतके शंभर दोनसे स्वारांचीं, त्यांस खातरेस आणिलेच नाही. लोक उठून गेले. कांही वळखी व ममतेचे लोक् नवी हजीरी करून चाकरीस ठेविले. मागील देणे सुट घातली, याजमुले फौजेचा पेच तुटला. दोन संकटें निवारण जाहाली. तिसरे श्रीमंताकडील राहिलें. त्यास बलवंतराव व जिवाजीपंत पाठविले. मागून आपण श्रीमंताच्या लग्नास जाणार होते, ते ईस्वरें दुखण्याने निवारण केले. त्याउपरी दसरा जाहाल्यावर निघतो म्हणून आपण पत्रे पाठवित गेले. लौकिकार्थे डेरे दिल्हे व आपणही जातीने मुहूर्ते करून बाहेर निघाले. स्वामीकडे पत्रे लिहिलीं त्याची उतरे आलीं,

इतक्यांत दादासाहेबाचा काल जाहाला ही दिक्क घेऊन घरास आले दुसरा मुहूर्त पाहिला त्या मुहूर्तानें निघाल्यावर जावेंच लागेल, याजकरितां येतेशामजंग व इशमतजग व अजिमुदौला यांचा तिढा आणून ठेविला मनापासून पुण्यास यावयाचे धुरधर याचे चितात नाहीं कारभारी भवानीपंत मुनसी जाहाले आहेत परतु मुनसीनी कुबुद्धी सांगित-ली तर मान्य करितात वरकड मुनसीनी रघोजीबावाच्या व जानोजीबावाच्या चालीची गोष्ट सांगितल्यास मानीत नाहीत नवाबाचा पक्ष मुनसीस बहुत करून आहे, तसा आपल्याकडील धरीत नाहीत काया याचा मनमा धुरधर याच्या चितांत पुण्यास यावयाचे नाही लौकीकार्थ मात्र अडांबर जाण्याचे करून दाखवितात मिथ्या वांदे करून पत्रें आपल्या नावें लिहितात व हस्ताक्षरे खातरजमेची पत्रें लिहून पाठवितात ती कोणतीही खरी नाहीत. धुरधर यांच्या जातीचा खवीर असाच आहे, यांच्या लिहिल्याचे व बोलण्याचे व शफतेचे प्रमाण कोणतेही मोजावें असे नाहीं पुर्ते मतल्बी आहेत याच्या चितात भय तिलप्रायही नाही दिवाकरपत होते ते यांस भयप्रदर्शन करीत होते ते गेले आतां कारभारी मुनसी आहेत ते कुबुद्धी सांगून आपली चल्ती दाखवून आहेत भवानी कालोचे कांहीच मानीत नाहीत फौजेच्या देण्याचा गवगवा चौसालचा लोकाचा आहे पैका येक हातचा सुटत नाही भवानी कालोस तर दररोज उण्या गोष्टी बोलतात जर भवानी कालोनी प्रतिउतर करावें, तर आबरु घेतील हा धाक मानून कांही बोल्त नाही जे धुरधर बोल्तील ते सोसीत आहेत वरकड कारभारी कोणी मातबर नाही जानराव येशवत आहे तो लोकांच्या चुगल्या मात्र सांगाव्या इतक्या कामाचा दिवाकरपंत व दामाजीपत याच्या घरची वस्तवानी पैका काढून नेवावयास अग्रगण्य जानराव होउन दोही घरची सर्व मालीयत धुरधर यांच्या घरांत घातली लीस रघुनाथपत म्हणून मामलेदार सरदेशमुखीकडील दिवाकरपताच्या वेलेचा जानोजीबावाच्या वेल्यापासून होता, त्याजवर तजकरा दोन लक्ष रु॥ काढून ठेविले आहेत त्यांचा बाजवीप्रो हिशेब पाहात नाहीत त्याच्या प्राणावर आहे त्याजवल रुपया नाही भाजवी पाहिल्यास कांही निघत नाहीं असें आहे शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

स. नं ८८
फा नं १४
प क्र. ९१

१८७

१६ मार्च १७८४

श्री

सेवेसी विज्ञापना राजश्री सेनाधुरंधर याणी कार्तिकमासी जानोजी भोसले यांच्या दोघी स्त्रिया व आपली कन्या जेष्ठ बालाबाई यांची रवानगी श्रीकासीयात्रेस केली होती

समागमें आणखी शरीरसंमंधी लोक व कारकूनमंडली व शहरातील यात्रेच्या उदेशें करून गेले होते. सर्वत्र त्रिस्थली यात्रा संपादून फाल्गुन वद्य ८ रामक्षेत्रास येऊन पोंहचले. नर्मदा दक्षणतीरी बारा कोस आल्यावर जानोजी भोसले याचे स्त्रीस लखनादौ-डच्या मुकामीं देवाज्ञा जाहाली. धुरंधरास नवम दिवसीं वर्तमान कललें. दोन दिवस सर्व कुटुंबासहित अशौच्यात होते. नंतर शुधस्नान केलें. गुणवंताबाई गोविंदराव महाडीक यांची कन्या जानोजीबावास दिल्ही होती. तिजला येथून गेल्यापूर्वीच वाताचा उपद्रव होता, तोच वृधीस जाऊन काल जाहाला. वरकड सुरक्षीत रामक्षेत्रास आली. त्रयोदसीस नागपुरास येणार आहेत. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

रु. नं. ८८
फा. नं. १४
प. नं. ८०

१८८

मार्च १७८४

श्री

सेवेसी विज्ञापना. इमादुदौला कलकत्याहून निघून वाराणसीस येऊन पोहचला म्हणून सावकारी दोन तीन पत्रें आली आहेत. वेणीराम याचे पत्र आलेले नाही. इंग्रजास वाराणसीस यावयाचे कारण इंद्रसेनाच्या विद्यमाने राजश्री महादजी सिंदे यांच्या बोलण्यास करार ठरला आहे जे, आपल्या इंग्रजी सुभ्याची भेट घडावी, याप्रमाणे निश्चयांत आणिलें. त्यावरून इमादुदौला कासीस सरंजामसुधा आला आहे. पुढें प्रयागास येऊन राहाणार, तेथे सिंदे जाऊन त्यास भेटणार, याप्रमाणे वर्तमान आलें आहे. माहादाजी सिंदे याणी गोहदची बंदी केली होती. त्याजमुळें जाटास किल्ल्यात अनाची तंगी बहुत जाहाली. म्हणून गोहदवाला जाट किल्ल्यांतून निघून सिंदे याजवल येऊन भेटून सरंजामसुधा लस्कराजवल राहिला आहे. किला सिंदे यांच्या स्वाधीन करून दिल्हा म्हणून पत्रें सिंद्याच्या लस्करांतून आतांच आली. तपसील लिहिला नाही. तपसील लिहिला आल्यावर लिहून पाठवीन. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

रु. नं. ८८
फा. नं. १४
प. क्र. ७४

१८९

एप्रिल १७८४

श्री

सेवेसी विज्ञापना. राजश्री सेनाधुरंधर गुदस्ता दुखण्यापासून सुटले त्यापासून निशंक जाहले आहेत. रतीमात्र भय मानीत नाहीत. आपल्या कारभारियांजवल मनस्वी भाषणे करितात जे. नवाबाचा तर स्नेह संपादिलाच आहे. मुनसीनी जिमा करून घेतला

श्याप्रो प्रत्ययास आणून दिल्हे आहे व्यंकोजी भोसले याच्या नावे तीन हजारी मनसब करून आणिली जागीर नबाब देणार आहेत ती देतील आल्यातच जमा आहे. ईमजाचा तर माइपणा आहे तिकडील यसयास चालगारा लागत नाही. मोठी गोष्ट पसवासाची श्रीमताकडील, तर कागदीपत्री स्नेह राखिला म्हणजे जाहालें आम्ही त्यांचे चाकर नाही जे त्यावे चाकर असतील त्याणी त्यांचे भय मानावें आम्हास गरज नाही त्याणी स्नेह राखिला तर आम्ही स्नेह राखीतच आहों त्याणी स्नेह न राखिला तर आम्ही गरज ठेवीत नाही आमचे काय करणार आहेत? आम्हास दौलत शाहू महाराजानी दिल्ही ती आम्ही करतो, महाराजानी त्यास दिल्ही ती ते करितात आम्ही त्याची मागत नाही आपली देत नाही आमची ते मागू लागतील तर आम्ही उतर चांगले करून दाखऊ याप्रो वलगना कारमारी याजवल करितात व घरांत यायकामुले याजवल करितात गरजमतलबी मोठे आहेत ईश्वरसतेकरून यांजवर दात्र ज्यादिवसीं नानासाहेबासारिखा किंवा माधवरावसाहेबासारिखा बसेल त्यावेलेस याच्या डोल्याचा धूर निघेल उपरांत मार्गावर येयील मची सुरलीतपणा जानोजीबाबाप्रमाणे धरितील असें दिसत नाही जव्हाहिर जितके आलें तितके घेतात हती चांगला आला तर घेतात घोडे चांगले आल्यास घेतात पनास लक्षाचे जव्हाहीर संमही आहे कापड वीस लक्ष पर्यंत आहे नगदी पनास साठ पर्यंत आहे जव्हाहीर व कापड नागपुरातच आहे नगदी गोंवल्गीवर आहे हती दीडशें आहेत त्यांत चालीस पनास चांगले नामी आहेत घोडे तीन हजार पागेचे आहे इमारतीचे कारखाने फार आहेत हवेली राहावयाची व पागा व बागातील बंगले व तली व किल्याचे काम वैसे कारखाने नित्य चाल्ले आहेत दुसरीयाचे घर बुडवावे हीच बुधी रात्रंदिवस आहे प्रजेस किमपि सुख नाही जानोजी भोसले याच्या कारकीर्दीपेक्षा दिढी पैका रयतेपासून घेतात. शहरात मातवर सावकार पहिले होते त्याचा पैका साबाजी भोसले याजकडे गुतला होता साबाजी भोसले याचा काल जाहाल्यावर त्या सावकारापासून याणी पैका घेऊन त्यास पेचांत आणिले त्याजमुलें दिवाली निघाली कोणी राहिले नाहीत लक्षाधिपती होते त्यास आता भक्षावयास अन्न नाही असी त्याची गती जाहली आहे त्यांचे कर्ज याजवी यांजकडे असून देत नाहीत येक माधोजी नाईक काले आहेत त्याजवर याचा इलाज चाल्त नाही त्यास हरयेक पेचात घालावयास पाहातात परतु ते याच्या कारमारात येत नाहीत. वे उदासीनतेने आहेत येथून निघून अन्य स्थली जावें ही त्याची योजना या वर्षांत आहेसी दिसते. यंदाच्या श्रावण मासापासून रघोजी भोंसले व जानोजी भोंसले याणी व आपण जातीने धर्मादाय गांव व वर्षासन करून दिल्ही होती ती शाहून बंद

करून ठेविली. कोणास कांही पैसा देत नाहीत. ब्राह्मण उगेच आहेत. कोणी यजमानासी बोल्ह पावत नाहीत. आपल्यासारखा शाहाणा व कर्ता व संपतीवान कोणी नाही असी अहंता यास मोठी जाहाली आहे. या गर्वाचा परिहार ज्या दिवसी होईल तो होऊ. सध्या सर्व प्रकारें आपल्यासारखा कोणी दुसरा नाही हेच मानितात. त्याप्रो यांचे चालत आहे. राजपत्री गाव व जगन्नाथ देव व गुणाकर पडीत व दिवाकर दीक्षित याचे चालत आले असतां देत नाहीत. यो राजश्री यज्ञेश्वर दीक्षित घनवीथ पेठणकर सिंदखेडी राहातात त्यास शाहू माहाराजानी उमरावतीची सरदेशमुखी इनाम करून त्याचे तीर्थरूप गंगाधर दीक्षित जटावीथ यास दिल्ही. ती गुदस्तांपर्यंत अविछिन चालली. ती गुदस्तांपासून याणी जप्त केली आहे. राजपत्री इनामास याणी जप्ती करावी धर्मादायास, असी याची योग्यता नाही. परंतु निर्भय जाहाले म्हणून राज्याच्या धर्मादायाची जप्ती केली आहे. प्रस्तुत पुण्यास येत नाहीत, कन्येच्या लग्नाचा सभारंभ करीत आहेत. मंडपाचा स्तंभ मुहूर्ते करून उभा केला. वैशाख मासी लग्न करून ज्येष्ठ मासी पुण्यास जाऊ असे म्हणत आहेत. घडेल ते खरे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

रु. नं. ८८
फा. नं. १४
प. क्र. २७

१९०

सप्टेंबर १७८४

श्री

सेवेसी विज्ञापना. कलकत्याहून इमादुदौला याणी आपला भाचा हैदराबादेस रवाना केला होता तो नबाबाची स्वारी शहरास आल्यापूर्वी शहरास दाखल जाहाला होता. त्याउपरी कांही दिवसा नबाब शहरास आल्यावर शमसुदौला तेगजंग यांस इंग्रजास आणावयास त्याच्या जाग्यास पाठविले. इंग्रजाने तेगजंगाची मुदारात करून भेटला. वस्त्रें जव्हाहिर सिरपेच व जिगा व हती येक व घोडा देऊन समागमे इंग्रज आपला सरंजाम माहिमरातब व नौबत व फलटणचे लोक घेऊन आणीखी चार मातबर इंग्रज समागमें आणिले आहेत, त्यास घेऊन नवाबाच्या भेटीकरितां तेगजंगसुधा हवेलीत गेले. नवाब मसनदी येऊन बसले होते. तेथे जाऊन इंग्रजानी टोप्या काढून सलाम केले. इंग्रजानी नजर एकवीस पोशाख व जव्हाहर सिरपेच व जीगा व कंठी भुजबंद दोन व दोन हती व चार घोडे याप्रो नवाबास दिल्हे. नवाबानी त्यास अतर पानदान देऊन विदा केले. शहरात राहावयास पांच हवेल्या रिकाम्या करून देविल्या. त्याउपरी पांचवे दिवसी मायनुदौला व नवाब बसून व तेगजंग मिळुन इंग्रजास बलाऊन चार घडका खलबत जाले. इंग्रजाने मुख्त्यारनामा आणिला तो दाखविला. त्याची नकल करून नवाबास इंग्रजाने दिल्ही. ती

घेऊन इंग्रजास निरोप दिल्हा त्याउपरी आणिखी चौदियसी छ १० सावानी नबाब इंग्रजाच्या घरास गेले समागमे दोघे साहेबजादे व मोगलअलीखान माऊ व मोयनुदौला व तेगजंग वगैरे घेतले होते नवाबाची स्वारी जवल जातांच इंग्रज बाहेर येऊन सलाम केला तेव्हां नबाब उतरून सर्वांस समागमे हवेलीत घेऊन चालले तेव्हां येक खनीर जडावाचा मुठीचा नजर इंग्रजाने नवाबास दिल्हा त्यानंतर हवेलीत गेल्यावर बारा हजार होनाचा चौथरा मसनदीवर करून ठेविला होता त्याजवर नवाबास बसविलें चार घटिका चदा कल्यांतिणीचा नाच जाहला नंतर विडे अतर गुलाब देऊन चोवीस पोषाखाचे खाने हरजीनसी व जव्हाहीर चार खाने व पांच हती व येक छावा हतीचा व पांच घोडे याप्रो नजर केले ते नवाबानी घेऊन आपल्या हवेलीस आले प्रथम मसनदीवर नबाब होनाच्या बसले तेव्हां इंग्रजाने येक याद नवाबास दिल्ही ती बहुत संतोषाने घेऊन प्रसन्नता बहुत नवाबानी दाखविली सिकाकोल राजबंदरी येलूर मुस्तफानगरचा येवज इंग्रजाकडून दरसालचा येणें त्या यैवजाची चिठी दिल्ही म्हणून वर्तमान आहे इंग्रजाने सरंजाम भारी समागमे आणला आहे पंचवीस हती, पाऊणशे उंट व छकडे गाडे व येक पलटण इंग्रजी गारदी याप्रो सरंजाम आहे नवाबाचे मानस इंग्रज आलाहे यास ठेऊन घ्यावा व इंग्रजाचे मानस राहावयाचेंच आहे हिंदुस्थानात लखनाऊस शहाजादा, इंग्रज व मिर्जा अमानी येकत्र जाहाले आहेत तिकडे काय मसलत ठरेल तसे इंग्रजासी आपण बोलत असावें व इंग्रज बोलेल त्यांत आपल्या स्वार्थाचे असेल तसे करावे हा मनोदय नवाबाचा आहे याजकरितां इंग्रजास ठेऊन घेणार आहेत इंग्रजाने मुखत्यारनामायाची नकल दिल्ही आहे ती नवाबानी ठेऊन घेतली आहे पुण्यास मागे इंग्रज आले होते त्याणी मुखत्यारनामा आणिला असल्यास त्याची नकल आणवावी व नागपुरास चापम्यन आला होता त्याणे मुखत्यारनामा आणि(ला) आहे त्याची नकल आणून रुजवात पहावी याजकरिता पुण्यास व नागपुरास पत्रें नवाबानी लिहविली आहेत कलकत्याहून हली इंग्रज आला आहे याचे नाव ममताजुदौला मुफखरुलमुल्क मिस्तर जानसेन हिसाम(त)जग याप्रमाणे नांव आहे इतके इंग्रज दक्षिणेत वकीलीस आले परंतु याजप्रो शाहाणा व मायफिसाद कोणी नाही म्हणून मोयनुदौला म्हणत होते या प्रमाणे वर्तमान आहे व टिपूने श्रीरंगपटणाहून या इंग्रजाविसी नवाबास लिहून पाठविले होते जे, मायावी मात्रागमनी चरवख इंग्रज हा आहे यासी बहुत सावधपणे बोलून लौकर निरोप द्या ठेऊ नये असें लिहिलें होतें शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना नवाबानी तीन लाख रुपये देऊन तोफखान्याची तयारी करविली बैलांची खरेदी वराडात होत आहे म्हणून वर्तमान आहे हे विज्ञापना

रु. नं. ८८
फा. नं. १४
प. क्र. ८२

१९१

१७८४

श्री

सेवेसी विज्ञापना. स्वामींनी आज्ञापत्री आज्ञा केली जे, नागपुरास बंगालियाकडील जिनस चांगला तोफा येत असेल त्याजप्रो येथील मर्जीलायख कोणता हे तुम्हास समजत असतां कांहीच लिहिण्यांत तुमच्या येत नाहीं हे काय आहे म्हणून. त्यास बंगाल्यापैकी रेशमी जिनस उणाखट, तापते, मुगटे, गुदरकचे रेशीम बहुतकरून येत असतें. सफेत कापडाचा जिनस थोडा थोडा येतो, परंतु स्वामीच्या पसंदीस यावयाचा नाही. उणाखी माझ्याच पसंतीस न ये, स्वामीच्या कसा येईल? पंधरावीस तीस रु॥ पर्यंत किमती......टी व मलमले येतात. ती चांगली नाहीत. जात मात्र मलमली आहे. याजकरितां स्वामीस लिहिले नाही. पैमा बंगाली येत असतात. त्याचा तलाश केला आहे. ज्या मिलतील त्या घेऊन शेवेसी पाठवून देतो. आणीखी जिनस कांहीच मिलत नाही. गरीबाच्या संसारीकाचा जिनस मिलतो. नागपूरचे नाव मोठे. उतरपेठ फार, बंगाल्याकडील जिनस उणाखी येतो. इकडून रुई जाते इतकें आहे. शेवेसी श्रुत होय. चांगला स्वामीच्या पसंदीचा जिनस मिलत असतां सेवकाकडून आलस घडेल असे होणार नाही. हे विज्ञापना.

रु. नं. ८८
फा. नं. १४
प. क्र. १३२

१९२

जानेवारी १७८९

श्री

सेवेसी विज्ञापना. छत्तीसगडास बिंब्राजी भोंसले यांची स्त्री आनंदीबाई आहे, तिणे आपल्या दौलतीचा बंदोबस्त केला आहे तो मोडून आपल्या आज्ञेत चालावें याप्रो करावयास समलपूरचा बाहाणा करून येशवंतराव भवानी यांस फौज तोफा देऊन पाा होते. ते तोफा मागें ठेऊन पुढें पांच सातशा स्वारानिसी रतनपुरास गेले. शहराबाहेर तल्यावर उतरावयास जागा दिल्ही. येशवंतराव जातीने वाड्यात जाऊन भेटले. नंतर वर्तमान सांगितले. प्रांताच्या बंदोबस्ताविसी आज्ञा करावी. त्यावरून आनंदीबाईस राग बहुत आला. नंतर उतर केले जे, माझा प्राण आहे तोंपर्यंत बंदोबस्त मी केला आहे, करीन. तुम्ही चित न घालावें. यशवंतराव याणी प्रांतात जमीदार आणावयास रोखे पाठवीले ते ते माघारे साऱ्यानी टाकिले. येशवंतराव याच्या भोंवताले पायदल जमीदार व सिबंदीचे दोनतीन सवर आणून उतरविलें आहे येशवंतराव याचा इलाज चालत नाहीं. याप्रो पत्रें तेथून आली. त्यावरून सेनासाहेबसुभा यांस बहुत विषाद येऊन, महमदखान व धोंडो-

पत वगैरे फारकून प्रांताचा हिसेब घेऊन आणविले होते ते आले आहेत त्यास बलाऊन, त्याजवर रागें भरले तुम्ही प्रांत मोकळा करून देणें व चीजवस्त दागीने व पागा हती वगैरे आणून देणे म्हणून सांगितले त्यावरून त्याणी उतर केलें जे आम्ही चाकर आमच्या आज्ञेत बाई नाही ती खावद आहेत आम्हाकडे काय आहे ? त्यावरून येशवंतराव यांज-कडे फौज आणिखी पाठविणार आहेत महिपतराव दिनकर यांस तिकडे पा। आहेत ते तोफा घेऊन पुढें छतीसगडास गेले मागून फौज राहिली ती दोन हजारांच्या भरतीची जाणार आहे परंतु प्रांत याच्या हातास लागतां दिसत नाहीं पुढें काय करितील तसें लिहून पाठवीन सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

द म ८८
फा मं १४
प क्र. १२१

१९३ फेब्रुवारी १७८९

श्री

सेवेसी विज्ञापना छतीसगडास रा। येशवंतराव भवानी यास फौज व तोफा देऊन बदोबस्ताकरिता पा। होते त्यास येशवंतराव याणी तोफा मागें ठेऊन पांचशे स्वारानीसी रतनपुरास जाऊन आनंदीबाईस भेटले त्याउपरी येशवंतराव यांच्या भोवते जमीदार व पायदल उतरविलें. यांचे कांही चालूं दिल्हे नाही याप्रो जाहाल्यावर महिपत राव दिनकर मागून येथून पा। त्याणी तोफा नेऊन रायपुरास लाऊन हला करून घेतलें. त्याउपरी जमीदार व कमावीसदार यास रुजू जाहाले हे वर्तमान आनंदीबाईस कळलि-याउपरी कांही गडबड करीत होती तेव्हा त्याच्याच ममतेचे लोक होते त्याणी समजाविले जे, तुम्ही करितां हे चांगले नाही या गोष्टीनें परिणाम लागावयाचा नाही तोफा लाग-ल्यावर ठाणे घेऊन कैद करितील पुढें कैदेत राहावे लागेल त्याजपेक्षा संतोषाने त्यांच्या स्वाधीन करून आपला खर्चाचा बदोबस्त करून घेऊन राहावें हे चांगले आहे याप्रो सांगितल्यावर विरुधाने परिणाम नाहीं हे जाणून येशवंतराव यांच्या स्वाधीन ठाणे करून देऊन आपल्या खर्चाचा बंदोबस्त सालिना वीस हजारचा करून घेतला सर्व प्रांताचा बदोबस्त येशवंतराव याणी करून महिपतराव दिनकर यांस तेथे ठेऊन आपण फाल्गुन शुद्धांत आपले लग्न करावयास नागपुरास येणार आहेत राजश्री सेनासाहेबसुभा याणी स्वामीच्या पत्रांवर व मजबरोबरील बोलण्यावर श्रीमताच्या व आपल्या भेटीस यावयाची त्वरा केली आहे फाल्गुन वद्यांत भेटीस येतील असें दिसतें आपल्या आज्ञेवरून यांचे संकल्प विकल्प चितांतील दूर जाहाले आहेत प्रांजळ चित जाहाले आहे मोठ्या हर्षानें भेटीस येत असेत. याचा संतोष करून देणे स्वामीकडे आहे मुधोजी भोसले यांचे पुत्र

परंतु सेनासाहेबसुभे यांच्या जातीस चालीचे अंतर फार आहे. स्वामीचा भरोसा फार याणी (चितात) धरून संतोषाने भरून राहिले आहेत. सर्व प्रताप स्वामीच्या चरणाचा आहे. सेवकाकडे निरोप सांगण्याचा इरादा त्याणे करीत आहे. बहुतकरून यांणी व आम्ही अंबरापूरपर्यंत यावे. तेथून आम्हीं पुढें मागून चौमजलीच्या अंतराने फाल्गुन वद्यांत पुण्यास येऊन भेटी श्रीमंताच्या व आपल्या याणी घ्याव्या याप्रो बोलण्यांत आणिलें आहे. याप्रो घडल्यास करीत आहे. कदाचित न जाहल्यास आम्ही वराडातून पुढें निघून येऊ. मागून यांची स्वारी पंनास कोसाच्या अंतराने येईल. आम्ही ज्या दिवसी स्वामीच्या पायांजवल त्या दिवसी यांचा मुकाम पैठणाजवल गंगा दक्षणतीरी याप्रो घडेल. फाल्गुन वद्य पक्ष भेटीस टाळू नये व टालणार नाहीत असे वाटतें. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

13 मल्हारजी वोरपे यांचीं पत्रें

रु. नं. ९६
फा. नं. १
प. क्र. ३८४

१९४

१२ मार्च १७८०

श्री

साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हारजी वोरपे चरनावर मस्तक ठेऊन सिरसाष्टांग दंडवत. विंनती विज्ञप्ति यैसीजे. येथील कुशल ता। छ ५ माहे रबिलावल साहेबाचे कृपेअवलोकने करून मुकाम नवेगांव बांध तले कवडू पाटील, परगंणे प्रतापगड, प्रांत देवगड येथे साहेबाचे कृपा अवलोकन करून सेवकाचे वर्तमान येथास्थित आसे. या नंतरी साहेबी कृपा करून पत्रें छ १० माहे सफरची पाठविली ते छ १ माहे रबिलावली मु॥ मजकुरी पावली. श्रीमंत राजश्री चिमनाबापू यांचे लश्करचा बंदोबस्त करून कूच आठ कोसावर मुकाम करविले. ते दिवस संध्याकाली बातमी आली कीं, राजश्री सदासिव राम गुने पुनियाहून श्रीमंत चिमनाबापूसाहेब यासी सेनाबाहादरीचा किताब वस्त्रें व हती व मंडल्यांच्या सनदा घेऊन आले यैसे वर्तमान आले. ते वेलेस श्रीमंत सेनाधुरंधर याहि व राजश्री दिवाकरपंतदादानी सेवकास त्याजकडे विदा केले. ते घटकेसच मी राजश्री सदासिव राम गुने याजकडे जाऊन त्यास जलद घेऊन छ २९ माहे सफरी लशकरात घेऊन आलो. येक कोस श्रीमंत सेनासाहेबसुभा व राजश्री दिवाकरपंतदादा समागमे मानकरी लोक व सरदार हजार स्वार जाऊन ढेरियासी समारंभे करून आनिले. तेच क्षनी श्रीमंत सेनाधुरंधर याची भेटी होऊन मुकाम करविला. त्या उपरी श्रीमंत सेनाधुरंधर व दिवाकरपंतदादा याहि संध्याकाली येका ठिकानी होऊन राजश्री सदासिवपंत गुने यासी बलाऊन वस्त्रें व जव्हाहीर मोतियांचा तुरा व सिरपेच वगैरे हती व मंडल्याच्या सनदा व सिकेकटार हे

पाहून श्रीमंत सेनासाहेब व श्रीमंत सेनाधुरंधर बहुत खुसी होऊन दुसरे दिवसी फाल्गुन सुध २ दोन प्रहरा दिवसी मुहुर्ते करून श्रीमंत चिमनाबापूचे लष्करात मानकरी लोक व मातबर सरदार व मुछदी व कारकून व मामलतदार वगैरे लोक व तोफखाना व गारदी तासे मरफे लाऊन समारंभकरून श्रीमंत चिमनाबापू यासी वस्त्रे दिधली ते वेलेस साता रियाकडे कुरनिशा तीन वेल करून च्यार घटका नाच रंग करून तेच मुहुर्ते करून येका कोसाचे कूच केले मुछदियाहि व मामलतदाराहि नजरा करून त्या समारभानसी आपले लशकरात आले त्या उपरी दुसरे दिवसी छ २ माहे मजकुरी नया कोसा मुकाम करून लांजीवरून चुटियानागपुरावरून, रतनपूर रायेपूर डावे टाकून, शतरूचे मुल्कात शह देतील आता कांही कजेचा गुता राहिला नाही. आता मजल दर मजल करून जाईल श्रीमंत सेनासाहेब व श्रीमंत सेनाधुरंधर प्रांतातील गडजाती पाहून हुताशनी करावे यासी नागपुरास येतील आजी छ मजकुरी श्रीमंत विंबाजीबावा कडून भाई महमद तरी-खान व राजश्री धोंडोपत दिवान व राजश्री हंबीरराव मोहिते व राजश्री जैराम येशवंत यासी राजश्री जिवाजी माहादेव व राजश्री दिनाजी जगन्नाथ येसे घेऊन आले. त्यांचा करार ठहरला कीं, महिपतराव वगैरे तुम्हाजवळ आहेत त्याचे आबरूस खता करनार नाही व स्वरूपासारिखे पोटाचाहि बदोबस्त करून देऊ आनी त्याही येक जामीन द्यावा जे, कोठे फंद फेरीज करनार नाही याप्रमाणे करार जाहाला म्हणजे त्यास येथ घेऊन यावे मग राजश्री दिवाकरपतदादा याहि जाऊन श्रीमंत विंबाजीबावा भोसले यासी घेऊन येतील याप्रमाणे जाबसाल ठहरावून, त्याजकडील ग्रहस्त आले होते त्यासी वस्त्रे देऊन, श्रीमंत विंबाजीबावाकडे विदा केले आजी छ मजकुरी श्रीमंत सौभाग्यवती चिमाबाई व राजश्री दिवाकरपतदादा यासी नागपुरास रवाना केले सेवेसी कलावे. सवीतर वर्तमान राजश्री सदासी राम गुने याहि पत्रे सेवेसी लिहिली आहेत त्यावरून कलेल पुढे जे वर्तमान होईल ते सेवेसी लेखन करीन हे विज्ञापि

रु. नं ९६
का नं १
प रु. २१८

१९५

मे १७८०

श्री

पुरवणी साहेबाचे सेवेसी विज्ञापना येसीजे कलकत्याहून यास पत्रे आली त्याचा मजकूर याणी साहेबास लिहिला व राजश्री सदासिवपंतदादाकरवी लिहिविला त्याचे उत्तर साहेबी सदासिवपतदादास लिहिले जे, इमादुदौला याचे दानारयासीचे अर्थ राजश्री दिवाकरपतदादा याणी लिहिले ते कलले त्यास इमजी जात केवल, कावूचे यार. पूर्वी

करणेल ज्यान, करणेल इपटईन येथे आले, तेव्हां यैसेच माहाम होते. पुढे समधानरूप सर्व समजन्यात आले. यैसेच सुरतेहून करणेल गाडर याची पत्रें पहिली आलीं. त्यांत लिहिले कीं, येक जागा नेमस्त करावी. तेथे बोलणे घडावे. आपण सांगावे तैसे यैकू म्हणोन लिहिले. त्याजवरून येथून राजश्री लक्ष्मणराव चिटनवीस व न्याहालचंद त्याजकडे रवाना केले. उभयता तेथे गेलियावर गाडराची पहिली नजर राहिलीच नाही. हे राजश्री दिवाकरपंतदादा याचे प्रत्यास आणून दिल्हे. इंग्रज परम बेइमान. बोलावे येक, करावे येक. काबूचे यार त्याचे बोलण्याचा व लिहीण्याचा विस्वास मानावा यैसे नाही. जोपर्येंत आपला मतलब उगऊन कार्यें होय तो पावेतो दुसरियाचे आर्जव करावे. नरमपणाची चाल धरावी. मतलब जहाला म्हणजे काबूस चुकूच नये हे त्याचे यैन भांडवल. सांप्रत सेनाबाहादर फौजसुधा बंगालियांत गेले व उभयेता सरदार गुजरात प्रांती जाऊन लढाई सुरू जाहाली. नबाब सिकाकोलाकडे जातील. हैदरखान चेनापटनाकडे जातील. चहूकडून तान बसवितील. तेव्हां परिनाम नीट नाही यैसे समजोन याणी सेनाधुरंधर व राजश्री दिवाकरपंतदादा यास याप्रमाणे लिहिले. त्यास याच लिहिल्यावर राजश्री दिवाकरपंतदादा याचे जाणे श्रीकासीस व्हावे यैसे नसावे. त्यास लिहून पाठवावे कीं, पंतप्रधान यासी कैसे बोलावे ? काय ल्याहावे ? त्याचे मुदे आहेत, ते कैसे उगवावे, याचा मजकूर शपतपूर्वक खास दस्तुरपत्री लिहून पाठवावा. नंतर उतर आल्यावर इकडे ल्याहावे. उतर पाहून दिवाकरपंतदादा त्याचे आमचे विचारे ठरेल त्याप्रमाणे योग घडणें तो घडेल म्हणोन बहुत विस्तारे आज्ञापत्रे होते ते राजश्री सदासिवपंतदादा याणे सेनाधुरंधर व राजश्री दिवाकरपंतदादा यास दाखविली. पत्रे पाहून राजश्री दादा बहुत संतोसी जाहाले आणि बोलिले कीं, इंग्रज लबाड हे खरे. याच लिहिण्यावर भेटावे हे नीट नाही. उतर आणवून करणे ते करावे हेही खरे. जे आम्ही इंग्रजास लिहून पाठवावे त्याचा मसुदा श्रीमंत नाना याणीच लिहून पाठविला आहे. याप्रमाणेच आम्ही कलकत्त्यास पत्रें लिहून पाठऊ म्हणोन बोलिले. पत्रा फार दिवस लागले. वाटेस जासूद आजारी पडला म्हणौन आठदाहा दिवस अधिक लागले. त्यास जासुदास राजश्री सदासिवपंतदादा याचे समक्ष हाणमार केला. आबरू घेतली. कांही बाकी ठेविली नाही याचा तपसील दादा याणीहि लिहिला असेल. वरकडहि कितेक बारीक मोठे अर्थ राजश्री दादा याचे पत्रावरून सविस्तर सेवेसी श्रुत होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञप्ति.

अवल सालचे रोजमरी या मजकूर. राजश्री सबनीस यास लिहिला. सेवेसी विनंती करतील त्याप्रमाणे आज्ञा होऊन बंदोबस्त जाहाला पाहिजे हे विज्ञप्ति.

ना० भो० २७

रु. म ९६
फा म १
प क ३४१

१९६

१७८२

पुरवनी साहेबाचे सेवेसी विज्ञापना येसीजे त्रिवर्गाची सिरे व धडे गंगागिरी यानी आपले राहुटीजवळ आनिले ते भगवन्तगीर याम दाखविले गीहि जवळ होतो हात लावून पाहिले व बोळखिले नतर गंगागीर याने भगवतगीर यास सांगितले जे, विसाजीपत-प्यारसे कारकून सुधा मारला गेला, येक राहिला नाही त्यारहि यद्दुधा मारिले शे पनास. कोणी पलोन गेले असले तरी फन्नेना त्याचा बंदोबस्त अगोधर जागानजागा घाटवरी केली आहे पलाले त्यार तेहि चौकीवर सापडतील येक जाऊ देणार नाही याप्रमाणे जाहाली उभायेता उभाउमी फानात कांही बोलोन भगवनगीर न वसना तैसाच माघारे फिरोन मागती गद्यात जाऊ लागला ते समयी मी विचारिले जे, यास आम्र घात्रमाची कांही तजवीज होईल किंवा नाही तेव्हा भगवतगीरीने सांगितले जे, यर्त कांही घडत नाही, यैसे सांगितले नतर गावात आले त्याउपरी गंगागीर यानी गव्यात ताकीद केली जे, दखनी लोक कोण्ही घरी ठेविलियास गुणेगारी टरेल याप्रमाणे वदोबस्त जाहाला तेव्हां भगवतगीर याने मजला सांगितले जे, गावात ताकीद जाहाली आता तुम्हांस कलेल तिकडे जावे नतर मी आपली फ्रजे त्याजवळ न मागता भगवीच वखे घेऊन निघालो महतांने आपला सिशा वरोबर देऊन नर्मदापार करून देऊन मागारे गेत्रा नतर मी इकडे आलो याप्रमाणे कारकुनाने माधोजी नाईक मजकुरास सांगितले त्याजवरून नाइक मशार-निल्हेनी कारकूनाचे पुतेस घेऊन सेनाधुरधर याजकडे गेले तेयेहि याप्रमाणेच सांगितले नतर सेनाधुरंधरानी कारकून मजकुरास राजश्री सदासिवपतनादा याजकडे पाठऊन दिल्हे दादा मशारनिलेजवळहि याचप्रमाणे सांगितले त्याजवरून दादा मशारनिलेनी विनंती लिहिली आहे व मी लिहिली आहे दुसरे महमद अमीरखान रोहिले याची खातमी छपारि-याहून वद्य १२ स आली त्यातहि याप्रमाणे मजकूर लिहिला आहे व बचई व श्रीनगर येथील ठाणी उठोन सिगपुरास गेली व माहामली जमीदार याणी मंडल्यास घेरा घातला आहे म्हणोन बातमीचे पत्र आले सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति

रु. मं ९६
फा मं १
प क २३८

१९७

१७९१

श्री

पुरवणी साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मलहरजी योरपे कृतानेक विज्ञापना येसीजे छ २२ सावानी राजश्री सेनासाहेबसुभा व राजश्री सेनाधुरंधर याची स्वारी सिसरे प्रहरी

तुलसीबागात गेली. तेथे राजश्री भवानी कालो व राजश्री श्रीधर लक्ष्मण व राजश्री कृष्णराव माधव, व राजश्री सिवराम हरि, व राजश्री जानराव येशवंत, व राजश्री बाबूराव वैद्य पुत्रासहित आले. यावर बरसाती बंगल्यात बैठक करून बसले. तो तैमुरशा दुरानी शाहजादा याजकडील हासन कुली बेग आला आहे. ते आले. त्यानी फरमान आनिले ते दिल्हे. यावर दिलीकडे कुरर्णीसा करावयास सांगितले. त्याजवरून सेनासाहेब यानी व सेनाधुरंधर याणी दिलीकडे रामराम मात्र केला. नंतर उभयेता बंधूस भेटावयास उठला. भेटला. उपरात बसून फरमान मुनसीकडून वाचविले व त्याने येक तरवार नजर केली. यावर फरमान वाचून पाहिली. त्यातला आनवै जे, आम्हास दिलीस येणे आहे. आम्हास येऊन सामील होतील ते आमचे मैत्र, नाही येणार ते आमचे शत्रू होय. नंतर त्यास विच्यारिले जे, दिलीपासून पिसावर किती कोस आहे व फौज किती आहे? त्यानी उतर केले कीं पचतीस मजली आहे व फौज येक लाख आसी हाजार आहे. आनी कलमज्यारी चाललीच आहे व पत्रे याप्रमाणे चहूंकडे गेले आहेत. नंतर म्हणू लागले कीं लांबनीचे जाणे आहे व बरसात जवल आली आहे. त्यास पत्राचा जाब द्यावा. त्यावरून सेनासाहेबानी म्हटले कीं, मुनसीस सांगून जाब देवितो. नंतर विडे देऊन राजश्री आनंदराव बाबूराव वैद्य व राजश्री लक्ष्मण बलाल श्रीकासीहून आले आहेत त्यास पुण्यास जाण्यास निरोप देऊन वस्त्रे, सेले, पागोटे पैटणी व मलमली व आरधा किनखाप देऊन येक पाहारा बराबर दिल्हा. उदैकचा मुहूर्त करून बाहर निघणार व राजश्री विटल बलाल सुभेदार, प्रांत वराड याचे पुत्र राजश्री महिपतराव यास निरोपाची वस्त्रे, पैटणी, पागोटे व कासीचा दुपाटा व झगा ब्राह्मणपुरी, व किनखापाची तुमान व सिरपेच व पालखीचे विडे व येक हाती तैनात दिल्हा व त्याजबराबर विटल बलाल सुभेदार यास वस्त्रे, सेला पागोटे, पैटणी व मलमल व किनखाप व त्याचे दोघ पुत्र राजश्री गणपतराव व राजश्री रगपतराव यास सेले, पागोटे पैटणी व मलमली व आरधा आरधा किनखाप यैसे दिल्हे; व त्याचे दोन च्यार कारकून यास सेल पागोटे दिल्हे व हुसनखान पेटेचा फौजदार याचे पुत्रास पेटेचे काम सांगून त्याचे पालखीचे विडे व वस्त्रे दिल्हे. त्यानी दोन दोन मोहरा नजर केली व त्याचे पुतण्यास नायबी दिल्ही व त्यानी येकयेक मोर नजर केली व रहिमानखान यास निरोपाचे वस्त्रे दिल्हे. साहेबाचे सेवेसी श्रुत व्हावे हे विज्ञापती.

रु. नं. ९६
फा. नं. १
प. क्र. १४०

१९८

१० एप्रिल १७९२

श्री

पुरवणी साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हारजी वोरपे कृतानेक विज्ञापना ऐसिजे.

छ ३ सावानी प्रात काळी कृष्णराव माधव येऊन सेनासाहेबासी दोन घटका बोलून गेले नंतर स्नान देवपुजा करून आर्ती होऊन तोफ सोडून ब्राह्मणाचे पाय प्रक्षाळुन बसले. तो भवानी काळो व कृष्णराव माधव आले चार घटका खलबत करून गेले दोनप्रहरी पांच सहासे ब्राह्मणाचे भोजन होऊन पैसा पैसा दक्षणा दिल्ही सायंकाळी सेनासाहेब नजरबागात बसले तो राजा बुराणशा व श्रीधर लक्ष्मण व व्यंकटराव कासी व महिपतराव दिनकर आले जरीदखान पठाण छत्तीसगडाहुन आले त्यांनीं सेनासाहेबाची भेट घेऊन रूपये दोन नजर केले नंतर दोनघटका बोलून सर्व गेले नंतर स्नान देवपुजा करून आर्ती होऊन तोफ सोडून फराळ केले यावर श्रीधर लक्ष्मण व कृष्णराव माधव व पांडुरंग गणेश आले दोनघटका कलावतीनीचा नाच होऊन कथा आर्ती करून दोनप्रहर रात्री तोफ सोडुन कारभारी गेले छ ४ रोजी प्रात काळी सेनासाहेबाची स्वारी गंगाजी नाईक गडकरी यांचे घरी मुंज होती म्हणून गेली बराबर कृष्णाजी मोहिते व श्रीधर लक्ष्मण व कृष्णराव माधव व जानराव येशवंत व विसाजी उमाजी व मानाजी घाटगे व तुकोजी नळ-बडे होते. तेथें मुंज लावून आचर पानदान होऊन स्वारी वाड्यांत आली यावर स्नान देवपुजा करून आर्ती होऊन तोफ सोडुन ब्राह्मणाचे पाय प्रक्षाळुन पांचसे ब्राह्मणाचे भोजन होऊन पैसा पैसा दक्षणा दिल्ही यावर भवानी काळो व श्रीधर लक्ष्मण व कृष्ण-राव माधव व पांडुरंग गणेश ऐसे बसून माधवराव घोरपडे यांचे प्रकर्णी प्रहरभर बोलणें जाले यावर कारभारी गेले. सायंकाळी सेनासाहेब नजरबागात माथावर येऊन बसले तो श्रीधर लक्ष्मण व कृष्णराव माधव व पांडुरंग गणेश आले तो बाळाजी सिवदेव यांची खातमीचे पत्रें आली ती वाचून पाहिलीयावर स्नान देवपुजा करून आर्ती होऊन तोफ सोडून फराळ करून बसले तो बाबूराव वैद्य व पांडुरंग गणेश वगैरे आले दोनप्रहर रात्र पावेतो कथा आर्ती होऊन तोफ सोडून सर्व आपले घरास गेले छ ५ रोजी प्रात काळी श्रीधर लक्ष्मण व कृष्णराव माधव येऊन दोनघटका सेनासाहेबासी बोलून गेले नंतर नामदारखान पठाण यांस देवआज्ञा जाली नंतर सेनासाहेबानी स्नान देवपुजा करून आर्ती होऊन तोफ सोडून ब्राह्मणाचे पाय प्रक्षाळुन चार पाचसे ब्राह्मणाचे भोजन होऊन पैसा पैसा दक्षणा दिल्हे यावर भवानी काळो व श्रीधर लक्ष्मण व कृष्णराव माधव आले. माधवराव घोरपडे यांचे प्रकर्णी पाच सहा घटका बोलणें जाले यावर कारभारी गेले तिसरे प्रहरी लक्ष्मण डोके यांचे येथे रामनवमीचा उत्छाह होता म्हणून सेनासाहेबाची स्वारी कथेस गेली बराबर बाबूराव वैद्य व भवानी काळो व श्रीधर लक्ष्मण व कृष्णराव माधव व पांडुरंग गणेश व मानाजी घाटगे व तुकोजी नळबडे वगैरे

होते. तेथें देवापुढे एक रूपाया ठेऊन पाच सहा घटका कथा यैकून आर्ती होऊन प्रसाद नारळ हारतुरे गजरे घेऊन सांयकाळी स्वारी वाड्यांत आली. कारभारी आपले घरास गेले. नंतर सेनासाहेबानी स्नान देवपुजा करून आर्ती होऊन तोफ सोडून फराळ केल्यावर सलाबतखान व केशवराव व तिमाराव व श्रीधर लक्ष्मण व कृष्णराव माधव आले. यैणेमहालात चार घटका पिरोज कलावंतीनीचा नाच जाला. नंतर कथा आर्ती होऊन तोफ सोडून सर्व कारभारी आपले घरास गेले. छ ६ रोजी प्रातःकाळी कृष्णराव माधव येऊन दोनघटका सेनासाहेबासी बोलून गेले. नंतर स्नान देवपुजा करून आर्ती होऊन तोफ सोडून ब्राह्मणाचे पाय प्रक्षाळुन पांच सातसे ब्राह्मणाचे भोजन होऊन पैसा पैसा दक्षणा दिल्ही. यावर कृष्णराव माधव येऊन दोन घटका बोलणें होऊन गेले. तिसरे प्रहरी लक्ष्मणराव पाटणकर यांचे येथे उच्छाव होता. म्हणून सेनासाहेबाची स्वारी गेली. तेथें घटकाभर बसून आत्तर पानदान होऊन माधवराव घोरपडे मालोजी-बावाचे पुत्र यांचे येथें उच्छाव म्हणून तेथें स्वारी गेली. घटका एक बसून आत्तर पानदान होऊन स्वारी वाड्यात आलीयावर स्नान देवपुजा करून आर्ती होऊन तोफ सोडून फराळ केले. यावर श्रीधर लक्ष्मण व कृष्णराव माधव आले. दोन घटका बोलून गेले. नंतर लक्ष्मण डोके याची कथा आर्ती होऊन दोनप्रहर रात्री तोफ सोडली. नंतर सर्व आपले घरास गेले. छ ७ रोजी सेनासाहेबानी स्नान देवपुजा करून उपाध्य व शास्त्री व भवानी काळो खेरिज करून मुत्सद्दी व बाबूराव वैद्य व मानकरी व आप्तवर्ग व सिलेदार लोक व साहुकार मंडळी व पठाण मंडळी बलावून आणिले. लक्ष्मण डोके याची कथा आर्ती होऊन श्रीरामचन्द्रजी जन्मकाल जाहाला. ते समई तोफाची व अरब गारदी याची एक सिलक जाली. यावर सर्व गेले. नंतर हाजार बारासे ब्राह्मणाचे भोजन होऊन पैसा पैसा दक्षणा दिल्ही. व भवानी काळो यांचे येथें उच्छाव होता म्हणून बाबूराव वैद्य व मुत्सद्दी मंडळी गेली होती. पाचघटका रात्र जालीयावर बाबूराव वैद्य व मुत्सद्दी मंडळी व मानकरी व साहुकार मंडळी व पठाण मंडळी बलाऊन आणून निशाण नौबती व तासे मोरफे बराबर घेऊन वहोण व दिंडी बराबर सेनासाहेब पाय उतारा होते. शहरांत फिरोन बाकीची पांचघटका रात्र राहाता स्वारी वाड्यांत दाखल जाली. छ ८ रोजी सेनासाहेबानी स्नान देवपुजा करून कथा आर्ती होऊन तोफ सोडून ब्राम्हणाचे पाय प्रक्षाळुन पारणे सोडिले. व चार पांचहजार ब्राह्मणाचे भोजन होऊन दक्षणा ब्राह्मणास रूपाया व बायकोस अधेली व मुलास पावली ऐसे दिल्हे. सायंकाळी सेनासाहेब नजरबागात जाऊन दोन घटका नाव पाहून वाड्यात जाऊन स्नान देवपुजा करून कथा आर्ती होऊन तोफ सोडली. यावर

पुण्याहून श्रीमंत महाराज राजश्री रावसाहेब व साहेबाची पत्रें सेनासाहेब यांस व बाबू राव वैद्य यांस डाकेबरावर आली ती राव मशारनिले आपले याचून सेनासाहेबाची पत्रें वाड्यात घेऊन गेले व मुत्सद्दी व मानकरी व सावकार मंडळी वगैरे आले पुण्याची पत्रें वाचून पाहिली नंतर कथा आर्ती होऊन तोफ सोडून लष्कर जान्यावर सेनासाहेबानी देवाची वस्त्रें घेतली उपरांत सर्वत्रास प्रसाद नारळ व हारतुरे गजरे घेऊन बाकीची पांचघटका रात्र राहता आपले घरास गेले छ ९ रोजी प्रात:काळी बाबाजी गोविंद चिटणीस यांचे घरी मुंज होती. म्हणून सेनासाहेबानी स्नान देवपुजा करून गेले. तेथें कृष्णाजी मोहिते व मुत्साजी गुजर व मानाजी घाटगे व तुकोजी नलवडे व भवानी काळे व श्रीधर लक्ष्मण व कृष्णराव माधव व बाबूराव वैद्य वगैरे मुत्सद्दमंडळी आले मुंज लावून आत्तर पानदान होऊन भवानी काळो व बाबूराव वैद्य आपले घरास गेले. आणि दोनकोस पारडीस देवाजी डोंगरदेव छत्तीसगडास पाठवितात म्हणून निरोप द्यावा यास सेनासाहेबाची स्वारी उभयतां कारभारी यासुधा गेली तेथें चारघटका खलबत करून त्यास निरोप देऊन त्यांणी सेनासाहेबास सेला पागोटे वस्त्राणपुरी दिल्हे. आणि सेनासाहेबानी त्यास घोडी दिल्ही त्याजबरोबर चाळीस पन्नास लोक जातात त्यांणीं दोन तीन रूपये प्रमाणें नजर केली व गुलामअल्ली चक याचा भाऊ निज्यामअल्ली चक यांसही छत्तीसगडास पाठवितात म्हणून त्यास पाल्खी दिल्ही आणि त्याणी शभर रूपये नजर केली नंतर स्वारी वाड्यांत आली सांयकाळी श्रीधर लक्ष्मण व कृष्णराव माधव आले दोन घटका खलबत करून गेले उपरांत सेनासाहेबानी स्नान देवपुजा करून सोमवार सोडला छ १० रोजी सेना साहेबानी स्नान देवपूजा करून भवानी काळे व श्रीधर लक्ष्मण व कृष्णराव माधव आले देवघरांत पाच सहा घटका खलबत करून गेले दोघटका नतर कृष्णराव माधव व महि पतराव दिनकर व पांडुरग गणेश बलावून आणिले चार घटका एकांत होऊन गेले नतर सेनासाहेबाची स्वारी तुळसीबागात जाऊन निद्रा केली सायंकाळीं स्वारी शक्करदऱ्यास जाऊन देवदर्शन घेऊन येऊन, स्नान देवपुजा करून फराळ केलें नंतर चिमणाजी दिवा कर गोसावी जामखेडकर यांची कथा बहुत अपूर्व म्हणून बाबूराव वैद्य यांणीं आपले येथें करविली याजकरितां राव मशारनिल्हेंनीं चिरंजीव पाठऊन सेनासाहेबास बलावून आणिले तेथें उपाध्य व शास्त्री व भवानी काळो खेरिजकरून सर्व मुत्सद्दी आले एक प्रहरभर कथा आर्ती होऊन, आत्तर पानदान करून, प्रसाद घेऊन हारतुरे गजरे घेऊन दोनप्रहर रात्री स्वारी गेली कारभारी आपलें घरास गेलें. छ ११ रोजी प्रात:काळीं श्रीधर लक्ष्मण व कृष्णराव माधव ऐसें बाबूराव वैद्य याचे येथें येऊन पुण्याची पत्रें आली त्यांचे प्रकर्णीं दोन घटका बोलून सरकार वाड्यांत गेलें तो सेनासाहेबांनीं स्नान देवपुजा करून देवघरांत

चारघटका खलबत करून, कारभारीं यांणी दोन घटका सुभानराव रननवरे यांचा हिशेब पाहिला. नंतर कारभारीं गेले. तिसरे प्रहरीं भवानी काळो यास कांहींसे समाधान नाहीं म्हणून सेनासाहेबाची स्वारी गेली. तेथें श्रीधर लक्ष्मण व कृष्णराव माधव व बाबूराव वैद्य यांस बोलावून नेले. पांच सहा घटका पुण्याची पत्रे आलीं. त्यांचे प्रकर्णी खलबत करून राव मशारनिले आपलें घरास गेले. दोन तीन घटका नंतर उभयतां कारभारी यासुद्धां स्वारी वाड्यांत आली. दोनघटका बोलणें होऊन गेले. नंतर उभयता कारभारीं बाबूराव वैद्य यांचे येथे आले. पांच सहा घटका पुण्याचे प्रकर्णीं बोलणे होऊन गेलें. आणि सेनासाहेबाची स्वारी लक्ष्मण डोके यांचे येथें गेली. तेथें कथा आर्ती होऊन ळळीत जाल्यावर अत्तर पानदान करून प्रसाद नारळ हारतुरे गजरे घेऊन तैसीच स्वारी भवानी काळो यांचे येथें गेली. तेथेही कथा आर्ती ळळीत होऊन अत्तर पानदान होऊन प्रसाद हारतुरे गजरे घेऊन बाकीची पांच सहा घटका रात्र राहता स्वारी वाड्यांत आली. छ १२ रोजी सेनासाहेबानी स्नान देवपुजा करून श्रीधर लक्ष्मण व कृष्णराव माधव आले. चारघटका पुण्याचे प्रकर्णी खलबत करून उभयता कारभारी बाबूराव वैद्य यांचे येथे येऊन दोन तीन घटका बोलून गेले. तीसरे प्रहरी बाबूराव घाटगे यांचे येथें उच्छाह होता. म्हणून सेनासाहेबाची स्वारी गेली. तेथें कथा आर्ती ळळीत होऊन अत्तर पानदान करून हारतुरे गजरे घेऊन वाड्यात आलीयावर तुळसीबागात गेले. तेथें भवानी काळो व श्रीधर लक्षुमण व कृष्णराव माधव आले. बागांत मधी चौत्रा आहे. त्याजवर बारादारी महताबी सफेत केली आहे. तेथें बैठक करून पांच सात घटका पुण्याची पत्रें आली. त्याच प्रकर्णी खलबत करून भवानी काळो आपले घरास गेले. आणी सेनासाहेबाची स्वारी मिरजा मुरादबेग यांचे येथें गेली. बराबर श्रीधर लक्षुमण व कृष्णराव माधव व पाडुरंग गणेश व कृष्णाजी मोहीते व मानाजी घाटगे व तुकोजी नलवडे व सिवसींग हाजारी वगैरे होतें. तेथें पिरोज कलावंतीणीचा नाच जाहला. नंतर अत्तर पानदान करून सेनासाहेब यांस वस्त्रे सेला पागोटे व जामेवार व किनखाप देऊन स्वारी अडीच प्रहर रात्री वाड्यांत आली. छ १३ रोजी सेनासाहेबाचे स्नान देवपुजा होऊन श्रीधर लक्षुमण व कृष्णराव माधव व पांडुरंग गणेश आले. प्रहर एक बोलणें होऊन कारभारी आपले घरास गेले. तिसरे प्रहरी माधोजी नाईक काळे यांचे मातोश्रीस छ २१ शाबानी देवआज्ञा जाली. म्हणून त्यांचे येथे सेनासाहेबाची स्वारी गेली. बरोबर राजे बुराणशा व श्रीधर लक्षुमण व कृष्णराव माधव होते. चारघटका बसून त्यांचे समाधान करून राजे व कारभारी आपले घरास गेले. आणि सेनासाहेबाची स्वारी भगवंतराव माने याचे येथें गेली. त्याचे कांहीं वाकडे आले होतें.

म्हणून त्यांची समजावीस करून वाड्यांत आले तसेच तुळसीबागांत गेले पांच घटका बसून श्रीधर लक्ष्मण मुनसी यांचे येथें गेलें तेथें बाबूराव वैद्य व भवानी काळे व बाबाजी गोविंद वगैरे मुत्सद्द मंडळी व सलाबतखान मंडळी सुद्धा व कृष्णाजी मोहीते व कुसाजी गुजर व मानाजी घाटगे व तुकोजी नलवडे वगैरे आले पिरोज कलावंतीणीचा नाच व करीमखान गवई यांचे गायन होऊन अत्तर पानदान होऊन सेनासाहेबास पागोटें पैठणी व काशीचा दुपेटा व जामानिमा व बनाबाईस चिरडीचोळी देऊन हारतुरे गजरे घेऊन वाड्यांत आले कारभारी आपले घरास गेले छ १४ रोजी सेनासाहेबांनीं स्नान देवपुजा करून प्रहर दिवस आलीयावर भवानी काळे व श्रीधर लक्ष्मण व कृष्णराव माधव आले पुण्यास जाण्याचें प्रकर्णीं दहा घटका खलबत होऊन तसेच सिलेखान्यांत आले दीड प्रहर जवाहीर पाहून चार घटका दिवस राहतां कारभारी घरास गेले आणि सेनासाहेबाची स्वारी तुळसीबागांत गेली तेथ लखणूवाली अंबस कलावतीन ईस निरोप देऊन वस्त्रें लुगडीं व शालजोड्या व सेले पागोटे देऊन तीन हजार रुपये खर्चास दिल्हे तो बाबूराव वैद्य आले पुण्याहून बाळाजी शिवदेव याचे बातमीची पत्रें आली तीं राव मशारनिलेस वाचून दाखविली उपरांत कृष्णराव माधव यांचे मधु बोलाव यास आले त्याजवरून सेनासाहेबाची स्वारी कृष्णराव माधव यांचे येथें गेली तेथें बाबूराव वैद्य पुत्रासहित व भवानी काळे व गणेश काळे व बाबाजी गोविंद वगैरे मुत्सद मंडळी व सलाबतखान मंडळीसुद्धा व केशवराव व तिमाराव व कृष्णाजी मोहिते व मानाजी घाटगे व तुकोजी नलवडे व कुसाजी गुजर होतें तेथं जाताच दिवाणखाना पाहिला बहूत चांगला केला आहे तेथें बैठक केली होती बसून अत्तर पानदान होऊन सेनासाहेबास सेला पागोटे पैठणी कष्यारंगाचे व झगा व जामेवार व बनाबाईस चिरडी चोळी दिल्हे नंतर पिरोज कलावतीणीने बसून गायन केले नंतर हारतुरे गजरे घेऊन दोन प्रहर रात्री स्वारी वाड्यांत आली कारभारी आपले घरास गेले छ १५ रोजीं सेनासाहेबानी स्नान देवपुजा करून श्रीधर लक्ष्मण व कृष्णराव माधव व महिपतराव दिनकर आले. चारघटका सिलेदार प्रकर्णी बोलणें होऊन श्रीधर लक्ष्मण व कृष्णराव माधव ऐसे बाबूराव वैद्य याचे येथें गेले तेथें भोजन होऊन निद्रा केली सरकारवाड्यांत सलाबत-खान याजसुद्धा भोजन होऊन निद्रा केली सायकाळी भवानी काळे व श्रीधर लक्ष्मण व कृष्णराव माधव आले. तैसेच सलाबतखान व कारभारी यासुद्धा स्वारी तुळसीबागांत गेली दोन प्रहर रात्र पावेतो बसून सलाबतखान प्रकर्णी बोलणें जाले परंतु निश्चय ठहरला नाहीं नंतर स्वारी वाड्यांत गेली आणि कारभारी आपले घरास गेले साहेबाचे सेवेसी श्रुत व्हावे हे विज्ञाप्ति

14 मल्हारजी नाईक वोरपे व दत्ताजी कुसाजी तोरडमल यांचीं पत्रें

रु. नं. ९६
फा. नं. २
प. क्र.

१९९

२९ डिसेंबर १७७८

श्री

श्रीमंत राजश्री त्रिंबकरावजी साहेब साहेबाचे सेवेसी.

सेवक मल्हारजी नाईक व दत्ताजी नाईक मुकाम नागपूर कृतानेक साष्टांग दंडवत विनंती. येथील क्षेम ता। ९ जिल्हेज परयेत आपले कृपेकरून वर्तमान येथास्तीत असे. नंतर इकडील वर्तमान उभयेता श्रीमंताणी श्रीमंत सेनाधुरंधर व राजश्री दिवाकरपंतदादा यास छ १७ जिलकादची पत्रें पाठविली ती पावली. त्यात मजकूर जे कलकत्याहून इंग्रजाचीं पलटणे मुंबईस जावयास खुसकीचे वाटेण येत आहेत. बुंदलखंड प्रांती येऊन करनेल गाडर याणी सरकारच्या अंमलात उपद्रव केला व श्रीमंत राजश्री दादासाहेब याची वरात पाच लक्ष रुपयाची राजश्री बालाजी गोविंद याजवर आणून पैका मागू लागले. मशारनिलेणी पैका न देता पारपत्ये करावे हा मजकूर योजिला हे वर्तमान करनेल गाडर यास कलताच सागरचा रुख सोडून अलीकडे आले. पाठीवर राजश्री बालाजी गोविंद व सिवराम विठल वगैरे दाहा बारा हाजार फौज आहे. कदाचित इंग्रज वराड प्रांती आल्यास तुम्ही इंग्रजाचे तोंडावर मातबर फौज पाठऊन बरे वजेने पारपत्ये करावे. इंग्रज इमानाचे बहुत खोटे. त्याणी बहुतास इमान देऊन दुसरियाचे दौलतीत हाळू हाळू पाये सिरऊन गोड बोलून बहुताच्या दौलती घेतल्या. सिवटी दौलतीचा तोरा येकीकडे ठेऊन आपणच दौलती घेत आले. परंतु कोणाचाही परिनाम इंग्रजाणी चांगला लाविला नाही, तेंव्हां पुढे याजपासून काये घडेल ते कलतच आहे. हे दौलत नीट, तरीच सर्वाच्या दौलती नीट आहेत. नाहीतर स्वराज्यात विनाश जाहाले हेच समजावे. इंग्रज वराड प्रांती येऊ लागल्यास पारपत्ये करावे. बरे वजेने रेच मोडावा.........आपले कटक इंग्रजाचे कबज्यात आहे. त्यासी वाकडे दाखविल्यास कटक जाईल हा अंदेशा चितांत आणू नये. स्वराज्ये कायम असल्यास कटक घरीच आहे. स्वराज्यावर पेच, तेंव्हां कटकच राहील यैसे नाही. हा पला पुढील सर्व तुमचे ध्यानांत नाही की काय यैसे बहुत विस्तारयुक्त लिहिले व राजश्री बाबूरावजी याचेही पत्री हांच मजकूर होता. त्यास सरकारचे आज्ञेप्रमाणे राजश्री (त्रुटित)

र नं ९६
फा नं २
प क नं ५९

२०० , १४ जानेवारी १७७२

श्री

सेवेसी विनती सेवक उभयेता नाइक मुकाम नागपूर एतानेक साष्टांग दंडवत विज्ञापना येथील क्षेम ता पौस वद्य १२ गुरुवार पर्येत आपले कृपेकरून वर्तमान येथास्थीत असे विशेष उभयेता श्रीमताकडून दोन पत्राच्या रवानग्या मुकाम कोंडाली व कारंजे येथून आपण राजश्री लक्ष्मणपतदादा याजकडे केल्या त्या पावल्या कोंडाळीचे मुकामाचे पत्रें संक्रातीचे दिवसी पावली तेच दिवसी सरकारात पत्र घेऊन गेल्ये, तो लोकांचे तिलगूल येत होते या गरबडीकरिता पत्रें दाखवावयास सोये पडलीच नाही दुसरे दिवसी कर होऊन काल बुधवारी पत्रें दाखवावी तो दुसरी रवानगी डाकेवरोबर आली दोन्ही रवानग्याचे पत्रें दाखवावी त्यास श्रीमंत माहाराज छेत्रपती स्वामी यास राज्याभिशक जाहाला त्यासी पत्रें उभयेता श्रीमताणी याम लिहिली होती त्याजवरून याणी काल बुधवारी समारभ करून तमाम लोकास बोलाऊन गवइ व कळवातणी उभ्या करून नाचरंग करविला व हातीवर साखर वाटली तोफा पाच सोडल्या समारभ चांगला केला आणि राजश्री दिवाकरपतदादा आपले दादा यासी बोलिले जे, आमची क्रिया चांगली आहे याजमुळे आमची मोहर पूर्वीपासून येकच चालत आली पालट जाहालाच नाही आणि सांप्रत तरी छेत्रपती व सेनासाहेबसुभा तीच अक्षर मोहरेत, अक्षई पुढे परंपरा ईश्वर यैसेच चालवील येक सतक्रियेवर व इमानावर थोहरी उतम फले देतो परीक्षा यातच आहे यैसे बहुत बोलिले सरंजाम खास(त)गत याचा मजकूरही बोलिले ते दादाणी आपणास लिहिलेच असेल त्याजवरून ध्यानास येईल याणी आपले खिजमतगार श्रीमत दादासाहेब याजकडे पाठविले होते ते आले व त्याजबरोबर श्रीमताचेही खिजमतगार असामी दोन आले होते त्यास मागती श्रीमताकडे याणी रवाना केले परतु त्याच्या व याच्या पत्राचा मजकूर काये हा कांही अद्याप शोध लागत नाही. इंग्रजाकडूनही काल पत्रें आली त्याचाही मजकूर कांहीच कळत नाही शोधात आहो समजल्यावरी मागाहून सविस्तर लिहून पाठऊ सर कारची पत्रें आज भास दाखऊ उतर दिल्यास घेऊन पाठऊ, न दिल्यास जे बोलतील ते लिहून पाठऊ. आपण हुसन सारवान याजबरोबर चिठी पाठविली ती पावली त्यास राजश्री बाळाजीपंत भा यांचे हाते यावी त्यास राजश्री नाना व भाऊ याचे समत्ये ठहरले जे, देऊन उपयोग नाही त्याणी कोणासी बोलावे किंवा कांही कारस्ताणी करून दाखवावी हा यैवज त्याचे आंगी नाही तेव्हां चिठी देऊन फळ नाही यैसे बोलिले त्याजवरून

राहिली. वरकड कितेक बारीक मोठे अर्थ राजश्री दादा याणी लिहिले आहेत त्याजवरून सेवेसी श्रुत होईल. बहुत काये लिहिणे कृपा लोभ असू दिल्हा पाहिजे हे विज्ञप्ति.

रु. नं. ९६
फा. नं. २
प. क्र. ८५

२०१

२२ डिसेंबर १७७९

श्री

साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हरजी घोरपे व दताजी कुसाजी कृतानेक सिर-साष्टांग दंडवत विज्ञापना. येथील क्षेम ता। १३ जिलेजपावेतो मुकाम नागपूर साहेबाचे कृपावलोकने आज्ञाधारकाचे वर्तमान येथास्थित असे. यानंतर साहेबी कृपा करून छ ७ जिलकादचे आज्ञापत्र सादर केले ते २५ जिलकादी पावली. तेथे आज्ञा कीं, तलेगांवचा मजकूर राजश्री दिवाकरपंत याणी आगोधर लेहून करावयाचे होते ते न केले. याउपरी दुसरा कारकून लौकरच रवाना होईल म्हणोन मशारनिलेस सांगणे. त्याजवरून आज्ञेप्रमाणे वर्तमान सांगितले आणि आज्ञापत्रहि दाखविले. त्याचे उतर जाहाले कीं, अगोधर श्रीमंतास लेहून करावे हा अर्थ खरा. परंतु येविसीचा मजकूर राजश्री तात्या यास पुण्याचे मुकामी बोलण्यात आलाच होता. त्यावरून त्याणी श्रीमंतास विनंती करणे ते केलीच असेल. कार-कुनाचा मजकूर तरी श्रीमंताणी कारकून तलेगावास पाठऊ नये. जो यैवज देणे तो येथून हुंडी करून पाठविण्यात येईल. कारकून येऊ नये याअर्थी राजश्री तानको कृष्ण यास पत्रें गेली आहेत. त्याप्रमाणे कारकुनाविसी श्रीमंतास विनंती करतील. याप्रमाणे उतर जाहाले. छ १९ जिलकादचे आज्ञापत्र सादर केले ते छ १ जिल्हेजी पावले. सिरी वंदून बहुत संतो-शाते पावलो. तेथे आज्ञा कीं, राजश्री दिवाकरपंतदादा याचे स्त्रीस समाधान वाटत नाही. त्यास सांप्रत शरीरप्रकृत कसी आहे ? आरोग्य जालेच असेल. वरचेवर वर्तमान लिहीत जाणे म्हणौन आज्ञा. त्यास दादाचे स्त्रीस कार्तिक वद्य ३ स देवआज्ञा जाहाली हे वर्तमान पेशजी विनंतीपत्री लिहिलेच आहे. त्याजवरून सेवेसी श्रुत जाहालेच असेल. श्रीमंत राजश्री चिमणाबापू याचा मुकाम वराड प्राती का। पिजर येथे आहे. सात आठ हजार फौज जमली आहे. तूर्त त्याच प्रांती राहावे. येथून साहेबास पत्रें गेली आहेत. त्याची उतरें जैसी येतील त्यासारखे करावे. याप्रमाणे श्रीमंत राजश्री सेनाधुरंधर व राजश्री दिवाकरपंतदादा याणी निश्चये केला आहे. अलीकडे साहेबाची पत्रें यास आली. त्यात मजकूर घाट चढू नये, नागपुराहून पूर्वेस मुकाम करवावा. मोहीम मातबर, महिणा पंधरा दिवस अधिकोतर लागले तरी पेच नाही. घाटावर फौजेचा गाहा होईल, आणि नागपुराचे पूर्वेस गाहा होणार नाही, यैसे नाही. भोसले याचे पत्र लोकास गेल्यास जेथे म्हटले तेथे फौजेचा गाहा

होईल, लोक आगेमागे येतील चिंता नाही परंतु पूर्वेसच जावयाचे करावे येसे बहुत विस्तारपूर्वक लिहिले त्याजवरून राजश्री दादा याणी बहुत प्रस्तावा केला म्हणत होते कीं, हे मसलत श्रीमताणी आम्हास सांगावी आणि आम्ही कबूल करावी येसे काहीच नयते परंतु राजश्री पाटीलबावा जांवगावीहून आले. तदोतर श्रीमत राजश्री नाना व राजश्री तात्या व राजश्री कृष्णरावजी व राजश्री पाटीलबावा याणी भिडेस गोविले आणि म्हणो लागले कीं नवाबानी लिहिले त्याप्रमाणे सर्वांनी करावे सर्वांस करणे उचित आहे तुम्ही बगाल्याची मोहीम करायी यात उपयोग फार आहे, येसा मुदा लोभाचे व ममतेचे पोटी घातला तेव्हां कबूल करणें प्राप्त जाहाले ते समयी आमचे बोलणे कीं, आमचे दौलतीत पैक्याची वोढ फार, आणि मोहीम मोठे फजाखीची इतके मात्र अवघड आहे त्यास गंगथडी प्रांती नबाबाकडून दोन तीन लाख पावेतो राजश्री अपाजी गोपाल घेतात त्याखेरीज ज्याजती देवावे म्हणजे फौज दरीचे घाटावर जमा होऊन मयणी कालेस्वराचे आसपासून आज्ञेप्रमाणे जाईल, येसे बोलिलो ते समई श्रीमंत राजश्री नाना व राजश्री तात्या व राजश्री कृष्णरावजी याणी कबूल केले कीं, घाटमाथा फौजेचा आला घालावा नबाबासहि लिहून सालाबादखेरीज काही येवज देवण्यात येईल, आणि राजश्री पाटीलबावा याणी कबूल केले कीं, जेथे उणं पडेल तेथे आम्ही आपले तर्फेन पूर्णता करू. येसा निश्चये करून श्रीमंताचा निरोप घेऊन नागपुरास आलो. आज्ञेप्रमाणे श्रीमत राजश्री चिमणाबापूसाहेब यास दसरियाचे मुहूर्ते डेरे दाखल करविले. आणि श्रीमंतास व नबाबास व राजश्री जिवाजीपत व राजश्री बगाजी रघुनाथ यास पत्रें लिहिले त्यास सर्वांचे पत्राची उत्तरें आली कीं, घाट चढावयाचे करूच नये त्याजवरून आपूर्व वाटले लिहिल्याप्रमाणे घाटाखाली फौजेचा मुकाम करविला आणि श्रीमतास पत्र लिहिले कीं, आज्ञेप्रमाणे फौजेचा बेत धरला असता नबाबाचे मर्जीस येत नाही त्यास जो बेत धरला आहे त्याप्रमाणे फौजेचा गाहा होऊन मयणी कालेस्वरचे आसपासून जाणे होये येसे घडावे गगथडीस नबाबाचे मर्जीनें लख पनास हाजार ज्याजती देविल्यास घेण्यात येतील मर्जी नसली तरी राजश्री आपाजी गोपाल साल दर साल घेतात त्याप्रमाणे घेण्यात येतील जर करिता यातहि नबाबाची मर्जी दिक होत असली तरी अपाजी गोपाल घेतात, त्यापेक्षा वीस पचवीस हाजार रुपये कमी घेण्यात येतील नबाबाचे प्रांताची खराबी फौज जाण्यामुले होईल, तरी श्रीमताणी आपला जिमा करावा, परंतु सहस्र प्रकारे मयणी कालेस्वराचे आसपासून जाणे घडे येसे करावे याप्रमाणे लिहिले त्याचे उतर कैसी येतील ती पाहावी आमचे पत्रें पोहोचल्याचे पूर्वी अलीकडे त्याणी लिहिले कीं, नागपुराचे पूर्वेस मुकाम करवावा भोसले याचे पत्र लोकास गेलियास जेथे पाहिजे तेथे लोक येतील,

चिंता नाही, यैसे लिहिले. त्यास पैक्यासिवाये फौजेचा गाहा होणे कलतच आहे. येविसीचा अनभव राजश्री तात्या याचे आंगी सर्व वेधना असून यैसे लिहिले यास काये म्हणावे ? बर असो. आम्ही पत्रे लिहिली त्याची उतरें कैसी येतात ती पाहावे यैसे वारंवार बोलत असतात. राजश्री भवानी काळो याची पत्रे लस्करातून पिजरीचे मुक्कामचे आली. त्याणी लिहिले कीं, आलजपुरीहून बहिरामजंगाकडून राजश्री माधवराव कोरडे नामे ग्रहस्त श्रीमंत राजश्री चिमणाबापूसाहेब याचे भेटीस आले. त्यास विचारिले कीं, वराडप्रांती साहेबजादे यांची स्वारी आली, त्यास तुम्हाकडून कांही नजर मेजवानी व्हावी. त्यास त्याणी उतर केले की, नवाबाचे तहाप्रमाणे वाजबी यैवज आपला घ्यावा. सिवायेतह नजर मेजवानी वगैरे घेऊ म्हणाल तरी नवाबाचे तहात आंतर होईल यैसे सांगितले, म्हणोन राजश्री भवानी काळो याणी लिहिले. त्याचे उतर येथून गेले कीं, ज्यापक्ष गंगथडीचा प्रकार यैसा, त्या पक्षी बहिरामजंगास काये म्हणावे ? असो. तहाखेरीज कोणतेहि न करावे. सर्व नजर श्रीमंत माहाराज राजश्री रावसाहेब याचे दौलतीवर द्यावी लागती यैसे दादा याणी लिहिले आहे. राजश्री वेणीराम सिवभद्र याची पत्रें कलकत्याहून येथे आली, त्यात लिहिले कीं, करनल हिस्टीन साहेब याणीं दाहा वीस लाख रुपये खजिना जाहाजात भरून सुरतेस पाठविला होता. त्यास जलमार्गे जाताना जाहाज पाण्यात बुडाले. यैवज मानसे सर्व बुडाले. जाहाजाचा सरदार मात्र वाचला, म्हणोन लिहिले आहे. त्यास राजश्री दादा म्हणत होते कीं, सालगुदस्ता प्रथम इंग्रज कलकत्याहून आले त्यास करनेल लसलीन सरदार मेला व अलिहाट येथे बोलावयास येत होता, तोहि वारला. मुंबईवाले बोरघाटावर श्रीमंतास घेऊन आले तेहि सीकस्त होऊन श्रीमंतास हाती देऊन फजियेत होऊन गेले. तैसेच हेहि दिसते. श्रीमंत माहाराज राजश्री रावसाहेब याचे दैव विचित्र आहे. त्याचे पुण्यप्रतापे करून सर्व गोस्टी नीटच घडतील आणि शत्रू लयासच जातील यैसे बोलिले. निर्मलेहून जाबितजंगाकडून राजश्री गोपिनाथ पुरुशोतम येथे आले होते, हे वर्तमान पेशजी विनंतीपत्री लिहिलेच होते. त्यास वकील मशारनिलेची रवानगी याणी मागती निर्मलेस केली. वकील जाऊन दोन तीन दिवस जाहाले. राजश्री दादा याणी निर्मलेस जावे यैसी साहेबाची आज्ञा व येथील निश्चये होता. त्यास तूर्त फौजेचे जाणे घाटावर महकूब जाहाले. तेव्हां निर्मलेस जाणे महकूब अर्थातच जाहाले. साहेबाची पत्रें आली यावर काये होणे ते होईल. तो पावेतो कोणतेहि होत नाही. साहेबानी सीत्रणी इसंगाबादेविसी भुपाळवाले यास पत्रे पाठविली, ती यास पावली. त्याजवरून लाला जाधवराव याची रवानगी होणार. लौकर जातील. सेनाधुरंधर याचे व सर्वांचे मानस कीं, दादानी

लग्न करावे त्यास दादाचे माणस परिछीन लग्न न करावे जावीतजग याणीहि लिहिले कीं, निर्मलप्रांती मुली साहा वोर्षापासून अकरा वोर्षापावेतो दोन तीन आहेत त्यामध्ये लग्न करावे म्हणौन लिहिले त्यास दादाचे मानस कीं, परिछीन लग्न करू नये म्हणत होते कीं, आग्रहास तरी लग्न करणे नाही आणि श्रीमंत राजश्री नाना व राजश्री तात्या याचीहि पत्रें येतील कीं, लग्न करावेच करावे येसे शपतपूर्वक पत्राची लगर लागेल, काये करावे येसे वोल्लिले त्यास येविसी येक दोन रवानगी लग्न करावे म्हणौन दादास यावीच यावी येविसी साहेबी पत्राची रवानगी तरी केलीच असेल परंतु येथील वोलण्याचा त्याईभाव ध्यानास यावा, यार्थी धटाई करून विनंती लिहिली असे श्रुत होवे हे विज्ञाप्ती.

स. मं ९६
फा मं २
प क्र. ९४

२०२

४ जून १७८०

श्री

पौ छ २१ रजब इदिवे
समानीन

साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हारजी वोरपे व दताजी कुसाजी तोरडमल कृतानेक सिरसा विज्ञापना येसीजे येथील क्षेम ता ३० जाखर पावेतो मुा नागपूर साहेबाचे कृपावलोकने आज्ञाधारकाचे वर्तमान येथास्तीत असे यानतर साहेबी कृपालू होऊन छ ६ जाखरचे आज्ञापत्र सादर केले, ते छ २० मिनहूस पावले सदरी याचून यद्दुत समाधान जाहाले वरचेवर वर्तमान लिहिणे म्हणौन आज्ञा, येणेकरून फार संतोश आहे राजश्री सदाशिवपतदादा यास साहेबी छ १४ जायलचे पत्र पाठविले कलकत्यास पत्रें त्याहा वयाचा मजकूर लिहिला त्याप्रमाणे श्रीमत सेनाधुरंधर व राजश्री दिवाकरपतदादा यास दाखविली पाहून वहुत संतोसी जाहाले आणि वोल्लिले जे, जो मजकूर आम्ही कलकत्यास लिहावा तोच मजकूर श्रीमत राजश्री नाना व राजश्री तात्या याणी लिहिला आहे याची उतरें समजोन लिहून पाठवू म्हणौन वोल्लिले हे वर्तमान राजश्री सदाशिवपतदादा याणी छ १२ जाखरी लिहिलेच आहे त्याजउपरी याणी कलकत्यास पत्राची रवानगी करावी तो राजश्री भवानी काळोजी याजकडे याणी दोन रवानग्या छ ११ व छ १६ जावलच्या केल्या होत्या त्याजवरोवर साहेबाची पत्रें छ २१ राखर यास आली होती तीही याणी भवानीपताकडे रवाना केली होती खिजमतगार व जासूद व कासीद येशा तीन जोड्या सारंगगडापावेतो गेले, पुढे समलपूरवाला याणी मार्ग वंद केला वाटा मारितो माणूस जाऊ देत नाही

याजमुळे तीनही जोड्या माघारे फिरोन आले. राजश्री नारो कृष्ण काले याजकडे सरकारच्या कासीद जोड्या च्यार, साहेबी पुण्याहून रवाना केले होते. तेही याचे जोड्याबरोबर सारंगगडापासून फिरोन आले. तेव्हां राजश्री दिवाकरपंतदादा म्हणो लागले कीं, समलपूरवाल्याणें मार्ग बंद केला. याजकरिता पत्राच्या रवानग्या फिरून आल्या. बंगाला मारावा, जालावा, लुटावा, म्हणौन बहुत विस्तारे लिहिले होते. हा मजकूर भवानीपंतास कळला असता व श्रीमंत राजश्री नाना याची पत्रे आम्हास आली तीही त्याजकडे रवाना केली होती, ही पत्रें त्यास पोहचली असती, तरी लिहिल्याप्रमाणे कांही तरी केले असते. आता या गोष्टीस उपाये काये करावा? आता कोणतेही प्रकारे ही पत्रे लस्करात गेली पाहिजेत. पत्रे जातील तेव्हां चैन पडेल, म्हणोन बहुत दिक जाहाले. राजश्री मार्तंड नाईक बंगालीयातून येथे आले. त्याचे मारफतीने त्याप्रांतीचे वडिये ब्राह्मण च्यार आसामी आणौन त्यास कांही सरकारातून यैवज देऊन ती पत्रे व येथून याणी अणीख पत्रे भवानीपंतास लिहिली कीं, सांगितल्याप्रमाणे तुम्हाकडून गोस्ट अमलात आली नाही. दरमियान समलपूरचा पेच आला व येथून पत्र रवाना केली तीही मागारे फिरून आली. तुम्हास पावली नाहीत. याजमुळे गोस्ट लांबणीवर गेली. सांप्रत बरसादकाल नमूद जाहला. आता काये घडेल? दिवस छावणीचे. तूर्त ढेकानाल व कुजंगवाले वगैरे मवासी आहेत, ते कटक प्रांतीच्ये सुभ्यास अमल सुरलीत देत नाहीत. लबाडी करून शरारत करितात. त्यास तुम्ही मवासी याचे तालुक्यात महिना दो महिणे छावणी करून मवासी मजकुराचे पारपत्य करून च्यार रुपये बेमुर्वत घ्यावे. पुढे लबाडी न करीत ते करावे. फौजेचा गाहा मोठा जाहाला. हे लोक ताजे राहाणे, लोकापासून बरे म्हणवणे, फौजेस पैका मिळणे, यास जागा म्हणावे तरी येक बंगाला. दुसरी तोडच नाही. येविसीचे अर्थ तुमचे ध्यानांत नाही यैसे नाही. त्यास बाजत बरसाद दसरियापासून तरी नेमल्याप्रमाणे बंगाला जालावा, मारावा, लुटावा, यात नफा किंवा नुकसान कोणतेही पाहाता येत नाही. विना हे केल्याखेरीज फौजेस पैका मिळून आपली सुटका होता दिसत नाही. सारांश फौजेस यैवज बंगाला, दुसरी तोडच् नाही. याजकरिता इंग्रजाचा प्रांत जाळून खाक करावा, म्हणजे फौजेची तोड निघेल. आणि बंगाला जालल्याचे वर्तमान श्रीमंत राजश्री नाना व हाजरत नबाब बंदगानअली यास कळावी, म्हणजे केल्या कर्मांचे सार्थक होईल, म्हणौन याप्रमाणे भवानीपंतास पत्रे लिहून वडिये ब्राह्मण याजबरोबर रवाना केली. कदाश्चित हेही पत्रे पावतील न पावतील, म्हणौन या पत्राच्या नकला करून कासीद जोड्या बरोबर निर्मलेकडून दुसरे मार्गे रवाना केली. छ १७ जमाखरी रवानगी केली. नंतर कलकत्यास इमादुदौला यास याणी

साहेबाचे आज्ञेप्रमाणे मजकूर लिहिला आहे आणिगही लिहिले आहे कीं, श्रीमन माहाराज राजश्री पतप्रधान याचे दौलतेचे पोटची आमची दौलत त्यांस टाकून आम्हास कोणतेही करिता येत नाही आणि तुमची आमची दोस्ती चलोत्तर याजकरिता आमचे चितावून श्रीमत माहाराज राजश्री पंतप्रधान याचा व तुमचा स्नेह आमचे मारफतीने व्हावा यांत आमचे चांगुलपणाची शोभा दिसावी. हेच अर्थ चितांत आणीन करनेल गाडर यास तुम्ही गावादेस बहुत लिहिले परंतु प्रसंगानसार गाडराचे जाणे सुरतेस जाहाले त्यांतही तर दरब करून राजश्री दिवाकरपत याची रवानगी पुण्यास केली तेथे जाऊन जितके कर्ण्या-चे मरातब होते तितके रीतीने राजश्री नाना यास बोलिले त्याजवरून त्याणी सर्व गोस्टीची खातरजमा राखून आमचे येकिले आम्ही सागितल्याप्रमाणे सर्व मान्य केले सुरतेस पत्रें व राजश्री लक्ष्मणराव चिटनवीस वगैर याची रवानगी केली लक्ष्मणराव सुरतेस जाऊन गाड रासी बोलून गाडरानी पत्रें लिहिली सेवटी त्याप्रमाणे अंमलात कांहीच आले नाहीत तेव्हा हजरत नवाब बदगान अली याणी मसुदा टरविला जे, श्रीमंत पतप्रधान याची फौज व उभयेता सरदार याणी सुरतेकडे जावे आम्ही सिकाकोलावरे जावे अयवा फौज पाठऊ. हैदरनाईक याणी चेनापटनाकडे जावे भोसले याची फौज बंगाल्यास जावी चहूकडून तान बसवाया इंग्रज आयास येऊन कोणाकडेही तहाचे बोलणे लावतील ते समई सर्वाचे मुदे हासल करून तह करावा याप्रमाणे ठरले त्याजवरून श्रीमत राजश्री नाना याणी आम्हास बंगाल्याची मोहीम सागितले ते समई कबूल न करावे तरी श्रीमत राजश्री नाना चितांत आणितील कीं, भोसले राजमंडळातील दौलतेचे सर्व बऱ्या वाईटाचे सरीक रफीक असता, इकडील लक्ष सोडून इंग्रजाचे लक्षी लागले याच अर्थी गाडर हुसेंगाबादेवर होते ते समई भोसले याजकडून उपेक्षा जाहाली हे दुरनिमित्य अगास येईल आणि हे सरदारी राजमंडळातील, श्रीमत पंतप्रधान याचे दौलतेचे सरीक रफीक हे खरे, तेव्हां सांगितल्याप्रमाणे मोहीम कबूल करणे प्राप्त जाहाली येथे येऊन राजश्री सेनाबा-हादर याची रवानगी दसरियास केली आणि कटक प्रांती जेस्टमासी फौजेचे जाणे घडले याचे कारण येक आपली दोस्ती फौज पचवीस हजार, पैक्याचा पेच भारी आहे, परंतु आमचे लक्ष श्रीमत पतप्रधान याचे ठाई व आपली दोस्ती चलोतर चालावी व श्रीमत पतप्रधान याचा व तुमचा स्नेह व्हावा, स्नेह अकृत्रीम चालावा, त्यांत आमचे चागुलपण शोभावे ऐसी आमची क्रिया ईस्वराजवल खरी आहे, तरी ईस्वर फौजे च्याही पेचावून पार पाडील, कांही गुता नाही परतु आपले लिहिल्यावरून पुण्यास लिहिले, त्याचे उत्तर आले तो मजकूर तपसीलवार लिहिला आहे त्याचे मुदे कसे उगवावे, त्यासी

कसे बोलावे, हे निश्चयपूर्वक खदस्तुर लिहून पाठवावे. त्यासारिखे राजश्री दिवाकरपंत याचे येणे श्रीकासीस घडेल. परंतु आता तहच करावा. यात फार कामे आहेत. तुम्ही दानारयास, जातीने अभिमानी, याजस्तव तलेगावचा बदला घेणे प्राप्त जाहाले. गुजराथ प्रांती साठ सत्तर हाजार मराठी फौज व उभयेता सरदार होते त्यासी गाडराणी तीन महिणे लडाई घेतली. मराठी फौज दाव घाव पाहून राहिले. याजमुले गाडराचे लस्करात दोन सेराची धारन माहागी जाहाली. याजकरिता उपाये नाही, म्हणौन भडोचेस मोठे ज्यामर्दीन गेला. मराठी फौज, उपाये नाही. मोगली फौज असती तरी अलबता धुडविली असती यात संदेह नाही. त्यास आपण तलेगांवचा बदला गाडराहाती घेविला. शर्त जाहाली. याउपरी तहच करावा. श्रीमंत रघुनाथरावदादा याचा पक्ष सोडावा. श्रीमंत पंतप्रधान यासी स्नेह करावा. हेच गोस्ट मसलतेस उचीत आहे. आम्ही दोस्तीचे वाटेने कलकल करून लिहितो. यैसे बहुत विस्तारे सेनाधुरंधर व राजश्री दिवाकरपंतदादा याणी लिहिले आहे व याप्रमाणेंच राजश्री बेणीराम सिवभद्र यासही लिहिले व इमादुदौला याचे दानारयासीचे व दूरंदेसीचें अर्थ पाल्हाले करून लिहिले आहे. बेणीरामपंताचा व्याही बिज्यारामपंत येथे आहेत, त्याची रवानगी मागाहून कलकत्यास करणार, हे वर्तमान बेणीरामपंतास याणी लिहिले आहे. राजश्री सदाशिवपंतदादा यास पत्रें वाचून दाखविली. उभयेता आज्ञाधारकही जवल होतो. राजश्री दिवाकरपंतदादा बोलिले कीं, आमची फौज दसरियास निघोन गेली. त्या प्रांतास जाता ज्येस्ट मास समलपूरचे गुल्याकरिता वगैर सहजा खाली लागला. परंतु इमादुदौला याजवर येहसान सारिखे करून दाखविले कीं, दसरियास फौज रवाना केली असता कटकप्रांती फौज जेस्टमासी पोहचावयाचे कारण हेच कीं, येक तुमचे दोस्तीकरिता केले, यैसे त्यास दर्शविले. गाडराचा प्रताप त्याहावयाचे कारण हेच कीं, तलेगावचा बदला घेतला, शर्त जाहाली, यैसे त्यास समजावे म्हणजे अभिमान सोडितील आणि विवेक करितील, मसलतीचे अर्थ समजतील. याजकरिता तैसे लिहिले. ज्या गोस्टीने ज्याचे समाधान त्यास तैसे लिहिले पाहिजे. येरवी इंग्रज म्हणजे लबाडीचे सिरोमणि, इंग्रज बेइमान म्हणौन श्रीमंत राजश्री नाना वारंवार लिहितात हे खरे. इंग्रजापासून लबाडीच्या रकमा फार जाहाल्या. मागील बोलण्याचे व वचनाचे स्मरण राहूच नये, क्रियेचें भये धरूच नये किंवा नेत्र संकोच होऊच नये, ह्या सर्व गोस्टीं प्रमान. परंतु प्रसंगास उपाये काये ? येरवी इतक्याही गोस्टी खऱ्या आणि आमच्याही प्रतीयास सर्व आले आहे. परंतु येक वेल मजला इमादुदौला याची भेटी घेणे प्राप्त आहे. मग पाहू तैसे करावयास येईल. श्रीमंत राजश्री नाना व राजश्री तात्या लिहितात जे, गुजराथ प्राती सरकारची फौज व

उमयेता सरदार जाऊन लढाई सुरू जाहाली भोसले याची फौज बगाल्यात गेली बंगाला म्हणजे इंग्रजाचे फालीज याजकरिता फालहरण फरावयाचे वाटेने नर्मतेने लिहितात बंगालियांत उपद्रव जाहाल्यास यापेक्षा नरमाई लिहितील, म्हणौन लिहितात त्यास हे समज कैसी असेल हे न कले. आमची फौज बगालियात जाती किंवा गेली, हे वर्तमान त्यास कल्ले नवते मंडलियाचे वर्तमान मात्र जारीराण्यात होते व गुजराय प्रांती लढाई सुरू जाहाली हेही वर्तमान त्यास कल्ले नवते त्याचे पूर्वी आमची पत्रें त्यास गेली होती, ते समइची पत्राची उतरें आली तदोतर गुजराय प्रांती लढाइ सुरू जाहाली व आमची फौज बगालियात जाती हे वतमान इंग्रजास कल्ले अगोधर गुजरायेत लढाई सुरू जाहाली किंवा आमची फौज बगालियात जाणार हे वर्तमान इंग्रजास कल्ले, उपरातीक यैसी पत्रें इंग्रजाणी लिहिली, यैसे जाहाले नाही पत्रें अगोधरचीच आहेत, यात गुंता नाही. परंतु यावर पहिले लिहिल्याप्रमाणे व आम्ही त्याचे पत्राची उतरें पाठविली याप्रमाणे मागती विवेकावर येऊन लिहितात किंवा आमची फौज बंगालियात गेली म्हणौन सिपाइगिरी आगी आणौन तुनुकमिजाज होऊन मागील विच्यार व स्मरण सोडून दुसरेच लिहितात, हे न कले बंगालियात फौज गेलीयावर इमादुदौलाचे व बेणीरामपंताचे पत्रें अगदी येत नाहीन, यामुले इंग्रजाचे लिहिल्यावर भरवसा येत नाही, म्हणौन राजश्री सदाशिवपंतदादा याजवल बोलत होते आज्ञाधारकही जवल होते सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना

र. मं ९६   **२०३**   १७ जून १७८०
फा मं २
प क्र. १२   **श्री**

पो छ २७ जमादिलाखर

साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हारजी घोरपे व दताजी कुसाजी तोरडमल मुा नागपूर कृतानेक विज्ञापना यैसीजे येथील क्षेम ता छ १२ जोखर पावेतो साहेबाचे कृपावलोकने आज्ञाधारकाचे वर्तमान येथास्थीत असे. यानतर नबाब बदगान अली याची पत्रें छ १४ जावलची आली, ती छ २७ जोवली येथे पावली त्यात मजकूर जे, सालगुदस्ता राजश्री दिवाकरपत पुण्यास गेले होते ते समइ हैदराबादेहून प्रथम मसुदा करून पाठविला कीं, इंग्रज शत्रु जबरदस्त त्याचे पारपत्य करणे जरूर आहे। त्यात हैदरखान याचेही शत्रुत्व आहे तेव्हां इंग्रजाचे पारपत्यास फौजा गेल्यास खान। मजकूर सर्वेसी गरबड करू लागतील तेव्हां मसलतेस लांब पडेल याजकरिता धर्त इंग्रजास हैदर पास दावकू नये पानावर, पान ठेऊन तहच करावा, आणि खान मजकुराचे पारपत्य आगोधर

हरवक्त करावे, नंतर सर्वाणी येकत्र होऊन इंग्रजास नतीजा द्यावयास येईल अथवा इंग्रजाचेच पारपत्य अगोधर करावयाचे असल्यास खानमजकुरासी तह करावा, आणि राजश्री नाना याणी फौज सुधा मुंबईकडे जावे व राजश्री तुकोजी होलकर याणी वगैर फौज घेऊन सुरतेकडे जावे व राजश्री माहादजी सिंदे याणी बंगालियात जावे, व राजश्री सेनासाहेब सुभा याची फौज सिकाकोलाकडे जावी, हैदरनाईक याणी चेनापटनाकडे जावे. आम्ही स्वदेसी असावे. चहूंकडून इंग्रजास तान बसवावा म्हणजे इंग्रज जरबेत येतील. आम्ही निखालस असल्यास आम्हाकडे वकील पाठऊन तहाचे बोलणे बोलू लागतील. तेव्हां आम्ही साफ उतर करू जे, राजश्री रघुनाथरावदादा तुम्हाजवल आहेत ते राव पंतप्रधान याचे स्वाधीन करावे, आणि बिघाडाचे पोटात सास्टी वगैरे जागे तुम्ही घेतले ते माघारे खाली करून द्यावे, आणि आमचा प्रांत सिकाकोल वगैरे दाबला आहे तो द्यावा, आणि सेनासाहेबसुभा याचा बंगाला घटाई करून दाबला आहे तोही द्यावा, पूर्वीचे तहाप्रमाणे चालावे. यैसे बोलोन सर्वांचे मुदे उगऊन घेऊ. याप्रमाणे मसुदा ठरला. तेव्हां पूर्वीचे स्मरन जाहाले. पूर्वी कैलासवासी जाणोजीबावा याचे बोलण्यात पाच सात वेल आले होते जे, आम्हास बंगालियाची मोहेमी सांगावी. त्याजउपरी राव पंतप्रधान याचे मसलतेमुले गोस्ट अमलात आली नाही. सांप्रत प्रसंग हाच आहे. भोसले याची फौज बंगाल्यात जावी, राजश्री नाना याणी मुंबईकडे जावे, सिंदे होलकर उभयेता सरदार याणी सुरतेकडे जावे, आमची फौज सिकाकोलाकडे जावी, हैदरखान याणी चेनापटनाकडेच जावे. चहूकडून येलगारा करावा. इंग्रज जेरदस्त जाहालियास कोणाकडेही तहाचे बोलणे लाविल्यास सर्वांचे मुदे हासल करावे. येकास टाकून येकाचा मतलब उगऊ नये. यैसा निश्चये ठरून मसुदा पुण्यास पाठविला. त्याचे उतर कारपरदाज याणी पाठविले कीं, आपण मसुदा पुढील मसलतेचा करून पाठविला तो फार चांगला आहे. मसुदियाप्रमाणे आम्ही व सेनासाहेब सुभा आणकूल असो. हैदरखान यासी तह करून घेतो आणि अगोधर इंग्रजास नतीजा द्यावा हेच मसलत चांगली आहे म्हणोन लिहिले. त्याप्रमाणे राजश्री नाना याणी मुंबईकडे जावे ते गोस्ट घडली नाही. उभयेता सरदार मात्र सुरतेकडे गेले परंतु अवकास करून गेले. तुमची फौज मात्र कराराप्रमाणे हरवक्त गेली, परंतु पला फार दूर यामुले च्यार दिवस कमपेश लागले. आमची फौज सिकाकोलाकडे जावी याजकरिता जावितजंग यास पत्रें रवाना केली कीं, तुम्ही फौज सुधा खमामाकडे जावे. त्याजवरून जंग निघोन लिहिल्याप्रमाणे जगताल पावेतो गेले व येथूनही फौज कांही रवाना केली. याणी त्याणी नेमले मसलतेस जावे त्यास हैदरखान अदवाणीचा अरसा लौकर उठवीनात.

अथाप करनुल तालुकियात त्याचा पायेबंद आहे, तेव्हां फौज सिकाकोलाकडे कैसी पाठवावी! फौज सिकाकोलाकडे गेल्यास खानमजकूर पेच वसवितील त्याचे बेइमानीस पारावार नाहीं याजकरिता फौजा च्यार दिवस राहावील्या खानमजकुराची शरारत अधिकोतर जाहाल्यास पारपत्य करणे जरूर आहे अगर खानमजकुर चेनापटनाकडे गेल्यास आमची फौज सिकाकोलाकडे जाईल कारपरदाज याणी खानमजकुरासी तह केला ते समई आमचा तह कांहीच उगऊन घेतला नाहीं आपलाच मतलब उगविला जर करिता तह करते वेलेस आमची गोस्टी समेटून घेतली असती तर आम्हास इतका पेच वसला नसता फौज सिकाकोलाकडे गेली असती वर असो. आमची क्रिया हेच आहे कीं, राय पंतप्रधान सोला योर्शाचे होतील तोपावेतो त्याचे दौलतेविसी सर्वप्रकारे आणकूल होऊन साहित्य करणे प्राप्त आहे जैसी आमची क्रिया तैसे फल ईसर देईल म्हणौन लिहिले दुसरे याणी वराड व गंगथडीचे नुकसाणीविसी लिहिले होते. त्याचे उतर आले जे, नुकसाणी वाजवी आहे परंतु जेथे नुकसाणी तेथे नुकसाणीसारिखा नफाही होत असनो चिंता नाहीं राजश्री खंडोजी भोसले फौजसुधा शत्रूचे मुल्कात टोकर पोहोचावे, प्रांत जालावा, येविसी वारंवार पत्रें जात असावी व त्याचे कुमकेस आणिख दहा पधरा हजार फौज रवाना करावी म्हणजे शत्रूवर दाब चांगला वसेल निकड करून कदमपेशी करावी म्हणौन वहुत विस्तारे लिहिले आहे. ती पत्रें याणी राजश्री सदाशिवपत दादा यास वाचून दाखविली आज्ञाधारकही जवल होते पत्रें अक्षरेशाहा वाचली नंतर राजश्री सेनाधुरधर वोलिले कीं, या लिहिण्यावरून नवावाचे ल्क्ष तुमचे मसलतेवर आहे किंवा आपले मतलबावर नजर आहे हे पुर्ते समजावे, आणि पुण्यास जे लिहिणे ते लिहावे म्हणौन सांगितले त्याजवरून राजश्री सदाशिवपतदादा याणी नवावाचे पत्राचा मजकूर व याचे वोलण्याचे माव व इंग्रजाची पुढील मसलतेची चाल सविस्तर लिहिले आहे, त्याजवरून सेवेसी श्रुत होईल राजश्री तानको कृष्ण याचे वातमीची पत्रें कालच आली त्याणे लिहिले आहे कीं, गार्डर ज्यामर्दी करून वसरजाम भडोचेस गेला पाठीवर रानेखान वगैरे वावापीराचे घाटापावेतो गेले सेवटी माघारे फिरून आले राजश्री गणेशपंत बेहेरे याणी सुरत प्रांतात दाब वराच वसविला होता परंतु इंग्रजाणी वातमी राखून छापा घातला लस्कर लुटले गेले गणेशपताची खवरच नाहीं मुबईवाले इंग्रज याणी कल्यान घेतले त्याचे मुकावल्यास राजश्री वाजी गोविंद गेले आहेत त्याजवर इंग्रजाणी छापा घातला तेव्हां मोठे सायासेकरून सांभाळून निघाले ऐसे लिहिले आहे. त्याजवरून राजश्री दिवाकरपंतदादा म्हणत होते जे, सरकारची फौज व उमयेता सरदार याणी मेहनत

करिता आलस केला नाही, परंतु इंग्रज परिनाम लागो देत नाहीत. त्यासी तहच करितां बर आहे, येविसी पहिल्यापासून मी सांगत गेलो व कलकत्याहून पत्रें आली तीही रुजू-वाद वकीलासी करून पत्रें पाठविली. परंतु याचे मर्जीस आले नाही काये करावे, यैसे बोलत होते. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ती.

र. नं. ९६
फा. नं. २
प. क्र. ६०

२०४

२५ जून १७८०

श्री

साहेबी छ ७ जमादिलारवरची पत्रें राजश्री सदासिवपंतदादा यास पाठविली ती छ १० मीनहूस येथे आली. राजश्री दिवाकरपंतदादा यास चंदन पाठविला तो यादीप्रमाणे सांडणीस्वाराबरोबर आला. राजश्री दादा यास राजश्री सदासिवपंतदादा याणी नेऊन दिल्हा. चंदन पाहून बहुत संतोसी जाहाले. त्यापैकी दोन तीन खोडे श्रीमंत सेनाधुरंधर याजकडे पाठऊन दिल्ही. पेशजी राजश्री सदासिवपंतदादा याणी मंडल्याचा मजकूर सेवेसी लिहिला होता त्याचे उतर आली जे, मंडले राजश्री सेनाबाहादर याचे सरंजामास दिल्हेच आहे, त्यांत कांही घालमेल करावयाची नाही. परंतु मंडलेवाले याची व राजश्री विसाजी गोविंद याची कलागत परस्परे दोन वोर्शे चालत आहे. यामुळे विसाजीपंताणी तेथील बंदोबस्त केला याचा संशये घ्यावयाचा नाही म्हणौन विस्तारे आज्ञापिले. ती पुरवणी राजश्री दिवाकरपंत-दादा यास दाखविली. त्याजवरून दादा बोलिले जे, श्रीमंत राजश्री नाना व राजश्री तात्या याणी तुम्हास लिहिले हे खरे. यादीमध्य श्रीमंताणी लिहिले त्याप्रमाणे सेनाबाहादर यास सरंजाम मिलेल यात गुंता नाही. परंतु आम्ही येथे आलो ते समई राजश्री विसाजीपंत याणी गढे घेतले. पुढे मंडले घेणार ते समई आम्ही येथून श्रीमंत नाना यास विनंतिपत्रें लिहिली होती त्याची उतरें आली जे, तुमची पत्रे आली त्याजवरून विसाजीपंतास पत्रें लिहून खिजमतगार वगैरे रवाना केले आहेत. याजउपरी मंडल्याचा उद्योग विसाजीपंता-कडून होणार नाही म्हणौन लिहिले. त्यास च्यार पाच महिणे जाहाले. त्याउपर विसाजी-पंताणी मंडले घेऊन जुना राजा कैद करून नवा स्थापिला. यैवज घेतला. सांप्रतही येक ग्रहस्त मंडल्याहून आला आहे. त्यांणी सांगितले जे, मंडले येथील चुकोती बेवीस लक्ष रुपये जाहाली. त्यापैकी तेरा नंतर दिल्हे. बाकी नऊ राहिले, ते घेऊन सागरास जाणार. विसाजीपंत मंडल्यातच आहेत. कुल प्रांतात ठाणी बसविली आहेत. नऊ लाख रुपये वसूल करून सागरास जाणार म्हणौन सांगतो. त्यास आमचे म्हणने हेच कीं, श्रीमंत राजश्री नाना यांची पत्रे व खिजमतगार विसाजीपंतास पाऊन वर्तमान कलल्यावर

आज्ञा न मानिता मंडले घेतले किंवा आगोधरच घेतले हे तुम्ही ल्याहावे आणि उतर आणवावे म्हणौन सांगितले होते त्यास तुम्ही लिहिले असता त्यानी गाळून मजकूर लिहिला किंवा तुम्हीच लिहिले नव्हते हे कांहीच कल्त नाही तेव्हां राजश्री सदासिव-पंतदादा याणी उतर केले जे, आणीखही लिहितो म्हणौन बोलिले राजश्री दिवाकर-पतदादा याचे मानस हेच आहे कीं, मंडल्याचे राहणीपैकी आम्हास कांही तरी यैवज विसाजीपताकडून देवयावा यैसे आहे व येक दोन वेल बोलण्यातही आले आहे सेवेसी श्रुत होये हे विज्ञापी

ह मं ९६
का मं २
प क्र. १०५

२०५

१ जुलै १७८०

श्री

साहेबाचे सेवेसी विज्ञापना यैसीजे

साहेवी कृपाळु होऊन छ ९ जाखरचे आज्ञापत्र सादर केले ते छ २६ मिनहूस पावले सिरी वंदून वहुत समाधान जाहाले राजश्री दिवाकरपतदादा याणी पेशजी साहेवास विनंतीपत्रें लिहिली होती जे, मी पुण्यास येतो, मजला येणीयायिसी आज्ञा आली पाहिजे म्हणौन लिहिले होते व राजश्री सदाशिवपतदादा याजकडूनही लिहिविले होते त्याचे उतर समाधानयुक्त साहेवी वहुत विस्तारे लिहिले, त्याजवरून वहुत संतोसी जाहाले आणि बोलिले जे, श्रीमंताणी सर्व अर्थ उगऊन लिहिले, कोणताही पडदा ठेविला नाही पुण्यास येण्याचा मजकूर श्रीमताणी राजश्री पाटीलबावा यास लिहिला आहे, त्यास जाणे तरी आहेच परंतु ये समई बोलाविले असते तरी जाऊन दोन महीणे राहून दसरियास श्रीहरीचे उछहास आलो असतो आतां पाटीलबावाचे विचारे बोलाविले तरी उछाह जवल आला याजकरिता श्रीमताणी दर्ते वोलाऊ नये वोलावणे तरी उछाह होऊन ललित जाहा लियावर बोलवावे म्हणजे फार चांगले आहे इंग्रजाची मसलत मोठी अवघड येऊन पडली आहे आमच्या छडाया त्यास समजल्या, त्याच्या आम्हास समजल्या पुढे कलह लांकला दौलतीस वोढ फार जाहाली. रात्रदिवस चैन पडत नाही त्यास कोणतेही तऱ्हेने तह असल्यास समेट करावी आम्हाकडे सूत्र आल्यास करीतच आहो कादाचीत आम्हाकडील संधान विस्कटल तरी नवाबाजवल मिस्तर ज्यान हाळन आला आहे त्याचे मारफातीने होत असल्यास करावे हेही न घडे तरी पुढे इंग्रजास पारपत्याचा विचार पका करावा लागेल बंगालियात आमची फौज गेली इतक्याने बंगालियात परिनाम नाही सरकारची फौज पंचवीस हजार व येक सरदार चांगला समंजीस पाठवावा आम्ही साल्गुदस्ता म्हतले

होते जे, बंगाल्यात घोडे भोसल्याचेच फिरले. त्यास हेही अहंता आम्ही सोडिली. श्रीमंताचे दौलतीवर पेच, तेव्हां आम्ही कोणतेही अर्थ पाहात नाही. तूर्त पाहाणे हेच जे, श्रीमंताचे दौलतेचे कल्यान असावे. याचे पोटी सर्व पाहावयास येईल. मुख्यार्थ मुल कायेम, तरी सर्व गोस्टी काईम हेच आमचे पाहाणे व समजणे आहे. दुसरे याखेरीज कांहीच सुचत नाही, याप्रमाणे मी श्रीमंतास लिहीतो. मसुदाही तयार जाहाला आहे परंतु राजश्री चिमापा चिटणीस यास समाधान वाटत नाही, फार हैरान आहे. भरंवसा नाही. गुचकी देखील दोन तीन दिवस लागली आहे. यामुले राजश्री कुशाबा वगैरे चिमापाचे कारकून त्याजवल गुंतले. येका दो दिवसा कारकून आलियावर पत्रें लिहून पाठवितो. तूर्त तुम्ही लिहून पाठवावे म्हणौन राजश्री सदाशिवपंतदादा यास सांगितले त्याजवरून दादाणी लिहिले आहे. मागाहून हे लिहितील त्याजबरोबर राजश्री सदाशिवपंतदादाही सविस्तर विनंती लिहितील. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ती.

रु. नं. ९६
फा. नं. २
प. क्र. ९२

२०६

११ जुलै १७८०

श्री

साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हारजी वोरपे व दताजी कुसाजी तोरडमल कृतानेक विज्ञापना यैसीजे. येथील क्षेम ताा छ ८ रजब पावेतो साहेबाचे कृपावलोकने मुाा नागपूर आज्ञाधारकाचे वर्तमान येथास्तीत असे. यानंतर साहेबी श्रीमंत सेनाधुरंधर व राजश्री दिवाकरपंतदादा यास पत्रे छ ९ जााखरची पाठविली. त्याची उतरें याणी लिहिली आहेत. याचा मजकूर राजश्री सदाशिवपंतदादा याणी व आज्ञाधारक याणी छ ३० जााखरी लिहिलाच आहे व सांप्रत याणीहि लिहिले आहे. दुसरे राजश्री दिवाकरपंतदादा याचे म्हणणे जे, इंग्रजाणी कोकणात शरारत फार केली. कल्यान जागे वगैर घेतल. पुढे उद्योग करीतच आहेत. तस्मात दक्षन ध्यावी हे मानस इंग्रजाचे दिसोन आले. आम्हाकडे तहाचे सूत्र लाविलेच आहे आणि गुजराथेत व कोकणात धुम मचविलीच आहे. तेव्हां तह करितो यैसे बोलून बरसादाचे दिवस घेतील. दसरियापासून बोरघाटावर यावयाची चाल धरतील. याजकरिता पुढील मसलतेची चाल आजपासून धरली पाहिजे तरीच सोई पडेल. पुढील मसलतेच्या चाली तीन च्यार आहेत. येक तरी बिजेरामपत याची रवानगी कलकत्यास करितो. बिजेराम तेथे गेल्यास त्याचा खुलासा तह करण्याचा अगर लडाईचा काये असेल तो सर्व समजेल. तह करीत असल्यास फार चांगले आहे. कदाचीत गाडर असुदा गेला व कोंकणप्रांती त्याची अगलीक जाहाली व होत आहे, या

र्थी हाथभरी होऊन दक्षन घ्यावी, हाच गर्व धरून लढाई करावी हेच इमादुदौला याचे चितांत असल्यास त्याची तजवीज सरकारची फौज पचवीस हजार अगर वीस हजार निदान पधरा हजार व येक सरदार चांगला वजनदार माणूस बंगाल्यात रवाना करावे त्याची तजवीज आजपासून होत असावी दसरियास फौजेन मार्ग चालावा कार्तिक मासी जो सरदार जाईल त्याची व श्रीमन राजश्री सेनाबहादर याची भेट व्हावी दोन्ही फौजा दोहीकडून बंगाल्यात गर्दी मचवावी. जालपोल करावी आणि उभयेता सरदार व जानिजग याची गठण व्हावी फोंकगात इंग्रजासी लढाई करावयास जफरुदौला पात्र चांगला आहे बंगाकडे मामलतसंबंधी च्यार रुपये येणे, त्यास हिशेब किती आणि काम केवढ ? याजकरिता रुपयाचा मजकूर श्रीमंत नाना याणी मनास आणू नये आणि मी सांगितल्यास आणणार नाहीत नाही दुसरे फरासिसाकडील महस्त पहिला पुण्यास आला होता बरोबर जंगी सामान चांगले आणिले होते त्याचा मुदा होता की इंग्रजाचे व आमचे वाकडे आहे त्यास सरकारातून आम्हास काम सांगावे मम्मईबदर इंग्रजाचे घेऊन देतो सुसकीमध्ये फिरंगजातीस सरकारचा काही तोफखाना व फौज द्यावी आमचे वास्ता ये बहुत दूर आहे याजकरिता सरकारातून चेऊल बदर राहावयास द्यावे म्हणजे काम फर्माविल्याप्रमाणे करून दाखवितो यैसा उमेदवार अप्रार्थीत मला माणूस आला होता सरकारातूनही त्याचा सन्मान चांगला जाहाला होता परतु इमामुदौला याणी आम्हास लिहिले की, फरासिसाचे व आमचे वाकडे असता फरासिसाकडील मला मानुस श्रीमत पतप्रधान याणी ठेऊन घेतला चेऊल बंदर व तोफखाना त्याचे स्वाधीन केला याजकरिता श्रीमत पंतप्रधान याचा व आमचा विघाड आहे कर नेल इपटन याचा सह फिरला म्हणोन आम्ही पलटणे ममइस रवाना केली यैसे लिहिले. त्याजवरून मी श्रीमतास लिहिले श्रीमताणी माझे पत्र जाताक्षणीच फरासीसाकडील महस्त काढून दिल्हा बेउमेद होऊन सरंजाम विकून गेला असता तर सांप्रत मोठा उपयोगी पडता इमादुदौला याणी हरामजादगी करून आम्हाकडून पत्रे लिहून काढविला सेवटी हा कालपावेतो इंग्रजाणी पडीचा मोहरा धरून दर्याचे पोटी दौलतेस पेच वसवीत चालला जागाजागा किले व गढी घेऊन मजबूत होत चालला पुढे हाथभरी होऊन सोखी फार मांडली आहे यावरून इंग्रज बेइमानाचे सिरोमणी पुर्ते समजले नरम बोलोन दौलत घेतील श्रीमताचे दौलतीस पेच बसल्यास नबाब व आम्ही राहात नाही याजकरिता सर्वाणी येकदिल होऊन इंग्रजाचे पारपत्यच करावे गेलेला फरासीसाकडील महस्त आणवावा येवणमहलीपैकी येक शाहाणा माणूस पाठवावा.

फरासिसाचे पातशहास व जो ग्रहस्त पहिला आला होता त्यास पत्रें पाठवावी आणि पहिला ग्रहस्त व तीन हजार गोरा जंगी सामान सुधा आणवावा. आणि त्याजबरोबर कांही सरकारचा तोफखाना व फौज द्यावी. आणि ममई व सुरत वगैर लाहान साहान बंदरे घ्यावी. ममई सुरतेकडून फरासीस व सरकारची फौज बंगाल्यात आम्ही व सरकारची कांही फौज कोकण प्रांती सास्टी कल्यान वगैर उभयेता सरदार व जाविनजंग या सिवाये नवाब व हैदरखान यैसे चहुकडून येकदाच येलगारा करावा. आणि इंग्रजास वेत्रजा नतिजा द्यावा म्हणजे इंग्रज सहज आयास येऊन श्रीमंत राजश्री दादासाहेब यास पाठऊन देतील. सास्टी व कल्यान वगैर जागे घेतले आहेत तेही देतील. म्हटल्याप्रमाणे तह करीतील. विनाइतके केल्याखेरीज इंग्रज तह करितात, हे गोस्ट किमपि घडनार नाही. याजकरिता इतके सायास करणे प्राप्तच आहे. हे वर्तमान मी श्रीमंत नाना यास लिहितो. हे मसलत राजश्री पाटीलबावाही पसंद करितील. तुम्हीही श्रीमंतास ल्याहावे. मीही दसरा जाहलियावर पुण्यास जातो म्हणौन राजश्री सदाशिवपंत दादा यास सांगितले व येविसीचा मजकूर राजश्री दादा याणी व राजश्री सदाशिवपंत दादा याणी सविस्तर लि॥ आहे त्याजवरून सेवेसी श्रुत होईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

रु. नं. ९६
फा. नं. २
प. क्र. १०४

२०७

जुलै १७८०

श्री

साहेबाचे सेवेसी विज्ञापना यैसीजे. राजश्री भवानी कालोजी याची पत्रें छ २५ जमादिलावलचें ढेकानालचे मुकामीची आली त्यात मजकूर जे, बाधापासून आज्ञा घेऊन स्वार जाहालो त्या दिवसापासून दरकुचात घोडी मरावयाचा ठपका लागला तो आज पर्यंत तैसाच चालला आहे. घोड्यात हाल राहिला नाही. ढेकानालवाले याणे मृदांगगड म्हणोन जागा मजबूत बांधली होती ते छ मजकुरी घेतलें चुन्हाड व प्यादे हे होते ते पळून गेले. आज कूच करून ढेकानाल ब्राह्मणी नदी पाच कोस आहे तेथे गेलो. ढेकानालवाला याजवळ सरंजाम पोक्त आहे. दाहा बारा हाजार माणूस व हाजार पाचसे इंग्रज तेलंग सुधा आहेत. जाग्याची मजबुदी चांगली केली व करीत आहेत आणि आम्हास तरी ढेकानालवाल्याचे पारपत्य अगोधर करणे जरूर. या प्रांतात मातबर संस्थाणिक हाच आहे. याचे पारपत्य जाहाल्यास मेदणीपुरवाले व कुजगवाले वगैरे लाहान थोर सहजच शरन येतील. रस्त चहूकडून येईल. च्यार रुपये मिलतील व च्यार महिणे छावणीसी सोये पडेल. ढेकानाल टाकून डावे उजवे जावे तरी ढेकानालवाल्यास कुजंगवाले व मेदणीपूरवाले व हरहरपूरवाले वगैरे आनकुल होतील आणि जमाव करतील, चहूकडून उपद्रव

करून रस्त वंद करितील, तेव्हां तिकडूनही अयघड पडेल, येसे समजोन ढेकानालेस गेलो सिना याचे पारपत्य केल्याखेरीज फौजेची सोये छावणीसी पडत नाही. समलपुरास दुराशा करून गुंतलों सेवटी त्याणी लढाई केली त्याच्या घोडी घरोबर आहेत त्याणी फौजेतील गवगवा पाहून घट जाहाले आहेत तेव्हां समलपुरचा यैवज मिल्णे कल्तच आहे दुसरे मार्गेही यद केला याप्रमाणे मर्तमान आहे फौजेत महर्गता फार. पडसी आली तरी च्यार सेर पाच सेर नाही तरी दोन सेर तीन सेर चालिलेच आहेत दश रुपयाचे आद सेर. मीठ तर मिलतच नाही घोड्यास दाना सालीचा, यामुले घोडी पकली आज पावेतो दोन अडीच हाजार घोडी मेली यामुले लोक मेदीत जाहाले लोकांची घरे बुडाली व बुडत आहेत जित्रमाची खरावी जाहाली त्यात गर्चांची योद यामुले लोक बहुत हैराण आहेत कांही घोडेवहुताणी गाहा करून उठून गेले तेव्हां श्रीमंत चिमणावापू स्वारीसुधा लोकांचे समाधान करावयास गेलो त्याचे येक दोन मुदेही कबूल केले तुमची घोडी जी मेली ती आमचे येथे हाजरीस आहेत त्याची तलव देऊ येसे कबूल केले कांही समाधान व कांही दाव येसे दाखविले लोक समजले कीं, आता येक्त नाही तरी कटस्थान घालितील येवंचे दावाचे पोटी घेऊन आलो पुढे लोकांचे गवगव्यावून पार पडणे, तारक ईश्वर व आपले पाये आहेत दुसरी तोडच नाही कलकत्याहून राजश्री वेणीराम सिवभद्र याची पत्रें आली त्यात मजकूर जे, आपली फौज या प्रातास येणार हे वर्तमान कलताच इमादुदौला याणी जलेस्वर वगैरे जागे आहेत, याचे वंदोवस्त केला व करीत आहेत. वरकड जे लिहिणे ते नागपुरास लिहिले आहे, त्याजवरून कलेल म्हणोन वेणीरामपंतानी लिहिले आहे म्हणोन भवानीपंताणी वहुत विस्तारे लिहिले आहे व राजश्री सेनावहादर याचे नावे सरकारात व साहेबासही पत्रें आहेत राजश्री दिवाकरपंतदादा याणी पत्रें राजश्री सदासिवपंतदादा यास दाखविली आज्ञाधारकही जवल होतो. सेवेसी श्रुत होये ही विज्ञाप्ती

क. नं ९६
फा नं २
प क. १८

२०८

१७८०

श्री

साहेवाचे सेवेसी विज्ञापना येसीजे

साहेवी घोड्याची सरेसर येक चांगली नक्षी राजश्री सेनाधुरंधर यास पाठविली ती राजश्री सदासिवपंतदादा याणी नेऊन दिल्ही पाहून वहुत संतोसी जाहाले. म्हणो लागले जे, या सरेसरीजोगे घोडे आम्हाजवल नाही. सरेसर तुम्ही आणविली तैसेच घोडेही आणवून द्यावे तेव्हां दादाणी उतर केले जे, सांप्रत मुखमले पुढे आले आहे, घोडेही मागाहून येईल चिंता नाही म्हणौन बोलिले मार्तपुरीचे सेलेही दिल्हे राजश्री नारोपंत

काले याचीही पत्रें राजश्री सेनाबाहादर याचे लस्करातून आली, तीही दादाणी रवाना केली आहेत. राजश्री भवाणी कालोजी याचे पत्राची उतरें तयार जाहाली आहेत. कलकत्याचे पत्राचा इतला त्यास लिहिला आहे. परंतु इंग्रजाचा व श्रीमंताचा तह होणेच्या गोस्टी ईस्वरास्वाधीन. मणुशापासून दुरापास्त आहेत यैसे लिहिले आहे. फौजेत पैक्याची वोढ, यामुले राजश्री मार्तंड नाईक याची रवानगी केली. नाइकास अडीच लक्ष रुपयाचा यैवज लाऊन दिल्हा. नाइकाणी लस्करात जाऊन राजश्री भवानीपंत यास अडीच लाख रुपये द्यावे. हे अडीच लाख रुपयाचा यैवज आला म्हणजे अणीख अडीच लाख फौजेस द्यावे यैसा करार मदार ठरुन नाइक मशारनिलेची रवानगी केली. वरकड कितेक बारीक मोठे अर्थ राजश्री सदासिवपंतदादा याचे पत्रावरून सेवेसी श्रुत होतील. येथे वर्तमान आले जे, राजश्री बाबूराव हरी यास सोडावयाचा जाब्रसाल राजश्री जिऊबा चिटनीस याचे मार्फतीने लागला आहे. त्याजवरून राजश्री दिवाकरपंतदादा म्हणत होते जे, बाबूराव हरीस सोडणे गोस्ट चुकीपैकी दिसती. येथे बाबूराव हरी होते ते समई आम्हासी श्रीहरी-जवल पुत्राची शपत केली कीं, श्रीमंत राजश्री दादासाहेब याचे राजकारण करणार नाही. यैसी शपत केली असता, तोच पुत्र महंमद इसपाबरोबर रवाना केला व आणीखही अन्याय त्याजकडून उदंड जाहाले. याजस्तव आमची खातरजमा त्याजविसी होत नाही. असो. श्रीमंत नाना याची खातरजमा कसी जाहाली असेल हे नकले म्हणौन बोलत होते. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ती.

रु. नं. ९६
फा. नं. २
प. क्र. ९३

२०९

२२ फेब्रु. १७८१

श्री

साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मलहरजी वोरपे व दताजी कुसाजी तोरडमल कृतानेक विज्ञापना ऐसीजे. येथील क्षेम ता॥ छ २८ सफरपावेतो साहेबाचे कृपावलोकने आज्ञाधारकाचे वर्तमान येथास्तित असे. यानंतर साहेवी राजश्री सदासिवपंतदादास लिहिले जे, नवाबानी अलीकडे नवा खीसारा काढून बोलणे लाविले आहे. याचे कसे करावे येविसी राजश्री दिवाकरपंतदादास विचारावे. ते याची तजवीज कसी सांगतात, ते लिहून पाठवावे म्हणौन आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणे मशारनिलेनी दादास पत्र दाखविले. वर्तमान सांगितले. त्याची उत्तरे दादानी चांगली केली आनि पत्रें लिहून पाठवावी येविसीचा मसुदा मागाहून तयार करुन पाठविणार. उतरे जाहाली. त्याचा मजकूर सदासिवपंतदादानी विस्तारे लिहिलाच आहे त्याजवरून सेवेसी श्रुत होईल. राजश्री दादाचे रक्षेचा पुत्र याचे लग्न माघ वद्य ७ सप्तमीस जाहाले. सेनाधुरंधर यानी समारंभ

चांगला करविला खुद आपण मंडपात येऊन सोमायेमान केले येणेकरून दिवाकरपंत-
दादास बहुत संतोश जाहाला सेनाबाहादर यानी स्वारी करून घेकानाऱ्यालयाचा पुत्र
धरल्याचे वर्तमान पेशजी आले होते त्याचा मजकूर सदासिवपंतदादानी पेशजी सेवेसी
विनती लिहिलीच आहे पेशजी जोडी गेली त्याची व हालीची पत्राची उतरें येतील त्या
सारिखे घडणे ते घडेल वरकड कितेक वारीक मोठे अर्थ राजश्री सदासिवपंतदादा यानी
लिहिले आहे त्याजवरून सेवेसी श्रुत होईल सेवेसी श्रुत होये हे विज्ञापी

द मं ९६
फा. म २
प क्र ९३ (अ)

२१०

२४ फेब्रुवारी १७८१

श्री

साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हरजी मोरपे व दताजी फुसाजी तोरडमल कृता-
नेक विज्ञापना ऐसीजे येथील क्षेम ता॥ छ ३० मफर मदवारपावेतो साहेबाचे कृपे
आवलोकने आज्ञाधारकाचे वर्तमान येथास्तीत असे यानंतरी राजश्री तानको कृष्ण याची
पत्रें छ १३ सफरची श्रीमंत सेना धुरंधर व राजश्री दिवाकरपंतदादा यास आली ती
छ २८ मीनहूस यास पावली. त्यात मजकूर जे, इंग्रज वमईहून निघोन बोरघाट चढून
घाटमाथा खंडालेयास आले सरकारची फौज व होळकर यानी येक दोन लढाई इंग्रजासी
घेतली परतु साधली नाही मागारे सरून घाटावर फारले येथे आले आहेत घाटाखाली
राजश्री बाजीपंत आना इंग्रजाचे पिछावर आहेत मारामारी करून उपद्रव करीत आहेत
व होळ्करकडील पेंढारियानेहि इंग्रजाचे तोफाचे बैल तीनसे व कांही छकडे व सामान,
व पालख्याण्या वगैरे पाडून छुगारून आणिले व आनीत आहेत सरकारची फौज चालीस
हाजार आहे परंतु इंग्रजाची जबरदस्ती फार आहे इंग्रज मजबुदीने जमावसुधा घाट
चढून मैदानात आले यामुळे पुण्यात लोक फार गरबडले आहेत पुण्य वोस होत आहे
भांडे देखील मिळत नाही. पुढे काये होते ते पाहावे म्हणोन लिहिले त्याजवरून या उभये
तास बहुत आश्चर्य वाटले. राजश्री दादा म्हणो लागले जे, सरकारची फौज घाटाखाली
पहिली गेलीच होती. मागाहून राजश्री तात्या व होळकर गेले चालीस हजार फौजेचा
गाहा जाहला असता इंग्रज येकायेकी मराठे फौजेस न मानिता जबरदस्तीने सरंजामसुधा
घाट चढून वरता आला, तेव्हां पुढे कैसे होईल? इंग्रज येकटा विनाआश्रा कोणाचा
असल्यावेरीज घाट चढावयास इंग्रजाची हिमत होईल ऐसे दिसत नाही नबाबाचा
मनसुबा नीट दिसत नाही त्यानीच नक्षा ठरविला असता सर्वांस भरी घालून आपण
तमासबीन होऊन घरी बसले, व इंग्रजाकडील वकील मिस्तर ज्यान हालन आपणापासी
ठेविलाच आहे इंग्रजाचा स्नेह राखून आपला बच्याव करून आहेत तेव्हां

गाडर व नवाव येकच दिसतात. गाडर नवाबाच्या समता खेरीज घाटमाथा आलेच नाहीत. नवाब व गाडर येकत्र जाहाल्यास फार कठीन पडेल अथवा तह केला तरी नवाब वडीलपणे सांगतील त्याप्रमाणे ऐकणे प्राप्त आहे. तेव्हां दोहीकडून कठिनच आहे. नवाब गाडर येक होतील यात गुन्ता नाही. या उपरी श्रीमंत राजश्री नाना यानी नवाबास कागद पत्र लिहिणे व इतला देणे तो बहुत समजोन द्यावा व लिहावे येविसीचा मजकूर तुम्ही श्रीमंतास लिहून पाठवावा. नवाबाकडे पत्रें ल्याहावयाचा मसुदा पाठऊ म्हटले होते, परंतु सध्या मसुद्याचे प्रयोजन नाही म्हणौन दादानी राजश्री सदाशिवपंतदादा यास सांगितले. त्याजवरून मशारनिलेनी सेवेसी विनंती लिहिली आहे. निर्मलेहून राजश्री गोपिनाथ पुरुशोतम याची बातमीची पत्रें आली त्यात लिहिले जे, करणेंल कोट चेनापटणास दाखल होऊन कोटाची व हैदरखान याची लडाई जाहाली. खान मशारनिले सिकस्त होऊन तीन कोस मागारे आले म्हणौन लिहिले आहे. राजश्री सेनाबाहादर याचे लस्करची बातमी आली आहे. अद्याप ढेकानालाजवलच आहेत. राजश्री भवानी कालो व राजश्री मनाजी सामराज याचे शरीरी समाधान वाटत नाही म्हणौन लिहिले आहे. वरकड कितेक बारीक मोठे अर्थ राजश्री सदासिवपंतदादा यानी लिहिले आहे त्याजवरून सेवेसी श्रुत होईल सेवेसी होये हे विज्ञापी.

रु. नं. ९६
फा. नं. २
प. क्र. १०९

२११

२० मे १७८१

श्री

पौ छ ८ जमादिलाखर
इहिदे ज्येष्ठ

साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हारजी वोरपे व दताजी कुसाजी तोरडमल कृतानेक विज्ञापना ऐसीजे. येथील क्षेम ता। २५ जमादिलावल पावेतो मुकाम नागपूर येथे साहेबाचे कृपावलोकने आज्ञाधारकाचें वर्तमान येथास्तीत असे. यानंतर राजश्री सेनाबहादर व राजश्री भवानी कालो याची पत्रे बालेस्वर बंदरची मुकामची छ १६ रविलाखरची आली. त्यात मजकूर नागपुराहून वरचेवर आज्ञा येत गेली जे, शत्रूचे प्रांत नेमाप्रमाणे जाळपोळ करावा. त्याजवरून फौजेचे समजावीस थोडेबहुता जे करून कटकाहून कूच करून चालिलो. पुढे जावे तरी इंग्रजानी चहूकडून घाट बंदी करून बंदोबस्त केला. कोण्हीकडे निघावे तरी फौजेत महर्घतेमुळे व पैकियाचे वोढीमुळे ताकद राहिली नाही. प्रांताची हवा नाकारी यामुळे घोड्या उंटाचा संहार फार जाहाला. तेव्हां मोठे सायासे करून केवझडवाला जमीदार बोलाऊन त्याची खातरजमा करून आज कुळ लोक त्याचे

प्रांतावून जावयाची योजना केली परंतु रानझाडीचे व डोंगर मोटे, अन्न नाही शत्रूचे पारपत्य न करिता व सरकारकाम न होता उगेच फौजेचे मरण होते प्रान वाचत नाही, तेव्हां प्राप्त झाले जे, कांही तरी करून शत्रूवर दाब राखून प्रान वाचवावा ऐसी मसलत चितात आणोन, सरदारास सांगोन, परमारे जळेश्वार वगैरे जागे येथे गरबड करविली त्याजवरून इंग्रजानी कांही भये व कांही दाब धरून इंद्रमन येथे पाठविले. मशारनिले येऊन बोलो लागले त्यात कांही जीव नाही सेवटी राजाराम मुकुंद समागमे घेऊन कलकत्यास गेले तेथे जाऊन मोठे युक्तीने तेरा लक्षाचा करारमदार केला व पहिले तीन येकून सोळा आनीख दाहा मागितले परंतु ऐकेनात सेवटी रोखा घेऊन यावेत ऐसे म्हटले परंतु ठरता दिसत नाही म्हणोन लिहिले आहे त्याजवरून सेनाधुरंधर व राजश्री दिवाकरपतदादा यास फार वाइट वाटले म्हणो लागले जे, पुण्यास जाऊन हे मोहीम श्रीमत नानाच्या सांगितल्यावरून कबूल करून येथे येऊन फौज रवाना केली. पैकाही खर्च केला त्याचे फल ऐसे प्राप्त व्हावे, याअर्थी केले नव्हते फटक दुसाला व साउकारी कर्ज मिळोन कमपेश पनास लाख रुपये लागोन चुकले त्यावून सोळा लाख घ्यावे हे उचित की काय! भवानीपतानी मोठी चुकीची गोस्ट केली कांही अंदेसा पाहिलाच नाही सोळा लाख घेतले याचा संतोश नाही यापेक्षा फटक इंग्रजानी घेतले असते तरी मोठा संतोश जाहाला असता आनि श्रीमंत नाना याचा दोश न लागता आता कांही न करिता त्याचा मनोभग जाहाल्यासारिखे जाहाले आता लिहून पाठवावे जे, तुम्ही हे मसलत चुकून केली, करावयाची नव्हती व नाही पूर्वीपासून तुम्हास सांगितले व लिहीत गेलो त्याप्रमाणे करावे, असे जरी लिहितो तरी येथून पत्रे जाऊन पोहचावयास येक मास पाहिजे तो पावेतो फौज मागारे फिरोन आपल्या मार्गात येईल तेव्हां लिहिणे अलम आहे आता जे जाहाले ते समर्थ फौज बलाऊन घेणे हेच उचित आहे याप्रमाणे राजश्री सदासिवपतदादा यानवल भाशन जाहाले आनि दिवाकरपंतदादा बोलिले जे, माझी क्रिया नीट आहे तरी श्रीहरी फलही चांगलेच देईल माझे शरीरी समाधान श्रीमंताचे पुण्य करून कांहीसे जाहाले म्हणजे मी पुण्यास जाऊन श्रीमंत नानाजवल विनंती करीन म्हणोन बहुताप्रकारे बोलणे जाहाले. आनि यानी व राजश्री सदासिवपतदादा यानी विस्तारे करून विनती पत्रे सेवेसी लिहिली आहेत त्याजवरून सेवेसी श्रुत होईल राजश्री सेनाबाहादर व राजश्री भवानी काळो यास पत्रे लिहून तयारी केली जे, तुम्हास सांगितले व लिहिले ते येथीकडे ठेऊन न करावे तेच केले. तुम्हास काये म्हणावे! तुम्ही इंग्रजापासून पैका घेतला व मागारे येता येणेकरून

राजश्री बाळाजीपंत नाना याचे चितास वाईट वाटेल. याजकरिता राजश्री दिवाकरपंत याची रवानगी पुण्यास करणे प्राप्त आहे. मशारनिले तेथे गेलियावर येथील आचरनाचा मोहजब देतील व सर्व कचे पके अर्थ समक्ष बोलतील तेंव्हांच त्याचे समाधान होईल. पनास बावन लाख रुपये मसलतीस लागोन खिसारियाखाली आलो हे येकीकडे राहून तुम्ही चुकल्यामुळे दिवाकरपंत यास पुण्यास पाठऊन क्रियेचा झाडा देणे लागला इतके अवघडपण तुमचे चुकीमुळे जाहाले. बरे असो. जे जाहाले ते समर्थ. परंतु आता दिवसगत न लागता लौकर यावयाचे करावे. मार्गी समलपूरवाला जमीदार याचा बंदोबस्त करून यावे. सहजाखाली बंदोबस्त होत असल्यास करावा. दिवसगत लागू लागल्यास पानावर पान ठेऊन दाब राखोन यावे. चिरंजीव बिंबाजीवावा आबा यास लोकाच्या सांगण्यावरून उगाच संदेह कारण नसता उत्पन्न जाहाला आहे. त्यास तुम्ही येताना त्याची भेटी घेऊन तेथे च्यार दिवस मुकाम करून त्याची खातरजमा करून समागमे भेटीस घेऊन यावे. येथे आलियावर भेटी निरंतर सर्व आर्थ परस्परे बोलण्यात येऊन संदेहाची निवृत्ती उभयेपक्षी होईल. परंतु त्याचे येणे तुम्हाबरोबर होये हे जरूर घडवावे म्हणौन लिहिले आहे. वरकड कितेक बारीक मोठे आर्थ राजश्री सदासिवपंतदादा यानी लिहिलेच आहे त्याजवरून सेवेसी श्रुत होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ती.

रु. नं. ९६
फा. नं. २
प. क्र. ९८, ९९ व १००

२१२

१५ जून १७८१

श्री

पौ छ ५ रजब आषाढ सन इसने समानीन

साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हारजी वोरपे व दत्ताजी कुसाजी तोरडमल कृतानेक विज्ञापना ऐसीजे, येथील क्षेम ताा छ २२ जमादिलाखर पावेतो साहेबाचे कृपालोकने मुाा नागपूर येथे वर्तमान येथास्थीत असे. यानंतर राजश्री सेनाबहादर यानी इंग्रजासी बोलीन पानावर पान टाकून सोला लाख रुपये घेऊन मागारे यावयाचा निश्चये ठरऊन श्रीमंत सेनाधुरंधर व राजश्री दिवाकरपंतदादा यास पत्रें लिहिली, त्याजवरून यानी भाशन केले. त्याचा मजकूर राजश्री सदाशिवपंतदादा लिहिलाच आहे व यानीहि लिहिले आहे त्याजवरून सेवेसी श्रुत जाहालेच असेल. अलीकडे सेनाबाहादर व राजश्री भवानी कालो याची पत्रे आली जे, आम्ही कुच करून बोध्यास आलो. येथून समलपूर च्यार पाच मजली पुढे आहे लौकरच येतो म्हणौन लिहिले आहे. त्याची उतरें यानी पाठविली जे, तुम्ही येथून गेला ते समई बंगाला ताकताराज कर्ण्याविसी बहुता प्रकारे बोध केला

म येथून सरचेयर पत्रें लिहीत गेलो जे, हंगामा जाल्योल कर्ण्याविसी आळस नच कराना. नेमीली मसल्त सिध्धीस गेली म्हणजे केल्या फर्माचे सार्थ होईल व फौजेचा ही खिसारा दूर होईल आनी दौलतेची नोक व आब राहील ऐसे वारंवार लिहीत गेलो ते तुम्ही सर्व येकीकडे ठेऊन इंग्रजासी वोलोन ऐवज घेऊन येत आहा, तुम्हास काये म्हणावे ? विधाडाचे पोटात वारामटीचा किल्ला व कटक प्रांत गेले असते व हाजार पाचसे माणूसही कामास आले असते तरी थाईट न वाटते मोठा संतोश चितास जाहाला असता । परंतु तुम्ही सर्व मसल्तेची व कर्ण्याची चाल सोडोन अविच्यारपणाची वर्तणूक केली येणेकरून फार उणे पन आले याच अर्थी राजश्री दिवाकर पुरुषोत्तम याची रवानगी पुण्यास करणे प्राप्त आहे बरे असो जे जाहाले ते समर्थ परतु समन्‍दूरवाला याने गुदस्ता तुम्हासी बदमामली केलीच आहे आता आनयासा मार्गी आहे व सरकारच्या तोफाही त्याजवल आहेत त्यास तुम्ही त्याचे पारपत्य करे यजेने करून तेथील बंदोबस्त उतम प्रकारे करावा अनी चिरंजीव चिंताजीबाबा याची भेटी घेऊन त्याची खातरजमा पक्केपणे करावि संशयेनिवृती करून भेटीस तुम्हासमागमे घेऊन यावे ही दोन्ही कामे अगत्यरूप करून यावे म्हणोन लिहिल आहे पत्रे जाऊन च्यार पाच दिवस जाहाले यरकड कित्तेक बारिकमोठे अर्थ राजश्री सदाशिवपतदादा यानी लिहिलेच आहेत त्याजवरून सेवेसी श्रुत होइल सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ती.

पुरवणी साहेबाचे सेवेसी विज्ञापना ऐसीजे राजश्री दिवाकरपतदादा साहेबाचे भेटीस यावयाची जलदी फार करीत आहेत. तेथे गेल्याखेरीज परिनाम नीट नाही, शरीरी समाधान नाही, परंतु येथून निघालो म्हणजे वाटेन श्रीमंताचे पुण्यप्रतापे करून दिवसे दिवस आरोग्यता होइल ऐसे म्हणत आहेत परंतु वैद्यानी सांगितले जे, मृगसीतलाई पड त्यास दाहा शम होईल, व वाटेन औशध च्यावयास सोये पडेल, ऐसे आजपर्यंत सांगत गेले जेष्ट सुध पक्षामध्य शरीरप्रकृत काहीसी बरी होती ते समई निघावयाची जलदीही करीत होते. सांप्रत या आठा दिवसात मागती गमान होत आहे. शरीरप्रकृतीचे वर्तमान तरी आजपासून गुणासच येत गेले तरी पालखीत बसून मजल चालावयायोग व्हावयास येक मास पाहिजे आनि येण्याविसी तरी फार जलदी करीत आहेत । काय घडेल ते पाहावे । जावीतर्जगाचा काल जहाला त्याचा पुत्र फरुक मिर्जा । आहे त्यास नवाब बंदनगानअली यानी बर्खे पाठवून त्याचे नावे सरदारी कायेम केली , त्यास याचे मानस आहे जे, जंगाचा व आपला स्नेह होता । त्याप्रमाणे मिर्जा मारनिलेचा स्नेह पका करून घ्यावा या तजविजीत आहेत. परतु तेथे मणुश पोक्त समजीस कोण्ही नाही । बली महमद बक्षी आहे, परंतु तो फक्त सिपाई, मसलतगार पुरा नाही । केल्याप्रमाणे जाहाल्यास उतम.

न जाहाल्यास लिहिणे व बोलणे तरी जेथील तेथे राहिले पाहिजे. याच अंदेशात आहेत, म्हणोन ल्याहावयास व बोलावयास याची खातरजमा पुरत नाही. जंगाकडून बुचेना नाईक जासूद येथे आहे, त्याची रवानगी यानी निर्मलेस केली आहे. निघोन प्रस्थानी आहे. येका दो दिवसी जाईल. नाईक मजकुरासही स्नेहाचे अर्थ बोलावयास सांगितले आहेत. येका महिन्यात जाऊन फिरोन येईल. काये घडेल ते पाहावे. इंग्रजानी सोळा लक्ष रुपये दिल्हे म्हणौन दादा बोलत आहेत व सेनाबहादरही लिहित आहेत. परंतु राजश्री नारोपंत काळे याचे लिहिल्यावरून ताळा पडत नाही. दादाची शरीराची अवस्था तरी अद्याप आरोग्यता नाही. याजकरिता याचे येणे तूर्त महिणा दोन महिणे होता दिसत नाही. पुढे अश्विनमासी याचे घरी देवाचा उछाह आहे. तेव्हां काये घडेल हे नकले. परंतु जातोच म्हणतात. म्हटल्याप्रमाणे विनंति लिहिणे प्राप्त आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

रु. नं. ९६
फा. नं. २
प. क्र. १०१

२१३

९ जुलै १७८१

श्री

साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हारजी वोरपे व दताजी कुसाजी तोरडमल कृतानेक विज्ञापना ऐसीजे. येथील क्षेम ता। छ १६ रजब मु॥ नागपूर साहेबाचे कृपावलोकने आज्ञाधारकाचे वर्तमान येथास्थीत असे. यानंतर कलकत्याहून इमादुदौला याची पत्रें सेनाधुरंधर व राजश्री दिवाकरपंतदादा यास आली जे, गुदस्ता तुम्ही दिवाकरपंताची रवानगी तहाचे कामाकरिता श्रीकासीस करणार होते व इकडून आम्हीही येणार होतो, तो जाबसाल श्रीमंत माहाराज राजश्री पंतप्रधान व कारभारी याचे जिदीमुळे घडोन आला नाही. बरे असो; आतातरी दिवाकरपंतदादा याची रवानगी श्रीवारानसीस करावी. आम्हीही लखनुरास येतो. नंतर कासीस पंत मारनिलेची व आमची भेटी होऊन परस्परे सर्व अर्थ बोलण्यात येतील म्हणौन लिहिले व राजश्री दादा यासही हाच मजकूर यापक्षी विस्तारे लिहिला आहे. त्याची उत्तरें येथून यानी इमादुदौला यास लिहिली आहेत जे, तहच करणे ऐसे तुमचे मनापासून निर्मळपणे आहे तरी तुम्ही साफ श्रीमंत राजश्री नाना यास परभारे पुण्यास लिहून पाठवावे जे, तुमचा व आमचा विघाड आज सात वोर्से वाढला आहे. यात उभयेपक्षी नफा व नुकसान कोणाचे किती जाहाले व पुढे परिनाम कसा हे सर्व समजले आहे. त्यास आमचे चितात हेच आहे जे, आता आपला व आमचा तह व्हावा म्हणजे उभयेपक्षी दौलती निर्वेध होतील. परंतु या बोलण्यात राजश्री दिवाकरपंतदादा असावे. दिवाकरपंतदादा तरी तुमचेच आहेत. परंतु आमचेहि स्नेही व सेजारी आहेत त्यास आम्हाकडे पाठवावे. त्यानी

श्रीफासीस यावे म्हणजे आम्हीही फासीस येऊ. भेटीनतर सर्व बंदोबस्त होणे ते होईल म्हणोन शपतपुरस्कर पत्रें तुम्ही श्रीमंत नानास ल्याहावे, म्हणजे त्याची खातरजमा पकी होईल नतर आम्हास श्रीमत लिहितील त्याप्रमाणे आम्हाकडून घडोन येईल म्हणोन राजश्री दादा यानी बहुत विस्तारे मजकूर लिहिला आहे याचा तपसील राजश्री सदाशिवपतदादा याचे पत्रावरून सविस्तर सेवेसी श्रुत होईल राजश्री दादाचे शरीरप्रकृतीचे वर्तमान जैसे आहे तैसेच आहे औशध उपाये होतच आहेत परंतु कोणाचे औशध उपयोगी पडोन गुणास येत नाही सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति

र. नं. ९६
फा नं. २
प क्र. १२

२१४

१६-जुलै १७८१

श्री

सेवेसी मल्हारजी नाइक योरपे व दत्ताजी नाईक तोरडमल्ल कृतानेक सां दंडवत विनंती ऐसीजे येथील क्षेम ता छ २३ रजबपावेतो मु॥ नागपूर आपले कृपेकरून वर्तमान येथास्तीत असे विशेष दियाकरपंतदादाचे शरीरी समाधान यावत नवते याचे आराम गैर-आरामाचे वर्तमान पेशजी सरकारात व आपणास वरचेवर विनंती लिहीनच गेले सांप्रत अशाढ वद्य ५ पंचमीस सीतज्वर आला त्या संवीन ज्वर उतरताच संनिपात व कफ निर्मान जाहाला त्रिदोश होऊन भ्रांती पडली दोन तीन दिवस व्याकुल होते बोलणे सर्व येकायेकी अकस्मात बंद जाहाले उपरांत कफामुळे स्वासही अधीक जाहाला अशाढ वद्य ९ नवमीस रविवारी प्रात काली च्यार घटका दिवस येताच देवाज्ञा जाहाली ईस्वरे बहुत वाईट केले. ईस्वरसत्तेस उपाये तरी कोणाचाही नाही परंतु दौलतीत मोठे दूरदेशी उमदे मनुश होते. दादाकरिता सेनाधुरधर व सेनासाहेबसुभा वगैरे सर्व मंडली फार श्रमी जाहाले व होत आहेत दुसरे राजश्री सेनाबाहादर व राजश्री बिंबाजीबावा भोसले याचे भेटीस गेल्याचे वर्तमान पेशजी लिहिलेच आहे सांप्रत सेनाबहादर याची पत्रें आली त्यांत मजकूर जे, अशाढ सुध १ सुमुहूर्ते करून बिंबाजीबावास समागमे घेऊन निघालो, तो रतनपुराचवल दाहा कोश आलीकडे तख्तपुरास आलो बिंबाजीबावाबरोबर राजश्री खंडोपंत व महिपतराव दिनकर व वेंकटराव कासी व हबीरराव मोहिते व महंमदखान तरीन आहेत. तख्तपुरावरून कुच यावे तरी पर्जन्य फार लागला यामुळे बिंबाजीबावाचा मुकाम तख्तपुरीच जाहाला त्याजवळ राजश्री भवानी काळो व मनाजी सामराज ठेऊन आम्ही सडे निघोन वमध्यावर आपले फौजेत आलो पाठीमागोन बिंबाजीबावा आले म्हणजे कुच करून लौकर येतो, म्हणौन लिहिले आहे पुढे जैसे वर्तमान येईल तैसे वरचेवर लिहिण्यात येईल बहुत काये लिहिणे. कृपा लोभ असू दिल्हा पाहिजे हे विनंती.

र. नं. ९६
फा. नं. २
प. क्र. ३३

२१५

१६ जुलै १७८१

श्री

पौ छ ७ सावान

साहेवाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हारजी वोरपे व दताजी कुसाजी तोरडमल कृतानेक विज्ञापना ऐसीजे. येथील क्षेम ता छ २३ रजव सोमवार पावेतो मुकाम नागपूर साहेवाचे कृपावलोकणे आज्ञाधारकाचे वर्तमान येयास्तीत असे. यानंतर दिवाकरपंतदादा याचे शरीरी पक्षघात वायूचा रोग होता. त्याचे आराम गैरआराम याचे वर्तमान राजश्री सदासिवपंतदादा यानी व आज्ञाधारकानी पेशजी वरचेवर विनती पत्रें लिहिलीच आहेत. सांप्रत आशाड वद्य ६ स सीतज्वर आला. येक दिवस ज्वर होता. ते दिवसी भ्रमना पडली. वोलणे चालणे सर्व राहिले. तृतीये प्रहरी श्रीमंत सेनाधुरंधर व सेनासाहेव सुभा दादाचे घरी गेले. वहुताप्रकारे वोलऊन पाहिले. परंतु वोलले नाहीत. सेवटी मोठे वळ्कारे म्हटले जे, काये वोळू? त्या उपरात राजश्री सदासिवपंतदादा गेले. यानीही वहुत वोलऊन पाहिले, परंतु येजमानासी उतर जाहाले त्याप्रमाणेच यासही जाहाले. दुसरे दिवसी सुक्रवारी प्रातःकाली दोन तीन घटकापर्येत काहीसे सावध जाहाले. ते समयी सेनाधुरंधर व राजश्री सदासिवपंतदादा गेले होते. यासी वोलो लागले जे, दौलत मोठी, वर असो. दौलतीचा वाली ईस्वर आहे. भोसले याचे घर मोठे परंतु नोक राहिली याप्रमाणे वोलो लागले. तेंव्हां सेनाधुरंधर व सदासिवपंतदादा यानी उतर केले जे, ऐसे वोळू नये व उदासीचा प्रकार चितांत आणू नये. ईस्वर आरोग्य लौकरच करील व इछिले मनोर्थ पूर्ण होतील. याप्रमाणे सागितले. त्याउपरी दादा काही वोलानातसे जाहाले. तेंव्हां हे उभयेताही उगेच राहिले. म्हणो लागले, आता तरी जावे. ज्वर निशप जाहालियावर सावध होतील. म्हणौन वैद्यास सांगितले, वरचेवर औशध उपाये करावयास अलस करू नये याप्रमाणे सांगोन आले. मागे ज्वर उतरावयाचे संधीतच शनिपात जाहाला व कफही जाहाला. वैद्यानी औशधउपायेही वहुत केले व सेनाधुरंधर यानीही उपाये करविता कांही आलस केलाच नाही. परंतु कांही गुणास येईना. सुक्रवारी साइकाली फार घावरे जाहाले ते समई वरून श्रीहरीच्या चौकात खाली उतरून आणिले. वोलणे तरी अगोधर प्रातःकालीपासून बंद जाहालेच होते. दुसरे दिवसी शनवारी स्वास चालला. सनवारी दिवस रात्र होते. रविवारी प्रातःकाली च्यार घटका दिवस येताच आशाड वद्य ९ नवमीस अकस्मात देवआज्ञा जाहाली. सेनाधुरंधर जाऊन दादाचा मेहुना राजश्री सिवरामपंत याजकरवी उतर कार्ये करउन अग्नप्रवेश करविला. सेनाधुरंधर व सेनासाहेव सुभा वगैरे सर्व मंडळी फार श्रमी जाहाले व होत आहेत.

ईश्वरे फार थाईट केले दौलतीत दादा मोठे दूरदेशी माणूस होते, परंतु ईश्वरसत्तेस उपाये काये । सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ती

र मं ९६
फा मं २
प मं ३५

२१६

१६ जुलै १७८१

श्री

पुरवनी साहेबाचे सेवेसी विज्ञापना ऐसीजे राजश्री सेनाबहादर रतनपुरास जाऊन राजश्री बिंबाजीबावा याची भेटी होऊन येण्या निश्चये ठरून पत्रे आली होती त्याचा मनकूर राजश्री सदासिवपत यानी विनंती पत्रे लिहिलीच आहेत व आज्ञाधारकानीही विनंती लिहिली आहे सांप्रत सेनाबाहादर याची पत्रे छ १९ रजबची बांधापलीकडे बारा कोश मुकाम आहे तेथील आली, ती येथे छ २२ मीनहूस आली त्यानी लिहिले आहे जे, तीर्थरूपाचे आज्ञेप्रमाणे तीर्थसरूपाची खातरजमा करून घेऊन येत असो रतनपुराहून कूच करून अलीकडे दाहा कोश तक्तपुरास आलो. तीर्थस्वरूपाबरोबर राजश्री हबीरराव मोहिते व महिपतराव दिनकर व धोंडो महादेव व महमदखान तरीन व व्यंकटराव कासी आहेत तक्तपुराहून कूच करुन पुढे यावे तरी, ते मुकामी प्रजन्य फार लागला यामुळे कूच करावयास सोये पडेना तेव्हां राजश्री भवानी काळो व मनाजी सामराज यास तीर्थसरूपाजवळ ठेऊन आम्ही सडे कूच करून पुढे येऊन धमध्याचे मुकामी आपले लस्करात दाखल जाहालो लस्करचे कूच करुन पुढे येत असो उदेक बाघाचा मुकाम आहे सांप्रत प्रजन्य कमी जाहाला आहे याजकरिता तीर्थसरूपही मागाहून कूच करुन लौकरच येतील म्हणोन लिहिले आहे वरकड कितेक बारीक मोठे अर्थ राजश्री सदासिवपंतदादा याचे पत्रावरून सेवेसी श्रुत होतील सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ती

र. मं ९६
फा मं २
प क १०२

२१७

५ ऑगस्ट १७८१

श्री

साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हारजी घोरपडे व दताजी तोरडमळ कृतानेक विज्ञापना ऐसीजे येथील क्षेम ता छ १४ साबान पावेतो साहेबाचे कृपावलोकने आज्ञाधारकाचे वर्तमान येथास्थीत असे. यानंतर साहेबी सेनाधुरंधर व दिवाकरपंतदादा यास पत्रे पाठविली. तेथे आज्ञा जे, राजश्री सेनाबहादर यास पत्रे जावी जे अलीकडे धमध्याची जागा पाहून छावणी करावी म्हणोन वगैरे कितेक अर्थ विस्तारे आज्ञापिले, त्याप्रमाणे राजश्री सदा-

शिवपंतदादा यानीही सांगितले. परंतु ते समई दिवाकरपंतदादा यास समाधान वाटत नवते. दिवसेदिवस रोगाचे बळ विशेष होत गेले. याजमुळे कांहीच ठरले नाही. सेवटी दादास देवआज्ञा जाहाली तेंव्हां तेच बोलणे मारनीले सेनाधुरंधर यास बोलले. त्याचे उतर जाहाले जे, इकडून फौज झाडीतून गेली. त्या प्रांतात दाना चारा अगदी नवता, आनी हवाही वाईट. जाण्यास पला फार लांब. यामुळे घोड्याउंटाचा संव्हार आगोधरच जाहाला, त्या उपरी महर्गताही फार जाहाली. हे वर्तमान पेशजी पुण्यासही लिहिण्यात आलेच आहे. हवा वाईट व महर्गता फार याजकरिता फौजेत कांही ताकत राहिली नाही. तिकडून येताना त्यास येथून लिहिले जे, समलपूरवाल्याचे नकल जाहाले. तेथील बंदोबस्त च्यार लाहाण मानसे करून चालवीत आहेत आनी समलपूरवाल्याजवळ येथील तोफा आहेत व गुदस्ता त्यानी बदमामली केली आहे. त्यास तुम्ही माघारे येताना समलपूरवाल्याचे पारपत्य करून तेथील वंदोवस्त करून यावे अनी चिरंजीव राजश्री विंबाजीबावा यास संशये उत्पन्न जाहाला आहे त्यास तुम्ही त्याची भेटी घेऊन संशये दूर करून खातरजमा करून भेटीस घेऊन यावे म्हणोन लिहिले होते व समलपूरप्रांती आसपासचे जमीदारही राजश्री भवानी काळो यास अनुकूल जाहाले होते जे, समलपूर आम्ही घेऊन देतो, फौज मात्र मदतीस असावी. त्याजवरून चिरंजीवानी व राजश्री भवानीपंतानी समलपूरवाल्याचा उद्योग योजिला. परंतु लोक कोण्ही राहावयास नेट धरीनात. जमीदारानी म्हटले जे, च्यार हजार फौज येथे ठेऊन जावे म्हणजे जागा घेऊन देतो. त्याजवरून भवानीपंतानी कोणाकोणास राहावयास सांगितले. परंतु कोणी नेट न धरीत. साफ उतर करू लागले जे, आम्हास रावयास पुरवत नाही याप्रमाणे जाहाले. लोक कोणी राहीनात. तेंव्हां उगाच फौजेचा भरणा ठेऊन फळ काये ? याजस्तव कांही लोकास तेथूनच निरोप देत गेले. देशचे लोक ढमढेरे व जाधव व निंबालकर व पाटणकर वगैरे बरोबर आले आहेत त्याचे पुढे कसे होईल हे न कले. फौजेत कांही ताकत राहिली नाही. शक्ती असती तरी समलपुरासारखी जागा सहजात येत असता टाकून कैसे येते ? तेंव्हां छावनी केल्यास लोक जवळ राहाणे व कार्ये होणे हे कलतच आहे. फौजेत सामर्थे असते तरी छावणी करवणे कांही अगाध नवते. चिरंजीव विंबाजीबावा याचे पोटांत उगाच संशये होता. त्यास चिरंजीव चिमणाबापू व राजश्री भवानीपंत जाऊन त्याची खातरजमा करून भेटीस घेऊन आले. इतके मात्र कार्ये जाहले. वरकड कांहीच घडले नाही म्हणोंन मारनिलेसी उतर जाहाले. व सेनाधुरंधर यानीही पत्राचे उतर लिहिले व राजश्री सदाशिवपंतदादा यानीही विनंती लिहिली आहे त्याजवरून सेवेसी श्रुत होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञप्ति.

क. मं. ९६
फा मं. २
प क्र. ५८

२१८

२१ ऑगस्ट १७८१

श्री

साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हारजी घोरपे व दताजी कुसाजी तोरडमळ कृतानेक विज्ञापना येसीजे येथील क्षेम ता छ १ रमजानपावेतो साहेबाचे कृपावलोकने आज्ञाधारकाचे वर्तमान मुकाम नागपूर येथे मेयास्तीन असे. यानंतर साहेबी छ ५ व छ ९ सावानची पत्रे सेनाधुरंधर व राजश्री सखारामपंतदादा यास पत्रे पाठविली ती यास पावली पुढे इग्रजाचे राजकारण धरण्याविसी विस्तारे आज्ञापिले त्याप्रमाणे दादा मशारनिले यानी पत्रे सेनाधुरंधर यास दिल्ही, व वर्तमान सर्व सांगितले त्याजवरून धुरंधर यानी उतर केले त्याचा मजकूर दादा मशारनिले यानी सविस्तर लिहिला आहे, त्याजवरून सेवेसी श्रुत होइल साहेबी आम्हा उभयेतास आज्ञापत्रे दोन छ ५ व छ ९ सावानची सादर केली ती पावली सिरी वदोन परम संतोश जाहाला राजश्री सेनाबाहादर याजबरोबर देशची फौज ढमढेरे व जाधव व पाटणकर व निंबाल्कर आले आहेत ते अद्याप आहेत त्यांचा हिशाब तयार करावयास सांगितले आहे त्याजवरून हिशेब तयार होत आहे हिशेब तयार जाहालियावर निरोप देणार म्हणौन वर्तमान आहे साहेब चितांत आणतील जे, राजकारणाचा मजकूर विस्तारे का लिहिला नाही ? तरी मजकूर मोठा नाजूक थोरल्या कार्याचा दादा मशारनिले यानी वेगळे ल्याहावे आनी आज्ञाधारकानी वेगळे ल्याहावे तरी कसे पडेल हे न कळे ! तत्रापि मशारनिलेचे लिहिण्यात सर्व अर्थ येतच असतात त्या पक्षी पुर्वक विनंती काये ल्याहावी, याजकरता लिहिले नाही राजश्री बिंबाजीराजा आल्या दिवसापासून त्याचे आगत्य स्वागत्य मान सन्मान चांगलाच होत आहे परंतु बोलणे चालणे कांहीच नाही अद्याप प्रथमच दिवस आहे दिवाकरपंतदादा वारल्यावर सर्व कामकाज सेनाधुरंधर जातीनेच मणास आनीत आहेत परंतु राजश्री बलवंतराव विष्णु व भवानीपंत मुनसी यास घेऊन जे करणे ते करीत आहेत परंतु दिवाकरपंतदादाचे आंगी योग्यता होती त्याप्रमाणे कोणा आंगीचे मुकत्यारी येणार नाही येविसीचे सर्व अर्थ ध्यानातही आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ती

क. मं. ९६
फा मं. २
प क्र. ४

२१९

ऑगष्ट १७८१

श्री

पुरवनी सेवेसी विज्ञापना ऐसीजे सेनाधुरंधर याजकडून कटक प्रांती राजश्री राजाराम मुकुंद सिवभट साठे याचे कारकीर्दीपासून होते. साल्गुदस्ता राजश्री सेनाबहादर त्या प्रांती गेले होते ते समई राजश्री बापोजी आनंत याजकडून प्रांत मजकूरचा सुभा दूर

करून राजाराम मकुंद याजकडे जप्तीचे काम सांगितले व फौजेच्या देण्याघेणियात व लोकाचे बोलण्यात होतेच. काम पडल्यास यथाशक्ती ऐवजाची सरभराई करीत होते. त्याच संधीत कलकत्याहून इंद्रशन व ईखंभर सिवभद्र ऐवजाचे बोलणे बोलावयास सेनाबाहादर याजकडे आले होते. ऐवजाचे बोलणे बोलोन सेनाबाहादर याजकडील ग्रहस्त समागमे घेऊन कलकत्यास जाऊन ऐवजाचा निकाल करून ध्यावा ऐसे ठरले. ते समई राजारामपंत प्रसंगी होतेच. शाहाना माणूस, व तिकडील माहीत, ऐसे जाणौन राजश्री भवानी कालो यानी इंद्रशनासमागमे कलकत्यास रवाना केला. तेथे जाऊन ऐवजाचा करार मदार करून आला. राजश्री भवानीपंताजवल सागो लागला, इमादुदौला यानी सांगितले जे, तुम्ही दोन हजार मराठी फौज आम्हास घावी त्याच्या पोटास आम्ही देऊ म्हणौन सांगितले. तेव्हां भवानीपंतानी उत्तर केले जे, इंग्रजापासून पैका घेणे हेच गोस्ट ईस्वरप्रीत्यर्थ नाही. याचे वाईटपण चितांत किती येत असेल हे ईस्वर जाणे. परंतु फौजेत ताकत नाही व जवल रुपया नाही यास्तव पैका घेणे प्राप्त ऐसे असता दोन हजार फौज घावी म्हणौन इमादुदौला मुदा घालीत असल्यास हे गोस्ट आम्हास साफ आनकूल पडतच नाही. तुम्ही पैका आनिला तो त्याचा मागारे देणे, याप्रमाणे साफ सागितले. त्यानंतर त्यानी फौजेचा जाबसाल सर्व महकुब ठेविला. ऐवज मात्र दिल्हा तो घेतला. नंतर सेनाबहादर फौजसुधा माघारे आले. सांप्रत कटकची वातमी आली जे, राजारामपंत यानी आपला जेस्ट बंधु दोन हजार फौजेनसी गंजामाकडे पाठविला व प्रातमजकुरी जागा बजागा बंदोबस्त करीत आहे. त्याजवरून सेनाधुरंधर यास बहुत त्राश होऊन वाईट वाटले. आता कसेहि करून राजारामपंताचे येणे युक्तीचे वाटेने येथे घडवावे ऐसे ठरून राजारामपंतास पत्रे लिहिली जे, तुम्ही कलकत्याचे जाबसालास वाकीफ आहा त्यास तुम्ही अगोधर येथे येणे. इमादुदौलाही श्रीकासीस आले आहेत. राजश्री वेणीराम सिवभद्र यास येथे येण्याविसी पत्रें लिा आहेत. तेही येतील. ते व तुम्ही येथे आलियावर येथील सुलेन जे करणे ते केले जाईल. तुम्ही दोन हाजार फौज गंजामाकडे पाठविली म्हणौन ऐकिण्यात येत आहे, त्यास येथील इतल्याखेरीज तुम्ही फौजेची रवानगी करणार नाही हे खातरजमा पकेपणे आहे. तत्रापि केली असल्यास फौज माघारे बोलाऊन घेणे. प्रांतमजकुरी तुम्ही आपले खातरजमेचा ग्रहस्त ठेऊन आपले खातरखा बंदोबस्त करून लौकर येणे. येताना राजश्री हैबतराव जाचक किले बाराभट यासही समागमे घेऊन येणे म्हणौन बहुत विस्तार पूर्वक लिहिले आहे व हैबतराव जाचक यासहि येण्याविसी पत्रे लिहिली आहेत. काये घडेल ते पाहावे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापी.

रु. मं ९६
फा मं २
प क्र. ९१

२२०

५ सप्टेंबर १७८१

श्री

साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हारजी घोरपे व दताजी कुमाजी तोरडमल कृतानेक विज्ञापना ऐसीजे येथील क्षेम ता। छ १६ रमजान पावेतो मु॥ नागपूर साहेबाचे कृपावलोकने आज्ञाधारकाचे वर्तमान येथास्तीत असे मानतर साहेबी राजश्री सदाशिवपंतदादा याचे पत्री पुर्व दिशाचे वगैर कितेक वारीक मोठे अर्थ सेनाधुरंधर यासी बोलावयासी आज्ञापिले, त्याप्रमाणे मशारनिलेनी सांगितले त्याचे उतर सेनाधुरंधर यानी मानिल्हेमी केले त्याचा मजकूर मानिलेनी सविस्तर विनती लिहिली आहे वरकड कितेक वारीकमोठे अर्थ सविस्तर विनंती लिहिली आहे त्याजवरून सेवेसी श्रृत होइल सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति

रु. मं ९६
फा मं २
प क्र. १०८

२२१

११ सप्टेंबर १७८१

श्री

साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हारजी घोरपे व दताजी तोरडमल कृतानेक विज्ञापना ऐसीजे येथील क्षेम ता। छ २२ रमजान पावेतो साहेबाचे कृपावलोकने आज्ञाधारकाचे वर्तमान येथास्तीत असे यानतर इकडील वर्तमान छ १६ मीनहूस राजश्री सदासिव पंतदादा यानी सविस्तर वर्तमान सेवेसी विनती लिहिलीच आहे सांप्रत सावकारियात वातमी आली जे, इमादुदौला कल्कत्याहून सर्व सरंजामसुधा निघोन श्रीकासीस आला इंग्रज कल्कत्यात ठेविला त्याचे स्वाधीन ठाणेजातीचा सरजाम ठेऊन सर्व बीजवस्त काढून आला कासीचा राजा राजश्री चेतसिंग पुढे जाऊन सन्माने करून घेऊन आला च्यार पाच दिवस राजा भेटीस जात येत होता कासीजवल चेतसिंगाचा किल्ला मातबर कोण्ही आहे तो आम्हास द्यावा म्हणोन इमादुदौला यानी मुदा घातला तेव्हां चेतसिंगानी उतर केले जे, तो किल्ला माझे मुलाल्येकरा वसावयास स्थळ तितकेच आहे आनी किल्लेदारही माझे स्वाधीन राहिला नाही, याप्रमाणे सांगितले त्याउपरी श्रावण वद्य १२ स चेतसिंग भागीर्थीचे स्नानास गेले स्नान करून पूजा करीत बसले होते. हे वातमी इमादुदौला यानी राखोन चौरा पाठऊन धरला हे वर्तमान चेतसिंगाचे चुलत्यास कलताच तीनच्यारसे लोकानसी ज्यामर्दीने—जाऊन चौरा मारून राजा सोडऊन घेतला से समई इंग्रजाकडील दोन गोरे मातबर चौरे बरोबर होते त्याचे हात तोडले. वरकड मारले व कांही जखमी जाहाले चेतसिंगासही जखम येक लागली परंतु इंग्रज सिकस्त करून नावेत बसून रामगडास गेले तेथे जाऊन फौजेचा जथ पाडिला व त्या प्रांतीचे रजवाडे सर्व चेतसिंगास

अनुकूल होऊन इंग्रजाचे लडाईस आले. श्रीगनपती पाठीसी घालून इंग्रजाचे पलटणासी लडाई सुरु केली. ते समई इंग्रजानी तोफा सुरु केल्या. तो पंधरा तोफा रंजक प्याल्या. तेव्हां चेतसिंगा(चे) लोकानी निकड करून तरमुडी दिल्ही. इंग्रजाचा मोड जाहाला. इंग्रज फार मारले गेले व कितेक जखमी ठार जाहाले. पलटणे लुटून पस्त केली. तेव्हां इमादुदौला यास समजले जे, येथे राहून प्रान वाचत नाही, व परिनाम नीट नाही. ऐसे जाणोन रात्री पलोन इंग्रजाचा किला चेरणार म्हणौन आहे त्या किल्यास जात होते. त्याचे पाठीलागास चेतसिंगाची फौज घेराघेरी व मारामारी करीत जातच होते. ते चेरणारचा किला पुढे तीन कोस राहिला. ते वेळेस चेतसिंगाकडील लोकानी निकड करून गाट घातली. लडाई मातवर जाहाली. सेवटी इंग्रज सिकंदा जाहाला. पलटणे झाडून लुटले. तोफा व दारुगोळा व वंदुखा वगैरे जिनस वहुत इंग्रजाचा चेतसिंगास सापडला. इमादुदौलास येक जखम लागली आनी पाडाऊ आला. त्याजवरोवर जगतसेटी याचा पुत्र व आनी येक दोन मातवर कैदेत होते त्यास चेतसिंगाने वस्त्रे प्रवर्णे देऊन सन्मान केला. इमादुदौला याजवरोवर कवसडवाले होते त्यापैकी येक जनास ठेऊन वरकडाचीं डोचकी मारली. खासा हिस्टिन चेतसिंगाचे कैदेत आहेत म्हणौन येथे पाच सात जागा वर्तमाने आली आहेत. गोसावी व पत्रें आली आहेत येविसी राजश्री सदासिवपंतदादा यानी सविस्तर विनंती लिहिली आहे त्याजवरून सेवेसी श्रुत होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

२२२

रु. नं. ९६
फा. नं. २
प. क्र. १०६

सप्टेंबर १७८१

श्री

पुरवणी सेवेसी विज्ञापना ऐसीजे. राजश्री नारो कृष्ण काले याचे शरीरी समाधान नाही म्हणौन पवनीस राहिले होते. सांप्रत येथे आले आहेत. राजश्री मणाजी सामराज फडणीस याचे वाड्यात राहिले आहेत. क्षये रोग लागला आहे. औशध उपाये करीतच आहेत. परंतु कांही गुणास येत नाही. कांहीसे आरोग्य जाहालियास दसरा होऊन सेवेसी येणार आहेत. नवाब वंदगानआली यानी राजश्री बगाजी रघुनाथ याजकडून सेनाधुरंधर यास पत्रें लिहविली आहेत. त्याचा मजकूर राजश्री सदासिवपंतदादा यानी विनंती लिहिलीच आहे त्याजवरून सेवेसी श्रुत होईल. सेवेसी श्रुत होये विज्ञाप्ती.

२२३

रु. नं. ९६
फा. नं. २
प. क्र. १०७

सप्टेंबर १७८१

श्री

पुरवनी सेवेसी विज्ञापना ऐसीजे. कलकत्याहून इमादुदौला यानी डाकतर वैद्य

येथे आला हा मजकूर पेशजी सेवेसी विनती लिहिलीच आहे सांप्रत दाफ्तरास समाधान वाटत नाही. आरोग्य जाहाल्यास निरोप घेऊन जाणार राजश्री चिमणाबापू याजबरोबर देशची फौज आली त्याचे देण्याचा निकाल अद्याप कांही होत नाही ऐवजाचीही वोढ फार आहे फौजेचे देणेयाचा निकाल होत नाही तोपावेतो यांस कांहीच सुचत नाही राजश्री सदासिवपंतदादा व राजश्री बळवंतराव विष्णु यांची रवानगी करीतील ऐसे दिसते परंतु निश्चये नाही सेवेसी श्रुत होये हे विज्ञापी

र नं ९६
फा म २
प क्र. ७

२२४

एप्रिल १७८७

श्री

पुरवणी साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हारजी वोरपे व दताजी कुसाजी तोरडमल कृतानेक विज्ञापना ऐसीजे सरकारची जासूदजोडी, पत्रें व मकरसंक्रमणाचेतिळ शर्करा घेऊन राजश्री सेनाधुरंधर याजकडे आले होते त्याचे जाब आले ते घेऊन पाठविले आहेत संस्थान चरकारी, प्रांत बुंदलखंड येथील बुदेले वेणीबाहादर याणी मिशर म्हणून महस्त यास येथे धुरंधराकडे पाठविला, तो येऊन राजश्री सिवाजी पोळ याचे विद्यमाने राजश्री सेनाधुरंधरास चैत्र शुा १२ स भेटला कार्ये कामास आला याची चौकसी करून मागाहून विनती लिहून पाठऊ राजश्री विटलपंत सुभेदार व हशमतजंग याचे बिघडले होते सांप्रत तह पूर्ववतप्रमाणे होऊन आपलाले ठिकानी आहेत सेवेसी श्रुत होय हे विज्ञापी

र. नं ९६
फा नं २
प क्र. ८

२२५

एप्रिल १७८७

श्री

पुरवणी साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हारजी वोरपे व दताजी कुसाजी तोरडमल कृतानेक विज्ञापना ऐसीजे राजश्री भवानी नागनाथ याणी सांगितले कीं, वेणीबाहादर बुदले सस्थान चरकारी, प्रांत बुंदलखंड याजकडील महस्त सालगुदस्त तुम्ही उमयेता नाईक येथे नव्हता तेव्हां आला होता त्याणे सांगितले कीं, आमचा चाकर अर्जुनसिंग होता, त्याणे आम्हास हरामखोरी केली. आमचे भाऊ परणेवाले व बांदावाले यास मिळून आमचे दौल्तेत बखेडा बहुत केला दुसरे, राजश्री खंडेराव हरी यासी अर्जुनसिंगाने सूत्र करून त्याच्या विद्यमाने सिपाही राजकारण करुन आम्हास पदच्युत केले त्यास आपण राजश्री नाना यास लिहून आपले मारफातीने बंदोबस्त आमचा करून द्यावा म्हणून येज-

मानास वर्तमान सांगितले त्याजवरून श्रीमंत राजश्री नाना यास पत्रे लिहून दिल्हे होते कीं, समक्ष याचे वर्तमान मनास आणून वंदोवस्त करून द्यावा म्हणून. त्याप्रमाणे याणी पुण्यास (या)वे ते न करिता फिरुन मागारे गेले. तिकडे अर्जुनसिंग याणी समजुता करून सोये करावी ते गोस्ट त्याजकडून न घडली. यामुळे मागती प्रताप मिशर व अपाजी सिंदा कुडाळकर पाठविले ते येथे आले आहेत, बोलणे गुदस्ता प्रमाणेच बोलत आहेत. पुढे ठरेल त्याप्रमाणे सांगू म्हणून बोलले. त्यावरून विनंती सेवेसी लिहिली आहे. राजश्री सेनासाहेब-सुभा याचे दुसरे लग्न राजश्री सेनाधुरंधर करीत आहेत. शरीरसंबंध राजश्री दुरगोजी सिरके याची कन्या वधु योजिली आहे. उमर वोर्ष अकरा बाराची आहे. स्वरूप चांगले आहे. वैशाख शुध आस्टमीचे लग्न नेमस्त केले आहे. चैत्र वद्य पंचमीस मुहुर्तेकरून मंडपाचा स्तंभ उभा केला. साहित्य होत आहे. सेनासाहेव यास मांडीचे जांघेजवल केसतोड जाला आहे. केसतोड किंवा वद असेल असेही कोणी कोणी बोलत आहेत. नवाबानी येक ग्रहस्त मुसलमान हती खरेदी करावयास बंगाल्यात या मार्गे पाठविला, तो येथे आला आहे. सेना-धुरंधरास नवाबानी पत्रे लिहिले आहे की, नवे हती चालीस पन्नास खरीद करून आण-विले आहेत. कलकतेवाले इंग्रजास पत्रे पाठविली आहेत कीं, हती आमचे ग्रहस्त चालीस पन्नास खरीदी करतील. त्यास जकातीची माफी करून सिकाकोल राजबंदरी पावेतो माणस देऊन पोहोचून द्यावे म्हणून. त्याप्रमाणे ते करतील. आपणाकडील अमलदार कटक प्रांती राजश्री राजाराम मकुंद आहेत त्यास पत्रे द्यावे कीं, चालीस पन्नास हती खरीदी करतील त्यास करून आणू देणे. जकातीचा वगैरे हरयेक बाबे तगादा न करणे. आपल्या प्रांता-तून चौकी पाहरा करऊन हदपार करून देवणे म्हणून. त्याप्रमाणे सेनाधुरंधरानी राजश्री राजाराम मकुंद यास पत्रें देविली व राजश्री वेणीराम सिवभद्र यास लिहिले कीं, नवाबानी हातीविसी इंग्रजास पत्रे लिहिली आहेत त्याचा मजकूर नवाबाकडील ग्रहस्त सांगतील त्या प्रमाणे कलकत्यास लिहून करवणे. वारानसीस काम पडल्यास तेथील आधिकारियास सांगोन बंदोबस्त करणे म्हणून लिहिले आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापी.

रु. नं. ९६
फा. नं. २
प. क्र. १९–२०

२२६

१४ नोव्हेंबर १७८७

श्री

छ २३ सफर कार्तिक

साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हारजी वोरपे व दताजी कुसाजी तोरडमल कृतानेक विज्ञापना ऐसीजे. येथील क्षेम ता छ ३ सफर पावेतो मुकाम नागपूर येथे साहेबाचे कृपावलोकनेकरून आज्ञाधारकाचे वर्तमान येथास्थित असे. यानंतर इकडील वर्तमान

तरी छ २६ मोहरमी राजश्री सेनाधुरंधर याणी राजश्री विठ्ठल बल्लाल सुभेदार प्रांत वराड यास पत्र लिहिले त्यात मजकूर कीं, पेंढारी यांचा जमाव नर्मदा उतरोन मल्कापुरचे सुमारे येणार हे वर्तमान तुम्हास कळताच पातुराहून कूच करून आकोटचे सुमारे गेला म्हणून समजले त्यास मसलतीचा पला नितांत आणून त्याचे रुखावर जाण्याचे केले हे उतम जाले परतु इकडे यांची न लिहिले असो आकोट व मल्कापुर या सुमारे त्याचा रुख जैसा पाहाल तैसे राहाणे उतावळी करून गाठ न घालणे. मागील पीठा त्याची दृष्टीस पडे ऐसी सलावत दाखवून जखेच्या व दात्राच्या सिफयान सावध राहाणे आणि बातमीस जासूद नाईक शाहना तिकडील माहीन पाहून पुढे रवाना करणे. बातमी येईल त्याप्रमाणे इकडे वरचेवर लिहीत जाणे म्हणून व इब्राहिमखान पठाण फडपेशला याणी छ ८ मोहरमी भांबचे ठाणे घेतले आणि बिटंदखान याचे कबिले सुखरूप काढून दिल्हे ते जबलियात येऊन राहिले आहेत बिलदखान येथे आहेत त्याणी कबिले आणवयाची परवानगी घेतली आहे त्यावरून तुम्हास लिहिले व पन्नास स्वार पाठविले आहेत व तुम्ही तेथून पन्नास स्वार व डोल्या दोन व वेगारीचे गाडे पाच सात व मारवारदारी घेऊन वाटेचा बदोबस्त करून रवाना करणे म्हणून लिहिले त्याउपरी छ २८ मोहरमी राजश्री विठ्ठलपत सुभेदार याची पत्रें राजश्री सेनाधुरंधर यास आली, त्यात लिहिले जे, येदडे याचा जमाव दाहा हजार पावेतो नर्मदातीराकडोन बऱ्हानपूरचे सुमारे आले. पुढे मलकापुरावर शह देऊन पैका घ्यावा, कावूत आल्यास लुटावे, पुढे वराडात बातमी कोणीकडे न कळता जल्दी करून मुदा हसल करून त्वरेने सोइ पडेल तिकडे निघोन जावे, याप्रमाणे बातमी पकी आली तेव्हां पातुरात बसून फल नाही असे जाणून आसीन वद्य १० स मुहुर्ते करून निघोन येकादसीस कुरणखेडास आलो पुढे आकोटचे सुमारे जात आसो तैनाती लोक सरंजामी व इतलाखी जागा बजागा छावणीस होते त्यासही बलाऊन घेतले आहेत, परंतु आपला जमाव किती हा तो आपले घ्यानातच आहे आणि पेंढारियाची बोलणी जी होतात ती लिहिता पुरवत नाही तेव्हां कुणाचा आश्रये करून बोलतात किंवा निराश्रित हेही समजत नाही तरी पुण्यापर्येंत डाक बसऊन वर्तमान वरचेवर आणवावे म्हणजे येदड यास मुल आहे किंवा नाही हे समजेल आणि नागपुरीहून फौजेची रवानगी पत्रदर्शनी करावी वराडप्रांती नवाबाकडील सुभा व जागीरदार यासही सामील होण्याविसी पत्रें यावी, म्हणुन त्यावरून सेनाधुरंधर याणी त्याच वेळे तोफखान्याचे दारोगे यास बलाऊन ताकीद केली कीं, लाहन तोफा पाच व बाणाच्या कैच्या दाहा येथा तुम्हाकडील सदाराम कारभारी यावराबर रवाना करणे म्हणून आणी छावणी पागा व लोक आहेत त्यास व छपारेयास महमद अमीनखान व हैबतखान रोहिले यास

सरंजामसुद्धा येणे, एक घटका विलंब न करणे, म्हणून पत्रें पाठविली आणि राजश्री भवानी कालो व भवानी नागनाथ यास ताकीद केली कीं, जे लोक येतील त्यांस येथें गुंता न करिता वरचेवर सुभेदार मशारनिलेकडे रवाना करीत जाणे. छपारेयाहून रोहिले याचे येण्यास सत्तर कोसाचा पला आहे त्याचे येण्यास आवकास लागेल. ते मागाहून जातील. येथील फौजेत कोणी आळेकरी आसावा. त्यास राजश्री पांडुरंग गणेश व जेराम गणेश व येशवंतराव भवानी व जानराव येशवंत या च्यार आसाम्यापैकी एकाची नेमणुक तुमचे विच्यारे योजून करणे म्हणून. आणि सलाबतखान व बहलोलखान व हशमतजंग व ईभ्राहिमखा कडपेवाला वगैर जागीरदार यास पत्रें पाठविली की, पेंढारी वराडात दंगा करणार त्याच्या तोडावर राजश्री विठल बलाल सुभेदार याची रवानगी केली आहे, त्यास तुम्ही जमावसुधा जाऊन सुभेदार मशारनिलेस सामील होणे, निदान जातीच्या जाण्यास विलंब असल्यास जमावाची रवानगी पत्रदर्शनी करावी म्हणून लिहिले. आणि दोनप्रहरी निद्रेस गेले तेच दिवसी साईकाली बातमी आली की, बेदडे याणी जेनाबादचा कमाविसदार धरून नेला व बऱ्हानपुरासही उपद्रव केला. तेथून कूच करून बोदवडचे आसपास येऊन मुक्काम केला. तेथून पेंढारियाची येक टोळी पाच सातशाची मलकापुरावर पाठवून हल्याचा उद्योग केला. परंतु मलकापुरकरास बातमी अगोधर होती. त्याजकरिता सावध राहिले. सेवट कांही गुरे व दहापांच आसाम्या सापडल्या त्या धरून नेल्या. या दहशदीने तालुका उजाड जाला म्हणून. व राजश्री बाळाजी सिवदेव पुण्यास आहेत त्याजकडोन वरचेवर बातमी येत आसावी याकरिता धुरंधराणी येथून संताजी नाईक जाधव जासूद याचा पुतण्या मंगाजी नाईक याजबरावर जासूद आसामी दाहा येसे त्याजकडे नेमिले आहेत. येका दो रोजात निघोन येतील. धुरंधर याणी रामटेकाचे पाने विड्याची सरकारात बैल तीन व आपणास दोन व राजश्री तात्या यास येक व राजश्री तुकोजी होलकर सुभेदार यास येक व नारो गणेश यास येक व राजश्री गोविंदराव कृष्ण काले वगैरे यास येक व किरकोली येक असे दाहा बैल पानाचे भरून छ २१ मोहरमी रवाना केले व नवाबाकडेही पानाचे बैल रवाना केले. त्याची यादी मागाहून पाठवितो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

रु. नं. ९६
फा. नं. २
प. क्र. २

२२७

२५ डिसेंबर १७८७

श्री

पौ छ ४ रबिलाखर सन समान समानीन पौष

साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हारजी वोरपे व दताजी कुसाजी तोरडमल कृतानेक

विज्ञापना ऐसीजे येथील क्षेम ता छ १४ रबिलाखरपावेतो मुक्काम नागपूर साहेबांचे कृपाव लोकने करून आज्ञाधारकाचे वर्तमान येथास्थित असे यानतर इकडील वर्तमान तरी बिंबाजीबाबा मोसले रतनपुरी होते तेथून पलीकडे नर म्हणून जागा पन्नास पचावण कोस आहे तेथे राजश्री सटवोजी भोसले यास ठेविले होते त्यास दोन च्यार ठिकाणचे जमीदार याणी येका करून सटवोजी भोसले यास सावध होऊ न देता गलबल करून नरे जागा घेतली ते समई सटवोजी मशारनिले निघोन बिंबाजीबाबा जवळ आला ते समई बिंबाजी बाबा वायूचे आजारे करून श्रमीच होते परतु नरे जाग मागती हस्तगत करावी या इरेन आपण जातीन गेले तेथे जाऊन दाव घाय दोन महिने केले जागा घ्यावी तरी दिवसे-दिवस शरीरी श्रम बहुत होऊ लागले तेव्हां सर्वाचे विचारे रतनपुरास जावे, आरोग्यता जालियावर जागा घ्यावयास येइल ऐसे ठरून मागारे कोसभर आले. तेथे फारच बाधा जाला रात्री वोमनही च्यार पाच वेळा जाले पालखीत बसावयास शक्ति राहिली नाही याजकरिता तेथेच मुक्काम केला त्याच सवीत ज्वरही आला पाच सात दिवस बहुत हैराण जाले. दोन तीन दिवस भ्रांतीही जाली सेवटी कार्तिक बद्य १३ स शुक्रवारी रात्रीं देव-आज्ञा जाली तिही स्त्रियापैकी सौभाग्यादि संपन्न मातुश्री ठमाबाइ बराबर होती. तिने सह गमन केले. आनदीबाइ व रमाबाई रतनपुरी आहेत त्यास वर्तमान कळल्यावर काये ते क-लेल सटवोजी मोसले यास कैद केले म्हणून राजश्री धोंडो महादेव व माईखान याची पत्रे राजश्री सेनाधुरंधर यास आली ती छ ११ रबिलावली शनवारी च्यार घटका रात्री अवसी पावली त्यावरून धुरधर वगेरेयास श्रम दु:खाचे बहुत जाले चौघडा बद आहे. तेथे सर्व विधी जाली त्यायला, यामुले येथे तीन दिवस मात्र सुतक आहे ऐसे ठरले राजश्री सेना-साहेबसुमा व राजश्री भवानी काळो व भवानी नागनाथ याचे नांवे पत्रें राजश्री धोंडो माहादेव व माईखान यास छ १२ रबिलावली गेले त्यात मजकूर कीं, तेथील बदोबस्त बहुत सावधपणें राखणे व सटवोजी भोसले याचे पायी बेड्या घालोन चौकीपाहरेयाचा बदोबस्त पकेपणे करणे म्हणून लिहिले आहे राजश्री भवानी नागनाथ याणी साहेबासही विनतीपत्र लिहिले आहे बिंबाजीबाबा याचे पोटी पुत्र संतान नाही तेथील बदोबस्ता-करिता येथून कोणी मातबर मद्दस्त पाठवितील ऐसे वाटते राजश्री बगाजी रघुनाथ याची पत्रें हैदराबादेहून कालच आली त्यातील अर्थ समजला नाही कळल्यावर विनती लिहून पाठऊ सेवेसी श्रुत होये हे विज्ञापी

र. नं. ९६
फा. नं. २
प. क्र. १७

२२८

२६ जानेवारी १७८८

श्री

पौ छ ३ जमादिलावल
माघ सन समान समानीन

साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हारजी वोरपे व दताजी कुसाजी तोरडमल कृतानेक विज्ञापना ऐसीजे. येथील क्षेम ताा छ १६ रबिलाखर पावेतो मुकाम नागपूर साहेबाचे कृपावलोकनेकरून आज्ञाधारकाचे वर्तमान येथास्थीत असे. यानंतर इकडील वर्तमान मंडळे प्रकरणी राजश्री भवानी नागनाथ बोलले त्याचा तपसील सेवेसी विनंति लिहिली होती. त्याचे उत्तर साहेवी कृपाळु होऊन छ २२ सफरचे आज्ञापत्र सादर केले, ते छ १० रबिलावली पावले. सिरी वंदून सनाथ जालो. जी गोष्ट करारात आणिली त्याप्रमाणे निभाऊन द्यावी ही चाल या दरबारची आहे व निभावण्यात होत आल्या आहेत. मंडलेयाचा कारभार जाला ते समईचे बोलणे कीं, च्यार दिवस अधिक उणे लागतील. मधी तीन लक्ष रुपये सरकारातून देविले. त्याप्रमाणे दिल्हे ही गोष्ट खरी आहे, परंतु बुंदेले याणी मसलत करून स्थले घेतली ती सोडणे त्यास कठीण पडले. सरकारातून सांगावयास कमती जाली नाही, परंतु मधी तिकडे गुढगे वखेडे पडले यामुले दिसगतीवर पडले. आलीकडे राजयाचे सरंजामाची गोष्ट पडली ती मान्य यादीप्रमाणे जाली. तेंव्हां स्थल हवाली करण्यास गुंता नाही. सनद जाल्यापासून वसूल द्यावा म्हणतात. ही गोष्ट ठीक नाही व असे घडतही नाही. मंडळे हवाली जाले म्हणजे फौज चाकरीस यावी याप्रमाणे करार आहे. ती फौज मंडळे हवाली जाले नसता चाकरीस आणिली की काये हे प्रकार मनात यावयाजोगे आहेत. मंडळे हवाली जाले म्हणजे काराराप्रमाणे सरकारचा पैका द्यावा. फौजेची चाकरी व्हावी. पहिले तीन लक्ष दिल्हे आहेत ते करारात मजरा पडतील. लिहिल्याप्रमाणे घडावे. उगाच वाकड्या कल्पना घेऊन बोलू लागल्यास इलाज नाही. आम्ही लिहिले प्रकार हे वाजबी आहेत. त्याणी समजावे उतर यावे म्हणजे बुंदेलेयास लिहिण्याचा उद्योग होईल. पो तलेगाव दाहासहस्र प्रांत वराड येथील बेचालीस गावच्या ऐवजाविसी लिहिले, त्यास दुबारा हुंडणावळ पडेल ते न करणे. तलेगावीहून हुंडी करून ऐवज पाठवणे. राजश्री रामराव गुजर यास जावयाविसी सागितले परंतु त्याणी म्हटले कीं, आम्हास समाधान नाही, जाणे होणार नाही. लिहिले प्रकार धुरंधरासी बोलून उतर पाठवणे म्हणून आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणे सेनाधुरंधर व राजश्री भवानी नागनाथ यासी सर्व बोललो व आज्ञापत्रही दाखविले. उतर जाली त्याचा मजकूर पुरवणीपत्रात विनंती लिहिली आहे त्याजवरून सेवेसी श्रुत होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

२२९ २६ जानेवारी १७८८

श्री

पुरवणी साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हारजी घोरपे व दताजी कुमाजी तोरडमल कृता-नेक विज्ञापना ऐसीजे राजश्री नारोपंत परचुरे हे येथे छ २ रबिलाखरी आले राहावयास राजश्री सदासिव राम गुणे याचा वाडा दिल्हा तेच दिवसी राजश्री सेनाधुरंधर याची भेट जाली वर्तमान धुरंधरानी विचारिले, तेव्हां मशारनिल्हेनी सांगितले कीं, शरीरी समाधान वाटत नव्हते दिवसेदिवस अधिक रोगाचे यत्न, तेव्हां गगातीरास टोक्यास च्यार दिवस जावे म्हणून श्रीमंत राजश्री नाना याची आज्ञा घेऊन आलो तेथेही अधिकच वाखा जाला कनिस्ट पुत्र राजश्री विठलराव यास चिरंजीव त्रिंबकराव याणी मागाहून पाठविले तेव्हां चितास उत्कठा हेच उत्पन्न जाली कीं, श्री कासीस जावे म्हणून निरोप न घेता निघोन आलो तेथे होणे ते होऊ म्हणून सांगितले दोन च्यार दिवस राहून औषध करून घेऊन शुा ९ मीस निघोन मंडल्यापावेतो दोन जासूद आपले सरकारचे बराबर दिल्हे आहेत मशारनिल्हेनी राजश्री त्रिंबकराव यास पत्र दिल्हे ते पाठविले आहे वैद्यानी संमनीची व्यथा सांगितली. पाटेची औषध चांगली धुरंधराणी करऊन देविली. सन्मान करुन पुत्रासुधा वस्त्रें देऊन रवानगी केली. इग्रजाकडील मजकूर कारे मुखावर आले आहेत याचा पुर्तेपणे शोध विनती लिहून पाठऊ मडळे प्रकरणी सेनाधुरंधर दिक आहेत सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ती ताजा कलम. राजश्री सेनाबाहादर व राजश्री व्यंकोजी भोसले हे उभयेता छ १२ रबिलाखरी बुधवारीं चद्रपुरास देवीच्या दर्शनास दोनसे स्वारानसी गेले पंधरा वीस दिवस लागणार आहे आपल्या पत्राचे उत्तर खातरखा आले म्हणून सेनाबाहादर मजजवळ सांगत होते. धुरंधर व सेनासाहेब छ १५ रबिलाखरी येथून तीन कोस कोराडीस देवीचे दर्शनास गेले सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ती

रु. नं. ९६
का. नं. २
प. क्र. १४

२३० १८ मार्च १७८८

श्री

पुरवणी साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हारजी घोरपे व दताजी कुसाजी तोरडमल कृतानेक विज्ञापना ऐसीजे राजश्री सेनाधुरधर याची कन्या गगाभागिर्थी ठकूबाई गुजर याचा पुत्र राजश्री गुजाबा गुजर याचे लग्न नेमस्त केल्याची विनंती येथाजी सेवेसी लिहिलील आहे

त्याच संधीत विंबाजीबावा भोसले यास देवआज्ञा जाली याचे वर्तमान आले यामुले राहिले. सांप्रत फाल्गुन वद्य पंचमीची तीथ नेमस्त केली आहे. मंडप तयार पहिलेच जाला आहे. कांही काम राहिले तेही होत आहे. शुध ७ सप्तमीस गडगनेर चालीस लागला आहे. तेच दिवसी उपाध्येयाचे घरी गडगनेर जाला. सेनाधुरंधर व सेनासाहेब सुभा व सेनाबहादर व व्यंकोजी भोसले व परसोजी भोसले व सोभाग्यादिसंपन्न मातुश्री चिमाबाई वगैरे व गुज्याबा यैसे होते. भोजन होऊन गुज्याबा गुजर व त्याचे चुलते राजश्री जानराव व महादजी व कुशाबा वगैरे सात आठ असाम्यास वस्त्रे दिल्ही. दुसरे दिवसी राजश्री सोमाजी मोहिते याचे घरी धुरंधर खेरीज करून सदरहु प्रमाणे जाऊन समारंभ होऊन भोजनउतर वस्त्रें. सदरहु प्रमाणे तेच दिवसी गंगाभागिर्थी सगुणाबाई निंबालकर याचे घरी सेनाधुरंधर व सदरहु मंडळी व आणिख काही पाटणकर वगैरे मराठे मुसलमानसुधा गेले. फराल होऊन वस्त्रें सदरहु प्रमाणे जाली. त्याउपरी राजश्री मानसिंग मोहिते याचे घरीही याच प्रमाने गडगनेर होऊन वस्त्रे जाली. छ ६ जमादिलाखरी राजश्री व्यंकोजी भोसले याणी आपल्या बागात आरास करऊन भोजनास सेनाधुरंधर व सेनासाहेब सुभा व सेनाबहादर व परसोजी भोसले व सोभाग्यादिसंपन्न मातुश्री चिमाबाई वगैरे घरमंडळी व मराठे पाटणकर व घाटगे निंबालकर वगैरे व सलाबतखान व महमद आमीखान बमयेमंडळी वगैरे मिलोन कमपेश तीनसे पर्येत भरणा होता. भोजन होऊन नाचरंग जाला. च्यार घटका दिवसास राजश्री गुजाबा गुजर यास वस्त्रे पागोटे व सेला नागपुरी जामा बऱ्हानपुरी व किनखाप व सिरपेच दिल्हा व राजश्री सोमाजी मोहिते व राजश्री कृष्णाजी मोहिते गंगाभागिर्थी बालाबाई मोहिते याचा पुत्र यास शेला पागोटे बऱ्हानपुरी व जामेही बऱ्हानपुरी, किनखापा येणेप्रमाणे उभयेतास व गुज्याबाचे चुलते राजश्री जानराव गुजर व महादजी गुजर व कुशाबा गुजर व त्रिवर्गाचे पुत्र वगैरे गुजर मंडळी पंधरा सोळा असामी व कारकून त्याजकडील तिघ यास दर आसामीस सेला पागोटे येणेप्रमाणे दिल्ही. छ ७ रोजी राजश्री सेनासाहेबसुभा याणीही व्यंकोजी भोसले याचे गडगनेराप्रमाणेच आपले बागात करून वस्त्रें त्याचप्रमाणे दिल्ही. गुजाबास वस्त्राखेरीज कंठी दिल्ही. राजश्री भवानी नागनाथ याचे नातवास वायू होऊन दोष जाला. देवी मानवी उपाये केले परंतु गुणास न आले. फाल्गुन शुध १० मध्यरात्री देवआज्ञा जाली. मुनसीच्या ज्येष्ठ पुत्राचा पुत्र उमार येकवीस बेवीस वोर्षाची होती त्याचे दुःख मुनसीस मोठे जाले. आपल्या देखत पुत्र सुना व नातु जातात. वृधापकाली हे काये पाहावे! लोक काये म्हणतील? हेच कालजी करतात. सेवेसी श्रुत होये विज्ञाप्ती.

२२९ २६ जानेवारी १७८८

श्री

पुरवणी साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हारजी घोरपे व दताजी कुसाजी तोरडमल कृता-नेक विज्ञापना ऐसीजे राजश्री नारोपत परचुरे हे येथे छ २ रबिलाखरी आले राहवयास राजश्री सदासिव राम गुणे याचा वाडा दिल्हा तेच दिवसी राजश्री सेनाधुरंधर याची भेट जाली. वर्तमान धुरंधरानी विचारिले, तेव्हां मशारनिल्हेनी सांगितले कीं, शरीरी समाधान वाटत नव्हते. दिवसेदिवस अधिक रोगाचे बल, तेव्हां गगातीरास टोक्यास च्यार दिवस जावे म्हणून श्रीमंत राजश्री नाना याची आज्ञा घेऊन आलो तेथेही अधिकच बाधा जाला कनिस्ट पुत्र राजश्री विठलराव यास चिरंजीव त्रिंबकराव याणी मागाहून पाठविले. तेव्हां चितास उत्कठा हेच उत्पन्न जाली कीं, श्री कासीस जावे. म्हणून निरोप न घेता निघोन आलो तेथे होणे ते होऊ म्हणून सांगितले दोन च्यार दिवस राहून औषध करून घेऊन शुा ९ मीस निघोन मंडल्यापावेतो दोन जासूद आपले सरकारचे बराबर दिल्हे आहेत. मशारनिल्हेनी राजश्री त्रिंबकराय यास पत्र दिल्हे ते पाठविले आहे वैद्यानी संग्रनीची व्यथा सांगितली वाटेची औषध चांगली धुरंधराणी करून देविली सन्मान करुन पुत्रासुधा वस्त्रें देऊन रवानगी केली. इग्रजाकडील ग्रहस्त काये मुद्यावर आले आहेत याचा पुर्तेपणे शोध विनती लिहून पाठऊ मटले प्रकरणी सेनाधुरंधर दिक आहेत सेवेसी श्रुत होये हे विज्ञापी ताजा कलम. राजश्री सेनाबाहादर व राजश्री व्यंकोजी भोसले हे उभयेता छ १३ रबिलाखरी बुधवारीं चद्रपुरास देवीच्या दर्शनास दोनसे लोकानसी गेले पंधरा वीस दिवस लागणार आहे आपल्या पत्राचे उत्तर खातरखा आले म्हणून सेनाबाहादर मजजवल सांगत होते. धुरंधर व सेनासाहेब छ १५ रबिलाखरी येथून तीन कोस कोराडीस देवीचे दर्शनास गेले सेवेसी श्रुत होय हे विज्ञापी

र. नं. ९६
फा. नं. २
प क्र. १४

२३० १८ मार्च १७८८

श्री

पुरवणी साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हारजी घोरपे व दताजी कुसाजी तोरडमल कृतानेक विज्ञापना ऐसीजे राजश्री सेनाधुरंधर याची कन्या गगाभागिर्थी ठकूबाई गुजर याचा पुत्र राजश्री गुआबा गुजर याचे लग्न नेमस्त केल्याची विनंती पेशजी सेवेसी लिहिलील आहे

त्याच संधीत विंबाजीवावा भोसले यास देवआज्ञा जाली याचे वर्तमान आले यामुळे राहिले. सांप्रत फाल्गुन वद्य पंचमीची तीथ नेमस्त केली आहे. मंडप तयार पहिलेच जाला आहे. कांही काम राहिले तेही होत आहे. शुध ७ सप्तमीस गडगनेर चालीस लागला आहे. तेच दिवसी उपाध्येयाचे घरी गडगनेर जाला. सेनाधुरंधर व सेनासाहेव सुभा व सेनावहादर व व्यंकोजी भोसले व परसोजी भोसले व सोभाग्यादिसंपन्न मातुश्री चिमावाई वगैरे व गुज्यावा यैसे होते. भोजन होऊन गुज्यावा गुजर व त्याचे चुलते राजश्री जानराव व महादजी व कुशावा वगैरे सात आठ असाम्यास वस्त्रे दिल्ही. दुसरे दिवसी राजश्री सोमाजी मोहिते याचे घरी धुरंधर खेरीज करून सदरहु प्रमाणे जाऊन समारंभ होऊन भोजनउतर वस्त्रें. सदरहु प्रमाणे तेच दिवसी गंगाभागिर्थी सगुणावाई निंवालकर याचे घरी सेनाधुरंधर व सदरहु मंडळी व आणिख काही पाटणकर वगैरे मराठे मुसलमानसुधा गेले. फराल होऊन वस्त्रें सदरहु प्रमाणे जाली. त्याउपरी राजश्री मानसिंग मोहिते याचे घरीही याच प्रमाने गडगनेर होऊन वस्त्रें जाली. छ ६ जमादिलाखरी राजश्री व्यंकोजी भोसले याणी आपल्या वागात आरास करऊन भोजनास सेनाधुरंधर व सेनासाहेव सुभा व सेनावहादर व परसोजी भोसले व सोभाग्यादिसंपन्न मातुश्री चिमावाई वगैरे घरमंडळी व मराठे पाटणकर व घाटगे निंवालकर वगैरे व सलावतखान व महमद आमीखान वमयेमंडळी वगैरे मिलोन कमपेश तीनसे पर्येत भरणा होता. भोजन होऊन नाचरंग जाला. च्यार घटका दिवसास राजश्री गुजावा गुजर यास वस्त्रे पागोटे व सेला नागपुरी जामा वऱ्हानपुरी व किनखाप व सिरपेच दिल्हा व राजश्री सोमाजी मोहिते व राजश्री कृष्णाजी मोहिते गंगाभागिर्थी वालावाई मोहिते याचा पुत्र यास शेला पागोटे वऱ्हानपुरी व जामेही बऱ्हानपुरी, किनखापा येणेप्रमाणे उभयेतास व गुज्यावाचे चुलते राजश्री जानराव गुजर व महादजी गुजर व कुशावा गुजर व त्रिवर्गाचे पुत्र वगैरे गुजर मंडळी पंधरा सोळा असामी व कारकून त्याजकडील तिघ यास दर आसामीस सेला पागोटे येणेप्रमाणे दिल्ही. छ ७ रोजी राजश्री सेनासाहेवसुभा याणीही व्यंकोजी भोसले याचे गडगनेराप्रमाणेच आपले बागात करून वस्त्रें त्याचप्रमाणे दिल्ही. गुजावास वस्त्राखेरीज कंठी दिल्ही. राजश्री भवानी नागनाथ याचे नातवास वायू होऊन दोष जाला. देवी मानवी उपाये केले परंतु गुणास न आले. फाल्गुन शुध १० मध्यरात्री देवआज्ञा जाली. मुनसीच्या ज्येष्ट पुत्राचा पुत्र उमार येकवीस बेवीस वोर्पाची होती त्याचे दुःख मुनसीस मोठे जाले. आपल्या देखत पुत्र सुना व नातु जातात. वृधापकाली हे काये पाहावे! लोक काये म्हणतील? हेच कालजी करतात. सेवेसी श्रृत होये विज्ञाप्ती.

ना० भो० ३३

रु. नं ९६
फा नं २
प क्र. १५

२३१

१ एप्रिल १७८८

श्री

पौ छ १७ रजब सन समान समानीं पैन्न

साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हारजी योरपे व दताजी कुमाजी तोरडमल कृतानेक विज्ञापना ऐसीजे येथील क्षेम ता छ २३ जमादिलाखर पावेतो मुकाम नागपूर साहेबाचे कृपावलोकने करून आज्ञाधारकाचे वर्तमान येयास्थीत असे यानतर इकर्डाल वर्तमान तरी राजश्री विठ्ठल बलाल सुभेदार प्रांत वराड याची पत्रे राजश्री सेनाधुरंधर व राजश्री भवानी नागनाथ यास आली त्यात मजकूर लिहिला आहे कीं, अलीबहादर याचा मुकाम जयपूर कोथळी येथे नजीक मल्कापूर साहा कोस आहे त्याणी मलकापूर प्रगणेयात दगा फार केला आहे गांव व माल याची तसनस बहुत जाली यामुळे जमीदारानी भेट घेऊन पाच हजार रुपये चुकोती ठरविली फडशा व्हाया तो राजश्री येशवतराव नाईक निंबालकर याणी मुदा घातला कीं, मल्कापूर प्रगण्यात आमची बाकी रुपये आठरा हजार येणे आहेत ते घेतले पाहिजेत म्हणून त्यावरून ठरली गोस्ट इस्कटून मागती त्यांवनीवर घालऊन दगा मन मानेसा करीत आहेत, म्हणून प्रगणे मजकूरचे जमीदारानी लिहिले आहे पुढे याचा बदोबस्त कसा करावा येविसी आज्ञा जाली पाहिजे म्हणून त्याजवरून सेनाधुरंधर याणी उभयता आज्ञाधारकास सांगितले कीं, निंबाल्कर मशारनिले याची बाकी कांही राहिली नाही. त्याणी निमित्य ठेऊन हरयेक जागा पैका घ्यावा हे चाल त्याच्या घरची त्यासी आम्ही समजोन घेऊ. चिंता नाही परंतु सांप्रत तुमच्या दरबारात आहेत याज करिता उपाय नाही अली बाहादर व त्याचे कारभारी याणी निंबाल्कर मशारनिले याच्या सांगितल्यावर जिदीस प्रवर्तावे हे अपूर्व आहे कारण पूर्वी कैलासवासी नानासाहेब यांची स्वारी लाखनवाड्याच्या घाटावर येऊन मुकाम करून लिहून पाठविले कीं, तुम्हाकडून ऐवज येणे त्यास लाखनवाड्याचा घाट दरवाजा आहे, आमचे धरणे दरवाज्यात आहे म्हणून कौतुक करून बोल्णी जाली असी मर्यादा तुमचे घरीहून होत आली, हा कालवर तैसेच चाल्वीत आहेत वरे असो राजश्री विठ्ठल बलाल सुभेदार याच्या पत्राचे उतर राजश्री भवानी नागनाथ कसे तरी लिहोत जाले वर्तमान तुम्हास कलविले पुण्यास व लस्करास लिहून पाठवणे चितास येईल ते करतील म्हणून बोलले, त्याजवरून सेवेसी विनंती लिहिली आहे आणि याप्रमाणे कांही कमपेश मजकूर श्रीमत अलीबाहादरसाहेब व राजश्री बाबूराव विश्वनाथ वैद्य यासही त्याच्या सांगितल्यावरून लिहिला आहे पुढे आज्ञा

करणार साहेब समर्थ आहेत. याचे उतर आज्ञापत्र येईल त्यातील अर्थ यास दाखवयायोग्य लिहावयास आज्ञा जाली पाहिजे. तेव्हां यास प्रमाण वाटेल. नाही तरी लिहिले न लिहिले हे समजणार नाहीत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ती.

रु. नं. ९६
फा. नं. २
प. क्र. १०३

२३२

७ मे १७८८

श्री

पौ छ १६ सावान

साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हारजी वोरपे व दताजी कुसाजी तोरडमल कृतानेक विज्ञापना येसीजे. येथील क्षेम ता। छ ३० रजब पावेतो मुकाम नागपुर साहेबाचे कृपावलोकने करून आज्ञाधारकाचे वर्तमान येथास्थित असे. यानंतर इकडील वर्तमान तरी राजश्री सेनाधुरंधर याणी पेशजी बोलणेयात आणिले ते वर्तमान सेवेसी विनंती लिहिलीच आहे. त्याउपरी वोलिले कीं, मंडले प्रकरणी तरी तुम्हासी काये बोलावे ? मला गरज नाही. येविसी पुण्याहून तुम्ही आला तेव्हांच सर्व बोलण्यात आले. सारांष, दौलतीसी व मसी संबंध नाही. राजश्री पंतप्रधान व राजश्री नाना याचे नात राजश्री सेनासाहेबसुभा यासी आहे. उचितास येईल तैसे त्याणी सुखरूप करावे आणि सेनासाहेब याणी त्यासी कसे वर्तावे, आचरन काये आचरावे हे याचे स्वधर्मास येईल तैसे करतील. साबाजी भोसले वारलेयावर राजश्री नाना याचे वचनाचा लाभ आम्ही मेळविला. येणे करुन कृत्यकृतश्च भारत जाले. कारण राजश्री नाना याचे वचन म्हणजे आजरआमर. कोणास लभ्य होणार नाहीच नाही. तो लाभ आम्हास प्राप्त जाला, तेव्हां इछा कोणतीहि राहिली नाही. वरकड आम्हाकडे कोणतेहि नाही. इंग्रज येथे आले आहेत. त्याचा प्रकार राजश्री भवानी नागनाथ सांगतील म्हणून वहुत प्रस्तावा केला. त्या उपरी राजश्री भवानी नागनाथ यानी सांगितले कीं, कटक प्रांती बालेसर बंदर आमचे आहे. तेथे आमचे व त्याचे प्रांताची सरद लागली आहे. त्याचे गाव आमचे तालुकियात कांही आले आहेत. व आमचे गांव कांही त्याच्या तालुक्यात गेले आहेत. परंतु अमल ज्याचा त्याजकडे चालत आहे. सांप्रत येथे इंग्रज आले याचे बोलणे कीं, तुमच्या तालुक्याचे गांव आमच्या प्रांतात आले आहेत ते आम्हाकडे द्यावे. त्याच्या यैवज मुबदल्यास आमचे गांव तुमच्या तालुक्यात आहेत ते घ्यावे. आम्ही देतो आणि हेस्टिन इमादुदौला बाहादर त्याचा स्नेह होता त्याप्रमाणे चालवावा. आम्हाकडूनही हेस्टिनाप्रमाणेच वर्तणूक घडेल. आंतर पडणार नाही. सलामसलत प्रकरणी सर्व प्रकारे दुसरा आर्थ नाही म्हणून बहुत घरोब्याचे वाटेन बोलतात. त्यास कलकत्याकडील गाव बालेसर बंदरच्या तालुक्यात इंग्रजाचे आले आहेत ते घेऊन आपल्याकडील गाव मुबदल्यास

द्यावे तरी आमचा अमल दूर जाऊन कलकत्याचा नाका दाबला आहे मुनदला केल्यास कलकत्याच्या अमलास खुलासा होतो वालेसर बंदर पावेतो हुकूम त्याचाच होतो दुसरे गाव मुनदल्यास दिल्यान येवजाचा प्रकार अधिक कांही लाभ असावा तोही नाही सेवट लाख बरावरीस येवजाचा असावा हाही नाही नुकसान आमचेच आहे यामुळे सेनाधुरंधर याचे चितास येत नाही परंतु त्याजला अद्याप स्पस्ट भोडुन दाउविले नाही केव्हाचा प्रकार त्याच्या बोलण्याप्रमाणे इकडूनही रंगामेजीचेच उतर होत आहेत व करणे प्राप्त कारण आदरास प्रतिआदर हे उघडच गोस्ट आहे सल्लामसलत म्हणावे तरी श्रीमंत राजश्री नाना जे मसल्त नूतन करतील तेच मसलत आमची आहे वेगळी करावी ऐसी राहिली नाही येते समई विनंती ही गी केली तेव्हां इंग्रजासी मसलतप्रकरणी कांही बोलण्याचे व विचारण्याचे कारणच नाही इंग्रजाचा प्रकार श्रमिस्ट. पुण्यास व येथे व सिंधा जवल येक दोन ग्रहस्त त्याचे उगेच आहेत सांप्रत सिंधाचे लस्करात इंग्रज आहेत त्याज कडून येक ग्रहस्त इंग्रज पातशाहाकडेही गेला आहे म्हणून आमची बातमी आली आहे. याची चाल हेच पडली आहे सर्वा ठायी ग्रहस्त पाठऊन उगेच सारी क्षेत्र राखून असावे त्यायवली जसा प्रसंग पडेल तैसी वर्तणूक करावी हा त्याचा खंबीर. येथून हरयेक सल्लामसल्त इंग्रजासी श्रीमंत नाना याचे इतल्याखेरीज होणार नाही बरकड अधिकोतर इंग्रजाकडील कांहीच नाही पुण्याहूनही येक इंग्रज येथे येत आहे निघोन मार्गी आहे म्हणून मिस्तर ज्यारज फास्तर यास त्याचे पत्र आले आहे काये कामास येत आहेत हे आलियावर कलेल सलाबतखान येथे आल्यापासून जे बोल्णे जाले ते तुम्हास कललेच आहे सेवट खानानी साफ सांगितले की, अलजपूरचा सुभा व मये बालापूर येथील वसूल आमचे हिशाचा आकार सवा दोन अडीच लाख रुपयेयाचा त्यात पंतप्रधान याचे हसे यापैकी तीन लाख व नवाबाचा सरकार व खासगत सरदारीची वेगमी आहे यात कैसे करावे याचा विचार आपणच सांगावा ऐसी खानाची बोलणी संकटाची अर्थ पाहता इतकेही खरे दुसरे आपल्या घरास आले त्यापक्ष पैकाच घ्यावा तुमचे आम्हास ऐकावयाचे नाही हेच बोलणे सेवटवर बोलावे तरी त्याच्या येण्याचे व आपल्या बलावण्याचे स्वरूप चांगले नाही मतल्बच ठरतो. लांबवावे तरी दिवस लावणीचे हगामाचे मृगास येक मास राहिला जमीदारही येथे हरदु अमलाचे लक्ष्यामुले आहेत म्हणून उगाच खानास ठेऊन फल नाही आणि लावणीही होत नाही तेव्हां पानावर पान टाकून निरोप द्यावा हा मनसबा ठरऊन हे कचे वर्तमान खानाचे विचारे प्रांताचे जमेचा आकार व देण्याचा भरणा खानाच्या सांगितल्या प्रमाणे उगावून नवाबास पत्रें लिहिली राव पतप्रधान याच्या येवजाची तोड खानाकडून

निकाल होऊन आम्ही जामीनकीपासून मुक्त होऊ हा विचार राहिला नाही. आपण पंतप्रधान याचे यैवजाचा भरणा करतील तरीच आमची जामीनकी दूर होईल आणि खानाचे सरदारीचा बच्याव होईल. याप्रमाणे विस्तारे लिहिले आहे व खानानीही याच अन्वय नवाबास लिहिले आहे आणि अमल इकडील व खानाकडील यात कांही लढे होते ते बारकाईने न पाहता जमीदाराचा समजुता कार्याकारण करून तोड पाडून खानास निरोप दिल्हा. पुढे घडेल ते खरे म्हणून सांगितले त्यावरून विनंती लिहिली आहे. परंतु सेनासाहेब याणी आश्विन मासी साडेतीन लाख रुपयाच्या हुंडी करून यैवज आपले सरकारचा पाठविला तो सलाबतखानानी द्यावा यैसे ठरले आहे. परंतु मुनसीचे म्हणणे कांहीच खानानी दिल्हे नाही देत नाही यैसे आहे. शोध करून मागाहून विनंती लिहून पाठऊ. सेवेसी श्रृत होय हे विज्ञाप्ती.

रु नं. ९६
फा. नं. २
प. क्र. १०

२३३

१८ जून १७८८

श्री

पुरवणी साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हारजी वोरपे व दताजी कुसाजी तोरडमल कृतानेक विज्ञापना यैसीजे. साहेबी कृपाळू होऊन छ २४ साबानचे आज्ञापत्र सादर केले ते छ १२ रमजानी मंगलवारी प्रातःकाली पावले. सिरी वंदून सनाथ जालो. मुधोजी भोसले सेनाधुरंधर यास वैशाख पूर्णिमेस देवआज्ञा जाली त्यावरून चितास बहुत खेद जाला. होणार गोस्टीस उपाये नाही. येविसी समाधान पत्रें राजश्री रघोजी भोसले सेनासाहेबसुभा व राजश्री खंडोजी भोसले सेनाबाहादर व राजश्री व्यंकोजी भोसले यास पाठविली आहेत व राजश्री भवानीपंत मुनसीसही पत्र पाठविले आहे. चिमाबाई जाणार असा भाव लिहिण्यात होता. त्यास त्यांचे जाणे न होय असे सर्वांनी मिळून करावे म्हणून आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणे त्यांची पत्रे घेऊन वाड्यात गेलो. मुनसीही आले होते. सेनासाहेब याजवल लाखोटे दिल्हे. त्यानी घेऊन राजश्री कृष्णराव माधव चिटनीस याचे कानात सांगितले कीं, मी आताच बाईकडून आलो. त्यास उगेच स्मरण होऊन वाईट वाटले आहे. समाधान करून आलो. चिमनाबापू तेथेच आहेत. ही पत्रे आली असे कलले. मनाबापू वगैरे सांगतील याजकरिता या वेलेस लाखोटे तैसे ठेवावे म्हणून मुनसीस कलवणे. त्या प्रमाणे मुनसीस कुशाबानी सांगितले यास्तव लाखोटे चिटनिसाजवल दिल्हा. मुनसीनी आपले पत्रें वाचून मजकूर सांगितला. याउपरी पत्रे पाहातील. उतर होतील त्याप्रमाणे विनंती लिहून पाठऊ. सेवेसी श्रृत होय हे विज्ञाप्ती.

आज्ञापत्र सेनासाहेब व मुनसी यानी पाहिले. सेवेसी श्रृत होय हे विज्ञाप्ती.

ऐ. म ९६
फा मं २
प ऋ. मं ९

२३४

१९ जून १७८८

श्री

साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हारजी योरपे व दताजी कुसाजी तोरडमल कृतानेक विज्ञापना ऐसीजे येथील क्षेम तागाइत छ १४ रमजान पावेतो साहेबाचे कृपावलोकने करून आज्ञाधारकाचे वर्तमान येथास्थीत असे यानंतर इकडील वर्तमान तरी छ १ रमजानी विनतीपत्रें सेवेसी पाठविली आहेत तेच दिवसी सिका व दसरे सोडावयाची परवानगी जाली मुधोजीबावा वर्तमान होते त्या दिवसात राजश्री सेनासाहेबसुभा याचे चितात राजश्री सदासिव राम गुणे यास येथे आणून पूर्ववत प्रमाणे चालवावे दरम्यान करनाटकात परस्परे विपर्यास आला, तो मिटऊन खातरजमा त्याची आपली करून घ्यावी या उद्योगात बहुत होते परंतु मुधोजीबावाची जीद सेनटवर येकसारिखी दुसरे राजश्री भवानी नागनाथ यासहि सदासिवपंत शैल्य मोठेच होते यामुले सेनासाहेब याणी पुर्तेपणे नमुदास गोस्ट आणिली नाही. आवन राजश्री माहादजी बलाल ल्स्करी याचे हाती सदासिवपंत यास सिलसिला ठेऊन काळे करून संधी पाहून योजिली गोष्ट सिद्धीस न्यावी या कर्तव्यात होते, तो अकस्मात मुधोजीबावाचा काल जाला सुतकासव व काही उदा सिनता व दौलतेचा नवा बदोबस्त करणे यात कमपेश येक मास गेला सांप्रत तेच अनुसंधान धरून राजश्री माहादाजी बलाल ल्स्करी यास सांगून मशारनिलेकरवी मशारनिलेचे नावे राजश्री सदासिव राम गुणे यास पत्रें लिहिविली कीं, तुम्हीच येशखी होऊन यावे मागील गोस्टी जाल्या त्या जाल्या तुमच्या जातीचा भरवसा व खातरजमा सेनासाहेबास आहे म्हणून लिहून मुजरद जासूदजोडीबरावर सदासिवपंत याजकडे पाठविले आहे. उतर आल्यावर पुढील डौल ध्यानास आलियावर त्यासारिखे मुनसी यास बोलावयाचे व सांगावयाचे पाहातील तैसे करतील माहादजी बलाल ल्स्करी पहिलेपासून सेनासाहेबाचे ममतेत सेनाबहादर यावरावर होते तेसमई सेनासाहेबानी ल्स्करीस लिहून सदासिवपंताची खातरजमा करवीत गेले त्याच अनुसंधानावर सांप्रत ल्स्करीकरवी लिहिले आहे दौलतेचा बदोबस्त पहिला संच व आला आहे, त्याप्रमाणे कामकाज चालीस लागली आहेत मसलत प्रकरण मुनसीकडे आहे तैसेच आहे सेनाबहादर यास कारभारात घेऊन चालत आहेत राजश्री भवानी कालो श्री महायात्रेस गेले आहेत त्यास लौकर येण्यविसी या पंधरा वीस दिवसात तीन च्यार पत्रें जासूद व सांडनीस्वार याबरावर निकडीन गेली आहेत, तेच ज्येस्ट आखेर पर्यंत येतील आलियावर चाल तऱ्हा ठरेल त्याप्रमाणे विनती सेवेसी लिहून पाठऊ. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाती

रु. नं. ९६
फा. नं. २
प. क्र. ८६

२३५

१० जुलै १७८८

श्री

पौ छ २२ सवाल आषाढ मास

साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हारजी वोरपे व दताजी कुसाजी तोरडमल कृतानेक विज्ञापना ऐसीजे. येथील क्षेम ता। छ ६ शवाल पावेतो मुकाम नागपूर साहेबाचे कृपावलोकने करून आज्ञाधारकाचे वर्तमान येथास्थीत असे. यानंतर इकडील वर्तमान तरी छ १२ रजमानी सेवेसी विनंती पत्रे पाठविलीच आहेत. त्याउपरी राजश्री भवानी कालो कासीहून येथे छ २२ रमजानी येऊन शहरानजिक मुकाम केला. दुसरे दिवसी छ २३ रोजी शनवारी प्रातःकाली आपल्या वाड्यात दाखल जाले. तेच दिवसी साइकाली सुमुहूर्ते करून राजश्री सेनासाहेबसुभा याचे भेटीस वाड्यात जाऊन अगोधर देवदर्शन घेऊन नंतर सेनासाहेब व सेनाबाहादर व राजश्री व्यंकोजी भोसले व गंगाजलनिर्मल मातुश्री चिमाबाई याचे दर्शन होऊन दोन घटका बसले. राजश्री भवानी नागनाथही होते. तेव्हां बाईस व सर्वांस दुख जाले त्यास पार नाही. भवानी कालो यानी बहुता प्रकारे विवेकाचे रीतीने बोलून समाधान करून घरास गेले. त्यांसहि फार वाईट वाटले. त्याउपरी सेनासाहेब व सेनाबहादर व भवानी कालो व भवानी नागनाथ याच्या दोनच्यार बैठका होऊन खलवत जाली. सेनासाहेब सेनाबहादर यास घेऊन कामकाज करीत आहेत. उभयेता भवानीपंत कारभारात आहेत. पुण्याहून दुखोटेयाचे वस्त्र व कोणी ग्रहस्त अद्याप येत नाही, यामुले येथे सर्वांस वाईट वाटत आहे. नित्य बोलण्यात येते की, दिवसगत लागल्यास चिंता नाही. मागे पुढे येईल. परंतु दुसरेयास उपक्षा केल्यासारखे दिसेल. राजश्री बगाजी रघुनाथ याची पत्रे हैदराबादेहून आली. त्यात मजकूर कीं, सेनाधुरंधर यानी कैलासवास केला हे गोष्ट मोठी वाईट जाली. ईश्वर सता प्रमाण. परंतु राज्याजी सारिखे माणुस उत्पन्न होणे कठिण आहे. याप्रमाणे दोन घटका बोलणे जाले. यात पूर्वीचे वस्त्र पाठऊन देतो म्हणून बोलून पत्रें लिहावयास परवानगी जाली आहे म्हणून लिहिले आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ती.

रु. नं. ९६
फा. नं. २
प. क्र. ५

२३६

२९ जुलै १७८८

श्री

पौ छ १० जिल्काद
श्रावण मास

साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हारजी वोरपे व दताजी कुसाजी तोरडमल कृतानेक विज्ञापना यैसीजे. येथील क्षेम तागाईत छ २५ सवाल पावेतो मुकाम नागपूर साहे-

याचे कृपावलोकनेकरून आज्ञाधारकाचे वर्तमान येयास्तीत असे यानंतर इकडील वर्तमान राजश्री सेनासाहेब सुभा व राजश्री सेनाबाहादर या उभयेतामध्ये विपर्यास येऊन त्याचे निराकरण परस्परे होऊन निखालस्ता जाल्यासारिखे जाले याची विनती छ १५ शवाली सेवेसी लिहिली आहे त्याउपरी सेनाबाहादर याणी कारभार सोडला कांहीं सफाइ व कांहीं मलीनता ऐसे चालत आहे सेनाबाहादर याणी मंडळ्याचा मुद्दा मातुश्री चिमाबाइ व कारभारी याजवल बोलण्यात आणिले कीं, माझी सोये काढून घावी तेव्हां सेनासाहेबसुभा याणी मातुश्री व राजश्री भवानी काळो व राजश्री भवानी नागनाथ याजवल सांगितले कीं, येथे कोणतेही घडत नाही आणि संशयानी संशयाची वृद्धि मात्र होईल याजकरिता दताजी नाईक तोरडमल याची रवानगी पुण्यास करावी येथील अर्थ सांगितल्याप्रमाणे राजश्री नाना व राजश्री तात्या यासी बोलोन उतर येतील, त्याउपरी कोणा येकाची रवानगी करू तदोतर तेथे बोलून जे ठरेल त्याप्रमाणे करावयास येइल यातच सर्व गोष्टी नीट आहेत व धुरंधरामागे ते उभयेता वडील आहेत करतील तैसे करतील हे वर्तमान सेनाबाहादरास कलविले त्याच्याही विचारास आले त्यावरून आज्ञाधारकास सेवेसी येण्याविसी सांगितले तेथे विनती करावयाचे अर्थ कितेक प्रकारे सांगणे ते सांगितले याजकडील उदाजी नयघरा जासूद तेथे राहावयाकरिता मजवरावर दिल्हा आहे बोलण्याचा गुता उरकोन निरोप ही जाला मुहूर्तेकरून पाच साहा दिवस प्रस्थानी राहून सर्व कामे उगऊन घेतली आज छ मजकुरी निघोन मजल दर मजल येऊन सेवेसी पोचतो दर्शनाअंती सेवेसी विनंती करीन छ २५ रमजानचे व छ १ सवालचे आज्ञापत्र साहेबी कृपाळू होऊन सादर केले ते पावोन सिरी वंदोन सनाथ जालो राजश्री आपा बलवत याची पत्रें सेनासाहेब व सेनाबाहादर व राजश्री व्यंकोजी भोसले व राजश्री भवानी नागनाथ यास समाधानाची आली सेला देऊन मातवर महस्ताची रवानगी सरकारातून होत आहे म्हणून लिहिले आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापती

व मं ९६
का मं २
प क ८७

२३७

ऑगष्ट १७८८

श्री

पुरवणी साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हारजी घोरपे व दताजी कुसाजी तोरडमल कृतानेक विज्ञापना ऐसीजे राजश्री भवानी काळो याणी सांगितले कीं, येथे आलियावर राजश्री सेनासाहेबसुभा याचे आमचे बोलणे येकांती दोनच्यार वेले जाले सेनासाहेबाचे बोलणे हेच कीं, आपासाहेब याणी तुम्हावर लोभ केला व तुमची मर्जी पाळन करीस गेले

त्यास याचे कारण वडिलास समजले होते कीं, दौलतेत मी किंवा येक दिवाणजी दुसरे-याच्याने येव्हडे वोझे घेऊन चालवणार नाही. ह्या गोष्टी तुमच्या अपरोक्ष निरंतर आम्हाजवल सांगत गेले. सांप्रत असा प्रकार घडला. प्रसंगी तुम्ही नव्हता. यामुले तुम्हास पत्रें वरचेवर पाठऊन लौकर आणविले. येणेकरून माझी निश्चिती जाली. पुढे तुम्हावर दौलतीचे वोझे आहे. राजश्री भवानी नागनाथही पोक्त मनुष्य आहेत. खतगिरी व प्रसंगोपात बोलण्यास योग्य आहेत. परंतु वोझ्याच्या न्यून पूर्ण पाहण्याच्या कामास तुम्हाखेरीज बंदोबस्त राहणार नाही. कलेल त्याप्रमाणे सांभाळावे. आम्हास सांगाल त्याप्रमाणे घडेल. मुनसी तुम्हाजवळ आहेत. राजश्री पंतप्रधान व राजश्री नाना व राजश्री तात्या याची पत्रे आली ती पाहावी म्हणून बहुता प्रकारे निखालसपणे बोलणे जाले. त्यास श्रीमंत राजश्री नाना याचे अभय जाल्याखेरीज कामकाजात चित पुरवणे सला नाही. तेथील मर्जी अगोधर पाहून येथे पूर्वी ज्यानी कारभार केला त्याचीच गोष्ट नीट राहिली हे मी पहातच आलो, याकरिता सेनासाहेब यास उत्तम आहे याप्रमाणे विचारिल्यास म्हणून वर्तणूकेत येईल. तेथील कांहीक संदर्प आल्यास चित पुरुऊन सेनासाहेब बोलतात याप्रमाणे करावे, हे दौलत त्यांचे उपयोगी पाडावी, त्यांजकडून याचे कल्याण घडावे, हे चितांत आहे. इतके घडणे यास कारण श्रीमंत नानाची मर्जी. सारांष येथील करण्यास तेथून रूप व्हावे हुरमत वाढवावी. तेथे आमचे जातीचे जाणे घडल्यास मानसन्मान राखोन कांही याचे मर्जीप्रमाणे घडावे तरीच उत्तम आहे. तेथील अश्वासन होईल तरीच वोझ माथा घेईन येरवी सला नाही. श्रीमंत राजश्री नाना खऱ्या गोष्टीचे रवादार, मलाही आवड, तेथेच विनंती करावी. हासल मुदा हासल कलम प्रनिस्ट अर्थ उदघाटन करावे. जे बोलणे व करणे ते राजश्री तात्या याचे समक्ष घडेल. आतबाहेर वेगळाले प्रकार वर्तावे हे चाल माझी नाही. येविसी तुम्ही हे बोलणे श्रीमंतास विनंती लिहावी. याचे उतर येईल ते मला दाखवावे. त्यासारखे करावयास येईल म्हणून सांगितले, त्यावरून विनंती सेवेसी लिहिली आहे. येविसीचे उतर आज्ञापत्र सादर करणार साहेब समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापी.

रु. नं. ९६
फा. नं. २
प. क्र. ८८

२३८

ऑगस्ट १७८८

श्री

पुरवणी साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हारजी वोरपे व दताजी कुसाजी तोरडमल कृतानेक विज्ञापना ऐसीजे. राजश्री भवानी कालो यानी म्हटले कीं, सेनाधुरंधर यांचा काल जाल्याचे वर्तमान त्यांस कळून समाधानार्थ पत्रें यावयाचे रीतीची आली. उचित

केले परंतु या पत्रावरावर कोणी मला गाणूस व वजा आले असे तरी ययापण्यत व ममता लोम विशप व लौकिकात चांगले दिसते येणे करून खबसुरताई उतम प्रकारे होती ते गोष्ट न जाली तेव्हां आज्ञाधारकाने सांगितले कीं, श्रीमंत राजश्री नाना यांची स्वारी टोक्यास त्याच संधीत आली होती म्हणून त्याउपरी राजश्री भवानी काळो बोलले कीं, तुम्ही म्हणता हे खरे, आम्ही जमेस धरीत नाही ऐसे नाही, परंतु या बोलण्यास संगत तेव्हां कीं मसलत प्रकरणाचा प्रसंग विना येजमान व श्रीमंत नाना व राजश्री तात्या येक जागा न होता घडूच नये यातील अर्थ नानास पत्र पात्रताच लिहिण्यास मसुदा करून अमुका महस्त व वजा व पत्रें याप्रमाणे लिहून पाठयावी ती व आपली पत्रें येणारा महस्तासी बोलून इकडे पाठयावी, इतका सारा अर्थ असो श्रीमंत नाना याची स्वारी पुण्यास जाताच याप्रमाणे रवानगी दुसरे दिवसी इकडे होऊन प्रथम पत्राच्या पाठीमागे आठा दाहा दिवसात महस्ताचे येणे येये घडावे तेही न जाले तेव्हां उपेक्षा किंवा लोभ हा अर्थ याहेमात्र कैसा दिसतो यास काये म्हणावे ? कारण या दौलतीचा पाया व मजबुदी व शोभा तेथील राखल्यावर व लोभावर विशेप आहे तेथून उपेक्षासारिखे दिसल्यास लौकिकात अर्थ करणार कैसा करतील, या दौल्तेचे तेज अधिक किंवा उणे हे कैसे भासल, हाही विचार त्यांचे चितात नाही ऐसे नाही ते वडील आहेत, ज्यात परिनाम चांगला तेच तेथून घडेल हे खातरजिमा पुर्तेपणे आहे सध्या लौकिकात आणीखसारिखे दिसते म्हणून तुम्हासी बोलणे प्राप्त तुम्हीही कांही लिहिणे असल्यास लिहावे म्हणून बोलले. त्यावरून विनंती सेवेसी लिहिली आहे आज्ञा करणार साहेब समर्थ आहेत राजश्री भवानी नागनाथ याचेही बोलणे याप्रमाणेच होत आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति

र. मं ९६
का मं २
प क्र. ८९

२३१

ऑगस्ट १७८८

श्री

पुरवणी साहेबाचे सेवेसी आज्ञारक मल्हारजी मोरपे व दताजी कुसाजी तोरकमल कृतानेक विज्ञापना ऐसीजे राजश्री भवानी काळो याणी सांगितले त्याप्रमाणे सेवेसी विनंती लिहिली आहे परंतु कारभाराचा प्रकार राजश्री भवानी नागनाथ पहिल्याप्रमाणे करीत आहेत बोलण्यास व ममतेत व विश्वासात अंतर तरी कोठे दिसत नाही सेनाधुरंधर मारल्यावर सेनाबाहादर यास सेनासाहेबानी कामाकाजात घेतले आहेत उमयेता भवानीपत सारा कारभार करीत आहेत सेनाबाहादर जवळ मात्र बसतात नसलेयास ठरले गोष्टीचा इतला देत असतात राजश्री भवानी काळो याचे समाधान होय ऐसी आज्ञा आज्ञाधारकाचे पत्री करणार साहेब समर्थ आहेत. त्याचे बोलण्याप्रमाणे कांही नमुद जाल्यास पत्र

दाखऊ न जाल्यास उतर आले नाही यैसे सांगू. मशारनिले आल्यापासून सेनासाहेब व सेनाबहादर याची स्वारी तीन च्यार वेल त्याचे येथे गेली होती. छ ४ रोजी मारनिलेस ज्वर आला म्हणून समाचारास सेनासाहेब व सेनाबाहादर गेले होते. सेवेसी श्रृत होय हे विज्ञाप्ती.

रु. नं. ९६
फा. नं. २
प. क्र. १६

२४०

११ मार्च १७९१

श्री

साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हारजी वोरपे व दताजी कुसाजी तोरडमल कृतानेक विज्ञापना ऐसीजे. येसील क्षेम तागाइत छ ५ रजब पावेतो मुक्काम नागपूर साहेबाचे कृपावलोकने करून आज्ञाधारकाचे वर्तमान येथास्थीत असे. यानंतर इकडील वर्तमान छ १६ जमादिलाखरी विनंतीपत्रे सेवेसी लिहिलीच आहेत. राजश्री परसोजीबावा याचे लग्न माघ २ स रविवारी लागले. च्यार दिवस येथासांग जाले. सासरा नातवान, याजकरिता राजश्री भवानी कालो यास व्याही करून नवरीकडील विध्वी त्याचे हातून करविला. देणगीवस्त्रें व जवाहीर व घोडी वगैरे यैसी हाजाराची भरती भवानी काळो कडून होत आली. लग्न जालियावर च्यार पाच दिवसी राजश्री मनाबापू यास समाधान वाटेनासे जाले. अंडाचा मेरगा उतरला. सेकाचा उपाये केला. तो अधिक होऊन कातडे गेले. खांद्याचे पाठीमागे सिरेवर बिबवा घातला. गुण तरी आला नाही परंतु बिबवा उफडुन दुख अधिक जाले. दहा बारा दिवस बहुत श्रमी जाले. सांप्रत कांहीसा आराम आहे. छ ३ रजबी बुधवारी चोरस्नानही केले. मुहूर्त पाहून पदार्चीं वस्त्रें व लग्न होईल. राजश्री सेनासाहेब सुभा याचेही लग्न होणार आहे व त्यांची कन्या बनाबाई यास वर राजश्री रामराव गुजर याचा पुत्र योजणार. येविसी ठकूबाई गुजर यानी येथून रामराव गुजर याजकडे सूचनेस ग्रहस्त पाठविले आहेत. सरकारची पत्रें राजश्री सेनासाहेब यास फौजसुधा येण्याविसी आली व राजश्री बाबूराव वैद्य यासही आली. त्याप्रमाणे राव मशारनिले यांसी बोलले. परंतु फौजेची नेमणूक अगोधरच होऊन राजश्री बलवंतराव भवानी यास डेरेदाखल करविले होते, त्यास निरोप छ २ मीनहूस कूच करऊन लाविले. राजश्री आनंदराव धुंडिराज याजवलील कांही लोक देविले ते घेऊन उमरखेडावरून येणार आहेत. राजश्री तुकोजी होलकर याचे पुत्र आंबड प्रगण्यात आले. त्याचे दहशादीने तेथील मामलेदार गैरहाजर जाले, म्हणून बातमी आहे. राजश्री परसोजीबावा याचे लग्नाचे आहेराची वस्त्रे व दागिने सरकारात व साहेबास पाठवणार. पाठवल्यावर विनंती लिहून पाठऊ. प्रगणे तलेगाव येथील बेचालीस गावचे कमाविसदार राजश्री शिवाजी येशवंत नि॥ पुणे येथे छ २ मीनहूस आले. राजश्री रामचंद्र दादो याची पत्रें सेनासाहेबास आली. ती बाबूराव यास दाखविली. सेवेसी श्रृत होय हे विज्ञाप्ती.

र मं ९६
फा मं २
प क्र ९०

२४१

श्री

पुरवणी साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हारजी घोरपे व दताजी कुसाजी तोरडमल कृतानेक विज्ञापना ऐसीजे राजश्री बाळाजी सिवदेव याणी आज्ञाधारकास पत्र लिहिले त्यात मजकूर कीं, तुम्ही गेल्यातागाईत आमची हेल्साहच येथे होत गेली पुर्वीचे साहेबसुद बोलत देखील नाहीत कामकाजाविसी बोलावे तेही करून देत नाहीत मगाजी नाईक अलीकडे आले परंतु जागा दिल्ही नाही बाहेर गाडे देऊन राहिले जागाविसी पाचसात वेळे विनंती केली परतु कानावरहि घेत नाहीत ऐसे सोसून आजपावेतो काढिले छपर देखील मिळत नाहीत हा बोभाट रतीमात्र आम्ही सरकारात लिहिला नाही कारण तुम्हावर तांढन होईल बाहेर कुटुंबसुधा पाण्यापावसात कोठवर राहावे? अगोधर तुम्हास सूचना ल्याहावी, तुम्ही येजमानास विनती लिहून बदोबस्त जाल्यास उतम, न जाल्यास आमच्या येजमानास विनंती लिहिणे प्राप्त म्हणून त्यास मारनिलेनी तरी चुकून लिहिले त्याच्या लिहिल्यास कोण मोजतात? परतु आज्ञाधारकाची विनती हेच कीं, मारनिलेस व मंगाजी नाईकास जागा समयेता पुरती व छपर वगैरे कार्याकारण धावयास आज्ञा जाली पाहिजे लाहान अथवा मोठे परदरबारचे माणुस, त्यातही विपये थोडका यामुले धटाईने विनती लिहिली आहे तरी कृपा करून आज्ञा करणार साहेब समर्थ आहेत सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ती

रु. मं ९६
फा मं २
प क्र. ६

२४२

श्री

पुरवणी साहेबाचे सेवेसी आज्ञाधारक मल्हारजी घोरपे व दताजी कुसाजी तोरडमल कृतानेक विज्ञापना ऐसीजे साहेबी पेशजी कृपाळू होऊन आज्ञापत्र सादर केले चिरंजीव राजश्री अपाचे बोलणे राजश्री बाळाजी सिवदेव यासी जाल्यावरून त्याणी सेनाधुरंधर यास पत्रें पाठविली त्यातील मजकूर लिहिला तो सविस्तर कळला त्यास बाळाजी सिवदेव याच्या लिहिण्यात मजकूर आला होता तसा कांही अपाजवळ आम्हाकडून बोलण्यात आला नव्हता मग त्याणी कशावरून लिहिला असेल तो असो म्हणून आज्ञा त्यास युक्तीचे वाटेन हा मजकूर राजश्री भवानी नागनाथ यास सांगितला त्याणी उतर केले कीं, खरे आहे मीही श्रीमतास विनतीपत्रें लिहिली होती त्याचे उतर आले त्यांतही साफसाफच अर्थ लिहिले आहे रंगामेजी अथवा लापनिकेची जात नाही राजश्री अपानीच कसे सांगितले व वालाजीपताने काये समजून लिहिले हे न कळे म्हणून बोलले. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ती

15 पुरवणी पत्रें (अनेकांचीं)

रु. नं. ८८
फा. नं. १५
प. क्र. ४

२४३

जानेवारी १७७५

श्री

पुरवनीपत्र श्रीमंत राजश्री बापू व राजश्री नाना स्वामीचे सेवेसी विनंती जे. युधप्रसंग उरकला. आज सेनाधुरंधराची तारपतार करून सेवक महमंद इसब याचे सोधास पुढेच होता. तो मागे सेनासाहेबावर दगा फितुराने जाला. तदनंतर राजश्री नानाजी कृष्ण जोसी व नानाजी कृष्ण करंडे हे उभयेता आले. यासी आपले स्वहस्ते गोली चालऊन चौघा हाती चार हा लावून जाया केले. तीच गती रानोजी घाटगे याची केली परंतु तो वाचला. मातुश्री दर्यावाई यानी दुसरे दिवसी म्हटले कीं ही गोष्ट वाईट जाले. ते समर्थ. आता तुम्ही उभयेता सर्वाधिकारी त्याजकडे कोण्ही पाठऊन ममता लावावी. जुनी राजपत्रें व श्रीमंताची पत्रे अधिकाराची अनवावी. तेव्हां पदयुक्त पत्रें लिहीत जावी. उतर केले कीं श्रीमंतानी अधिकार अगोधरच देऊन चुकले. आता पत्रें कोनते श्रीमंतास ल्याहावी ? त्यांची पत्रें लागत असतील तर पुन्हा अनवितो, यैसी उतरे जाली. दुसरे दिवसीच मजलस करून चौघास बोलाऊन विडे दिधले. सदनपत्र खतखुत पदयुक्त लिहितात. तिकडेही श्रीमंत रा। दादास व गाइकवाड अदी करून पत्रें पाठविली. श्रुत व्हावे येदर्थी विनंती लिहिली असे हे विज्ञापना.

रु. नं. ८८
फा. नं. १५
प. क्र. ७

२४४

सप्टेंबर १७८१

श्री

सेवेसी विज्ञापना. नवाबांस याणी पत्रें दिवाकरपंत गेल्याची लिहून पाठविली होती त्यांची उतरें त्याणी बगाजी रघुनाथ याजवळ केली. त्याणे मजकूर लिहून पाठविला आहे. दिवाकरपंताचा स्तव बहुत नवाबानी करून वाईट मानले. दोही दौलतींत दोघाचा इतबार आम्हास मोठा होता. त्यास कालानरूप घडते यास इलाज नाही. दिवाकरपंत होते याजमुले आमच्या चितात खतरा नव्हती. पंतप्रधान याच्या दौलतीत सखारामपंत होते त्यास कैदेत किल्यावर ठेविले. आतां कारपरदाज आहेत त्याचा इतबार येत नाही. आमचे करणे त्यास चांगले वाटत नाहीं ! असो. आम्ही काय करावें ? त्यास हैदरखान याचा भरोसा फार आहे तोही कळू येईल. आम्हासी करार केला त्याप्रो निभाव पडत नाही याजकरितां कृष्णराव यास बलाविले आहे ते येतात. पुढें कसें घडेल पाहावे. पुढील मसलतीकरितां कृष्णराव यास

आणविले आहे दिवाकरपंत यासही बलाविले होते, ते तो गेले त्याणी साहा मर्फे केल्या कराराप्त अंतर पडू दिल्हे नाहीं त्याप्रो राजाजीही रारातील म्हणून सेनाधुरंधर यांचा खत्र केला सेनाधुरंधर याणी येऊन भेटावें, पुढील कर्तव्यता येकविचारे व्हावी, हें मानस आहे परंतु यासमई त्याणी यात्रे ही सल्हाह नाही दिवस येक प्रकारचे आहेत याजकरिता कोणी शाहाणा माणूस कारभारी पाठऊन द्यावा म्हणून लिहिलें आहे श्रीमंताच्या दौलतीविसी निखालसपणा नबाबाच्या चितात नाही हे गोष्ट निसंदेह आहे नबाब, आपण व इंग्रज येकत्र व्हावे या योजनेत पुर्तेपणे आहेत, हे स्वामीस विदित व्हावे धातुपोपणाचे बोल्णें जिवाजीपंत यासी वगैरे कोणी स्वामीकडील पक्षपाती असतील त्याजवळ बोल्तात स्वार्थाची गोष्ट असेल ते बहुत येकांतांत घेऊन सांगतात, परंतु चितांत निर्मलता नाही दौलत श्रीमंताची पेचांत कोणत्या तऱ्हेने येईल हा मार्ग पाहात असतात स्वामीस कळावे शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

र. मं ८८
का मं १५
प क्र. २

२४५

मे १७८६

श्री

सेवेसी विज्ञापना स्वामीच्या चिठ्या दोन आल्या त्या पावल्या येक दोन प्रहरापूर्वी व येक अडीच प्रहरा व राजश्री सेनाधुरंधर यास लिहिल्या त्या पावल्या त्यांत मजकूर लिहिला जे, नारोपंत चक्रदेव यांच्या चिठ्या येतात जे खालील तले घेनले तटासी लोक ठेपले, अशांत धुरंधर याणी जमाव सुधा खाशानी लौकर जाऊन यशाचा वाटा घ्यावा म्हणून मजला आज्ञा लिहिली व धुरंधर यास लिहिले जे, नारोपंत यांच्या चिठ्या येतात जे, तले घेऊन लोक तटासी ठेपले. याजकरिता आतील लोक निकड करितात यास्तव धुरधराची कुमक लौकर व्हावी याजकरिता आपण खुद जमावसुधा जाऊन कुमक लौकर करून मजबुदी करावी. येश आपण घ्यावें, म्हणून त्यास प्रात कालीच स्नान न करितां धुरंधर निघून तोफा चढवावयास गेले मोठ्या दिक्कतीने जातीनसी उनात उभे राहून तोफा वरत्या नेल्या येक तोफ लागू करून ठेविली धुरंधर तेथेच बसले होते. तेव्हा आंतून लोक निघाले होते त्याची सरकारच्या लोकाची व याजकडील लोकाची झटपट जाहाली त्यावेलेस खासा होते तेथून पुढें जाऊन लोक आंतून आले होते त्याजवर आपल्या लोकाची मार बसविली त्याजमुले मागती लोक माघारे गेले याजकडील मोर्चे किल्याच्या भिंताजवल जाऊन पोंहचले आहेत याजकडील लोक व मोर्चे पोंहचले गुंता राहिला नाही कुमक करावी असा मार्गच पाहात नाहीत, यांच्या लोकावर येऊन बनली आहे निकड व मेहनत

करावयास आलस इकडून नाहीं. असे असून नारोपंत काय म्हणून कशा चिठ्या लिहितात कळत नाही. स्वामीकडील माणसे जातात त्याणी तर पाहिलेंच असेल! ते सांगतील त्यावरून विदीत होईल. धुरंधर आतांच वरून येऊन स्नान केले. आपल्याकडील प्यादे यांणी पाहिले आहे. याउपरी भोजन जाहाल्यावरही जातील. जावयास व तेथे राहून काम लौकर करिवण्यास यांचा उल्हास आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

पौ इंदुवासर दोन प्रहर सात (घ)टका दिवस.

रु. नं. ८८
फा. नं. १५
प. नं. ३

२४६

मे १७८६

श्री

सेवेसी विज्ञापना. स्वामीनी चिटी पाठविली पावली. राजश्री सेनाधुरंधरांचा आज वर्ज वार म्हणून प्रातःकाली विनंती लिहिली होती, त्यावरून सरकारच्या तोफा व गाडद-डोंगरावर पाठवून मुहूर्त केला व मोर्चे कायम करविले आहेत. त्यास धुरंधर याजकडील गारदी व बारगीर व सिलेदार मिळून अडीच तीन हजार लोक पाठऊन रात्रीस त्याणी तेथे राहून उज्याडतां मुबदल्यास दुसरे जाऊन गेले, त्यास विसावा द्यावा म्हणून आज्ञा लिहिली. त्यास आज्ञेप्रमाणे धुरंधरास सांगितले त्यावरून धुरंधरानी रा पांडुरंगपंत याजबा दोन तोफा पांचसेरी देऊन लोक व गारद देऊन डोंगरावर पाठविले. रात्रीचे तेथें राहावयास सांगितलें आहे. रात्री दिवसाचा मुबदला जाण्यायेण्याचा लोकाचा करावयाची तरतूद केली आहे. शेवेसी श्रुत होय. खासा धुरंधर राजश्री तात्याकडे तोफाची मारगिरी पाहावयास गेले. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

रु. नं. ८८
फा. नं. १५
प. नं. १

२४७

१ जूलै १७८६

श्री

पौ छ १० रमजान सबासमानीन द्या डाक

सेवेसी विज्ञापना ताा छ ४ रमजान वर्तमान यथास्थीत असे विशेष. स्वामीनी छ २० साबानची पत्रें पाठविली ती छ ३० मीा पावली.

राजश्री गोविंदराव कृष्ण व मैनुदौला यास पत्र पाठविले ते त्याजकडे पाठविलीं व दौलास पत्र लिहिले त्याचा मखीदा पा तो पावला.

होलकरांस पत्र पाठविले ते त्याजकडे पाठविले. मी येथून पत्रें पाठविली आहेत. अलीकडे पत्रे बरी येतात. तूर्त ते व गणेशपंत सावनूरचे लल्यास आहेत. आम्ही

इकडून तिकडे गेल्यावर भेटतील लाचारीने राहतील, परंतु श्रमी आहेत

बापुराव कृष्ण यांचे पत्र सातारियाहून आले त्यांत सौ चिमाबाई सातारियास गेली आगत स्वागत वस्त्रें अलंकार भोजन जालें कुन्हे होते ते निघाले असें लिहिले होते म्हणून आज्ञा केली ती कळली

राजश्री मुधोजी भोसले याचा दरगाहा पुढे तीस हजार व्हावा म्हणून आज्ञा त्यास रा मजकूर पूर्वी सेवेसी लिहिला आहे त्याची रजबदली अधीक घावे असी चाललीच आहे गी अधीक कबूल केले नाही ठरले ते लिहून पाठऊ गोविंदराव भगवंत पुढे येणार होते ते अदवानीकडे गेले, यामुळे आले नाहीत येका दो रोजी गाठ पडेल, सविस्तर लिहून पाठऊ.

कमलगज हती मुधोजी भोसले यास घावा, त्यास श्रीमताची मर्जी नाहीत तत्रापि युक्तिने सांगोन देविला म्हणौन आज्ञा केली ती कळली आपण मुदारतीस अंतर करीत नाही. त्याजकडून निभावणीत येइल ते खरे. जेजुरीस येणार तेव्हा स्वामीची भेट होईल आगत स्वागत होइलच

वनशकरीदेवीचा रथ नीट करवावा म्हणौन आज्ञा, त्यास रथ नीट करविला राजश्री सदाशिव राम मजजवळ येऊन राहिले मुधो जीवाबाचे मनांत हे नसावे येविसी आम्ही कांही बोलिलो नाही. दुसरा कोण नेमून देणे तो तेयून पाया येविसीचे कचे वर्तमान मल्हारजी नाइक गाठ पडल्यावर विनंती करील राजश्री परशरामपंतभाऊ याजकडील मजकूर लिहिला तो कळला घरी गेल्यावर पुत्राची मुंजी जाली लस्करात येण्याचा प्रकार पुण्याहून सरंजाम आणविला आहे, तो मजकूर सेवेसी लिहिलाच आहे स्वामीचे पत्र गेले आहे, गी येथून पत्रें पा आहेत, मद्राऽ ठाणी घालावयाचा मजकूर लिहिला आहे, येनीलसे वाटतें राजश्री गगा धरराव याम मिरजचे मुक्कामी रस्त व ठेक-ऱ्यांविसी सांगितले म्हणोन आज्ञा केली, त्यास याचे तर्तुदीस कारकून खिजमतगार पाठवितो इकडे रास्ते यांस सांगून ठोकरे करविले आहेत ऐयजाचा मजकूर लिहिला, त्यास प्यार छक्षांच्या हुंड्या पावल्याचा वगैर मजकूर सेवेसी लिहिला, तीं पत्रें पावली असतील सिसे चौदा खंडी भाड्याचे तहावरून पा म्हणून, त्यास बागडकोटास रा केले असे पूर्वी लिहिले होते, बागडकोटास पावल्याचे पत्र आले नाहीं येइल दारू वर्त वदामीपैकीं घेणे. मागाहून रा करू म्हणून आज्ञा, त्यास वदामीस दारू आहे ती मुतीकेप्रों वर्त आम्हाजवळ आहेच परंतु दारू गोले वगैर सरंजाम पूर्वी लिहिल्याप्रमो तर्तुद होऊन लौकर यावा जिवाजी गोपाळ याचे पत्राचे उत्तर आले ते त्याजकडे पाठविले,

सेवेसी श्रुत होय विज्ञापना

रु. नं. ८८
फा. नं. १५
प. क्र. ५

२४८

१७८६

श्री

पुा श्रीमंत रा नाना स्वामीचे सेवेसी विज्ञापना यैसीजे. आपाजीपंत व मल्हारजी नाईक याजला मंडले प्रकरणी बुंदेल्याकडे रवाना केले होते त्यास जबलगडापावेतो पोह्चून पंत मा त्याचा काल जाला. रा बापूजी मोरेश्वर व मोरो गोविंद तिखे तेथे आहेत. नित्य बोलतात, परंतु कांही अमलात येत नाहीं. स्वामी तिकडूणही ताकीद वकीलास करीतच आहेत. आगे मागे सर्व गोष्टी घडतील. स्वामीनेच ज्यापक्षी पुर्ता नियम केला आहे तेंव्हां घडेलच घडेल हे श्रीमंताचे पुर्ते लक्ष असे. परंतु कर्णाटकाचे मसलतीची वोढ व येथील फौजेची वोढ याजमुले वारंवार स्वामीस सरकारातोन वरचेवर लिहिण्यात येत आहे. शत्रू प्रबल जाला आनि त्याचा नित्य मुकाबला आहे याजकरिता लौकर रा सेनाधुरंधर याचे येणे फौजसुधा व्हावे म्हणोन रायाचे पत्री आज्ञा. यैसीयास सांप्रत तो मार्गसीर्ष वद्य अष्टमीचे लग्न श्रीमंत रा नानासाहेब याचे योजिले आहे. पौष मास तो याचे मते मुहुर्ताचा नव्हेच. माघावर गोष्ट पडली. पुढे कैसा निश्चय ठहरावितील व काय घडवितील ते प्रमाण. वोढी तोडी अदी करून पर्याये तो स्वामीस लिहिण्यात येतच असतील. मसलतीवर लक्ष देऊन निर्भीडपणे कोणी बोलावे यैसे कोणी राहिले नाही. मागील बोलण्याचे व मसलतीचे अनुसंधान ठेवावे यैसे कोण हे सर्व स्वामी जाणतात. हरेक गोष्टीस समजावे व उचीत उतर करावे. मिळोन सेनासाहेबसुभा याची जात. स्वामीचे पत्राचे निकडीवरून तेथूनच अंमलात येईल व खचीत सेनाधुरंधर यासी बोलून तेंव्हां ठहरावितील. स्वामीची मसलत आपली मोजतात. त्याचे लक्ष दृढतर आहे. यांत कैसेही नुकसान पडो, सर्व सुद बेहबुध तेथूनच आहे व स्वामीचे बोलण्याचे ठिकाणी लक्ष व तदनुरूप पेशजी वर्तनुक जाली व पुढेही होईल. हे वरकड सविस्तर मार दताजी नाईक तोरडमल याचे पत्रावरून ध्यानारूढ होईल. श्रीमंत रा सेनासाहेबसुभा याजला पत्र आम्हाविसी कृपा करून आले पाहिजे. दुःखास्पद होऊन यावर घरकृत्य कचा लिा, येविसी त्रास न मानिता कृपा करणार पाय समर्थ असेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. आम्ही मुलमुल आहोत, वडील माये बाा स्वामी असेत. हे विज्ञापना.

रु. नं. ८८
फा. नं. १५
प. नं. ८

२४९

१७ जून १७८७

श्री

श्रीमंत राजश्री नानासाहेब स्वामीचे सेवेसी

आज्ञाअंकीत मोरो बाबुराव निसबत पागा यादवराव देवकाते, दोनी कर जोडून

सिरसा नमस्कार विज्ञापना ता आशाढ शुा २ मुक्काम नागपूर स्वामीचे असीर्वादे करून लेकराचे वर्तमान येयास्थीत असे विशेष स्वामीची आज्ञा न घेता आलो हे गंनर लेकरापासून पडले खरे त्यास स्वामीची व सरकारची किफायेतेची चाकरी करावी तेव्हा स्वामीचे चरण द्रिष्टीस पडावे त्याग पुण्यात राहिल्याने न घडे राबन इसरे पाट दाखविली निकडे निघोन आलो त्यास या प्रांती येऊन पाच वर्षे सरकारचाकरी व स्वामीची चाकरी केली आहे, त्यात सरकार किफायेत व स्वामीचा किफायेत केली आहे त्यातील अर्थ स्वामीनी लेकरावर मेहरबानगी करून समजून घेतल्यावर ध्यानास येतील पर्णेवाले रावराजे धोकलसिंग यास समजाऊन जावसाल ठराविले नंतर राजेगजकुर याणी स्वामीचे चरणाजवळ मजला पाठविले आहे त्यातील जावसाल रा पाटीलबावाकडून रा खंडेराव हरी बुंदेलखंडात आले आणि मामल्याचा ठराव जाहाला आहे त्यात हुकमानी न होता मध्ये याकडे जावसाल राजीयाचे पडले आहेत ते पुढे करून दिल्यानंतर सरकार नजराणा व स्वामीचे अंतस्ताचे बोलणे राजयाजवल ठराऊन घेतले आहे त्याचा विस्तार पत्री काये लिहु ? स्वरु आज्ञा जाहाल्यास अर्ज करीन रावराजे याची पत्रे पत्रिते स्वामीस व सरकारात आहेत ती मजजवले आहेत श्रीमंतास हती वगैरे सरजाम राउपाकडून व राजे याचा भला माणोस चिमण हुजुरी म्हणोन सरजामाबरोबर आहे तो महेश्वरचे वाटेने विदा केला आहे मी श्रीगंगासागरचे यात्रेनिमित्य श्रीकासीहून नावेत बसोन गेलो यात्रा करून हाली मुक्काम मजकुर आलो पदरा रोजा स्वामीचे चरणाजवल येऊन हाजर होतो मी स्वामीचे लेकरू आहे गर्जीस येईल ते करावे परंतु या प्रांती येऊन चाकरी केली आहे, ही स्वामीनी समजून ध्यानी रील्यावाले राजे याजकडीलही जावसाल आहे त्यांत सरकार किफायत आहे, समजून घेतल्यास ध्यानास येईल लेकराने विस्तार काये लिहावा ? सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना

छ म ८८
फा म १५
प क्र. ६

२५०

२

(त्रुटित) त्याचा जो उमदगीचा मार्ग आहे तो समक्षतेने व परस्परा सर्व स्वामीचे ध्यानारूढ जाला आहे आनी रायाचा व त्याचा कैसा प्रकार हेही स्वामी जाणतच आहेत च्यार वर्षे सतत मुले मानसे सोडून येकनिष्ट सेवा केली स्वामीची देखील किती माडलेत व याचे येथील नाना प्रकारचे व्यस्त प्रकार ते सर्व येकीकडे ठेऊन यया सुधी चांगले करून दाखविले परंतु उतम केले येसी कांही वार्ता निघाली नाही. यातील मर्म ईश्वरास ठाऊक आहे किंवा स्वामी जाणतात त्याचे गेल्याची खती अंत करणपूर्वक रा सेनासाहेब सुभा याजला आहे व अभिमानही रायाचा त्याचेच जातीस होता यास कारण मिळोन पाय

सांप्रतही आमचा अभिमान तेथेच कांही आहे. सर्वात्मना पाय तारक असेत. श्रीमंत रा सेनासाहेबसुभा याचे नावे खागीने पत्र यावे कीं, बलवंतराव याचे ठाई फार करून आपले लक्ष होते. भगवंतसंकल्पे करूण ऐसा प्रकार जाला, यास निरोपाय असे. त्याचे वंधु उभयता व सेवकाचे नाव घालोन आज्ञा व्हावी की, बलवंतराव याचे सेवेवर व अभिमानावर लक्ष देऊन परामर्श करतीलच व केला पाहिजे हे आपणास योग्य असे. ऐसे पत्र आल्यास बहुत गोडीस पडे. त्याचा लखोटा व सेवका पत्राचे उतर रा दताजी नाईक याचे पत्रांत घालोन आज्ञा जाली पाहिजे. रांवटेकडूण विस्तार लिा, क्षमा करून परामर्श केला पाहिजे हे विज्ञापना.

16 याद्या

र. नं. ८८
फा. नं. १६
प. क्र. १

२५१

१७५?

श्रीपांडुरंग

यादी अजगास राजश्री मुधोजी भोसले सेनाधुरंधर याजकडे राजश्री गोविंद बलाल खांडेकर याचे रुपये ८०००० शके १६७८ धाता नाम संवछरे बा

खते

५०००० किता
३०००० किता
८००००

७७२० शके ७९ ईश्वरनाम संवछरे बा खते

४००० किता
३७२० किता
७७२०

४६००० शके १६८० बा खते

३०००० किता
१६००० किता मुा चेंद्रपूर
४६०००

२०००० शके १६८१ बा खत

१५३७२०

येक लक्ष त्रेपन हजार सातसेवीस रुो पो वसुल पा यण सीरपूर प्रांत चद्रपूर येथील मामलत पो रुो ४१००० येकेचाळीस हजार बाकी रुो

११२७२०

येक लक्ष बारा हजार सातसेवीस रुो

रु. नं ८८
फा. न १६
प क्र. ४

२५२

५ सप्टेंबर १७८५

श्री

नक्ल या असल

यादी कर्नाटकची मसलत फतेअलीखान याजवरी करावयाची सरकार व नबाब निजामअलीखान बहादर मिळोन ठहरली आहे येविशी राजश्री रघोजी भोसले सेनासाहेब-सुभा व राजश्री मुधोजी भोसले सेनाधुरधर याची कलमे करार करोन घेण्याची सुाा सीत समानीन मया व अलफ

दहा हजार फौज चाकरीस येईल, त्यापैकी सेनासाहेबसुभा याजकडील फौज खेरीज करून बाकी पाच हजार फौज राहिली त्यास फौज लस्करात दाखल जाल्या वरी पोटास दरमहा रुो साठ हजार द्यावे

कलम १

येणे प्रो करार करावे

नबाबाचा व आमचा पेशजी वराडात अलचपूरचे मुकामी परस्परे तह जाला आहे त्याप्रमाणे चालावे त्यात लढे राहिले आहेत ते नबाबास आपण सांगून तहाप्रमाणे चाल त्याची राहे याप्रमाणे करून द्यावे

कलम १

येणे प्रो करार करावे

छ ३० माहे सवाल सन सीत समानीन भाद्रपद सुाा पुर्णे

रु न ८८
फा नं १६
प क्र ५

२५३

५ सप्टेंबर १७८५

श्री

यादी कर्नाटकची मसलत फतेअलीखान याजवर कराव्ययाची सरकार व नबाब निजामअलीखान बहादर मिळोन ठरली आहे येविसी राजश्री रघोजी भोसले सेना-साहेबसुभा व राजश्री मुधोजी मोसले सेनाधुरधर याजकडील कराराची कलमे सुाा सीत समानीन मया व अलफ

दाहा हजार फौजेनिसी मसलतीस यावे. मनः पूर्वक मसलत तमाम होय तोपर्यंत राहून मसलत सेवटास न्यावी. सरकार-लक्षासिवाय कोणी गोष्ट घड्डू नये. येणे प्रों करार.

संस्थान गढेमंडले बंगाल्याचे मसलतसंबंधे राजश्री खंडोजी भोसले सेनाबहादर याजकडे फौजेच सरंजामास करार करून दिल्हा होता. ती मसलत सेवटास गेली नाही. तो मजकूर राहिला. हली फौजेचे सरंजामास सेनाबाहा-दर याजकडे करार करून द्यावा. सेवा येकनिष्टेने करू. येणे प्रा करार.

छ ३० सव्वाल सन सीत समानीन भाद्रपद

रु. नं. ८८
फा. नं. १६
प. क्र. ८

२५४

५ सप्टेंबर १७८५

श्री

यादी संस्थान गढेमंडलें सुा सीत समानीन मया व अलफ. संस्थान मजकूरपैकी रेवा दक्षिणतीरचे माहाल राजश्री रघोजी भोसले सेनासाहेबसुभा यांजकडे द्यावयाचा करार जाला आहे. ते खेरीज करून उतरतीर संस्थान मजकूर अलिकडे सरकारांत घेतलें आहे. ते राजश्री खंडोजी भोसले सेनाबाहादर याजकडे फौजेचे सरंजामास सालमजकुरापासून करार करून दिल्हे असे. येविसी कलमें.

उतरतीर संस्थान मजकूर आलीकडे सरकारात आले आहे ते माहाल व किले व ठाणी मशारनिले यांजकडे देविली असेत तर मशा-रनिलेकडील आमील येतील त्यांचे हवाली करून पावलियाचे कबज घेणे. साल मज-कूरचा वसूल तुम्ही घेतला असेल तो जमी-दाराचे गुजरतीने रुजु करून देऊन यादी हुजूर पाठविणे म्हणून बालाजी गोविंद यास सनद १

जमीदार संस्थान मजकूर यांस कीं आलीकडे संस्थान मजकूर सरकारात आले आहेत. फौजेचे सरंजामास दिल्हे असे. रुजू होऊन अमल सुरलीत देणे म्हणून.

दोन सनदा देवाव्या. खाशांनी फौजसुधा चाकरीस यावे. वरकड सरदाराप्रमाणे फौजेची गणती द्यावी. येणेप्रमाणे करार करावे. मंडल्याखेरीज दुसऱ्याचे माहाल बुंदेल्यानी घेतले असल्यास ते सरकारात राहील. येणे-प्रमाणे करार करावे.

संस्थान मजकूर तुमचे हवाली जाल्यावर तेथील कमाल जमा असेल ती मनास आणून फौजेचा करार करून देऊ. याप्रमाणे फौज चांगली बालगावी. येकनिष्टपणें दुसरे लक्ष न धरिता चाकरी करावी. येणेप्रमाणे करार करावे.

संस्थान मजकूर उतरतीर दक्षणतीर यांत जागीदार व पाटील कुलकर्णी वगैरे हकदार याजकडे हक्क दक्क, मानपान गाव, इनाम जमिनी व ब्राम्हणास वगैरे इनाम गाव व धर्मादाय पेशजीपासून चालत आले आहेत व सरकारांत अमल आल्यावर दिल्ले असतील ते चालवावे बोभाट येऊ नये येणेप्रमाणे करार करावें सदरहूप्रमाणे मालुमात व कल्मे लिहून खडोजी भोसले सेनाबहादर यांचे नावें सनद देयावी

पडले घोडे व दारुगोळी सरकारातुन देऊ नये येणेप्रमाणे करार करावे

छ ३० रमजान सीत समानीन

माफ्रपद सनदा लिहिणे

रु. नं ८८

फा नं १६

प क्र. ७

२५५ १७८५

श्री

यादी राजश्री खडोजी भोसले सेनाबाहादर याजकडे संस्थान गढेमंडले रेवा उतरतीर, सरकारात आलीकडे घेतले ते, फौजेचे सरजामास सालमजकुरापासून करार करून दिल्हे सबब सरकारचे तल्याचे कामास येकसाला सुा सीत समानीन मया व अल्फ

२००००० रुा

यासी मुदती

८०००० साल मजकूर सन सीत समानीन अखेरसाली

८०००० सन सबा समानीन अखेरसाली

४०००० सन समान समानीन अखेरसाली

२०,००००

दोन लाख रुा सदरहू सालबंदी प्रो पुण्यात पावते करावे येविसी राजश्री मुधोजी भोसले सेनाधुरंधर याची चिटी सरकारांत लिहून घ्यावी येणे प्रो करार करावे

रु. नं ८८

फा नं १६

प क्र. ९

२५६ १७९१

श्री

सुा इसने तिसैन मया व अलफ

यादी हती उतम

१ नगीना मकणा पोरला उमर वर्षे ३० उंच हात ६॥ निशोल

१ सुदरगज दताल उमर वर्षे ३० उच हात ६ निशोल

१ मनोहरगज दंताल उमर २५ उंच हात ६॥ वावत राजारामपंत सुभा कटक

१ हीरागज गजवाला दताल उमर ४० उच हात ६॥

४

रु. नं ८८
फा. नं. १६
रु. नं. ३

२५७

१२ एप्रिल १७९५

श्री

यादी नजर माजम फौज विठलपंत निा भोराले याजकडील सुा खमस तिसैन मया व अलफ छ २१ माहे रजमान विा अंताजी नानाजी

बलवंतराव शंकर
३०० स्वार
१ हती
२० उंट
३२१

संताजी सेलके
३०० स्वार
२५ उंट
३२५

सखाराम बापू
१८०० स्वार
१०० उंट
१ हती
१९०१

माधवराव रामचंद्र
१००० स्वार
४० उट
३ हती
१०४३

वागमारे मंडळी सिलेदार
५०० स्वार
३० उट
१ हती
५३१

नाना घाटगे
१९०० स्वार
११५ उंट
१ हती
२०१६

...
(फाटले आहे)

४००...
३०...
३
४३३

चिंतामण लिंबाजी
९०० स्वार
१ हती
५० उट
९५१

महमदखान सावतखान पठाण
१३०० स्वार
५० उंट
४ हती
१३५४

गणेशपत
५०० स्वार
२५ उंट
५२५
गणपतराव
२०० स्वार
१० उंट
२१०
आळवले मंडळी
२००० स्वार
१०० उंट
१ हत्ती
२१०१
महमदखान मोतदार गाडदी
आा स्वा १०००
ताा
५०० अरबी व सिंदी
५०० कवाइती पलटण
१०००
विरकोल सिलेदार मंडली
२०००

निराळकर मंडली
१०० स्वार
१० उंट
११०
गायके मंडली
१०० स्वार
५ उंट
१०५
भोसले मंडळी
२०० स्वार
१२ उंट
२१२
खाा विठलपत
२५० वा
१००

(फाटले आहे)

५९८

१७०१४
ताा
१४००० स्वार
५००० उत्तम
६००० मध्येम
३००० तटे वगैर कनिष्ट
१४०००

२००० गाडदी
७४७ उंट
२७ हती
४० बानाचे उंट
२०० कारकून व शाग्रीतपेशा

१७०१४

17 श्रीराम सदाशिव यांचीं पत्रें

रु. नं. ८८
फा. नं. १३
प. क्र. ४

२५८

९ आक्टोबर १७८७

श्री

शेवेसी श्रीराम सदाशिव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २६ जिल्हेज मंगलवार मुाा नागपूर येथास्थीत असो विशेष. राजश्री मुधोजी भोसले याजकडील दिनचर्या. राजश्री खंडोजी भोसले लस्करातून आले व येथे आल्यावर समाधानही नवते. साां त्याचे श्वशुर राजश्री बाबूराव पालकर याचे घरी छ १२ रोज मंगलवारी मेजवानी जाली. खाशे मंडलीस लहाणथोरास सर्वांस वस्त्रे दिल्ही. छ १७ रोज मंदवारी भाद्रपद वद्य ४ स रघोजी भोसले याचा पक्ष जाला. मानकरी मंडळी वगैरे सर्वांस भोजनास बोलाविले होते. पक्ष व कपिलाषष्टी करावयास येथून बारा कोस श्रीरामतीर्थ आहे तेथे जाऊन शष्टी वगैर करावी असा निश्चय जाला होता. परंतु मधे नदी मातबर तेथे उतारास नावा वगैर नाहीत, आणि शष्टीही जवल आली, याजकरिता जाणे राहिले. येथेच होम केला व ब्रह्मांडदान दिल्हे. दाहा गाईची पूजा करून दाहा गाईस रुपयाचे खुर व सोण्याच्या शबया, दाहा पुतल्या सिंगी बाधल्या. व दहा पात्रे तांब्याची केली व दाहा खाडावा लाकडी, दाहा सोवली व मुगटे, दाहा शालेचे फर्दे, दाहा गवाली, दाहा पल्यापंचपात्रे तांब्याची, दाहा चंबू तांब्याची, हे दाहा ब्राह्मणास दिल्ही व दाहा मोहरा दिल्ह्या. आणखी पंधरा ब्राह्मणास पंधरा सोवली व पंचपात्रपल्या तांब्याची चंबु पंधरा दिल्हे. विसा ब्राह्मणास वीस कुडक्याचे जोड दिल्हे व पंचवीस मोहरा पंचवीस ब्राह्मणास दिल्ह्या. होमाचे पूजेस मोहरा शंभर सवासे व लोट्या तांब्याच्या शंभर अजमासे व पुतळी शंभर व चौरी रुपयाचे दांडीची व ताब्याचा पाट येक दिल्हा व दोन बैल व आणखी शंभर दिडसे गाई दिल्ह्या. राजश्री खंडोजी भोसले याणी दाहा गाई दाहा मोहरा येक

बैल दिल्हा राजश्री रघोजी भोसले याणी पंचवीस गाई दिल्हा व वेंकोजी भोसले याणी पाच गाइ दिल्हा आणखी पाच सातशे ब्राम्हण होते त्यास कोणास येक रु॥, कोणास अर्धा, कोणास पावला यामाणे दिल्हे येकंदर शाठीस अजमासे साडेचारपाचहजार पर्यंत लागले असतील छ १८ रोज बुधवारी श्रीभागीर्थीचे पाण्याच्या कुप्या येथे आहेत त्या पो दाहा बारा आणून खाशाही पाहून गुरुदी वगैर याचे घरी पाठवून दिल्हा छ २० रोजी येथून पत्रें राजश्री नाना व तात्या यास लिहून येक जोडी रा केली दसऱ्याबरोबर वरी येक दो दिवसा सांडणीस्वाराबरोबर रवाने होणार व याजकडील कारकून हैदराबादेस आहेत त्यास पत्रे लिहून जोडी रा केली छ २२ रोजी खाशाचे शरीरास स्वस्त नवते ज्वर आला होता व जुलाब घेतला होता आता स्वस्त आहेत छ २३ रोजी सलाबतखान वराडचे सुभे याजकडून पत्रें तीन थैल्या आल्या व राजश्री रघोजी भोसले व खंडोजी भोसले व वेंकोजी भोसले यांनी स्वारी बागात गेली होती तेथे मातीचे घागरीस फटाके घालून दोन घागरी सोडून सायंकाळी आपण सोनाजी मोहिते जावाई यासुधा वाड्यात आले राजश्री वेंकोजी भोसले यास अमदानगरचे किल्लेदार त्याजकडून पत्रें घेऊन दोन आसामी आले ते तेथे वाड्यात रहुन दिवस आहेत कागदीचे कैद वगैर न्यावयास आले म्हणून सांगतात राजश्री रघोजी भोसले हे दुसरे लग्न मार्गसीर्शमासी करणार. सिरके यासी शरीरसमंध पाहून ठेवला आहे राजश्री खंडोजी भोसले यास मूल होत नाही त्याणी दुसरें लग्न करावे ते करीत नाहीत व रघोजी भोसले याचे चिरंजीव परसोजी भोसले याचे लग्न करावे, मातवरासी शरीरसमंध करावा, लग्नास राजश्री नाना यास अथवा राजश्री तात्यास आणावे, मातबर समारंभ करावा, असी मर्जी आहे श्रीमंतास आणावे असी आमची शक्ती नाही, म्हणून येखादे बेल बोलतात गुजाजी गुजर, यांचे नातू, लेकीचे पुत्र, याचे लि॥ नीयर्तेज त्याचे लग्न येथें मार्गसीर्ष मासी होणार. अपाजी माहाडीक यासी शरीरसंमधाचा निश्चय, जाला आहे छ २४ रोज रविवारी राजश्री रघोजी भोसले याची स्वारी माहादजी नाईक सावकार याचे घरास गेली होती कर्ज मागावयास जातात म्हणून ऐकिले लोकांचा देण्याविशइ दगा नित्य रा भवानी काळो दिवाण याचे घरी होतो, पैसा कोणास मिळत नाही यमाणे आहे छ २५ रोजी प्रात काळी रा रघोजी भोसले याणी बाहेर बसून कोमटे आणली बुजविले तिसरा प्रहरी का॥ पोवनी येथून तीन बैल कापडाचे भरून आले खाशे खासे मिळजार जामदारखान्यात बसून कापड दसऱ्याबदल वा पोशाख वगैर शाल-जोड्या पाहात असतात राजश्री माहादजी सिंदे हे हली दहा पंधरा हजार फौजेनसी जाऊन सडे डिगेवर आहेत मशारनिल्हेकडील काही पागा माळवे प्राती ठाण्याही होत्या, त्याही जाऊन मिळाल्या व काही पागा आहिल्याबाइ होळकर याजकडून गेल्या जैपूरवाले याची

फौज वीस हजार आहे. त्याचा शेह यास आहेच. हे सडे जरारी मयदानात आहेत म्हणून वर्तमान येथे आहे. येथील वकील रा माहदजी सिंदे याजकडे असते तरी त्याची पत्रे मुजरत यास येती व येथीलही पत्रे जाती तर तिकडील वर्तमान खरे कचेपके लौकर लौकर कलते. वकील तेथे नाहीत. वकील तिकडून आल्यास बहुत दिवस जाले. वकील मागती पाठवावे असी मर्जी आहे. परंतु त्यास खर्चाची उस्तवारी होणे कठीण, येथे बाजारी वर्तमान सावकारात येते तेच येथेही कलते. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

रु. नं. ८८
फा. नं. १३
प. क्र. ६

२५१

२६ ऑक्टोबर १७८७

श्री

शेवेसी श्रीराम सदाशिव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ १४ मोहरम भृगुवार मुा नागपूर येथास्थीत असो विशेष. राजश्री मुधोजी भोसले याजकडील दिनच्यर्या. छ २८ जिल्हेज बुधवारी प्रातःकाली रा खंडोजी भोसले व वेंकोजी भोसले उभयता रा सोमाजी मोहिते याचे घरी भोजनास गेले होते. तिसरा प्रहरी राजश्री मुधोजी भो व खंडोजी भोसले बाहेरील चौकात बसून चालीस पनास फटाके येकदाच पेटऊन त्याजवर हाती घालून च्यार घडी तमाशा पाहिला. त्याजवर साइंकाली निर्मळेकडील अमुरशा फकीर दरवर्षास येत असतो, हाली आला आहे, त्याजकडे जुने किल्यात खासे मंडळी गेले होते. दोन घटका बसून वाड्यात आले. छ २८ रोज गुरुवार च्यार घडी दिवस राहाता राजश्री रघोजी भो व खंडोजी भो व वेंकोजी भो व याची मातुश्री चिमाबाई व गजराबाई रघोजी भो याची स्त्री व गंगाबाई खंडोजी भोसले याची स्त्री यांची स्वारी बागात गेली होती. तेथे दोन घडी सहल करून साइंकाली वाड्यात आले. छ २९ रोज भृगुवार प्रातःकाली दसऱ्या बाा वस्त्रे राजश्री बिंबाजी भोसले याजकडे छत्तीसगडास रवाना केली व मौजे देऊर नजीक जेजुरी येथे श्री देवीस वस्त्र रा केली. राजश्री खंडोजी भोसले व वेकोजी भोसले व जैराम गणेश, मौजे सोणेगाव तीन कोस आहे, तेथील बागात भोजनास गेले होते. भोजन करून च्यार घडी हरणाचे सिकारीस गेले. परंतु सिकार हाती लागली नाही. पाळीव कालवीट जवल होता त्याचे सिंगास फासे बांधून जंगलातील हरणात सोडला की त्यासी यासी टकर जाल्याणे त्याचे सिंगात फासे गुंतून हाती लागेल. टकर जाली परंतु फासे अडकून जंगलचे हरण हाती लागले नाही. साइंकाली वाड्यात आले. तिसरा प्रहरी खासे बाहेरील चौकात येऊन बसले. दसऱ्याकरिता नवा सरंजाम कलाबतु आंबारी व हतीची झूल वगैर होत आहे. तेथे हाती आणून झूल घालून पाहिली व आंबारीचे पडदे वगैर लाऊन पाहिले. तेथून साइंकाली राजश्री सोमाजी मोहिते जावाई याचे घरी स्वारी गेली होती. तेथे झिंगा-

बाई लेकीस साडी व चोळी देऊन वाड्यात आले छ १ मोहरम तिसरा प्रहरी राजश्री वेंकोजी भोसले मौजे कोराडी तीन कोस आहे तेथे गुरूकडे गेले होते छ ३ रोजी प्रात-काली चिटणीस फडणीस मुछ्दी वगैर सर्वांचे घरास दसऱ्याचे पोशाग पाठऊन दिल्हे छ ५ रोज बुधवार कमालअली पठाण सिलेदार बाहेर चाकरीस होता तो आला रा मुधोजी भो यास पाच रुा व रघोजी भो यास च्यार रुा भेट ठेवली छ ६ रोज गुरुवार पहिले प्रहर रात्रीस खासे मंडळी जुने किल्यांत डोले पाहावयास गेले तेथून गुलाबअली व सेख फरास याचा डोला पाहून वाड्यात आले. छ ७ रोज भृगुवार प्रात काली राजश्री भवानी नागनाथ मुनसी व भवानी काळो दिवाण हे येऊन मधील चौकात च्यार घडी खल्बत जाले तिसरा प्रहरी कलावतूची अंबारी पाहून बाहेरील चौकात बसले तेथे पटाक्यावर हाती घालून दोन घडी तमाशा पाहिला साइकअली विल्दखा व गाहवतणी वराडचे सुभे येथे कजिया बा आहेत ते आले होते सलाम करून गेले त्याजवर हैदराबादेहून बगाजीपंत कारकून याजकडून दिनच्पर्यंची पत्रें आली ती वाचली राजश्री माहादजी सिंदे याजकडील पेशजीचे वर्तमान व टिपूकडे रामचंद्रपत गेले होते ते आले आणखी तेथील दिनच्पर्यंचे वर्तमान लिा होते छ ८ रोज मदवारी घोडी व हाती व जरीपटका याची पूजा केली तिसरा प्रहरी पुण्याकडील वस्त्रे आली ती उदईक घेऊ म्हणून मल्हारजी मोरपे यास सांगितले छ ९ रोज रविवार प्रात काली मल्हारजी मोरपे हे वस्त्रे घेऊन आले तेव्हां सर्वास बोलाऊन ज्याची त्यास वस्त्रे दिल्ही व आपणही घेतली तेथे वराडप्रांती भाम वगैर येक दोन परगणे याचे सुभे विल्दखान आहेत याजवर दुसरी सनद घेऊन हैदराबादेहून कर्नुलकर पठाण इभ्रामखान आले आहेत त्यास विल्दखा ठाणी देत नाहीत याजकरिता उभयताचा कजिया आहे विलदखा येथेच आहे व इभ्रामखा याजकडून भामेहून कारकून पारसी पत्रें घेऊन आला ती घेतली सिल्गनास स्वारी जावयास तयार जाली तेव्हां वासीमाहून हासमतजग याजकडून पत्रें आली ती घेतली सिलगनाहून आल्यावर दरवाज्यात येक टोणगा मारविला त्याजवर वाड्यात जाऊन देवदर्शण करून दिवाणखान्यात बसले तेथे सर्वांचा सलाम मुजरा होऊन मुछ्दी वगैर सर्वांणी नजरा कोण्ही येक मोहर, कोणी दोन मोहरा, कोणी पाच रुा, दाहा रुा याप्रो नजरा जाल्या छ १० रोज इंदुवार राजश्री खंडोजी भोसले यास मेजवान्या घरच्या राजश्री मुधोजी भोसले व रघोजी भोसले व वेंकोजी भोसले याच्या तीन मेजवान्या होणार, याजकरिता बागात जागा पहावयास खासे मंडली रा खंडोजी भोसले याचे बागात गेले होते तेथे जागा पाहिली जागा डेरे वगैर घालावयास नीट करविली मुछ्दी याच्याही मेजवान्या होणार आहेत तिसरा प्रहरी डोले

पाहावयास खासे मंडली गेले होते. साइकाली झिंगावाई लेकीस रुतु प्राप्त जाला. छ ११ रोज मंगलवार तिसरा प्रहरी सकरदरा बाग आहे, तेथे खासे मंडळी याची स्वारी गेली होती. तेथे नव्या तोफा वतावयाचा कारखाना चालला आहे. दाहावारा तोफा च्यार पाचसे गोल्याच्या तयार जाल्या आहेत. तेथे दोन तोफेचे पाच पाच वार केले व सफेद डेरा बारदारी मोगलाई तऱ्हा राजश्री रघोजी भोसले याणी करविला आहे तो पाहावयास उभा करविला, तो पाहून वाड्यात आले. छ १२ रोज बुधवार प्रातःकाली राजश्री रघोजी भोसले व खंडोजी भोसले याची स्वारी देवाजीपंत याचे घरी लळीत जाले तेथे गेले. तेथुन रघोजी भोसले वाड्यात आले व खंडोजी भोसले आपले वागात जाऊन निलयाचा हुरडा खाऊन वाड्यात आले. तिसरा प्रहरी राजश्री वेंकोजी भोसले याची स्वारी वागात गेली होती तेथे वाजरीचे कणसे दोनच्यार आणऊन खाऊन साइकाली वाड्यात आले. साइकाली सैद हासनखा पठाण हिंदुस्थानचा वेरोजगारी मातवर आहे तो खाशास येऊन भेटला. छ १३ रोज गुरुवार प्रातःकाली सिकारीस जावयास स्वारी तयार करविली आणि वाघाचे बातमीस पुढे लोक व साडणीस्वार पाठविले. वातमी तिसरा प्रहर पावेतो आली नाही याजकरिता स्वारी राहिली. साइकाली नजरवागात रा। रघोजी भोसले व खंडोजी भोसले व वेंकोजी भोसले वसले होते तेथे वुराणराज याचा पुत्र वडेखा आले. तेथे च्यार कोमडी आणून जुजविली. त्याजवर वाड्यात उठोन गेले. मंडल्याविशी राजश्री मुधोजी भोसले याची मर्जी बहुतच दिक आहे. राजश्री माहादजी सिंदे डिगेपासून सात कोसावर आहेत. कांही नवल विशेष वर्तमान नाही. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. कलकत्याहून इंग्रेज प्रयागास आला होता तो कानपुरास गेला. पागा ठाण्याही चारणीस होत्या, त्याजवलील पाच सात पागा दसऱ्याचे दिवसी आल्या होत्या. त्याजसुध्धा आजमासे फौज आडीच तीन हजार दसऱ्याचे दिवसी होती. मागती पागा जेथील तेथे चारणीस गेल्या हे विज्ञापना.

रु. नं. ८८
फा. नं. १३
प. क्र. ५

२६०

१४ नोव्हेंबर १७८७

श्री

छ २३ सफर
कार्तिक

शेवेसी श्रीराम सदाशिव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ २ सफर इंदुवार मु॥ नागपूर येथास्थीत असो विशेष. राजश्री मुधोजी भोसले याजकडील दिनचर्या. छ १९ मोहरम बुधवारी झिंगावाईचे फलशोभन येथे वाड्यातच जाले. मानकरी वगैर सर्वास भोजनास बोलाविले होते. त्याणी सोमाजी मोहिते यास अहेर केले. छ २० रोज

राजश्री माहादजी बलाल फडणीस याचे घरी मेजवानी जाली गाशाम सर्वास वस्त्रे व घोडी रास येक दिल्ही छ २१ रोज राजश्री मुधोजी भोसले यास मेजवान्या करावयास राजश्री रघोजी भोसले व खंडोजी भोसले व वेंकोजी भोसले याणी आपले आपले बागात जागा केली डेरे राहुट्या चांदण्या वगैरे दिल्या आहेत तेथे साईंकाली रा खंडोजी भोसले याचे बागात गेले होते जागा पाहून वाड्यात आले. छ २२ रोजी राजश्री खंडोजी भोसले याची मेजवानी जाली मानकरी वगैरे सर्वास भोजनास बोलावले होते. राजश्री मुधोजी भोसले व रघोजी भोसले व वेंकोजी भोसले यास वस्त्रे दिल्ही तिसरा प्रहरी कल्यांताचा नाच होऊन साईंकाली वाड्यात आले छ २३ रोज राजश्री वेंकोजी भोसले याणी आपले बागात मेजवानी केली मानकरी वगैर भोजनास आले होते तिसरा प्रहरी कल्यांताचा नाच जाला साईंकाली वाड्यात आले छ २४ रोज साइंकाली राजश्री मुधोजी भोसले व परसोजी भोसले याची स्वारी विठोबास गेली होती व राजश्री रघोजी भोसले व खंडोजी भोसले याची स्वारी श्रीजागेश्वरास गेली होती छ २५ रोजी राजश्री रघोजी भोसले याचे बागात साइंकाली सर्व खासे मदती गेले होते जागा तयार होती ती पाहिली व नव्या तोफेचा कारखाना चालला आहे तेथे तोफा पाहिल्या व राजश्री खंडोजी भोसले याणी आपण जातीने येक बकरे तरवारीने तोडले साइंकाली वाड्यात आले छ २६ रोज राजश्री रघोजी भोसले याचे बागात मेजवानी जाली तेथे कबिलेसुधा गेले होते. मानकरी व बाबुराव पाल्कर व मानाजी मोहिते भोजनास आले होते राजश्री मुधोजी भोसले व खंडोजी भोसले व वेंकोजी भोसले यास वस्त्रे दिल्ही तिसरा प्रहरी कल्यांताचा नाच साइंकाली पावेतों जाला साइंकाली बाण दारूखाना व फटाके व नले तेथे बागात सोडून दोन घडी रात्री वाड्यात आले छ २७ रोज साइंकाली बाहेरील चौकात बसून कल्लावयावर हाती घालून दोन घडी तमाशा पाहिला त्याजवर वरकड लोक उठवून दिल्हे आणि च्यार घडी खलबत केले भवानी नागनाथ मुनसी व खंडोजी भोसले खलबत वगैर पासी जाले छ २८ रोज प्रात काली विठ्ठलपंत वराडचे सुभे याजकडून पत्रें आले की मालव्याकडून पेंढारी येदड धुम करीत गाव लुटीत येतात परगणे जैनाबाद येथील पेठ लुटली व कमावीसदार मारला का। मलकापूर येथील दाहा पाच माणसे धरून नेली बहुत प्रळये मांडला आहे पेंढारी याचा मु॥ येदलाबाद व बोदवड नजीक बराणपूर येथील मयदानात आहे विठ्ठलपंत सुभेदार हे उमरावतीस आहेत याजवल जमयत थोडी याजकरिता कांही कुमक पाठवावी म्हणून लिहिले आहे त्यास येथून येक तोफ व बाणाची कैची येक व सात आठसे फौज येका दोन दिवसी लौकरच जाणार पेंढारी (याचे बदलचे) पत्र आले म्हणून कोणीकडे जातात किंवा दोन दिवस पोट भरावयास

निघाले आहेत हे कलत नाही. कुमक लवकरच जाईल असे आहे. साइकाली बाहेरील चौकात राजश्री मुधोजी भोसले बसले होते तेथे रा। खंडोजी भोसले याणी दोन घडी घोडे फेरले. त्याजवर राजश्री वेंकोजी भोसले यासी वोथाव्या उभयतात येक घडी पर्येत खेलत होते. छ २९ रोज राजश्री रघोजी भोसले व खंडोजी भोसले व वेंकोजी भोसले व राजश्री बाबुराव पालकर याचे घरी दोन प्रहर भोजनास गेले होते. तेथे यास वस्त्रें दिल्ही. साइकाली रा। मानाजी मोहिते रा। रघोजी भोसले याचे श्वशुर याचे घरास भोजनास गेले होते तेथे वस्त्रें दिल्ही. राजश्री मुधोजी भोसले वाड्याजवलील ह्याणमंताचे दर्शनास गेले होते. तेथे (पाच येक फटाके) व चंद्रजोती आणून लाविल्या. त्याजवर साइकाली स्वारी माहादाजी नाइक सावकार याचे घरास गेली होती. छ ३० रोज रा। केदारजी मोहिते खाशाचे श्वशुर याचे घरास भोजनास येकटे खासे गेले व रघोजी भो व खंडोजी भोसले व वेंकोजी भोसले व परसोजी भो सोमाजी मोहिते याचे घरास भोजनास गेले होते. तिसरा प्रहरी खासे मंडली याची स्वारी मुछदी समागमे घेऊन तीनही कन्येचे घरास गेले. तेथे केले व पेढे याचा फराल करून रा। रघोजी भोसले व खंडोजी भोसले व वेंकोजी भो यास वस्त्रे दिल्ही. तेथे वोवालन्या मुछदी वगैर याणी कोणी मोहर कोणी दोन मोहरा, कोणी पाच रु॥ दहा रु॥ या प्रो घातल्या. दोन घडी रात्रीस वाड्यात आले. पुढे मुछदी याच्या मेजवान्या होणार आहेत. राजश्री माहादजी सिंदे डिगे नजीक पंचवीस हजार फौजनसी जमून आहेत. नवल विशेष वर्तमान नाही. भामेचे ठाणे विलंदखा याजकडे होते, ते छ ८ रोजी इभ्रामखा याणी हाला करून घेतले. विलंदखान येथेच आहेत. गायलगडकर किलेदार रामाजी केशव यास देवाज्ञा जाली. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

रु. नं. ८८
फा. नं. १३
प. क्र. ७

२६१

१० डिसेंबर १७८७

श्री

शेवेसी श्रीराम सदाशिव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ २९ सफर इंदुवार मु॥ नागपूर येथास्थीत असो विशेष. राजश्री मुधोजी भोसले याजकडील दिनच्यर्या. छ २ रोज मौजे करजुली तीन कोस आहे तेथे सिवाजी मोहिते याचे घरी मेजवानी जाली. छ ३ रोज बंगाल्याचे सुभे राजश्री राजाराम मुकुंद याचे घरी मेजवानी जाली. चिमाबाई व गजराबाई व गंगाबाई भोजनास सर्व खासे मंडळी गेले होते. राजश्री मुधोजी भोसले यास पाचसे मोहर व राजश्री रघोजी भोसले यास दोनसे मोहर व राजश्री खंडोजी भोसले व वेंकोजी भोसले या उभयतास दोनसे मोहर व चिमाबाई यास दोनसे मोहर याप्रो नजरा

कराव्या असा बेत मशारनिले याणी केला होता, परंतु हजार मोहर पेठेत मिळेना तेव्हां रा मुधोजी भोसले यास शंभर मोहर नजर केली व गोलाची फळी येक दिल्ही व आणखी नजरे बा पधरा हजाराचे तोडे वाड्यात पाठऊन दिल्हे व रार्जास वस्त्रे दिल्ही साईकाळी राजश्री खडोजी भोसले याची स्वारी माहादेवास गेली होती छ ४ रोज राजश्री रघोजी भोसले व खडोजी भोसले व वेंकोजी भोसले याची स्वारी मौजे फजरी गाजरी पाच कोस आहे तेथे दुरडा खावयास गेले होते तेथेच रात्री मुा करून राहिले छ ५ रोज प्रात काळी मस्त हाती सुटला होता, त्याणे येक माणुश मारले हाती आटोपेना, याजकरिता राजश्री मुधोजी भोसले याची स्वारी गेली होती हाती सुटून माणुश मारितात हे वर्तमान ऐकिले म्हणजे मर्जी बहुत खुश होत असती तिसरा प्रहरी बाहेरील चौफान बसून हाती व वाघाची लढाई लावली येक वाघ हातीने मारला दोन घडी रात्रीस राजश्री रघोजी भोसले व खडोजी भोसले याची स्वारी काल दुरडा खावयास गेले होते ते आले छ ६ रोज कन्येचे पुत्र गुण्याबा गुजर याचे लग्न मार्गसीर्श वद्यात आहे शरीरसबंध अपाजी माहाडीक यासी केला त्याचे घरास स्वारी प्रात काळी गेली होती तेथे मांडवाची वगैर जागा पाहून आले तिसरा प्रहरी पीलखान्यात स्वारी गेली होती तेथे मस्त हतीचा तमाशा ठाणावरूनच पाहिला छ ७ रोज प्रात काळी मुल्ही मडळी वगैर समागमे घेऊन तीन कोस मौजे सिवनगाव येथील बागात दुरडा खावयास स्वारी गेली तेथे दुरडा खाऊन खासे मंडळीचे भोजन तेथेच जाले त्याजवर राजश्री मुधोजी भोसले याणी च्यार घडी निद्रा केली राजश्री रघोजी भोसले व खडोजी भोसले व वेंकोजी भोसले याणी पारधी वगैर घेऊन सिकारीस गेले ते तिसरा प्रहरी येक हरण घेऊन आले तेथून दोन घडी रात्रीस स्वारी वाड्यात आली छ ८ रोज गाडेराव मस्त हाती सुटला होता त्याजकडे बाहेर स्वारी गेली होती हाती आटोपेना रानात जाऊ लागला तेव्हां फटाकून बागात आवटीभोजनास आले छ ९ रोज बागात आवलीभोजनास गेले होते भोजन करून रा खडोजी भोसले याणी बंदुखीने निशाण पाचसात हटली साईकाळी वाड्यात आले छ १० रोज तिसरा प्रहरी खासे मडळी याची स्वारी विठोबास गेली होती तेथून रा मुधोजी भो याची स्वारी उमाजी माहादेव सिलेखानी याचे घरी कथेस गेले, ते साइकाळी वाड्यात आले. छ ११ रोज तिसरा प्रहरी खासे मडळी सिताबरडीस गेले फिरगी चाकर आहेत त्याणी कागदाचा टोप जाहाजाप्रो केला होता त्यास काही इंग्रजी कल होती काही धुराचे बळाने टोप पाच सात हात वरता उडविला तेथे डोंगरावरून दुर्बीनातून भोवताले दाहापधरा कोसी पाहिले व श्रीरामचद्राचे देऊळ येथून बारा कोस आहे ते पाहिले तेथून स्वारी बागात गेली तेथे तोफा वगैर पाहून साइकाळी वाड्यात आले तुलसीचे लग्न लाऊन राजश्री मुधोजी भोसले याणी

जातीने पाच निशाण बदुखीने हटली त्यात दोन लागली, तीन चुकली. दोन प्रहरा रात्रीस स्वारी श्रीरामक्षेत्रास जावयास निघाली ते नगरधन म्हणून भोयकिला येथून आठ कोस आहे तेथे दोन घडी राहिले. माघून चिमाबाई गजराबाई व गंगाबाई यांची स्वारी आली. छ १२ रोज प्रातःकाली तेथून निघोन पहिले प्रहर दिवसास रामक्षेत्रास पावले. समागमे फौज अजमासे येक हजार पर्येत होती व तोफा लाहाण पाच होत्या. क्षेत्रवस्ती बहुत आहे. वाडे हवेल्या बहुत नाहीत, गोंडवणी वस्ती आहे. पाणी आड व विहीरी आहेत. बाहेर पाच सात तली पाण्याची आहेत. क्षेत्रापासून पूर्वेस जवलच डोंगरावर श्रीरामचंद्राचे देऊल आहे. तेथे देवाजवल पाण्याची बारव आहे. देवाचा हाती येक व घोडा येक व नगारखान्याची वगैर बारमाही नेमणूक आहे. देवाजवलील पुजा वगैर बडव्याचे कांही कजियामुले जप्त आहे. देवापासून पूर्वेस तीर्थ अर्धा कोस आहे. तेथे राहावयास भोसले याणी वाडा बांधला आहे. तेथे तीर्थाचे काठी वाड्यात राहिले होते. चिमाबाई वगैर यास तीर्थात स्नान करावयास घाटावर पाण्याचे आतून कनाथा व चांदण्या दिल्ह्या होत्या तेथे दोन गोदाण दिल्ही. आणीख वीस पंचवीस रुपये धर्म केला. साईकाली खासे मंडली देवास गेले होते. कार्तिक पौरणीमेस यात्रा वीस हजार पर्येत भरत असती. छ १३ रोज कर्नाटकप्रांती मध्वाचार्य स्वामी असतात हे श्रीकासीस गेले होते. तिकडून आल्यावर दोन महिणे तीर्थाचे काठी राहिले आहेत. त्याचे दर्शणास गेले होते. राजश्री मुधोजी भोसले व रघोजी भोसले व खंडोजी भोसले व वेंकोजी भोसले याणी चौघाही च्यार मोहरा स्वामीपुढे ठेविल्या. साइकाली स्वारी देवास गेली होती. छ १४ रोज प्रातःकाळी राजश्री मुधोजी भोसले व परसोजी भोसले उभयेता येकच पालखीत बसून देवास गेले व प्रहरदिवसा राजश्री रघोजी भोसले व खंडोजी भोसले व चिमाबाई याची स्वारी देवास गेली. साइकाली खासे मंडळी स्वामीचे दर्शणास गेले होते. छ १५ रोज राजश्री सदाशिव राम गुणे याचे भाचे रामाजी त्रिंबक बंधूचे लग्नास सागरास गेले त्यास निरोपसमई वस्त्रे दिल्ही. प्रहरदिवसा खासे मंडळी देवास गेले. तिसरा प्रहरी राजश्री मुधोजी भोसले व परसोजी भोसले उभयता खुले हातीवर बसून च्यार घडी यात्रेत वगैर सहल केले. छ १६ रोज मौजे पारसीवणी पाच कोस हा गाव बाळाबाई याचा आहे तेथे प्रातःकाळी स्वारी राजश्री रघोजी भोसले व खंडोजी भोसले व वेकोजी भोसले चिमाबाई व गजराबाई वगैर मंडळी भोजनास गेले होते. साइकाली यात्रेत आले. तिसरा प्रहरी गोलनदाज नवे चाकर ठेवावयास आणिले होते त्याजकडून तोफा लाऊन पंधरा वीस निशाण लाऊन पाहिली. छ १७ रोज प्रातःकाळी खासे मंडळी देवास गेले होते. साइकाली स्वामीचे दर्शणास गेले. छ १८ रोज तेथून कुच करून दोन कोस किले नगरधनास आले तेथे बाहेर राहुट्या वगैर देऊन राहिले. किला लहाण आहे. बारा पंधरा बुरूज आहेत. दर

मुरुजास येक गुंडगळ आहे व लग्गण तोफा एक दोन आहेत निसरा प्रहरी राजश्री रघोजी भोसले व खंडोजी भोसले वगैर सिकारीस गेले ते साइकाळी च्यार हरणे घेऊन आले छ १९ रोज प्रात काली राजश्री रघोजी भोसले व खंडोजी भोसले व वेंकोजी भोसले याणी चिते व पारधी घेऊन सिकारीस गेले ते दोन प्रहरा साहा हरणे आणली, व साइकाली तीन हरणे आली त्यापैकी येक फालहुयीट ठेविला व बाकी लोकास वगैर वाटून दिल्ही छ २० रोज प्रात काली राजश्री वेंकोजी भोसले सिकारीस गेले ते दोन प्रहरा तीन हरणे घेऊन आले छ २१ रोज कुच करून राजश्री खंडोजी भोसले व वेंकोजी भोसले व चिमाबाई वगैर याची स्वारी नागपुरास आली व राजश्री मुधोजी भोसले व रघोजी भोसले उभयता माळाबाईचे गावास पारसीवणीस गेले तेथे जाताना मधे लहान नदी मातबर आहे तेथे याजमधे उतरून उभयतानी दोनसे लोक वाटून घेतले आणि तोटे व फटाके दोन घडी खेलले दोन वेल राजश्री रघोजी भोसले याचा मोड जाला तेथून पारसीवणीस गेले तेथे वाळ्याबाई जेष्ठ कन्या याचे येथे भोजनास गेले छ २२ रोजी कुच करून साइकाली नागपुरास आले. छ २३ रोज प्रात काली बागात स्वारी गेली तेथे नव्या तोफा योतविल्या होत्या त्या पाहिल्या छ २४ रोज राजश्री मुधोजी भोसले याचे शरीरास स्वस्त नवते ताप आला होता छ २५ रोज साइकाली खासे मंडळी स्वारी सितावरडीस गेली तेथे कागदाचे जाहाज फिरंगियाणी केले होते त्यात धुर करून उडविले, ते दोन पुरुस उडाले तेथून राजश्री मुधोजी भोसले वाड्यात आले व राजश्री रघोजी भोसले व खंडोजी भोसले वगैर गुण्याबा गुजर याचे बागात हुरडा खायास गेले छ २६ रोज मौजे सबलखेडी येथील बागात हुरडा खावयास खासे मंडळी चिमाबाई वगैर गेले तेथे हुरडा खाऊन भोजने तेथेच केली छ २७ रोज मौजे तेलगखेडी येथील बागात हुरडा खावयास स्वारी गेली ते साइकाली आले. राजश्री माहादजी सिंदे किल्ले आल्वर येथ वीस हजार फौजनसी आहेत येक लढाइ जाली जैपूरवाले याचा मोड होऊन माघारे गेले त्याजकडील कोण्ही येक माणूस मातबर पडला म्हणून वर्तमान आहे कानपुरास इंग्रज होता तो कलकत्यास गेला निजामअलीखान याजकडून वकील टिपूकडे मागती कांही बोलावयास गेले आहेत पेंढारी याजकडे फौजे पाठवावयास नेमणूक जाली होती त्यास खर्ची द्यावयाचा गवगवा आठ च्यार दिवस जाला, तो पेंढारी निघोन खानदेशात गेले तेव्हां फौज जाणार होती ते राहिली त्याचे तोंडावर वराडचे सुभे आहेत राजश्री भवानी काळे याचे चिरंजीवास कांही समधाची बाधा आहे यास्तव चिरंजीवास घेऊन श्रीकासीयात्रेस जाणार आहेत राजश्री भवानी नागनाथ मुनसी हे सेवकाचा राग करितात यास स्वामीचे येक पत्र हातचें पाहिजे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

रु. नं. ८८
फा. नं. १३
प. क्र. २२

२६२

२५ डिसेंबर १७८७

श्री

पो छ ४ राखर

शेवेसी श्रीराम सदाशिव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. छ १४ रबिलावल बुधवार येथास्थीत असो विशेष. राजश्री मुधोजी भोसले याजकडील दिनचर्या. छ १ रोज राजश्री भवानी काळो याचे घरी मेजवानी जाली. साइकाली पहिला जुना वाडा शहरात आहे तेथे स्वारी गेली होती. वाडा पाहून सोमाजी मोहिते जावाई यास द्यावयास काम लावणे म्हणून आज्ञा केली. छ २ रोज साइकाली राजश्री मुधोजी भोसले व चिमाबाई याची स्वारी आपाजी माहाडीक याचे घरास गेली होती. छ ३ रोज प्रातःकाली च्यार घडी खलबत जाले. त्याजवर राजश्री भवानी काळो हे श्रीकासीस जाण्यास मुहूर्तेकरून बाहेर प्रस्थानास जाऊन राहिले. साइकाली मस्त हाती बाहेर सुटला होता त्याजकडे स्वारी गेली होती. छ ४ रोज चंपाशष्टीस प्रातःकाली स्नान करून चौकडे व मोत्याच्या कंठ्या व सोण्याचे गाठे सर्वाणी घालून वाड्याबाहेर येऊन हणमंताची पूजा केली व वाघे पंधरावीस आसामी आले होते त्याची पूजा करून वाड्यात भोजनास गेले. तिसरा प्रहरी सकरदरियास स्वारी गेली. तेथे तोफा वगैर पाहून साइकाली वाड्यात आले. ठकुबाई कन्या याचा पुत्र गुज्याबा गुजर याचे लग्नाचा निश्चय मार्गसीर्श वद्य दशमीचा केला. छ ५ रोज श्रीमान बावाशास्त्री याचे घरी गडगीनेर जाला. गुज्याबा गुजर यास वस्त्रे दिल्ही. छ ६ रोज प्रातःकाली राजश्री खंडोजी भोसले याणी सिकारी कुत्री घेऊन राजश्री भवानी काळो प्रस्थानी आहेत त्याजकडे गेले. तेथे घडीभर बसून तेथून सिकारीस गेले. सिकार कांही सापडली नाही. दोन प्रहरा वाड्यात आले. साइकाली बाळाबाई याचे घरी गडीगनेर जाला. तेथे सर्व मंडली गेल होत. छ ७ रोज प्रातःकाली सिवबाला रजपूत मातबर सिलेदार आहे त्याचे पुत्राचे लग्नाचे साक्ष विडे जाले. त्याचे घरी राजश्री मुधोजी भोसले याची स्वारी गेली होती. दोन प्रहरा बाबुभट याचे घरी गडगनेर जाला तेथे सर्व मंडळी गेले होते. छ ८ रोज ठकूबाई याचा दिवाण बापूजीपंत याचे घरी गडीगनेर जाला. गुज्याबा गुजर यास व परसोजी भोसले यास वस्त्रे दिल्ही. तेथे च्यार घडी कलवाताचा नाच जाला. तेथून राजश्री मुधोजी भोसले वाड्यात आले व रा रघोजी भोसले व खंडोजी भोसले व वेंकोजी भो व चिमाबाई वगैर वेंकोजी मोहिते याचे घरी भोजनास गेले. गुज्याबा गुजर व परसोजी भोसले यास वस्त्रे दिल्ही. तेथून अंताजी भोसले याचे घरी भोजनास गेले. तेथे मुलास वस्त्रे दिल्ही. छ ९ रोज सोमाजी मोहिते याचे घरी गडगनेर जाला. तेथे भोजन करून

राजश्री मुधोजी भोसले वाड्यात आले व रघोजी भोसले व गंडोजी भोसले व वैंकोजी भोसले वगैर चद्रभान मोहिते याचे घरी भोजने केली तेथून लक्ष्मण भोसले व नयोजी भोसले याचे घरी भोजनास गेले साइकाली राजश्री मुधोजी भोसले व गंडोजी भोसले नजरबागात बसून गोकाखेच्या गाइ तेथे आणऊन पाहिल्या व दोन श्रोकड आणून झुजविले छ १० रोज तिसरा प्रहरी स्वारी सकरदरियाम गेली तेथे तोफा पाहून घटीभर बसले राजश्री राजाराम मुकुंद बंगाल्याचे सुभे यास पुसले कीं तुम्हास बंगाल्यात न्याव यास तोफा किती केयाल्या पाहिजेत त्याणी सांगितले कीं च्यार सेरी गोळ्याच्या च्यार पाच तोफा नेऊ म्हणून बोलले छ ११ रोज साइकाली राजश्री मुधोजी भोसले याची स्वारी जागेश्वरास गेली तेथून आपाजी गाडाडीक याचे घरास आले तेथे लग्नाचे मांडव पाहिले व क्षणभर बसून नवरी मूल आणून पाहिली तेथून पागेत आले आजारी घोडा येक होता तो पाहून वाड्यात आले. बिंबाजी भोसले यास देवआज्ञा जाली म्हणून यातमी तिसरा प्रहरी आली होती खाशाची रात्रीनी भोजने जाल्यावर सांगितले याम सोळावे दिवसी वर्तमान कळले छत्तीसगडापासून वीस कोसी नऱ्याची गढी आहे तेथील जमीदार बदलून आहेत त्याजकडे पहिल्याने येक वेळ सटवाजी भोसले यास पाठविले होते, त्यास जमीदाराही पिटोन लाविले तेव्हां छत्तीसगडाहून बिंबाजी भोसले गेले याचे शरीर अधिच सस्त नवते, ताप आला होता तेथे जानाच कार्तिक वद्य त्रयोदसी भृगुवारी रात्रौ देवआज्ञा जाली राजश्री भवानी काळो अद्याप प्रस्थानीच आहेत जाण्याचा निश्चय नाही बगाजीपंत फार कून याजकडील हैदराबादेस होते त्यास निजामअलीखान याणी आपले कांही कामकाजामुळे नागपुरास रा केले आहेत ते जेजोरीवरून येणार. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना

ह. भं ८८
फा भं १३
प क ८

२६३

२६ जानेवारी १७८८

श्री

पो छ जोयल सन समान समानीन माघ

शेवेसी श्रीराम सदाशिव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता छ १६ राखर मंदवार येथास्थित असो विशेष राजश्री मुधोजी भोसले याजकडील दिनचर्या छ १७ रावल साइकाली राजश्री विश्वनाथ कृष्ण जोसी यास येक सेलापागोटे कलसपाखी दिल्हे छ १८ रोज राजश्री भवानी काळे प्रस्थानी आहेत त्याजकडे स्वारी गेली तेथे च्यार घडी खलबत करून आले छ १९ रोज तिसरा प्रहरी सर्वांची स्वारी बागात गेली. तेथे येक वाघ मोकळा सोडून त्याजवर चाळीसपनास सिकारी कुत्री सोडून च्यार घडी तमाशा

पाहिला. छ २० रोज साइकाली राजश्री खंडोजी भोसले याची स्वारी जागेश्वरास गेली होती. छ २१ रोज साइकाली सर्वांची स्वारी नाना उपाधे याचे घरास गेली. तेथे दोन घडी बसून आले. छ २२ रोज प्रातःकाली राजश्री खंडोजी भोसले याची स्वारी बागात गेली. छ २३ रोज दोन प्रहरा स्वारी सर्वाची चिमाबाई व गजराबाई वगैर सुद्धा निघोन येथून नवकोस श्रीगणपतीचे स्थान आदाशास पहिले प्रहर रात्रीस पावली. छ २३ रोज प्रातःकाली राजश्री भवानी काळो स्वार होऊन श्रीकासीस गेले व चिमाबाई वगैर याची स्वारी दोन कोस धापीवाड्यास विठोबास गेले होते. आदाशास गणपतीचे शेंदुराची खोल गळून पडली होती त्यास आभिशेक करून ब्राह्मण घातले. तिसरा प्रहरी राजश्री मुधोजी भोसले व रघोजी भोसले व खंडोजी भोसले व वेंकोजी भोसले याची स्वारी दोन कोस विठोबास गेली होती. छ २५ रोज खासे मजकूर सिकारीस गेले ते दोन पाखरे धरून दोन प्रहरा आले. आणखी तिसरा प्रहरी सिकारीस गेले ते पाच हरणे घेऊन साइकाली मुग्रास आल्यावर द्वादसी याजकरिता हरणे सोडून दिल्ही. छ २६ रोज दोन प्रहरा सिकारीस गेले ते साहा कोस जाऊन तीन डुकरे घेऊन आले. छ २७ रोज आदाशाहून प्रातःकाली कुच करून चिमाबाई व गजराबाई याची स्वारी नागपुरास आली व राजश्री मुधोजी भोसले व रघोजी भोसले व खंडोजी भोसले याची स्वारी तीन कोस पाटण सांगवीस गेली. तेथे मुग्रा करून पागा वगैरे पाहिली. छ २८ रोज राजश्री रघोजी भोसले व खंडोजी भोसले याणी च्यार पाच चिते व पारधी घेऊन सिकारीस गेले ते साइकाली दोन हरणे घेऊन आले. छ २९ रोज मुकामच होता. छ ३० रोज दोन प्रहरा स्वारी नागपुरास आली. छ १ राखर प्रातःकाली भागीर्थीचे पाण्याच्या कुप्या च्यार आणून राजश्री विश्वनाथ कृष्ण जोसी यास येक व बाबा चिटणीस यास येक व भवानीपंत मुनसी यास दोन दिल्ह्या. छ ३ रोज राजश्री नारो आनत पडतुरे याची भेट पहिले प्रहर दिवसास जाली. रा॥ मुधोजी भोसले यास वस्त्रे दिल्ही. दोन प्रहरा सर्व खासे मंडळी सिकारीस गेले ते दोन हरणे धरून मौजे झरी येथे मुग्रा करून राहिले. छ ४ रोज मौजे वाकेश्वर येथील जंगलात वाघाची बातमी आली. तेथे जाऊन गोल्यानी वाघ मारला. छ ५ रोज पहिले प्रहर दिवसी नागपुरास आले. मिस्तर च्यारलीस आरल कारणवालीस बाहादर इंग्रज कलकतेवाला याजकडून मिस्तर जारज फारस्तर व रेनी साहेब उभयता वकील जावसालास आले त्याची भेट जाली. समागमे फिरंगी दोनसे पावेतो आहेत. पोशाख व जवाहीर वगैरे आणिले आहे ते अद्याप दिल्हे नाही. भेट मात्र वरचेवर जाली. त्यास मेजवानीस हजार रुग्रा पाठविले होते ते माघारे पाठविले. घेतले नाहीत. छ ६ रोज साइकाली स्वारी सकरदरीयास

गेली होती तेथे तोफा पाहून आले छ ७ रोज राजश्री नारो अनंत पटवर्धन यास श्रीकाशीचे व गयेचे वगैरे अधीकारी यास पत्रें इंग्रजाकडून देविली व निरोपसमई वस्त्रे दिल्ही छ ८ रोज तिसरा प्रहरी मौजे पाचेगाव येथील कुरणात वाघाने दोन मणुश मारली म्हणून वातमी आली त्याजकडे वेगा घालून रात्री चवकीचा बंदोबस्त करावयास राजश्री रघोजी भोसले याची स्वारी गेली छ ९ रोज प्रात काली सर्वांची स्वारी तेथे जाऊन समागमे दोन तोफा ल्हाण घेतल्या होत्या वाघ न आल्यावर तरी तोफा लाऊन गोलंदाज गोले कसे लावितात हे पाहाने तेव्हां सांडणीस्वार दादायारा आत घालून वाघ हुसकुन दिल्हा, तो फासात आडकून पडला तो सापल्यात घालून आणिला छ ९ रोज प्रात काली हातीस ऊस किती लागतो त्याच्या यादी आणऊन पाहिल्या दोनसे हातीस शभर सवासे रुा चा ऊस नित्य लागतो म्हणून रागे भरून तमाम हत्तींचे रतीब मना करविले छ ११ रोज प्रात काली स्वारी शुक्रवार तल्यास गेली तेथे तल्याचे मध्यभागी जागा पाहून खांब रोवावयास सांगितले पहिले च्यार घडी रात्रीस स्वारी सक्करदरीयास गेली तेथे तीन साचे करविले होते, त्यात तीन तोफा वोतविल्या त्यात दोन साचे फुटले येक साच्या नीट राहिला व मिस्तर जारज फारस्तर उभयता ईंग्रज आले होते त्यासी दोन घडी खल्वत जाले दोन प्रहर रात्रीस स्वारी वाड्यात आली छ १२ रोज हाती वेगळाले होते ते येकंदर काम माहादो त्रिंबक याजकडे पीलखान्याचे लाऊन रतीबाची परवाणगी सांगीतली छ १३ रोज राजश्री खंडोजी भोसले व वेंकोजी भोसले याची स्वारी येथून साठ कोस चंद्रपुरास कालिकाभवानीचे दर्शनास गेली छतीसगडास जावयास निरोप मागत होते, त्यास जाऊ दिल्हे नाही म्हणून त्याणी हे निमित्य करून गेले म्हणून वर्तमान आहे सायकाली राजश्री मुधोजी भोसले व रघोजी भोसले याची स्वारी सक्करदरीयास गेली तेथे येक तोफ वोतविली होती ते काढविली व मिस्तर जारज ईंग्रज तेथे आला होता च्यार घडीस रात्री वाड्यात आले ईंग्रजाही मेजवानीस यावयाविशई बोलणे लावले आहे छतीसगडाकडे स्वारी जाणार आहे अद्याप निश्चय नाही पुढे कारकून पाठविला आहे तेथील येक दोघे कारभारी आणविले आहेत ते आल्यावर स्वारी जाण्याचा निश्चये होईल नातु गुज्याबा गुजर याचे लग्नाचा निश्चये मार्गसीर्श मासी केला होता तो बिंबाजी भोसले याचे वर्तमान आल्यावर राहिला वराडात ल्यान गला वगैर खरीदी करून पुण्याकडे आणीत होते त्यास वराडचे सुभे याणी खरीद करू दिल्हा नाही व फरोख्त करीत होते त्यासही ताकीद केली मन्या-च्यार्ये स्वामी रामक्षेत्राहून येथे पधरा दिवस येऊन राहिले होते. हल्ली ज्यगनाथाकडे गेले राजश्री माहादजी सिंदे किल्ले ग्वाल्हेर येथे आहेत प्रस्तुत गलाटा म्हणून वर्तमान त्यात

याची मर्जी संतोष आहे. दताजी नाईक तेथे पोहोचल्यावर बोलणे जाले असेल. मजकूर लिा पाठविणे म्हणून आज्ञापत्र छ २१ मोहरमचे आले ते छ २५ रावली पावले. जासुदास रोजमरियाकरिता गुंता जाला म्हणून बहुत दिवस लागले. त्यास मंडल्याचे जाबसालाकरिता येथून कोणी बोलावयास पाठवावे असे आहे, अद्यापी निश्चये नाही. राजश्री मुधोजी भो व रघोजी भो उभयता आपल्या आपल्यात विचार करित असतात. सतेचालीस हजार व सतावीस लक्षाचा मजकूर काही नाईकासी बोलले आहेत. राजश्री भवानी नागनाथ मुनसी कांहीच मजकूर कळू देत नाहीत. पुसावे तरी सांगत नाहीत. पंतप्रधान याचे बातमीवाले जली स्थली काष्ठी पाशाणी जेथे पाहावे तेथे आहेत या प्रो म्हणून द्वेश करितात. तेव्हां गैरमाहित काय ल्याहावे ? शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

रु. नं. ८८
फा. नं. १३
प. क्र. ९

२६४

२० मार्च १७८८

श्री

पो छ ३ रजब समानीन चैत्र

शेवेसी श्रीराम सदाशिव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ११ जमादिलाखर गुरुवार येथास्थीत असो विशेष. राजश्री मुधोजी भोसले याजकडील दिनच्र्यर्या. छ १५ जमादिलावल प्रातःकाळी सलाबतखा आलजपूरचे सुभे आले त्यास आणावयास राजश्री रघोजी भोसले शहराबाहेर अर्धा कोस पर्येत गेले. तेथे याच्या त्याच्या भेटी होऊन वाड्यात आले. राजश्री मुधोजी भोसले याणी मोत्याची कंठी व चौकडा घालून पांढरा पोशाख करून बसले होते. भेट जाली. घडीभर खलबत जाले. त्याजवर मशारनिलेस उतरावयास जागा बागाजवळ सांगितली. साईकाली सर्वाची स्वारी सकरदरीयास गेली. तेथे येक तोफ वोतविली तेथे सलाबतखा तोफा पाहावयास आले होते.दोन प्रहरा रात्रीस वाड्यात आले. छ १६ रोज प्रातःकाली राजश्री तुकोजी होळकर याजकडील तीलगुल आले ते घेतले. तिसरा प्रहरी राजश्री रघुनाथराव नीलकंठ कुरंदवाडकर याजकडून तिलगुल राजश्री खंडोजी भोसले यास आले. छ १७ रोज प्रातःकाली इंदुलीचे बागात स्वारी गेली. तेथे नवी विहीर पाडिली व देवालय बांधले. माहादेवाची स्थापना करावयास होमाचे कुंड व मांडव जागा वगैर करावयास सांगितले. तिसरा प्रहरी राजश्री भवानी नागनाथ मुनसी याचे घरास गेले. मुनसीचे शरीरास स्वस्त नवते. तेथे घडीभर बसून साइकाळी सलाबतखा याचे राहुटीस सर्वाची स्वारी गेली. तेथे घडीभर बसून आले. छ १८ रोज प्रातःकाळी राजश्री कृष्णराव बळवंत याजकडील जिवबा फडणीस दरबारास आले. कपाली गंध लावले नवते म्हणून

पाच शा गुणेगारी घेतली प्रहरा दिवसी सर्वांची स्वारी इंदुलीचे बागात गेली तेथे होम वगैरे ब्राह्मणभोजन येकदोन दिवस जाले खासे मडळी चिमाबाई वगैरे सुधा दोन तीन दिवस रात्री तेथेच राहिले होते छ १९ रोज तिसरा प्रहरी बागात राजश्री मुधोजी भोसले व खडोजी भोसले याणी बदुखीने पाच सात निशाण छुटली. छ २० रोज राजश्री रघोजी भोसले याचे मुलीस देवी निघाल्या आहेत त्याची पुजा करावयास सर्वांची स्वारी प्रात काळी शहरात आली पुजा करून बागात स्वारी गेली तेथे माहादेवाची स्थापना केली तिसरा प्रहरी स्वारी शहरात नयोजी भोसले याचे घरी मुलीचे लग्न जाले त्याचे घरी येऊन लग्न लावल्यावर मागती रात्री बागात जाऊन राहिले छ २१ रोज तिसरा प्रहरी राजश्री रघोजी भोसले व खडोजी भोसले व वेंकोजी भोसले च्यार घडी चोपाट्या खेल्त होते. साइकाली स्वारी सक्करदरीयास गेली तेथे तोफा पाहून वाड्यात आले छ २२ रोज अर्जुनजी भोसले याचे घरी मुलीचे लग्न जालें. त्याचे घरास तिसरा प्रहरी स्वारी गेली साइकाली सलावतखा वाड्यात आले त्यासी च्यार घडी खलवत जाले. छ २३ रोज प्रात काळी राजश्री खंडोजी भोसले सिकारीस गेले ते प्रहरा दिवसी आले सिकार कांही मिळाली नाही छ २५ रोज तिसरा प्रहरी स्वारी बागात गेली तेथे मुछदी मडळी वगैर आले साइकाल पावेतो कलवाताचा नाच जाला सलावतखा आले होते. छ २६ रोज साइकाली सर्वांची स्वारी सक्करदरीयास गेली तेथे तोफा पाहून छ २७ रोज तिसरा प्रहरी सर्वांची स्वारी जागेश्वरास जाऊन इंदुलीचे बागातील माहादेवास गेले. छ २९ रोज राजश्री राजाराम मुकुंद बगाल्याचे सुभे यास पेशजी निरोप जाला होता, परंतु कांही कागदपत्र उगवणे होते याजकरिता राहिले. आज निरोप जाला आंगचा पोशाख दिल्हा व मोत्याची कठी येक दिल्ही व हाती नग येक घावयास सांगितले व जगनाथाकडील दोन ब्राह्मण समागमे होते त्यास वस्त्रे दिल्ही व दोन घोडी उभयतास देऊन छ ३० रोज प्रात काली शहराबाहेर मस्त हाती सुटला होता त्याजकडे स्वारी गेली हाती धरल्यावर वाड्यात आले साइकाली सर्वांची स्वारी राजापूरचे बागात गेली तेथे द्राक्षे खाऊन साइकाली आले छ २ जाखर प्रात काळी स्वारी राजश्री भवानी नागनाथ मुनसी याचे घरास गेली तेथे दोन घडी खलबत करून आले छ ३ रोज ठकाबाई याचे पुत्र गुण्याबा गुजर याचे लग्न फाल्गुण वद्य ५ चा निश्चये केला आज मानाजी घाडगे याचे घरी गडगीनेर जाला छ ४ रोज मैनाबाई निंबालकर याचे घरी गडगीनेर जाला छ ५ रोज प्रात काली केदारजी मोहिते राजश्री मुधोजी भोसले याचे स्वशुर याचे घरी गडीगनेर जाला साइकाली सोमाजी मोहिते जावाई याचे घरी गडीगनेर जाला राजश्री तुकोजी होल्कर याजकडील वकील निरोप घेऊन देशास

गेले. त्यास निरोप समई वस्त्रे दिल्ही. छ ६ रोज राजश्री वेंकोजी भोसले याणी आपले बागांत गडगीनेर केला मानकरी मंडळी वगैर सलाबतखा भोजनास आले होते. गुज्याबा गुजर यास वस्त्रे दिल्ही. साइंकाली च्यार घडी कलवाताचा नाच जाला. छ ७ रोज राजश्री रघोजी भोसले याणी आपलें बागात गडगेनर केला. मानकरी मंडळी व सलाबतखा भोजनास आले होते. गुज्याबा गुजर यास व गुजर मंडळीस वस्त्रे दिल्ही. राजश्री मुधोजी भोसले याचे शरीरास रात्री ज्वर ताप आला होता. सलाबतखा याजकडे हवाल्याबदल दाहा लक्ष रुा येणे आहेत याजकरिता येथे आले आहेत. समागमे स्वार दोनसे पावेतो आहेत. तूर्त तीन साडेतीन लक्ष रुा देणार ते घेऊन पुढे जामीन घ्यावा असे आहे. वराडात लाखनवाड्याजवल भोसल्यांचे ठाणे मौजे करांडचे हसमतजंग याणी लुटून दिल्हे व येक दो गावापासून खंडणी घेतली. धामधुम मांडली आहे. राजश्री माहादजी सिंदे किले ग्वालेर येथे आहेत. त्याचा कबिला शेंदवयास आला म्हणून पेशजी वर्तमान होते. हली किले अशेर येथे आला म्हणून वर्तमान आहे. बुंधेले याचा कबिला गढ्यास आला. पातशा व जैपूरवाला येक जाला. त्याची दाटी बहुत म्हणून वर्तमान. राजश्री भवानी नागनाथ मुनसी याचा नातू विसाबा विसा वर्षांत होता त्यास देवाज्ञा छ ९ रोजी जाली. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

ए. नं. ८८
का. नं. १३
प. क्र. १

२६५

३ एप्रिल १७८८

श्री

शेवेसी श्रीराम सदाशिव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २५ जमादिलाखर गुरुवार येथास्थीत असो विशेष. राजश्री मुधोजी भोसले याजकडील दिनचर्या छ ११ रोज गुजाबा गुजर यांस राजश्री खंडोजी भोसले याणी गडगनेर केला गुज्याबा गुजर यास व गुजर मंडलीस वस्त्रे दिल्ही. छ १२ रोज प्रातःकाली राजश्री मुधोजी भोसले व रघोजी भोसले याची स्वारी राजश्री भवानीपंत मुनसी याचे घरास गेली ते मुनसीचे समाधान करून आले. साईकाळी होलीची पूजा करून दोन बकरी जिवंत होळीत टाकली. तेथे राधाचा वगैरे च्यार घडी तमाशा पाहिला. छ १३ रोज प्रातःकाली च्यार घडी गुलाल वगैर खेळून तिसरा प्रहरी शहराबाहेर गाडी बगाडाचा तमाशा पाहवयास सर्वांची स्वारी गेली. च्यार घडी तमाशा पाहून आले. छ १४ रोज प्रातःकाली राजश्री रघोजी भोसले व खंडोजी भोसले शहरात अक्षत घावयास गेले. तिसरा प्रहरी छतीसगडाहून वेदमूर्ति राजश्री कृष्णभटजी आले होते त्याची मागती रवानगी केली. भटजीस वस्त्रे दिल्ही व आणखी येक दोघे कारभारी छतीसगडास आहेत त्यास आणावयास सांगितले.

छ १६ रोज प्रात काळी दुरया पाण्यास रुप्याच्या दोन करविल्या होत्या त्या आणून पाहिल्या कारेगरास येक सेलापागोटे दिल्हे. तिसरा प्रहरी कलवताचा नाच जाला छ १७ रोज साईकाळी गुण्याबा गुजर याचे लग्न लावावयास गेले लग्न लावून आल्यावर रात्री रा मुधोजी भोसले यास ज्वर ताप आला होता दुसरी दिवसी आराम जाला छ १९ रोज प्रातःकाळी गुण्याबा गुजर यास मुछदीमंडळी वगैरे याणी आहेर केले. छ २० रोज तिसरा प्रहरी सर्व माहाडीकाचे घरास गेले भोजन करून च्यार घडी कलवताचा तमाशा पाहिला रात्री साडे करून वरात मिरऊन मुहूर्ते करून मुल घेऊन आले. शरीर संमघ राजश्री आपाजी महाडीक यासी केला गुण्याबा गुजर याचे लग्न राजश्री मुधोजी भोसले याणी केले मुलीस वस्त्रा व वस्त्रे काही केली वरकड दुसरा खर्च काही मात्र जाला नाही. छ २१ रोज प्रातःकाळी राजश्री मानसिंग मोहिते यांचे घरास स्वारी गेली त्याचे घरी लग्न जाले त्यास आहेर करून आले. दोन प्रहरा सर्वाची स्वारी वाघाचे सिकारीस गेले आहेत दोन तीन वाघ खुब्यात पडले म्हणून लग्नापूर्वीच वातमी आली होती राजश्री विठ्ठल बलाल वराडचे सुमे उमरावती जवल होते त्याणी घाटावर दहा पाच गावास चिठ्या केल्या होत्या त्या हसमतजंग याचे शेहामुले माघारा गावकरानी टाकिल्या याजकरिता मशारनिल्हे घाटावर फौजसुधा गेले आहेत हसमतजंग मेहकर प्रांती फौजसुधा आहेत घाटावरील येक दोन ठाणी भोसल्याची मौजे करोड वगैरे पेशजी हसमतजंग याणी उठवून दिल्ही. त्याजवर काही दिसत नाही. आलीबहादर वराड प्राती प्रो मलकापूर येथे आहेत प्रो मजकूरचे जमीदारापासून दोन अडीच हजार खडणी घ्यावी असा ठराव जाला होता तो राजश्री येशवंतराव नाईक निंबालकर याणी समजाविले की आमचे आठरा हजार रुा साबाजी भोसले याचे वेलेचे येणे आहेत ते घेतले पाहिजेत. याजकरिता मुकामच आहे उपद्रव करितात म्हणून विठ्ठल बलाल सुमे याणी लिहिले होते त्यास राजश्री मुधोजी भोसले याचे बोलणे की ऐवज काही येणे नाही कसेही च्यार रुा मेलवावे असा पच पिराजी नाईक निंबालकर याजपासून आहे हरीभक्ती याचे लक्ष लावायाकरिता राजश्री हरीपंत तात्या याचे पत्र राजश्री खंडोजी भोसले यास आले होते. ऐवजाची तरतूद अद्याप होत नाही जासूद बसले आहेत शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

क. म ८८
का मं १३
प क्र १०

२६६

२४ एप्रिल १७८८

श्री

शेवेसी श्रीराम सदाशिव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना छ १७ रजब गुरुवार येथास्थीत असो विशेष राजश्री मुधोजी भोसले याजकडील विनंत्यर्या सिकारीस

सलाबतखा यास समागमे घेऊन गेले होते. ते तीन वाघ धरून छ २५ जमाखरी तिसरा प्रहरा आले. छ २६ रोज राजश्री आपाजी माहाडीक याचे घरास सर्व मंडळी भोजनास गेले. छ २७ रोज प्रो कडेवलीत येथील भगवंत गोपाल आजहृत देशमुख याणी दोन साला हिसेबाचा फडशा करून निरोप घेतला. वस्त्रे दिल्ही व लग्नाबा मानकरी वगैर पागे सर्व मंडळीस भोजनास बोलावले होते. छ २८ रोज सलाबतखा यास मेजवानी जाली. साइ-काली उभयता इंग्रज आले त्यासी च्यार घडी खलबत जाले. छ २९ रोज पासून आठ दाहा दिवस रामनवमीचा उछाह जाला. छ २ रजब प्रातःकाली राजश्री खंडोजी भोसले याची स्वारी बागात गेली. तेथे घोड्यावरून पडले. घोडा झाडासी बांधून बासाचा मार दिल्हा. राजश्री मुधोजी भोसले यास रामनवमीत दोन च्यार दिवस ज्वर ताप येत होता. छ ३ रोज प्रातःकाली राजश्री भवानी नागनाथ मुनसी व मल्हारजी नाईक यासी च्यार घडी खल-बत जाले. मंडल्याचे ध्यान बहुत लागले आहे. मुनसी व मल्हारजी नाईक पुण्यास येणार. छ ४ रोज प्रातःकाली स्वारी बाजीराव पाटणकर व माधवराव घोरपडे याचे गोटात गेली. त्याचे येथे रामनवमीचा उछाह होत असतो. तेथे दोन घडी बसून आले. छ ५ रोज तिसरा प्रहरी लक्ष्मण डोके गोसावी याचे घरास स्वारी गेली. तेथे घडीभर कथा पाहून आले. छ ९ रोज साइकाली इंग्रज आला. त्यासी च्यार घडी खलबत जाले. रात्री भवानी कालो याचे घरास लळीतास स्वारी गेली. छ १२ रोज दोन प्रहरा तीन कोस मौजे कोराडी येथे स्वारी गेली. तेथे देवीजवल पोर्णिमेची यात्रा भरत असती व राजश्री खंडोजी भोसले याचा काही नवस होता. तेथे गोंधल घातला. छ १३ रोज राजश्री रघोजी भोसले व खंडोजी भोसले सिकारीस गेले. तिसरा प्रहरी येक कालवीट घेऊन आले. साइकाली स्वारी नागपुरास आली. छ १५ रोज मानसिंग मोहिते याचे घरी मेजवानी राजश्री रघोजी भोसले व खंडोजी भोसले यास जाली. उभयतास वस्त्रे दिल्हीं. इंग्रज हे...(मंत) वाड्यात येऊन खलबत करि-तात. परंतु अद्याप काहीच वर्तमान फुटत नाही. आणखी वरकडाचे वकील आहेत तसे इंग्रज आले आहेत. काही बोलावयास आले नाहीत म्हणून वर्तमान. पुढे काही जाल्यास सेवेसी लिा. हसमतजंग मेहकर प्रांती पाचसातसे फौजसुधा आहेत. त्याणी घाटावरील भोसल्याचे दोनच्यार गावचे झेंडे वगैर मोडून दंगा केला. याजकरिता राजश्री विठल बलाल वराडचे सुभे याजवल तीनच्यारसे पावेतो लोक आहेत. हे घाटावर गेले होते कांही कटकट जाली. मागती विठल बलाल खाले वराडात आले. राजश्री मुधोजी भोसले यास येक दोन दिवसा ज्वर ताप येत असतो. राजश्री रघोजी भोसले यास केसतोड जाला. शरीरास आराम नाही. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. प्रो मंगरुल प्रांत वराड जागीर उदाजी आटोले

याजकडे होती ते पोलादजंग याजकडे जाली काही लोक वगैर ठाणे घ्यावयास आले होते. त्याचे कुमकेस इभ्रामखान याणी तोफखाना पा होता ठाणे हातास आले नाही. येक महिण्याचा करार केला आहे तोफखानेवाल्याही मौजे हिंगणगाव येथे फजिया केला फजियात येक ब्राह्मण मारला गेला राजश्री माहादजी सिंदे किले ग्वालेर येथे आहेत. पातशा व जैपूरवाले याची फुट पडली येक चित्ते नाहीत जैपूरवाले याणी काही सत्याचे बोलणे लावलें आहे म्हणून वर्तमान आहे हे विज्ञापना

क.	नं	८८	२६७		६ मे १७८८
का	नं.	१२			
प	क्र.	११	श्री		

शेवेसी श्रीराम सदाशिव कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना ता। छ २९ रजब मंगळवार येथासीत असो विशेष राजश्री मुधोजी भोसले यानकडील दिनचर्या छ १९ रोज प्रातःकाळी सलाबतखा यास निरोप जाला वस्त्रे दिल्ही. त्याजकडे चौदा लक्ष रुा येणे त्याचे दोन हप्ते सात लक्ष पेशजी पावले बाकी सात लक्ष येणे आहेत त्या पो वर्त काहीच दिल्हे नाही. शमर दिडसे घोडी पागेची याजकडे चाकर ठेवावयास टाकून गेले छ २० रोज सायंकाळी राजश्री रघोजी भोसले व खंडोजी भोसले व चिमाबाई यांची स्वारी इंदुलीची बागात दोन घटी सहल करावयास गेले. छ २१ रोज पातशाकडील पारसी पत्रे आली. राजश्री माहादजी सिंदे चमेलीचे तीरी आहेत बरसातीचे दिवस आले याजकरिता पातशा दिलीस गेले व जैपूरवाले याचे घरी लग्न आहे म्हणून वर्तमान आहे छ २२ रोज पासून पाच सात दिवस राजश्री मुधोजी भोसले यास ज्वर ताप येतो, किंचित शरीर स्वस्त नाही राजश्री वेंकोजी भोसले विठोबाचे देवळी नित्य धर्मतपूजा करीत बसतात छ २५ रोज सायंकाळी राजश्री रघोजी भोसले इंदुलीचे बागात वसंत पूजा करावयास गेले होते. छ २७ रोज सिवबाला हजारी याचे घरी मेजवानी आली सर्वास वस्त्रे दिल्ही व घोडी रास येक नजर दिल्ही. राजश्री रघोजी भोसले याचे दुसरे लग्न वैशाख शुद्ध आष्टमीस होणार. शरीर समंध राजश्री दुर्गोजी सिरके यासी केला मूल दहा अकरा वर्षांची आहे. इंग्रजाकडील काही नवल विशेष वर्तमान अस्तुत दिसत नाही. मिस्तर जारज इंग्रज सहल करावयास बागात गेला होता तेथे घोड्यावरून पडला पाय दुखतो आजारी आहे. राजश्री रघोजी भोसले यास केसतोड जाला म्हणून पेशजी लिा होते तो केसतोड नाही दुखं जिरले आहे लग्नाचे मंडप वगैर बाहेर तल्याचे काठी होत आहेत शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना ।

म्हणून सवनीसास बहुत वेळ लिहिले त्याजवर अलीकडे तीन जोड्या आहेत येक जोडी ठेवून घेतली की रजेस गेली न कळे जोड्या पुरत नाहीत तेव्हा पत्रे किती दिवसा पाठवीत जावी म्हणून राजश्री त्रिंबकराव यास लिहितो, परंतु कांहींच लिहीत नाही. त्यास लिहिले सारखे न लिहिले सारखेच म्हणून स्वामीस येक वेळ लिहितो जोडी पुण्याकडील लवकर आली नाही म्हणून दोनही पत्रे येकदा रवाना केली येक जोडी मजजवळ असती दुसरी जोडी पुण्याहून येईल तेव्हां पत्रे रवाना करीन अथवा आजुरा करून पाठवावयास आज्ञा होईल तर पाठवीन जोडीच अधिक मजजवळ नाही तेव्हां पत्रे कोणावरावर पाठवावी? येथे पत्रे लिहून ठेवितो जोडी महिण्या दो महिण्या येईल तसे पत्र पाठवीन सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना तीन जोड्या आहेत आणखी दोन जोड्या असाव्या, म्हणजे पांच जोड्या असल्यास पत्रे वरचेवर येतील दोन जोड्याविसी आज्ञा जाली पाहिजे रोजमऱ्याचे चिठीवर देणे लवकर होत नाही याजकरिता जासुदास बहुत दिवस लागतात सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना

ए. मं ८८
फा मं १३
प क. ३८

२८९ — २ डिसेंबर १७९०

श्री

सेवेसी श्रीराम सदाशिव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता। छ २४ रबिलावल मुकाम नागपुर येथास्थीत असो विशेष राजश्री रघोजी भोसले याजकडील दिनच्यर्या विजयादशमीची पत्र स्वामीकडील आली ती गजराबाई याचे अवरोधाकरिता घेतली नवती. छ २१ सफरी प्रात काली घेतली नतर स्वारी किल्यात जाऊन बुराणशाची जखम पाहून महीपत दिनकर छत्तीसगडास जावयास बाहेर राहिले होते त्याचे राहुटीस जाऊन च्यार घडी खल्बत केले. महिपत दिनकर याणी घोडी रास येक नजर केली तेथे वेंकोजी भोसले याणी फेरून पाहिली घोडी बहुत चांगली आपले बसावयाचे वेगमीची आहे म्हणून स्वाशास सांगितले. तेथून त्या घोडीवर बसून आले तिसरे प्रहरी सक्करदरीयास गेले तेथे रमण्यातील हरणे पाहिली. तोफा पाहून आले. छ २२ रोज स्नान देवपूजा करून माजोरा हत्ती शहरापासून अर्धा कोसावर होता तो दूर पडतो म्हणून शेहराजवल आणून बांधावा म्हणून स्वारी जाऊन त्यास सोडून आणले शेहराजवल दोन तीन मेल आणला तो पळाला, ठाणावर येईना च्यार घडी उभे राहून सेस्ट फटाकून वाड्यात आले. तिसरे प्रहरी दाढ बहुत दुखत होती छ २३ रोज दोन प्रहर पावेतो दाढ दुखली दोन प्रहरी स्नान केले. दाढे करिता दोनतीन दिवस श्रमी होते. छ २६ रोज सावतखा पठाण याजकडील धोंमर

लोक चाकरीहून आले त्याची हजेरी घेतली. येक येक रुपया प्रो सर्व लोकाणी नजरा केल्या. नजरा करावयाचे कारण नाही. परंतु लोक खुशामती. छ २७ रोज नर्कचतुर्दसीस भवानी काळो याचे घरी भोजनास गेले. भोजन करून खाशास सर्वास वस्त्रे दिल्ही. रात्री पांडुरंग गणेश व आनापा घाटगे व परसोजी भोसले यासी दोन प्रहर रात्र पावेतो जुंवा खेलले. छ २८ रोज स्नान देवपूजा करून प्रहरभर जुवा खेलले. इकडे दिपवालीत जुवा खेलायची चाल बहुत आहे. रात्री दोन प्रहर रात्र पावेतो जुवा खेलत होते. छ २९ रोज स्नान देवपूजा करून प्रहरभर जुवा खेलून प्रहर दिवसा स्वारी माधोजी नाईक काळे यांचे घरास गेली. तेथे वहीची पूजा जाली. खासे मंडळीस वस्त्रे दिल्ही. रात्री दोन प्रहर रात्र पावेतो जुवा खेल्ले. छ ३० रोज बाळाबाई ठकाबाई याचे घरी भाऊबीज जाली. सोमवार होता. दोन प्रहरी फराल ठकुबाई याचे घरी केला. साईकाली भोजन बाळाबाई याचे घरी केले. उभयता वस्त्रे दिल्ही. रात्री दोन प्रहर पावेतो जुवा खेलले. छ १ सवाल प्रातःकाली हातीच्या सिऱ्या नव्या करविल्या आहेत त्या आणून पहिल्या व आवरंगाबादेहून तबके व गुलाबदाण्या रुप्याच्या, वर सोण्याचा मुलामा करऊन आणविली ती पाहिली. रुपायास येक रुपाया साहा आणे प्रो देऊन घेतली व मुछद्याकडून दोनच्यार तबके व गुलाबदाण्या घेविल्या व नगे गोसावी दोन अडीचसे परजन्यकालचे छावणीस ठेवले होते त्यास रा करून दिल्हे. छ २ रोज प्रातःकाली हाजामत केली. स्नान देवपूजा करून दोन घडी खलबत जाले. तिसरे प्रहरी स्वारी बागात गेली. तेथे रमण्यातील हरणे पाहिली. देव दर्शन करून आले. छ ३ रोज स्नान देवपूजा करून गायलगडकर किलेदार वेंकाजी भास्कर हिसेबाकरितां आले होते त्यास निरोप जाला. वस्त्रे दिल्ही. छ ४ रोज स्नान देवपूजा करून प्रहर दिवसा स्वारी डोंगरखेडी येथील बागात हुरडा खायास मुछदीयासुधा गेले. छ ५ रोज कुसाजी गुजर याचे घरी मेजवानी जाली. मानकर मंडळी सुधा भोजनास गेले. साइकाली हरणाचा रमणा पाहिला. छ ६ रोज प्रातःकाली स्नान करून स्वारी सक्करदरी-याचे बागात मुछदी सुधा आवलीभोजनास गेले. दोन प्रहरा भोजने करून साइकाली हरणाचा रमणा व तोफा पाहून आले. खाशाची दुसरी स्त्री भवानीबाई वराडात माहेरी होती, तीस येथून अर्जुना भोसला आणावयास पाठविला होता. आज घेऊन आला. छ ७ रोज स्नान देवपूजा करून सावतखा पठाण याजकडील लोकाची हजेरी घेतली. छ ८ रोज स्नान देवपूजा करून गोसावी सवदागर याणी घोडी आणली. ती शहराबाहेर जाऊन पाहिली. दाहाबारा घोडी चांगली खरेदी केली. छ ९ रोज स्नान देवपूजा करून प्रहर दिवसा स्वारी शंकराचार्ये स्वामी याचे बिराडास गेली. स्वामी परजन्य काळाकरिता राहिले

होते आता कासीस जातात। त्यास येक धोत्रजोडा व येक शालजोडी व रुपायाचा तोडा येक दिल्हा आणखी मुछद्याही कोणी शमर कोणी दोनसे कोणी चालीस पनास या प्रो शो दिल्हे स्वामी परजन्य लागला याजकरिता आठच्यार दिवस राहिले आहेत. कासीचा मार्ग सुरक्षीत नाही महागाई काळ पडला याजकरिता गोंडवणचे गोंड। हजार बाराशे मिळून भोसल्याचे अमलात वाटा मारितात सवदागर वगैर गोसावी कासीहून येत होते ते लुटले तेव्हा यात्राहि लुटतील त्याची चौकसी पारपत्य यांच्याणे होत नाही स्वामी। दुसरे मार्ग सागरावरून जाणार तेथून स्वारी सक्करदरीयास ,गेली तेथे कार्तिकीची कथा जाली छ १० रोज प्रात काली स्नान देवपूजा करून च्यार, घडी खलबते, जाले. साइकाली तुलसीचे लग्न लावले छ ११ रोज प्रात काली हाजामत जाली स्नान देवपूजा करून स्वारी महादाजी ल्स्करी याचे घरी गेली तेथे अनंतरूपीची कथा जाली दोन घडी कथा श्रवण करून आले कार्तिकीस श्रीरामक्षेत्रास यात्रा भरत असती तेथे मुधोजी भोसले दरसाल जात होते ते वारल्यावर हे दोन तीन वर्षे गेले नाहीत, येथे लक्ष्मीनारायेणाजवल कथा कीर्तन जाले छ १४ रोज लव्हीन जाले. छ १५ रोज तेलगखेडी येथील बागात हुरडा खावयास मुछदीसुधा गेले. हुरडा खाऊन साइकाली आले छ १६ रोज सिवनगाव येथील बागात हुरडा खावयास गेले हुरडा खाऊन च्यार घडी सिकारीस गेले च्यार हरणे व दोन तडस आणले छ १८ रोज स्नान देवपूजा करून हाजामत केली दोन घडी खलबत जाले नळ दुखत होते त्यास तुंबड्या लाऊन रक्त काढले छ १९ रोज स्नान देवपूजा करून बेनीसिंग गारदी याची हजेरी घेतली चारणीस उट होते, पाहावयास आणले होते ते पाहिले इकडे पावसाची झड पाच दिवस लागली होती. पाऊस चांगला पडला धोंडो माहादेव बिंबाजी भोसले याचे दिवाण छत्तीसगडास होते त्यास बिंबाजी भोसले वारल्यावर हिसेबाकरिता मशारनिलेस आणले तीन वर्षे त्याजवर चौकी आहे छत्तीसगडचा हिसेब दे नाहीतर दोन लक्ष शो दंड दे असे त्यास म्हणत होते. तों त्याचा फडणीस असा अकस्मात येक दिवसी मृत्यु पावला तेव्हां हिसेबाचे लचांड चुकले. हिसेब देणार मारला तेव्हा विलाज नाही. अलीकडे धोंडो-पता पासून चालीस हजार शो दंड घेतला, परंतु त्यास मोकलीक नाही. चौकी तसीच आहे त्याची मुले मणुशे छत्तीसगडास आहेत मंडल्याकरिता येथून त्रिंबकजी भोसला गुदस्ता गेला होता इतके दिवस खराब होऊन आला पुण्याकडून पागा वराडात चरणीस आल्या आहेत व गला खरेदी करून न्यावयास लमान आला त्यास येथून वराडप्रांती वगैर गोंडवणात जागाजागा कमावीसदारास ताकीद केली की, प्रांतातील गला विकू न देणे. गला विकल्यास काल पडेल असी म्हणून ताकीद केली गुदस्ता

स्वारी गंगेस गेली तेव्हा सेगावचे मुकामी बाजीराव व जयरामराव पाटणकर याणी येक दिवस आडऊन दाहा बारा हजार रुो घेतले तेव्हां दुसरे दिवसी कुच करू दिल्हे म्हणून तो कुन्हा धरून उभयतास हली निरोप दिल्हा. त्याजकडे पंधरा हजार रुो फाजील निघत होते ते सोडले. आणखी पेठेचे कर्ज लोकाचे होते तेही सोडविले, परंतु तुम्ही जा म्हणून त्यास सांगितले. ते उभयता गेले व सित्रबाला हजारी संगमनेरकर त्यास निरोप दिल्हा. मातबर माणूस थोर थोर नामी लोक पाटणकरासारखे यास निरोप दिल्हा! काही समय पडल्यास असे माणूस मिळणार नाही. वेदमूर्ती राजश्री श्रीकृष्णभट जेजोरीकर सितारामबावा याचे पुत्र याचे पाचसे रुो वर्षासन पहिले होते. अलीकडे पाच सात वर्षे चालले नाही, म्हणून याचा मुा जेजोरीस होता तेव्हा भटजीबावा याणी येऊन उद्योग केला. तेव्हा मुछदी याणी सर्वाणी व खाशानी सांगितले तुम्ही नागपुरास या, पाचशापैकी काही थोडे बहुत करून देऊ म्हणून बोलले. त्याजवरून भटजी येथे आले. महिणा दोन महिणे जाल्यावर कारभारी यास दोनच्यार वेल सूचना केली तेव्हा कारभारी याणी सांगितले, तुम्ही आता आलात, गडबड का करिता. स्वस्थ असा. दोचौ महिण्या करून देऊ असे बोलले. त्याजवर भटजीबाबा सात आठ महिणे राहून दोन घोडी माणसे शहरचा खर्च दोन अडीसे रुो कर्ज खाऊन खराब जाले, सेवटी काही होत नाही असे जाले. मुछदी कारभारी याचे घरास जाऊन विचारीत. यास रागे भरावे, पायउतारा येऊन बोलावे, काय आग्हास दाहा वीस रुो म्हणाल तर देऊ. वरकड आमच्याणे काही होत नाही असे सांगत. भटजीबावा महासमर्थ ब्राह्मण, आठ महिणे खराब होऊन श्रम करून काही करून दिल्ले नाही. आता निरोप घेऊन जाणार या उद्योगात आहेत. स्वामीचा प्रताप याच्या उरावर आहे म्हणून हे काही ठीक आहेत, नाहीतर हे नित्य येक ब्रह्महत्या करितील असे भटजीबावा तलतलून बोलतात. या प्रोच याणी नजर धरली, धर्म वगैर कोणास रुपाया देऊ नये. आमची सरदारी वोढीत आली, वोढ जाली म्हणावे आणि कोणी कमाविसदार व जमेदार वगैरे लोकावर हरयेक दोष ठेऊन कोणापासून दोन हजार, कोणापासून पाच हजार, दाहा हजार रुो, कोणा मुछद्यापासून लाख दोन लाख रुो घ्यावे, असी तऱ्हा निघाली. गुदस्ता स्वारी आले तेव्हा जनार्दन विश्वनाथ याजपासून लाख रुा घेतले. च्यार रुो घ्यावयास निमित्य करावे. सरदारी ओढीत काशाणे आली? अवघे लबाडीचे ध्यान आहे. मुलुखचा पैसा येतो त्या प्रो येतच आहे. खर्च म्हणावा तर फौज येथे दहा पाच हजार नाही. हजार बारासे पधरासे पावेतो असती. खजाना याजवल बहुत आहे. वोढ जाली हे लटके ढोग करितात. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. स्वारी अशेरचा किला पाहावयास गोडवणात आठा दिवसा जाणार. समागमे मुछदी कारभारी कोणी जात नाहीत. सडे जाणार आहेत. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

ना० भो० ४४

र नं ८८
फा नं १३
प क्र. २७

२९०

१८ जानेवारी १७९१

श्री

शेवेसी श्रीराम सदाशिव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता १६ जमादिल-वल मुकाम नागपूर येथास्थीत असो विशेष राजश्री रघोजी भोसले याजकडील दिनचर्या छ २९ रात्रल दतियाचे रा याकडील पोशाख येक पांदरा चदेरी व मदुख येक व सुर्त्री तीन जोड्या आली ती घेतली व महिपत दिनकर छत्तीसगडचे सुभे यास वस्त्रे दिल्ही, येक सिरपेच दिल्हा तिसरे प्रहरी स्वारी सक्करदरीयास गेली तेथे तोफा पाहून कुरणात च्यार घडी सिकारीस गेले. सिकार काही मिळाली नाही छ १ रविवार बनाबाइ याचे साहुलीचे लग्न माळाबाई यांचे वास्यात लागले तेथे खासे च्यार घडी तमाशा पाहिला मदुखाची सिलक करविली दुसरे दिवसी साडे करून वरात मिरविली छ ३ राखरी वेंकोजी भोसले मुहूर्त करून बाहेर इंदूलीचे बागात जाऊन राहिले व आनदराव धोंडीराज गगथडीचे सुभे यास वस्त्रे दिल्ही छ ४ रोज प्रातःकाळी स्नान भोजन करून पाचवे घटकेस मुहूर्ते करून निघोन इंदुलीस जाऊन राहिले छ ५ रोज कोसभर टाकळीचा मुा केला छ ६ रोज प्रातःकाळी माघारे इंदुलीचे मुास येऊन चिमाबाई यासी च्यार घडी खलबत करून दाहा कोस अदाशाचे मुकामी जाऊन राहिले. चिमाबाई व परसोजी भोसले शहरात आले छ ७ रोज साहा कोस केलमदचे मुकामी जाऊन सिकारीस गेले, च्यार तितर व येक हरण आणले छ ८ रोज दाहाकोस मोहोगाव येथील मुकामास गेले. भिकाजी गोपाळ वराडचे फडणीस यास निरोप दिल्हा वस्त्रे दिल्ही मार्गात लोधीखेडे येथील कमावीसदार वामनाजी-पत याचे घरी मेजवानी जाली भोजने करून वस्त्राऐवजी उभयतापुढे पनास पनास रुो ठेवले. छ ९ रोज बारा कोस पांढुरण्याचा मुा केला तेथे मुास गेल्यावर सिकारीस गेले. दोन तितर आणले छ १० रोज चवदा कोस मुास गेले तेथे घोडी व उट कारवाण घेऊन आले होते से येकवीस घोडी खरेदी केली व येक गाडी व उट खरीद केले मुलताईचे तल्यात स्नान केले तापी नदीचा उगम त्या तल्यातून आहे छ ११ रोज तेथे मुा केला दोन प्रहरी सिकारीस गेले येक ससा मात्र धरला दोन तोफा येक हाती व सिकारीचा सरजाम वाघरावगैर मुलताईचे मुकामी ठेऊन छ १२ रोजी कुच करून दाहा कोस रतव्याचे मुकामास गेले. तेथून किल्ला असेरचा येवीस कोस आहे मार्गात गाडी घाट अडचण, मार्ग चांगला नाही याजकरिता बुनगे हाती वगैर माडून रतव्याचे मुकामी ठेऊन बराबर दोन राहुट्या व खासी घोडी दाहा व पाच साहा हाती घेतले व लोकही सडे सडे दोनसे पावेतो घेऊन छ १३ रोजी दाहा कोस सत्याचे मुकामास गेले मार्गात जाता

सिकार करीत गेले. दोन चार तितर मिळाले. छ १४ रोजी कुच करून बारा कोस किल्याचे माचीस जाऊन राहिले. अलीपेठेत डेरे देऊन राहिले. येतांच किल्याचा दरवाजा खालून पाहिला. दरवाज्यापुढे आंब्याचे वृक्ष होता तो तोडविला. छ १५ रोज बुधवारी स्नान भोजन करून च्यार घडी निद्रा करून प्रहर दिवसा मुहूर्त करून किला पाहावयास निघाले ते अली दरवाजा व गणेश दरवाजा याणे आत जाऊन वर चढल्यावर पालखीत बसून पाण्याचे टाके पाहिले. किल्यावरील तोफांची व जंबुऱ्याची सिलक किलेदाराने केली व दरवाज्यात येक हाल्या तोडविला. तेथून किलेदाराचे कचेरीस जाऊन घडीभर बसले. तेथून किल्याचे पूर्वेस जाऊन किल्याचा कडा पाहिला. तेथून डेऱ्यास आले. सिलक केली. तेथे गोलनदाज याचा हात उडून गेला तो कापून तळावयास सागितले. छ १६ रोज प्रातः-काली मुदबख किल्यावर पाठवून टाक्याजवळ स्वयेपाक करावयास सागितला. च्यार घडी दिवसा स्नान करून किल्यावर येऊन किल्याचा दुसरा दरवाजा बऱ्हाणपूर दरवाजा पाहावयास पायउतारा दरवाजा उतरून कड्यावर घडीभर बसले. किला असा बांधावा, इकडे काम लावावे असे पाहिले. येथून वर येऊन खिडकी किल्याची पाहिली. तेथे दगड मातबर होता तो सुरंग लाऊन फोडावयास सागितले. भोवताली अशर पाहून पूर्वेस येऊन बसले. किल्यासभोवत्या चौक्या बसवावयास कारण काही नाही म्हणून बोलले व पहिलेंही चौक्या नाहीत. चौहूकडून कडे तुटले. दोनी दरवाज्यावर मात्र चौक्या असतात. तोफा अछेर सेर गोल्याचा तीस पस्तीस व जंबुरीचे चालीस पनास व किल्यावर सिबंदी माणूस दोनसे अडीचसे पावेतो आहे. पाण्याचे टाके येक व तले येक व आणखी पाणी जागा जागा बहुत आहे. किल्याजवळ भावेर व भुलेर दोन टेकड्या मातबर आहेत. भोजन करून भुलेर टेकडी पाहावयास गेले. टेकडी पाहिली. टेकड्यावर सिबंदी नाही. वोस आहेत. तेथून उतरून डेऱ्यास आले. झाडून भोवताले कमावीसदार बोलाऊन प्रांतातील बिगारी आणावयास सांगितले. किल्यावर झाडी बहुत आहे ती तोडावी म्हणून ताकीद केली. कमावीसदार बोलले की तिसा कोसावरून बेगारी येऊन झाडी कसी तुटती. तेंव्हा मोलाचीं माणसे करऊन तोडावयास सांगितले. छ १७ रोज मेण व लाख काही खरीदी केले. भोजन करून प्रहर दिवसा किल्याचे खालून डावा किला घेऊन पाहात चालले. चौथा हिसा किला व कडे खालून पाहिले. तेथे बराणपूर दरवाजाचे पेठेत घडीभर बसले. तेथून लोक वगैर पायउतारा होऊन बराणपूर दरवाज्याने चढून किल्यावर आले. खासे पालखीत बसून आले. वाट बहुत अवघड होती. पालखी भोयाणी डोक्षीवर घेऊन चढले. भोयांस दोन बकरी व दारूची घागर येक देविली, महमद मुसम किलेदार आला, येथील तले बांधावे

म्हणून बोलला तेथे दोन घडी खलबत केले तेथून कचेरीस आले किल्यासभोवती सफेली बांधावी म्हणून बोलले किल्याखाली अलीपेठचे याणी उदमी यांस कौल देऊन त्यास पागोटीं बांधली किल्यास दाणा पुरवीत जावा म्हणून सांगितले छ १८ रोज कुच करून सस्याचा मुा करविला मार्गात तवा नदी साहा कोस होती तेथे मुदबख पाठऊन जाताना भोजने केली तेथून सिकार खेलत मुास आले छ १९ रोज कुच होऊन सुनग्यात रतख्याचे मुास आले मार्गात सिकार च्यार तितर आणले गारयानी मार्गात वाघाची पिली दोन लाहाण आली होती ते वाघणीने दोन मणुशे मारली म्हणून सिकारीचा सरंजाम वाघरा वगैरे मुलताईस ठेविले होते ते आणविले छ २० रोज मुा करून गांवकरास ताकीद केली की गावची माणसे झाडीत घालून वाघाचा शोध करणे गाव करानी फिरून पाहिले परंतु वाघ कोठे ठिकाणी लागेना झाडी बहुत, वाघराहि लावता येत नाहीत तेव्हा राहिले सवदागरानी उट व सा राघे व घोडी आणली होती ती पाहीली त्यात येक घोडा चांगला होता तो फेरयून पाहिला तेथून सिकारीस गेले तेथे येक ससा मात्र आणला तो कुत्र्याकडून धरून मारविला आणखी दोनच्यार तितर मारले छ २१ रोज कुच करून घाट उतरून दहा कोस सरकारखर्यास आले मुास आल्यावर कमावीसदारावर इतराजी जाली लस्कर जवलचे चांगले मार्गे आणावे ते दुसरे झाडीचे लामचे मार्गे घातले छ २२ रोज लस्करचे कुच होऊन पुढे आले स्वारी माघून पाहाडी किला लहाण होता तो घोस आहे तो पाहून खेडीचे मुकामास आले. गायलगड किला पाहावयास जावे म्हणून मजकूर केला छ २३ रोज म्हइसदई दाहाकोस मुकाम जाला मार्गात कोसभर येऊन सिकार येक असल गोल्यानी मारले उटावर घालून आणले मुा आल्यावर पाहिले दोन तोफा व गारद घाट अवघड याजमुले म्हईसदइचे मुकामी ठेविले छ २४ रोज सात कोस खांबले येथे मुा केला मार्गात सिकार खेलत आले छ २५ रोज साहा कोस सकेण येथे मुा केला मार्ग बहुत कठीण, झाडी पाहाड कडे बहुत, बुणगे चुकून दुसरेकडे गेले. डोंगर सातपुड्याचा मार्गात चालताना कड्यांत पडून माणसे व उंट घोडी दहापाच मेली छ २६ रोज लस्कर झाडून सकेणचे मुा येऊन सडे होऊन शंभर दिडसे लोकानसी पाच कोस गायलगडास गेले मागील प्रहर दिवस राहता मधी दरवाज्याने किल्यावर गेले दरवाज्यात येक हाल्या मारला दुसरे दिली दरवाज्यास येक हाल्या मारला छ २७ रोज विठल बलाल वराडचे सुभे आले त्याची भेट जाली छ २८ रोज किला भोवता फिरून पाहिला माचीस दगड मोठाले दोन तीन होते ते सुरग लाऊन फोडविले छ २९ रोज मोचन करून वेंकोजी भोसले वीस कोस नरनाला येथील किला

पाहावयास गेले. खाशानी दगड्यास सुरंग् लाऊन फोडविले. खुशालजी देशमुख याची भेट जाली. तेथून शाहासाहेब पिराचे दर्शनास गेले. छ ३० रोज प्रात:काली पीरपंठा दरवाज्यापासून झाडून किला फिरून पाहिला. किल्यावर च्यार तोफा मातबर, तीस पस्तीस चालीस सेराच्या व लाहाण शंभर तोफ आहे. पाण्याची पाच तली आहेत. सिबंदी पाचसातसे माणूस आहे. छ १ जावली कुच करून लस्कर पुढे सकेनास पाच कोस आले. सात आठा जमातदारास पागोटी बांधली व पेठचे ठाण्यास पागोटी दिल्ही. खुशालजी देशमुखास निरोप दिल्हा. गोसावियाचा मठ वरता आहे. तेथे जाऊन घडीभर बसले. गोसावीबावा याणी वस्त्रे खाशास दिल्ही. तेथून साईकाली मुकामास आले. छ २ रोजी तेथे मुा केला. साइकाली वेंकोजी भोसले नरनाला पाहावयास गेले होते ते आले. छ ३ रोज कुच करून साहा कोस खांबल्यास मार्गात सिकार खेलीत आले. छ ४ रोज सात कोस म्हईसदईस आले. छ ४ रोजी संक्रात होती. तेथे मुा केला. छ ५ रोज साहा कोस लालखेडी प्रो सातनर येथील मुास आले. मार्गात सिकार खेलत आले. छ ६ रोज साहा कोस वीरगावचा मुकाम करविला. मार्गात तापीवर स्वयंपाक करऊन भोजने केली. तेथून सिकारीस गेले. च्यार हरणे मारली. छ ७ रोज पाच कोस आटनेरास आले. सिवार मुलुक तुडवितो याजकरिता मागती मुलताईवरून आले. छ ८ रोजी मुलताईस साहा कोस आले. मार्गात सिकार केली. चिल्याकडून अकरा हरणे धरून आणली. छ ९ रोज पंधरा कोस पाढुरणेयाचा मुा करविला. छ १० रोज पंधरा कोस केलवदेस आले. मार्गात करकोच्या वहीरससाण्याकडून च्यार धरविल्या. राजश्री बाबुराव वैद्य नागपुराहून आले त्याची भेट मागील प्रहर दिवस राहाता जाली. परसोजी भोसले व मुछदी मंडळी नागपुराहून आले. त्यांची सर्वांची भेट जाली नंतर मुास आले. छ ११ रोज अदाशास मुास आले. छ १२ रोजी कुच करून लस्कर इंदुलीस नागपुरानजीक आले. स्वारी मागे सिकारीस गेली. च्यार तितर घेऊन मुास आले. तेथे हाजामत करून भोजने जाली. श्रीगणेशाचे दर्शण करून स्वारी निघोन साइकाली इंदुलीस नागपुरानजीक आले. तेथे नागपूरचे लोक वगैरे सर्वांच्या भेटी जाल्या. सर्वांणी नजरा केल्या. समागमे फौज आठ-दहासे होती. शंभर गारद दोन तोफा लहाण बाणाचे उंट पाच, हती तीस होते. वरकड काही ढाल निशाण नौबत व जरीपटका हे अगदी काहीच बरोबर नवते. मुलुक वोशाढ. वैराण धारण वारा सेर होती. झाडी व डोगर बहुत. मार्ग चांगला नाही. लस्कर बहुत हैराण श्रमी जाले. उंटे व घोडी माणसे मार्गात चालताना कड्यात पडून मेली. छ १३ रोज अकरा घटका पौर्णिमा होती, अकरा घटकानंतर गुरुपुष्य मुहूर्त होता, तेव्हा वाड्यात

आले चिमाबाईची भेट घेऊन कुशाबा चिटणीस याचे घरास स्वारी गेली त्यास बहुत समाधान नाही म्हणून अर्ध घटका बसून सकरदरियाचे बागात गेली तेथे लक्ष्मीनारायेणाचे दर्शण करून तोफा पाहिल्या छ १४ रोज माहादाजीपंत कुटे यांचे चिरंजीव श्रीकासीस जातात त्यास मार्गाचा बदोबस्त करऊन देऊन त्यास रवेष्ठ दिल्ही इकडे पाऊस मागती लागला आहे गारा पडतात कल्पतेश्वराकडील मिस्तर जारज इंग्रेज नागपुरास होता तो येक दोन दिवस आजारी होता त्यास छ २८ राखरी देवआज्ञा जाली जेजोरीकर श्रीकृष्णभट येथे होते त्यास मुळचाही आपणावर पटी करून साडेतीनसे शो करून दिल्हे खाशानी काही दिल्हे नाही शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

र मै ८८
फा मै १३
प कृ २८

२९१

१९ फेब्रुवारी १७९१

श्री

पौ छ १ रजब इहिदे तिसैन

शेवेसी श्रीराम सदाशिव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता छ १५ रोज जमादिलाखर मुा नागपूर स्वामीचे कृपावल्गेकणेकरून शेवकाचे वर्तमान येयास्थीत असे विशेष येथून च्यार हजार फौज देऊन राजश्री भवानी काळो याचे पुत्रास कर्नाटकात राजश्री तात्या याजकडे रवाना करितात त्यास वस्त्रे जाली आठा पंधरा दिवसी येथून निघतील त्यास राजश्री बाबुराव वैद्य याणी मजला आज बोलाऊन सांगितले की राजश्री तात्या याजकडे फौज जाती याजबरावर तुम्ही जा म्हणून बोलले त्यास मी उत्तर केले की तुम्ही जा म्हणता आणि श्रीमंत राजश्री नाना रागे भरतील तर कसें आम्ही श्रीमंतास लिहितो म्हणून बोलले. त्यास मीही श्रीमतास लिहितो, आज्ञा येईल त्याप्रो करीन म्हणून बोललो त्यास फौजेबरावर यावे किंवा नागपुरासच असावे काय आज्ञा येईल त्याप्रो करीन हे जा म्हणतात परंतु विना स्वामीची आज्ञा आल्यासिवाय जात नाही पत्रे डाकेबा पाठविली याजमुळे वरकड मजकूर लिहिला नाही हे फौजेबरावर जा म्हणतात याचा अर्थ व कुन्हा समजला आहे जोडी येईल त्या पत्री मागाहून सविस्तर सेवेसी लिहीन आज्ञा येईल त्याप्रो करीन, शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

र मै ८८
फा मै १३
प कृ. २९

२९२

२० फेब्रुवारी १७९१

श्री

शेवेसी श्रीराम सदाशिव विज्ञापना ता छ १६ जमादिलाखर येयास्थीत असो विशेष, राजश्री तात्या याजकडे राजश्री भवानी काळो याचे पुत्रास च्यार हजार फौज

देऊन पाठवितात. त्यास वस्त्रे होऊन मुहूर्ते करून बाहेर राहिले. आठा पंधरा दिवसी जातील. त्याज राजश्री बाबुराव वैद्य शेवकास म्हणतात फौज कर्नाटकात जाती याजबराबर तुम्ही जा. फौजेबराबर तुम्ही जा म्हणावयाचे कारण की पहिले पासून येथे मुछ्द्यांस वगैर मल्हारजी ना। दताजी ना। यास सर्वास माझी आडचण व नाईकानी माझी स्पर्धा व कुचेष्टा बहुत केल्या की यांस कसेहि येथून काढून द्यावे. म्हणून नाईकानी मुछ्द्यांस येक दोन वेल सांगून कुशाबा चिटणीस याजकडून सांगविले की सदाशिवपंतासारख्याच्या मेखा उपटून दिल्ह्या होत्या तेव्हा दुसरे तिसरेयाचा मजकूर काय आणला आहे. सर्वांचे मानस की यास कोठेहि पेचात धरून येथून काढून द्यावे. मुछ्द्याची प्राप्त नाही की मजला म्हणतील! असे कोणाच्याणे म्हणवत नाही. नाईकानी मुछ्द्यास बहुता प्रकारे सुचविले परंतु त्याच्याणे काही न होये. तेव्हा अता बाबुराव वैद्य आल्यावर त्याची व नाइकाची येक गटी पहिली होतीच. अता बहुत खुशामतीत व बाबुराव नाईकाचे खुशामतीत बहुत आहेत. नाइकानी बाबुराव यास बोध केला की श्रीराम सदाशिव यास बराबर लाऊन द्यावयाचे करावे, येथे कामाचा नाही. हे संमत मुछ्द्यानी व उभयता नाइकाही मिळून बाबुराव यास सुचविले आहे. नाईक स्पर्धा व कुचेष्ट बहुत करितात की हे किलमीस सर्वांचे चितात सलते, यास कसेहि काढून द्यावे असे रंगढंग व हुंनेर बहुता प्रकारचे नाईक करितात. दताजी नाचे महत्व व प्रत्यदुण येथेच बहुत आहे. त्याचे सांगितल्याप्रा। बाबुरावहि त्याचेच मिलतीत, मिळून सेवकास फौजेबरावर लाऊन द्यावे असे सर्वांचे लक्ष. बाबुराव याचे तैनातीस दोघे नाईक आहेत, त्यात एकाणे फौजेबराबर जावे—त्याचे सामान सरंजाम यथास्थीत उभयतास पाल पडताल राहुट्या घोडी व जासूद जोड्या अधिक आगल्या अफ्तागिरे सर्वा गोष्टीने त्यांचा बंदोबस्त चागला. त्यास पाठवावे ते त्यासी बाबुराव याच्याणे अधिक बोलवत नाही. नाइकाची उफराटी खुशामत करितात, असे त्याचे अधिपत्य येथे आहे. मी त्यास बहुतच खुपतो. मी येथे नसलो म्हणजे नाईकाचे व बाबुराव याचे समाधान. स्वस्थ शालजोड्या व शेलेपागोटी मेलवावी, खायास खर्चास आनंद, सोण्याच्या कंठ्या व कडी घालावी. असो. त्याचे दैवे करून त्यास मिलते, त्याचा मी द्वेश करीत नाही, परंतु माझ्या कुचेष्टा करावयास चुकत नाहीत. आता बाबुराव यासी मिळून हे उपस्थीत केले की तुम्ही फौजेबराबर जा. त्यास स्वामीनी सेवकास बाबुराव याचे तैनातीस करून दिल्हे नाही की त्याचे म्हटलेवरून जावे. स्वामी आज्ञा करतील त्याप्रा। करीन. फौजेबराबर पाठवावयास बाबुराव स्वामीस गैरसमजूत बहुत लिहितील. त्यास स्वामीस पहिलेपासून माहीतच आहे. नाईकाचे व बाबुराव याचे बोलण्याचा अर्थ व कुन्हा स्वामीस कळावा म्हणून इतके लिहिले. काल

छ १५ मिनहूचे येक पत्र श्यो लिहून डाकेयरावर पाठवावयास बाबुराव याची पत्रे जात होती त्याजवळ दिल्हे, ते स्वामीस पावेल की फोडून वाचून मधे ठेवतील हे न कले त्यात दुसरा मजकूर काही लिहिला नाही. फॉनेनरावर जा म्हणतात स्वामीची काये आज्ञा ? इतकेच लिा, तुमचे तैनातीस दोघे नाईक आहेत त्यास पाठवणे श्रीराम सदाशिव यासी तुम्हास कारण नाही म्हणून बाबुराव यास येक पत्र स्वामींनी पाठविले पाहिजे नाहीतर बाबुराव शेवकासी स्पर्धा धरतील म्हणून स्वामीचे पत्र यास असावे शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

र. नं ८८
फा नं १३
प नं ३०

२९३

२१ फेब्रुवारी १७९१

श्री

शेवेसी श्रीराम सदाशिव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ताा १७ जमादिलाखर मुा नागपुर येथास्थीत असो विशेष राजश्री रघोजी भोसले याजकडील दिनच्चर्या छ १६ जमादिलावल स्नान करून पहिले च्यार घडी दिवसास स्वारी जानो येशवंत पागा याचे घरास गेली त्याचे मातुश्रीस देवाज्ञा जाली तेथे घडीभर बसून इंग्रजाचे घरास गेले. येक इंग्रज वारला, येक आहे त्यास दुखोट्याची घर्ने देऊन आले तिसऱ्या प्रहरी किल्यात बुराणशाचे घरास गेले. बुराणशास पेशजी चितळ्याने सिंग मारले त्या जखमेने बहुत श्रमी होत आराम होऊन उठावे असे नवते परंतु काही आयुशमर्यादे करून उठून स्वस्थ जाले त्यास बहुत आनंद जाला की घरचे मुलालेकरांस निरऊन मोईवर उतरले होते असे असोन ईश्वरे वाचविले म्हणून सर्वास आनद जाला शहरचे लोकानी वगैर बुराणशास वस्त्रे सर्माणी दिल्ही तेथे च्यार घडी कल्यातांचा तमाशा पाहिला खाशाणी त्यास वस्त्रे दिल्ही बुराणशा बहुत थोर माणूस, कोणाचे कामात वऱ्या वाइटात नाही, आपले गरीबीने आहे म्हणूनच याचे राज्यात टिकून आहे तेथून स्वारी सकरदरीयास गेली तोफा पाहून आले छ १७ रोज प्रात काळी स्नान करून बाबुराव वैद्य यासी च्यार घडी खलबत केले तिसरे प्रहरी स्वारी जागेश्वरास गेली. छ १९ रोज मागील च्यार घडी रात्रीस कोणास कळू न देता पालखीत बसून येकटेच तीन कोस करकोच्या मारावयास गेले तों तेथे माणसाचा जमाव फार मिळाला करकोच्या काही मिळाल्या नाहीत तेथून आल्यावर स्नान केले तिसरे प्रहरी कुशाबा चिटणीस याचे घरास गेले त्यास आठपधरा दिवस समाधान वाटत नाही तेथे क्षणभर बसून भवानी काळो याचे घरास गेले स्वारी करून आले म्हणून भवानी काळे याणी वस्त्रे दिल्ही. तेथून मानसिंग मोहिते याचे घरास गेले तेथे घडीभर बसून आले छ २० रोज प्रात काळी हाजामत केली स्नान करून च्यार घडी बाबुराव यासी खलबत

केले. साइकाली बाबुराव यास घेऊन सकरदरीयास गेले. तेथे झाडून तोफा वैद्यास दाखविल्या व दीड प्रहर रात्रपावेतो तेथे राहून दोन तोफा वोतविल्या. छ २१ रोज प्रातः-स्नान करून मुछद्यांस व शरीरसंमंधी लोक यास वगैर उपाधे बोलाऊन परसोजी भोसले याचे लग्नाचा तिथिनिश्चये माघ वद्य द्वितीयेचा केला. शरीरसंमध कृष्णाजी मोहिते यासी केला. छ २३ रोज स्नान देवपूजा करून भवानी काळो यासी च्यार घडी खलवत केले. वराडात वेंकोजी मोहिता गढी वलकाऊन यासी वदलून आहे त्याजकडे पाचसातसे लोक व गारदी देऊन गुडो शंकर यास वस्त्रे देऊन रवाना केले. तिसरे प्रहरी स्वारी सकरदरियास गेली. तेथे रमण्यातील हरणे चितले पाहून आले. छ २४ रोज प्रहर दिवसा तल्याजवल लग्नाचे मांडवाची जागा जाऊन पाहिली. साइकाली लक्ष्मीनारायणाचे दर्शणास गेले. येकादसी होती. छ २६ रोज वाघाची बातमी आली. प्रहर दिवसा जाऊन तीन कोस सोणेगाव येथील राणात जाऊन वाघ माहाताने हातीवरून भाल्याने मारला. बाबुराव वैद्य समागमे होते. त्यास सोणेगावचा बाग दाखविला. तेथे दोन घडी बसून साइकाली आले. छ २८ रोज प्रहर दिवसा तल्याजवल मांडवाची जागा जाऊन पाहिली. तेथून कागदाचा बाग करतात तो पाहिला व दारूचा कारखाना पाहिला. छ १ जमाखर रात्री वाड्यात इंग्रजाचे साकलीचा धका बसतो त्याचा तमाशा पाहिला. प्रहर दिवसा जामदारखान्यात कापड पाहिले. मानपा घाटगे याचे मेजवानी जाली. खासे मंडळी भोजनास गेले होते. छ २ रोज सकरदरीयास लक्ष्मीनारायेणाजवळ वसंतपंचमीचा उछाहा कथा कलवाताचा नाच होतो. तेथे शहरातील बाजार नेऊन भरविला. दोन घडी तमाशा पाहून आले. छ ४ रोज तिसरे प्रहरी वसंतपंचमीस मुछदी वगैर लोक मिलोन सकरदरीयास गेले. तेथे च्यार घडी नाच जाला. लळीत आर्ती करून प्रहर रात्री आले. छ ६ रोज बाळाजीपंत जामदारखाने याचे घरी गडगनेर जाला. दोन प्रहरी भोजने करून खाशास वस्त्रे दिल्ही. साइकाली जिवाजीपंत कोलटकर मुजुमदार याचा गडगनेर. तेथे भोजने करून सर्वांस वस्त्रे दिल्ही. छ ७ रोज वेंकोजी भोसले याचा गडगनेर तेलंगखेडी येथील बागात प्रहर दिवसा तयार होऊन मुछदमंडळी वगैर मानकरी झाडून हातीवर बसून पुढे कलवांताचे तकतराव दोन व गवई व वाजंत्र्याचे ताफे आणून दोन कोस मिरवत गेले. तेथे मराठे मंडळीची भोजने जाली. कलंवताचा तमाशा जाला. तेथे खाशांस व मुछद्यांस वगैर शागीर्द पेशास सर्वांस वस्त्रे दिल्ही. तेथे बाबुराव वैद्य आले. समागमे उभयता पुत्र व माणसे पालखी होती. इतक्यांस दरवाज्यावर प्यादे जाऊ देईनात. तुम्ही येकटे जा म्हणून बोलला. सर्वांस जाऊ द्यावयाची

परवानगी नाही। तेव्हां वैद्य रागे भरून माघारे फिरले मुछदी मंगीर शाहून बागातील माडीवर होते वैद्य रुसून चालले म्हणून दताजी नाइकाने येऊन यांस समजाऊन बागात घेऊन गेले तेव्हा तेथे मुछद्यांस बहुत फडफडून रागे भरून बोलले कीं, काय वेडे हो, बारा छुचे बारा शोधे मिळाल्यात यात येकही शाहाणा योग्य नाही भवानी काळेस म्हणाले कीं, असीच वेडे हो, बक्षीगिरी गमवली आणि साबाजी भोसले मारविले छ ८ रोज मुगटराव याचे गडगनेराची वस्त्रे घेऊन सिवराम हरी खाजगीवाले याचे घरी भोजने केली. खाशांस सर्वांस वस्त्रे दिल्ही तेथून जानो यशवंत पाग्या व जनार्दन विश्वनाथ व बिसाजी ठमाजी व बाबुराव पाल्कर यांचे सर्वांचे घरी वस्त्रे गडगनेराची दिल्ही. छ ९ रोज प्रात काळी यागनिश्चयास सर्वास बोलाविले. भवानी काळो बाख्यात येईनात बाबुराव वैद्य या प्रो बोलले, तेव्हा त्यासी कांही बोलतो असतो तरी तुमचे मसलतीस काही विक्षेप व्हावा यात ठीक नाही मी कासीस जातो, सत्य कासीवास करितो, तुमचे घरी लग्न आहे तरी सोयेऱ्याचे मांडवात च्यार दिवस येईन या प्रो सांगून पाठविले तेव्हा कुशाबा चिटणीस याजला दोन बेल त्याजकडे पाठविले, परंतु आले नाहीत तेव्हा वैकोजी भोसले यास पाठविले ते घेऊन आले नवरीचे मांडवात जाऊन यागनिश्चये केला हलेद लागली. साइकाळी जिवाजी माहादेव फडणीस व येसभट व बावा उपाधे याचे घरी गडगनेराची वस्त्रे दिल्ही छ १० रोज पेठेत अक्षत वाटायास वैकोजी भोसले गेले व शहरात खाशाणी अक्षेत दिल्ही. नारायेणदास किलेदार व महमदअली पठाण घरी याचे गडगनेराची वस्त्रे खाशास दिल्ही छ ११ रोज बाळबाई याचे घरी गडगनेर जाला दोनप्रहरी भोजने करून वस्त्रे दिल्ही परसोजी भोसले यास सिरपेच दिल्हा साइकाळी ठकाबाई याचे घरी वस्त्रे खाशास, परसोजी भोसले यास सिरपेच व घोडी रास येक दिल्ही. बाबुराव वैद्य यासही तेथे वस्त्रे दिल्ही सर्वांचे आर्जवात खुशामतीत बहुत आहेत तेथून मावसीबाई व जानोजी गुजर याचे घरी वस्त्रे दिल्ही साइकाळी मुराणशा राजे व कृष्णाजी गोविंद चिटणीस याचे घरी वस्त्रे दिल्ही छ १२ रोज बाबुराव वैद्य याचे घरी गडगनेर जाला भोजने केली वस्त्रे दिल्ही व घोडी रास येक दिल्ही तेथून वैकोबाशास्त्री व तुकोजी नलावडे याचे घरी सर्वास वस्त्रे दिल्ही तेथून नाना भाटगे व मुरादबेग व नूरमहमद व मैनाबाई निंबाळकर व लक्ष्मणराव पाटणकर सर्वांचे घरी वस्त्रे दिल्हे छ १३ रोज प्रात काळी बळवंतराव भवानी यास वस्त्रे दिल्ही येक मोत्याची कंठी दिल्ही फौजेची नेमणूक करून कर्नाटकात रा करितास दोनप्रहर मानसिंग मोहिते याचे घरी गडगनेर जाला भोजने करून सर्वास वस्त्रे दिल्ही परसोजी भोसले यास सिरपेच दिल्हा तेथून महादाजी राम

याचे घरी वस्त्रे दिल्ही. तेथून श्रीधर लक्ष्मण मुनसी याचे घरी वस्ले दिल्ही. परसोजी भोसलेस येक सिरपेच दिल्हा. कुशाबा चिटणीस याचे घरी वस्त्रे व परसोजी भोसले यास सिरपेच दिल्हा. तेथून श्रीमानशास्त्री व दामाजीपंत याचे घरी वस्त्रे दिल्ही. प्रहर रात्रीस भवानी काळो याचे घरास गेले. तेथे भोजने केली. कलवाताचा तमाशा च्यार घडी जाला. सर्वांस वस्त्रे दिल्ही. परसोजी भोसले यास सिरपेच व तुरा दिल्हा. छ १४ रोज माधोजी नाईक काले याचे घरी गडगनेर जाला. भोजने करून वस्त्रे दिल्ही. तेथून बाळाजी नाईक व बगाजी रघुनाथ व मुरारजी नाईक गडकरी व वानवले व धोंडो महादेव व मानाजी व साळोंके व शावाजी घाटगे व गाहादजी लस्करी व सखाराम बक्षी इतक्याचे घरी वस्त्रे दिल्ही. छ १५ रोज प्रहर दिवसा आपाजी गोपाल याचे घरी वस्ले घेतली. तेथून मुकुंद कृष्ण नि॥ पाटणकर व मुरादखा व यशवंत हरी नि॥ गाडद व महिपत दिनकर छतीस-गडचे सुभे व महमद अगीखान व हैबतखान इतक्याचे घरी गडगनेराची वस्त्रे घेऊन आल्यावर दोन प्रहरानंतर देवप्रतेष्टा वसली. छ १६ रोज माघ वद्य २ रविवारी गोरज लग्न लागले. समारंभ होईल याचा मजकूर मागाहून शो लि॥. बाबुराव वैद्य येथे आल्यापासून मुछ्याचे वगैर सर्वांचे आर्जवात खुशामतीत प्रस्तुत बहुत आहेत. सर्वां मुछ्याचे घरास जात असतात. दररोज पेशजी येथे होते तेंव्हा भोसले याचे वाड्यात दोन दोन महिने जात नवते. आता पहिल्या प्रो कर्डा वोल व जरबेचा जावसाल नाही. आतां सौम्य प्रवृत धरली आहे. पुढे कसे होईल ते पाहावे. सोमलपूरचा किला फितूर होऊन याचे लोक पडकोटात येक महिणा होते, परंतु त्यांस कुमक लौकर पोहचली नाही. कुमक लौकर पोहचली असती तर किला आला होता. मागे जानोजी भोसले याणी येक दोन वेल खटपट चांगली केली. तेंव्हा किला आला नाही. आता स्वल्पात किला हस्तगत जाला असताना गेला! कुमकेविसी त्यांचे पत्र आले. परंतु त्यास कुमक लौकर पाठवावी असी बुधच कोणास सुचेना. येका महिन्यानी कुमक पाठविली तो तेथे फितुराचा बंदोवस्त करून जमयत मेलऊन याजकडील लोक पडकोटात होते ते काढून दिल्हे. परसोजी भोसले याचे लग्नाचा हर्ष व आनंद खाशास बहुत आहे आणि चिमाबाई खंडोजी भोसले याचे स्मरण होऊन आज आठच्यार दिवस बहुत रडती. खासे कोठे बाहेर गेले म्हणजे बहुतच मोठ्याणे रडती. खाशास म्हणती कीं, कायरे, असे केल तुज देखवत नवत तर त्याजला येखादे किल्यावर टाकावयाचे होते, याप्रो दुख आठऊन बहुत शोक होतो. त्याचें पुण्य थोडे आणि आयुश सरले हे खरेच, परंतु याणी कुडत्रीम केले त्याची चर्या लोपत नाही. रघोजी भोसले दैवान, जानोजी भोसले याचा खजाना गायलगडावर याचेच

हातीं साबाजी भोसले याची दौलत याजमुळेच दर्यावाइचे जवाहीर वगैर याचे हातीं लागले. घरात खुळ काहीमात्र राहिले नाही बिंबाजी भोसले काही होते ते मारले खंडोजी भोसले याची गत्य असी केली आता पूर्वसमुद्रपर्येत मुद्दख याचाच येक वेंकोजी भोसला आहे तो बुव्ह ते कशात जमा, असल काय नसल काय लग्नसमंधी काही ब्राह्मणभोजन अथवा धर्मकार करावयाचे काही दिसत नाही, पुढे होईल ते सेवेसी लिहीन शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

रु. नं ८८
फा. नं १३
प क्र. ३२

२९४

२३ मार्च १७९१

श्रीराम

शेवेसी श्रीराम सदाशिव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता छ १७ रजब मुकाम नागपूर येथास्थीत असो विशेष छ १७ जमादिलाखरी प्रहर दिवसा पठाण लोक याणी सर्वाणी खाशास आहेर केले दोन प्रहरा मांडवात जाऊन मुछ्यांसी वगैर लोकांसी च्यार घडी हलदीचा रग खेलले छ १९ रोज प्रात काली मानकरी मंडळी वगैर सर्वाणी आहेर केले तिसरे प्रहरी मांडवात जाऊन घडीभर हलदीचा रंग खेलले च्यार घडी रात्रीस साडे करून वरात काढून वाड्यात येऊन वारा घटकेत लक्ष्मीपूजन केले मुलीचे नाव कासीबाई आहे दुसरे नाव ठेवले नाही मूल आठ वर्षाची आहे (सा) दे जाले तेथे उपाध्यास व खाशांस वगैर वस्त्रे व्याही याणी दिल्ही. वस्त्र वगैर सर्व यांचेच, नांव मात्र सोयेऱ्याचे छ २० रोज रघोजी भोसले व मुधोजी भोसले यांचे घडगे आहे तेथे मोहर पाया पडावयास नेले होते छ २१ रोज शरीरसमंधी यास वगैर लोकांस लग्नाची वस्त्रे दिल्ही. साइकाली स्वारी सुरसिंग माने याचे घरास गेले तेथे मुलीचे लग्न जाले तेथे घडीभर बसून आले छ २२ रोज स्नान करून च्यार घडी खलबत भवानी काळो यासी केले. तिसरे प्रहरी स्वारी सिताबर्डीवर बलवंतराव भवानी याचे राहुटीस गेले दोन घडी खलबत करून आले भवानी काळो व मुनसी यांस माबुराव वैद्य याचे घरी मेजवानी जाली. छ २४ रोज प्रात काली स्नान देवपूजा करून च्यार घडी खलबत केले. साइकाली स्वारी जागेश्वरास गेली वेंकोजी भोसले यास येक दोन दिवस ज्वर येत होता व आंड येफारला त्यास शेकले, त्याजमुळे समाधान नवते छ २५ रोज प्रात काली वेंकोजी भास्कर गायलगडकर किलेदार यास निरोप जाला त्यास वस्त्रे दिल्ही दोन प्रहरी शामराव रामचंद्र याचे घरास गेले लग्नाचा गवगनेर राहिला होता, तेव्हा अवकाश जाला नाही आज खाशास वस्त्रे दिल्ही. तेथून किसनसिंग याचे घरास गेले. तेथे खाशास व मुछ्द

वेंकोबाशास्त्री याचे घरास गेले शास्त्रीबावा याणी नया अग्नी करून होम केला शास्त्रीबावा बरोबर तल्यात अवभृतस्नानास गेले तेथे सर्वांणी स्नान करून आले साइकाली जागेश्वर माहादेवाचे दर्शनास गेले छ ९ रोज प्रात काली स्नान देवपूजा जाल्यावर माधोजी ना काले यासी घडीभर खलबत केले दोन प्रहरी श्रीमानशास्त्री याचे घरी भोजनास गेले शास्त्रीबावा कासीहून आले म्हणून खाशास भोजनास बोलावले साइकाली सफरदव्यास गेले. तेथे रमण्यातील हरणे चितले सांबरे पाहून आले छ १० रोज प्रातःकाली स्नान करून नाना उपाधे याचे घरास गेले तेथे होम जाला घडीभर बसून आले रात्री वाड्यात पोऱ्याचा तमाशा जाला खाशानी घडीभर पाहिला छ १२ रोज स्नान करून प्रहर दिवसा केदारजी मोहिते याचे घरास गेले त्याचे पुत्राचे लग्न आहे त्यास हलेद लागली. तेथे घडीभर बसून बाबुराव पालकर याचे घरास गेले तेथे मुलीस हलेद लागली साइकाली सावतखां पठाण याचे घरास गेले प्रहरभर लाली कलवातीन पुण्याची आली तिचा नाच जाला तेथे खाशास व मुत्सद मडळीस वस्त्रे दिल्ही खाशास घोडा रास येक नजर केला लग्नापूर्वी गडगनेर करावयास फावले नाही म्हणून आज केला छ १३ रोज स्नान करून देवघरात भवानी काळे यासी दोन प्रहर खलबत केले. साइकाली हुताशनीची पूजा केली, हुताशनीत येक बकरे टाकले छ १४ रोज प्रात काली नजरबागात च्यार घडी कलवाताचा तमाशा जाला दोन घडी पोऱ्याचा तमाशा जाला छ १५ रोज वेंकोजी भोसले याचे रुद्रसी लग्न प्रात काली नजरबागात लावले त्याचा शरीरसमंध कानोजी गुजर यासी केला मूल आठ नव वर्षाची आहे त्याचे वागनिश्चयास खासे गेले. कानोजी गुजर याचे घर दूर पडते याजकरिता वाड्याजवल ठकाबाई याचे घरी मांडव घातला तेथे मुलीस आणून वागनिश्चय केला हलेद लागली. छ १६ रोज प्रातःकाली हजामत केली मानकरी वगैर शरीरसमंधी यास भोजनास बोलावले होते. साईकाली स्वारी बाबुराव पालकर व कुशाबा चिटणीस व वेंकोजी भोसला याचे घरास गेली मुलीची लग्न लागली घडीभर बसून आले वेंकोजी भोसले याचे लग्न उदईक आहे परसोजी भोसले याचे लग्नात काही ब्राह्मणभोजन केले नाही, येका ब्राह्मणास अन्न घातले नाही, व भाकारही दिल्हा नाही लग्न जाल्यावर आठदाहा दिवसी गावाचे ब्राह्मणास मात्र हजारपाचसे रुो दिल्हे लग्नास शोभा किंवा समारंभ काही काडीमात्र जाला नाही. घरात चिमाबाई व गगाबाई पंधरा दिवस रडत होते बाहेर शहरचे लोकांस व शागीर्दपेशास यांस देखील येक दिवस अन्न मिळाले नाही खाशांस मात्र आनंद हर्ष उत्साह बहुत जाला शहरचा सावकार वाणी असतो तो चांगले लग्न करितो परसोजी भोसले याचे पहिले लग्न काही चांगले केले नाही. मुत्सद मंडळीस वगैर कोणासच अन्न घातले नाही,

मराठे मराठे दोन दिवस जेवले आणि बारगीर पठाण व शरीरसंबंधी यांस शंभर दोनसे लोकास वस्त्रे मात्र दिल्ही इतका खर्च. वरकड खर्च काडीमात्र नाही. लग्नास खर्च आठ हजार कदाचित दाहा हजार रुो लागले, परंतु लग्नसमंधे मिलकत चागली जाली. गडगनेरची व आहेराची वस्त्रे दोन लक्ष रुो आलीं. आणखी प्रातावर व सिलेदार व शागीर्दपेशा यांजवर अहेरपटी दोन लक्ष रुो करणार. लग्न चांगले जाले. दहा हजार खर्च लागला आणि दोन तीन लक्षाची मिलकत जाली! सिलेदार खासे खासे शंभर दोनसे भोजनास बोलावले होते. वरकड झाडून सिलेदार यास किंवा झाडून शागीर्दपेशास कोणास अन्न घातले नाही, तेंव्हा शेहरचे गोरगरीब यास कोण घालतो. शागीर्दपेशाचे लोक रडतात कीं येक दिवस जेवावयास तर मिळाले नाही, परंतु आहेरपटी, येकयेक रोजमरा तो वजा पडली. बल्वंतराव भवानी कर्नाटकात पाठवावयास येथून मात्र जलदी करून रा। केले. परंतु ते उमरावतीवर वराडात आहेत. जवल तीनच्यारसे लोक आहेत. वरकड लोकाचा बंदोबस्त नाही. लोक येथून वरचेवर जातात. पाच हजार फौज जाती म्हणून आवाई आहे. परंतु दोन हजार कदाचित अडीच हजार जाईल. फौज चाकरीस आली म्हणून नाव मात्र आहे. परंतु फौजेत जीव नाही. त्याचा बंदोबस्त नाही. बाबुराव वैद्य आले तेंव्हा पाचसे रुो त्यास मेजवानी दिल्ही व उभयता पुत्रास व त्यास तीन तीन पोशाख दिल्हे. व प्रस्तुत पाच हजार रुो खर्चास दिल्हे. माहादाजीपंत लस्करी फडणीस याजकडे पेशजी लोकाचे व माहालचे कामकाज झाडून होतें, त्यास आलीकडे कोणी जादू केली न कले. त्यास बुद्धीभ्रंश जाला. पिसे लागल्या प्रो बोलण्यात चलतो! आता बाहेर येत नाही. आठ दिवस निजून राहिला. या मुलकात जादू बहुत करितात. दुष्ट लोक. कोणी डोईजड जाला, देखवेणा, म्हणजे त्यास जादू करावी. बाबुराव वैद्य शेवकास म्हणतात, तुमचे आंड कुजले येथे बसून, आता येथून जा म्हणतात. शाो श्रुत होय हे विज्ञापना. हे पत्र लिहून तिल-गुलाची जोडी सरकारची आली होती येथून गेली, त्याजबाा पाठवावयास पत्र लिहून ठेविले. त्या जासुदास मल्हारजी दताजी नाो याणी सांगितलें कीं, श्रीरामपंताची पत्रे नेऊ नका! त्याणी आपली पत्रे त्याजबाा पाठवीली. नाईकानी सांगितल्यावरून माझी पत्रे नेली नाहीत. याकरिता आतां पाठविली. शेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

रु. नं. ८८
फा. नं. १३
प. क्र. ३२

२९५

४ मे १७९१

श्री

शेवेसी श्रीराम सदाशिव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तां छ २९ साबान मुकाम नागपूर येथास्थीत असो विशेष. राजश्री सेनासाहेब सुभा याजकडील दिनच्यर्या.

छ १८ रजब गुरुवारी साईकाली राजश्री वेंकोजी भोसले याचे लग्न लागले छ १९ रोज प्रातःकाली मुछदमंडळी वगैर सर्वांणी आहेर केले तिसरे प्रहरी मिरवत गुलाल खेलत सोयेऱ्याचे मांडवात भोजनास गेले भोजने केली दोन घडी कलवंताचा तमाशा जाला छ २० रोज बुराणशा गोंड राजा याणी आहेर केला रात्री साडे वगैर करून दोन प्रहर रात्री वाड्यात येऊन लक्ष्मीपूजन केले छ २२ रोज तिसरे प्रहरी स्वारी चिनापटणकर जोसी आले आहेत त्याचे बिराडास गेली तेथे अर्धघडी बसून तेथून जागेश्वराचे दर्शन करून आले छ २३ रोज प्रात काली स्नान देवपूजा करून च्यार घडी खल्वत जाले. तिसरे प्रहरी स्वारी बाबुराव वैद्य याचे घरास गेली त्याचे ज्येष्ट पुत्रास ठेस लागून पडले ते किंचित लागले याजमुळे खासे पाहावयास गेले होते साइकाली स्वारी जमालखां पठाण मुणेरीकर याचे घरास गेली. तेथे खाशास वस्त्रे दिल्ही च्यार घडी कलवाताचा तमाशा जाला लग्नाचा गडगनेर राहिला होता तो आज जाला छ २४ रोज प्रात काली स्नान करून स्वारी सक्करदरीयास खासे व चिमाबाई वगैर बाइका मंडळी गेले लक्ष्मीनारायेणा जवल कथा जाली एकादसी होती म्हणून तेथेच बागात साइकाल पावेतो फर्मिले छ २५ रोज स्नान भोजन करून च्यार घडी खल्वत भवानी काळे यासी केले तिसरे प्रहरी जुन्या वाड्यातील चौकात जेठीची कुस्ती तीन जोड्यांची जाली चिमाबाई वगैर बायकांची मंडळी माडीवर बसले होते प्रहरभर कुस्तीचा तमाशा पाहिला छ २६ रोज प्रात काली हजामत केली स्नान करून मुछद मंडळी व उपाधे व शास्त्रीमंडळी बोलाऊन आरसे माहालात बसले लाली कलवातनीचा नाच दोन घडी जाला तेथे आहेराची वस्त्रे स्वामीकडील सर्वांणी घेतली साइकाली स्वारी इंग्रजाचे घरास गेली तेथे मेजवानी जाली खाशास वस्त्रे दिल्ही छ २७ रोज नरोजी जाचक याचे घरी मेजवानी जाली. तेथे भोजने करून खाशास वस्त्रे दिल्ही तेथून नारायेणसिंग याचे घरी मेजवानीची वस्त्रे दिल्ही तेथून कुशाबा चिटणीस याचे घरी मुलींची दोन लग्न जाली म्हणून त्याचे घरी मेजवानीस रात्री स्वारी गेली मुछद-मंडळी बाइका होते बाबुराव वैद्य होते च्यार घडी लाली कलवतनीचा नाच जाला खाशास वस्त्र दिल्ही छ २८ रोज स्नान देवपूजा करू^{न} प्रहर दिवसा बाहेर लग्नाचे मांडवात जाऊन लग्नाची गुर दक्षणा काही राहिली होती ते ब्राह्मणास दिल्ही ब्राह्मणास प्रदक्षिणा केल्या साइकाली राजश्री तात्या यांजकडील आहेराची वस्त्रे सर्वांणी घेतली छ २९ रोज स्नान देवपूजा करून ब्राह्मणाची पूजा जाली आर्ती जाली श्रीरामनवमीचे उच्छहास प्रारंभ जाला रात्री सरकारची वस्त्रे आहेराची सर्वांणी घेतली छ. १ साबान स्नान देवपूजा जाली आर्ती करून ब्राह्मणांची पूजा केली तिसरे प्रहरी स्वारी सक्करदरीयास

गेली. तेथे लक्ष्मीनारायेणाचे दर्शन करून आले. रात्री दोन घडी कथा ऐकिली. छ २ रोज स्नान देवपूजा करून ब्राह्मणांची पूजा जाली. तिसरे प्रहरी कलवाताचा तमाशा दोन घडी पाहिला. रात्री घडीभर कथा ऐकली. छ ३ रोज स्नान देवपूजा जाल्यावर वेंकोजी भोसले यास सेनाधुरंधरीची वस्त्रे बाबुराव वैद्य याणी दिल्ही. वकील मडळी व मुछद मंडळी याणी सर्वांणी नजरा खाशांस व वेंकोजी भोसले यांस उभयतासहि केल्या. वस्त्र दिल्ही आणि पत्रे नाहीत म्हणून बाबुराव यास खाशानी विचारले, त्यास पत्रें नाहीत, वस्त्र वगैर यादीप्रो सदाशिवपंत याचे कारकुनाही दिल्ही, तेव्हा पत्रें दिल्ही नाहीत असे बाबुराव याणी सागितले. वस्त्राबराबर पत्रे नाहीत असे घडणार नाही म्हणून खासे म्हणाले. पत्राविसी दिकत पडली होती. खासे बहुत रागे भरले. तेव्हा पत्राची गफलत कसी जाली हे न कले. किंवा बाबुराव याणी मधे ठेविली हे कलत नाही. छ ५ रोज स्नान देवपूजा करून ब्राह्मणाची पूजा जाली. तिसरे प्रहरी स्वारी लक्ष्मण डोके गोसावी याचे घरास गेली. त्याचे घरी श्रीरामनवमीचा उत्छहा असतो. तेथे दोन घडी कथा ऐकून आले. रात्री भवानी काळो याचे घरास गेले. त्याचे घरी उत्छहा आहे. तेथे प्रहरभर कथा ऐकिली. अर्ती जाल्यावर वाड्यात आले. छ ६ रोज स्नान देवपूजा करून ब्राह्मणांची पूजा जाली. तिसरे प्रहरी च्यार घडी कलंवाताचा तमाशा पाहिला. मागील च्यार घडी दिवस राहता स्वारी लक्ष्मणराव पाटणकर याचे घरास गेली. तेथे नवमीचा उत्छहा आहे. दोन घडी कथा ऐकिली, तेथुन मालजी आहेरराव याचे घरास गेले. येथे दोन घडी कथा ऐकली. रात्री वाड्यात च्यार घडी कथा ऐकली. मुछद मंडली व बाबुराव वैद्य कथेस आले होते. छ ७ रोज स्नान देवपूजा करून ब्राह्मणाची पूजा जाली. देवघरापुढे बिछात करऊन कथेस प्रारंभ करविला. मुछद मंडलीस वगैर मानकरीयांस सर्वांस बोलाऊन आणविले. प्रहरभर कथा जाली. रामजन्म जाल्यावर अर्ती करून सर्वांस विडे दिल्हे. प्रहररात्रीस देवाचे वहन मिरवावयास काढले. खासे व मुछद मंडली झाडून होते. वहन मिरऊन मागील च्यार घडी रात्रीस वाड्यात आले. छ ८ रोज स्नान देवपूजा करून ब्राह्मणाची पूजा जाली. गोसावी ब्राह्मण बैरागी वगैर दोनसे तिनशे पात्र भोजनास जाले. खाशास नव दिवस निराहार असतो, आज पारणे जाले. ब्राह्मणास वगैर सर्वांस रुपया अधेली प्रो दक्षणा दिल्ही. रात्री ललीत जाले. छ १० रोज स्नान करून भवानी काळो व बाबुराव वैद्य यासी प्रहरभर खलबत जाले. तिसरे प्रहरी स्वारी सकरदरीयास गेली. लक्ष्मीनारायणाचे दर्शण करून तोफा पाहून आले. छ ११ रोज प्रातःस्नान देवपूजा भोजन करून प्रहर दिवसा स्वारी तीन कोस टाकलीचा वोढा व तले पाहावयास गेले. तले वगैर पाहून नल बांधून पाणी

शहरात आणावे म्हणून पाहिले रात्री भवानी काळो याचे घरी लळीत जाले तेथे प्रहरभर गेले. लळीत जाल्यावर आले छ १२ रोज सायंकाळी सर्वांची स्वारी चिमाबाइ वगैर सुधा पाच कोस वाघोड्यास पौर्णिमेस ग्रहणाकरिता कना नदीचे संगमी स्नानास गेले छ १३ रोजी ग्रहण जाले स्नान करून बारा बारा गोदाणे दिल्ही छ १४ रोजी प्रात काळी सिकारीस गेले ते च्यार हरणे घेऊन दोन प्रहरी आले छ १५ रोज दोन प्रहर रात्रीस स्वारी नागपुरास आली छ १६ रोज स्नान देवपूजा करून प्रहरभर खल्वत केले तिसर प्रहरी स्वारी गणपतीस गेली दर्शन करून घडीभर नावेत बसून तल्यात फिरले सायंकाळी वाड्यात येऊन रात्री स्नान भोजन केले चतुर्थी होती छ १७ रोज प्रात स्नान देवपूजा जाली भवानी काळो याचे घरी मुलींची दोन लग्ने आहेत लग्न करावयास कारंज्यास वासमा जवल जातात ते निरोपास आले होते त्यास उदईक निरोप देऊ म्हणून सांगितले सायंकाळी मुछद मंडळी व कारकून वगैर उपाधे शास्त्री मंडळी यास लग्नाची वस्त्रे येक येक सेला पागोटे सर्वास दिल्हे प्रहर रात्रीस स्वारी मुत्सदी शास्त्री वगैर सुधा घेऊन सकरदऱ्यास गेले तेथे लग्नाची दारू टेंका वगैरे केली होती ते सोडली च्यार घडी तमाशा पाहिला छ १८ रोज बाबुराव पालकर याचे घरी मेजवानी जाली खासे मंडळी भोजनास गेले होते छ १९ रोज केदारजी मोहिते याचे घरी मेजवानी जाली भोजने करून सर्वांस वस्त्रे दिल्ही तिसरे प्रहरी सक्करदरीयास गेले तोका पाहून लक्ष्मीनारायणाचे दर्शन करून आले बाबुराव वैद्य व दोघे ना ग्रहणास रामक्षेत्रास गेले होते तेथे पाच दिवस होते बधूस देवआज्ञा जाल्याचे वर्तमान त्यास तेथेच कळले त्याचे बंधू विभक्त बहुत दिवस जाले होते. त्यास पुत्र संतान कांहीं नाही. ते त्याचे घरात पन्नास हजाराचा जागा निघेल ते च्यावयास यास अधिकार नाही सरकारात घेतील असे येथे बोलतात छ २० रोज प्रहर दिवसा स्वारी बाबुराव वैद्य याचे घरास गेली, त्यास दुखोट्याची वस्त्रे दिल्ही तिसरे प्रहरी माहादाजी लस्करी याचे घरास गेले त्यास पिसे लागले. त्याचे बुध्धीस भ्रंश जाला आहे त्याचा समाचार घेऊन आले. रात्री स्वारी सिकारीस वाघोड्यास मासे मारावयास जावे असा बेत जाला होता परंतु आभाल येऊन पाऊस पडला याजमुले गेले नाहीत. अक्षतृतीया करून जाणार. छ २१ रोज स्नान देवपूजा करून प्रहरभर खलबत कुशाबा चिटणीस यासी जाले नंतर स्वारी दादोबा ना पिदडी यास देवआज्ञा जाली, त्याचे घरास गेली तेथे क्षणभर बसून त्याचे चिरंजिवाचे समाधान करून आले सायंकाळी लग्नाची वस्त्र द्यावयाची कोणी राहिले होते त्यास बाबुराव वगैर यास सर्वांस वस्त्रे दिल्ही च्यार घडी कळवताचा तमाशा जाला भवानी काळो लग्नास गेले आहेत सरकारचे हुजरे व माहात सदाशिवपंता-

बराबर आले होते त्याची रा जाली. हुजऱ्यांस दोघास दोन कडी व शंभर रुो व माहातास दीडसे रुो दिल्हे. छ २३ रोज प्रातःकाली स्नान देवपूजा जालयावर गाडीखान्याची हजेरी वैलांची वगैर घेतली. कुशाबा चिटणीस व बाबुराव वैद्य यांसी च्यार घडी खलबत जाले. तिसरे प्रहरी सकरदरीयास गेले. लक्ष्मीनारायणाचे दर्शन करून आले. छ २४ रोज स्नान करून कुशावा चिटणीस यासी प्रहरभर खलबत जाले. प्रहर दिवसा स्वारी सकरदरीयास चिमा-बाईसुधा गेली. येकादसी होती. लक्ष्मीनारायणाजवल प्रहरभर कथा जाली. च्यार घडी बंगल्यात निद्रा केली. साइकाली स्नान करून देवाची पूजा करून तेथे फराल करून च्यार घडी रात्रीस वाड्यात आले. छ २५ रोज शनिप्रदोश होता. मर्जी दिक होती. तिसर प्रहरी जागेश्वराचे दर्शन करून येऊन स्नान भोजन जाले. रात्री कुशाबा चिटणीस व बाबुराव वैद्य यास बोलाऊन प्रहरभर खलबत केले. छ २६ रोज प्रातःस्नान देवपूजा जाली. मौजे हिंगणे येथून साहा कोस तेथील जंगलात वाघ निघाल्याची वातमी आली. प्रहर दिवसा स्वारी तयार करून सिकारीस गेले. तेथील जंगलात वाघ पाहिला. कोठे सापडला नाही. व दुसरी काही सिकार मिळाली नाही. छ २७ रोजी तिसरे प्रहरी स्वारी नागपुरास आली. हिंगणघाटाकडे वीस कोसावर वाघ निघाल्याची वातमी आली त्याजवरून खासे सिकारीस जाणार असा बेत जाला होता, परंतु राजश्री बाबुराव वैद्य म्हणाले आम्ही समागमे येतो म्हणून बोलले. खाशाणी सागितले की उनाळा दिवस आहे, तुम्ही हैराण व्हावयास येऊं नका. त्यास हे ऐकेनात. माहाराज मी येतोच! तेव्हा खाशाची मर्जी दिक जाली, अगदीच गेली. तेव्हां खासे राहिले. वेंकोजी भोसले सिकारीस गेले होते. छ २९ रोज दोन वाघ घेऊन आले. नारोबा नाईक कानडे सावकार आहेत त्याणी स्वयंपाकास येक आचारी ब्राह्मण म्हणून ठेवला होता. येक महिणाभर स्वयंपाक केला. नाईकानी नवेद्य वैसीदेव करून भोजन येक महिणा पावेतो केले. येका महिण्यानंतर तो आच्यारी जातीचा महार निघाला. तेव्हा हे वर्तमान खाशास कलल्यावर नारोबा नाइकास बोलाऊन आणून पेचात धरून तीन लक्ष रुाचे रोखे मुधोजी भोसले याचे हतचे नाइकाजवल होते ते आणून फाडले व आणखी पंचवीस हजार रुो नक्त घेतले. राजश्री बाबुराव वैद्य यास पेशजी पांच हजार रुो दिल्हे व आणखी हली साहा हजार रुो दिल्हे. यो अकरा हजार रुो पावले. दरमहा येक हजार प्रो नेमून दिल्हा. बहुत अर्जवात आहेत. चिमाबाई यासी व खाशासी याणी आनप्रमाण केली की मी बाबुराव आहे, तुमचे दौलतीस काही येक जड पडू द्यावयाचा नाही, नाना सर्वा प्रकारे तुमचेसे करून देईन. राजश्री वेंकटराव कृष्ण, होलकर याज कडील वकील

योर प्रहस्त पुण्याकडील लोमी स्वासी बाबुराव स्पर्धा कुचेष्टा त्याच्या क रितात सचिवा
कडील फारकून पुण्याचे यांचे स्वारी समागमे आले ते खर्चावाचून हैराण त्यास खर्चास
देत नाहीत फर्ज खातात उठून यावयाचे तजविजीत आहेत खर्चास न दिल्हे म्हणजे
फटाकून उठून जाईल हेच सर्वाचे लक्ष आहे पुण्याकडील लोकानी अवघी दौलतच
डोक्षीवर घेतली भवानीपत मुनसी मारल्यावर कुशाबा चिटणीस हाच य त कामकाजात
याचा डौल आहे पोशा खुशामती जडला आहे तो म्हणतो की बाबुरा आहेत, दोघे
नाईक आहेत, श्रीरामपत आहेतच, गोपालपत मामा तेही आले आहेतच असा पुण्यात
का अगदीच काल पडला आहे न कले, या प्रो म्हणतात राजश्री माहादजी सिंदे
याजकडे येथून वकील मुधोजी भोसले याणी पाठविला होता तो माहाद जी सिंदे याणी
राहू दिल्हा नाही पुण्यास जा, येथे वकीलाचे प्रयोजन नाही, असे सांगि ले तेथे वर्षभर
फर्ज खाऊन उठून आले हली याणी वेंकटराव कासी परभु यास वकील स पाठवावयास
योजले आहे, आठा पधरा दिवसा रा फरतील चिनापटणकर जोसी येथे आला होता तो
जोतीसी चांगला थोर सत्पात्र, पुढे महिण्या दोन महिण्या काय होणार ते भविश सांगतो,
म्हणून त्याची सिपारस खाशाजवल बहुताही केली व बाबुराव याणीही केली. त्यास तीनसे
रुा खर्चास दिल्हे वहुत अतीथ्य करीन सेवटी जोसीबावा दारु पिऊ लाग ले फलवातनीचे
घरी खाव्यास जात बोभाट जाला, फलवातनी घरी येके दिवसी धरले ते च्या दुसरे दिवसी
रात्री उघडे वोडखे पळून गेले घोडे मणुश देखील टाकले! बलवंतराव भ वानी कर्नाटकात
पाठवावयास फौज देऊन रा केल्यास च्यार महिणे होत आले अद्याप अ र्धा मार्ग पावले
नाहीत फौज मात्र गगा उतरली बलवंतराव भवानी हे मासमास लष्कारि ना राहिले आहेत
वैशाख मासी लष्कर करून जातील तेव्हा जेष्टअखेरीस फौज पावेल फौजे या दोघा
नाइकावल येकाणे जावे म्हणून स्वामीची आज्ञा जाली हे खाशानी ऐकून खाशाची मर्जी
बहुत विक जाली अगदीच मर्जी वेताल गेली दोघा नाइकावन येका णी जावे आणि
श्रीरामपताने जाऊ नये! असे बोलले शेवकास तो केवल शत्रु प्रो मुछदी खासे अदी करून
पाहातात मुछदी म्हणतात आमची दौलत बुडवावयास रु येथे आलास काय खडोजी
भोसले यारले आणि तुम्ही राहिलाच आहात येथे काही तुमचे राहण्याचे कारण तो दिसत
नाही श्रीरामपंत कधी मरेल असे पाहतात! जादू करून मारतील, भुक्र ार नाहीन दोघा
नाइकावन येकाणे जावे असे बाबुराव यास पत्र आल्यास महिणा दीड म हिणा होत आला
दत्ताजी ना जाणार, अद्याप नागपूर सुटत नाही. गोष्ट कठीण, केवल प्राणसंकट जाले
आहे स्वामीची आज्ञा जाल्यास उपाय नाही येक दो दिवसी जाणार. मास च्यारसे रुा
खर्चास दिल्हे रुा श्रुत होय हे विज्ञापना

के. नं. ८८
फा. नं. १३
प. क्र. ३३

२१६

२१ मे १७९१

श्री

शेवेसी श्रीराम सदाशिव विज्ञापना. ताा छ १७ रमजान मुाा नागपूर येथास्थीत असो विशेष. छ १ रोज प्रातःकाली स्नान करून स्वारी दादोबा नाईक पिदडी याचे घरास गेली. तेथे मुलाची मुंज होती. तेथे दोन घडी बसून मुंज पाचवे घटकेची होती ते लागल्यावर मुरारजी नाईक गडकरी याचे घरास गेले. त्याचे मुलीचे लग्न आहे. लग्न लावल्यावर आले. तिसरे प्रहरी पुण्याची पत्रे डाकेची आली ती वाचली. प्रहर रात्री स्वारी सकरदरीयास गेली. तेथे येक तोफ चालीस सेर गोल्याची वोतली. छ २ रोज स्नान देवपूजा करून दोन घडी कुशाबा चिटणीस यासी खलबत जाले. तिसरे प्रहरी जैसिंग भोसला याचे लग्न मानसिंग मोहिते याचे राखीचे मुलीसी लागले तेथे स्वारी गेली. लग्न लागल्यावर आले. छ ३ रोज स्नान देवपूजा करून दोन घडी दरबार जाला, दोन प्रहरी उपाध्याबरोबर तल्यात अवभृतस्नानास गेले. स्नाने करून आले. छ ४ रोजी माहादाजी लस्करी फडणीस यास बुध्धीस भ्रंश चल जाला. येथे बरा होत नाही याजकरिता राजेश्वरास राहावयास जातो. तेथे बरा होईल. त्यास निरोप जाला, वस्त्रे दिल्ही. व जिवाजी माहादेव फडणीस मुलाचे लग्नास पुण्यास जातात त्यास निरोप जाला. वस्त्रे दिल्ही. खाशास मेजवानी विठल दिनकर याचे घरी जाली. दोन प्रहरी खासेमंडळी भोजनास गेले. भोजने करून वस्त्रे दिल्ही. घोडा रास १ नजर केला. छ ५ रोज स्नान करून कुसाजी गुजर याचे घरी स्वारी गेली. त्याचे पुत्राचे लग्नाचा वागनिश्चये जाला. साइकाली स्वारी जागेश्वरास गेली. तेथून आल्यावर स्नान करून भोजन केले. छ ६ रोज कुसाजी गुजर व संभाजी सिरके यास गडगनेर केला. त्याचे मंडळीस वस्त्रे दिल्ही. छ ७ रोज स्नान देवपूजा करून हजामत केली. बाबुराव वैद्य यासी घडीभर खलबत केले. तिसर प्रहरी शुक्रवार तल्याचे काठी पाण्याची गार हवा घेत च्यार घडी बसले. साइकाली वाड्यात आले. छ ८ रोज प्रातःकाली बाबुराव वैद्य यासी दोन घडी खलबत केले. तिसरे प्रहरी खंडोजी भोसले याचे बागात गेले. बाग पाहिला. वावरात लंका दारू सोडावयास जागा पाहिली. केलीचे खांब आणून त्यांत बंदुखीचे गज घाल्हून तरवारीने तोडून पाहिले. छ ९ रोज स्नान देवपूजा करून स्वारी माधोजी नाईक काले याचे घरास गेली. त्याचे मुलीचे लग्न आहे. लग्न लागल्यावर संभाजी सिरके याचे घरी गेले. तेथे मुलीचे लग्न लागले. तिसरे प्रहरी यशवंतराव मोहिते याचे घरास गेले. त्याचे घरी लग्न मुलीचे जाले. तेथे घडीभर मांडवात बसून जनार्दन विश्वनाथ याचे घरी गेले. त्याचे घरी मुलीचे लग्न जाले. तेथे घडीभर बसून आले.

छ १० रोज स्नान देवपूजा करून घडीभर खलयत जाले तिसरे प्रहरी स्वारी सक्करदरी यास गेली येकादसी आहे तेथे दोन घडी कथा जाली साइकाली स्नान करून लक्ष्मीनारायणाची पूजा केली फराल केला शेहरावून मुछ्द मंडळी वगैर झाडून बोलाऊन नेऊन लग्नाची लक्का दारू वगैरे राहिली होती ती तेथे तल्याचे पाळीवर बसून दोन प्रहर रात्र पावेतो सोडून तमाशा पाहिला छ ११ रोज स्नान करून कुशावा चिटणीस यासी दोन घडी खलवत केले तिसरे प्रहरी येशवतराव मोहिता त्याचे घरास गेले तेथे लग्नाचे लोक वगैर भोजनास बसले होते तेथे खासे दोन घडी बसून आले छ १२ रोज साइकाली सोमवारचे स्नान भोजन करून येशवतराव मोहिते याचे घरास गेले त्याचे घरी रात्री साडे वगैर जाले तेथून आल्यावर वाड्यात दशानताराचे सोंगें आणली त्याचा तमाशा पाहिला छ १३ रोज स्नान करून च्यार घडी निद्रा केली रात्री जागले होते मुधोजी भोसले याचे श्राध जाले छ १४ रोज स्नान देवपूजा करून सक्करदरीयास गेले पेशजी तोफ बोतली होती ते काढविली दोन प्रहरी येऊन भोजन केले साइकाली बुराणशाचे किल्यात गेले. त्याचे पुत्राचे लग्न आहे तेथे घडीभर कलवाताचा तमाशा पाहून आले छ १५ रोज स्नान देवपूजा करून हजामत केली नाना घाटगे याचे घरी मेजवानी जाली दोन प्रहरी खासे मंडळी भोजनास गेले खाशास वस्त्रे दिल्ही साइकाली बावा दीक्षित याचे घरी नरसिंह जयतीचा उत्छव असतो तेथे स्वारी गेली घडीभर बसून ललीत जाल्यावर मानाया घाटगे याचे घरी गेले लग्नाचा मांडव पाहिला घडीभर कलवाताचा तमाशा पाहिला छ १६ रोज मानाया घाटगे यास गडगनेर केला त्यास भोजन करून वस्त्रे दिल्ही खाशा मेजवानी संभाजी सिरके याचे घरी जाली भोजने करून वस्त्रे दिल्ही खाशाचे लग्न वैशाख वद्य १० चे नेमले आहे लग्न जाले म्हणजे चिमाबाई व वेंकोजी भोसले कासीस जाणार आहेत पुर्ता निश्चये नाही पौश मासी पत्रे देऊन येक जोडी रा। केले त्याजवर माघमासी येक जोडी रा केली दोनी जोड्या तेथे जाऊन बसल्या त्यास च्यार महिणे जाले अद्याप येत नाहीत तेव्हा पुण्यात रोजमरे होत नाहीत म्हणून बसलेत किंवा रोजमरे होऊन आले आणि वाटेत मारले गेले किंवा पुण्यात ठेऊन घेतले हे न कले. च्यार महिणे जाले जोडी येत नाही पत्रे दोन तीन लिहली हली येथून सांडणीस्वार आला याज बा। पाठविली. पुढे डाकेबरोबर पाठवीत जाईन दुसरे येथे राहावयास घर नाही म्हणून स्वामीस बोभाट लिहीन याजकरिता गुदस्ता मात्र येक छेपरी दिल्ही होती. हली बरसात आली घर नाही. काही छेपरी शेकार पाहिजे म्हणून मुछद्यास सांगितले. खाशास विचारून देऊ असे बोल्ले. त्याणी खाशास विचारले की श्रीरामपंत छेपऱ्या मागतात,

बरसात आली. त्यास खाशाही स्पष्ट उतर केले की येथे वकील वकील तऱ्ही किती असावें असे काही प्रमाण आहे, की जो येतो तो येथेच राहतो. राहावयास घर वाडे जागा कोणाकोणास द्यावे ? वकील येक असतो किंवा दोन. येथे च्यारच्यार पाचपाच वकील. सारा पुण्यातील कारभार पचकल आणि लबाड जाला. गुदस्ता येक साल छेपऱ्या दिल्ह्या, आता दरसाल छेपरे द्यावयाचा आमचा धारा नाही असे खाशानी आपले स्वमुखे निर्मळ सांगितले. तेंव्हा येथे कोणता उपाय करावा ? घर तों राहावयास पाहिजे. रोजमरा येतो तो येथे खर्चास पुरेना. तेंव्हा येथे घर कशाचे करावे ? शहरचे खर्चाने बेजार. उठून यावयास आज्ञा होईल तर येईन. अथवा चिमाबाई व वेंकाजी भोसले कासीस जाता याजबराबर कासीस जाईन. ब्राह्मणाचा कोटी गयावर्जन करून दिल्हा पाहिजे. पुण्य स्वामीस आहे. येथे सर्व शत्रू प्रा॥ पाहतात व खर्चाची पोटाची विपत्य भोग वजा मरतो. केवल घोडी माणूस शहरचा खर्च मातबरानीच वालगावा. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

रु. नं. ८८
फा. नं. १३
प. क्र. ३४

२९७

१२ जून १७९१

श्री

शेवेसी श्रीराम सदाशिव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ ९ शवाल मु॥ नागपूर येथास्थीत असो विशेष. राजश्री सेनासाहेब सुभा याजकडील दिनच्यर्या. छ १९ रमजान प्रातःकाली नजरबागात खाशाचे लग्न रुइसी लागले. प्रहर दिवसा वेंकोजी भोसले व परसोजी भोसले माहाडीकाचे मांडवात जाऊन वागनिश्चये केला. नवरीस हलेद लागली. तेथून आल्यावर खाशास हलद लागली. छ २० रोज स्नान देवपूजा करून वेंकटराव कासी परभु यास राजश्री माहादाजी सिंदे याजकडे वकीलीस पाठवितात त्यास वस्त्रे दिल्ही व पाच हजार रु॥ खर्चास दिल्हे व आणखी खर्चास लागल्यास द्यावे म्हणून आबाजी नाइक वानवले यास पत्र दिल्हे व त्यास पालखीची परवानगी सांगितली. तिसर प्रहरी स्वारी शहराबाहेर गळाजवळ जाऊन तेथे पेठ वसावयास जागा पाहिली. तेथून सकरदऱ्यास गेले. तेथे तोफा पाहून लक्ष्मीनारायणाचे दर्शण करून आले. छ २१ रोज प्रातःकाली हजामत केली. तेथे कुशाबा चिटणीस यासी घडीभर खलबत केले. तिसरा प्रहरा बाबुराव वैद्य यासी दोन घडी खलबत केले. छ २२ रोज प्रातःकाली स्नान देवपूजा करून प्रहर दिवसा देवप्रत्यष्ठा बसली. शरीरसंमधी वगैर लोक भोजनास बोलावले होते. छ २३ रोजी सेनासाहेब सुभा याचे गोरज लग्न लागले. शरीर संमंध विठोजी माहाडीक यासी केला. छ २५ रोज रात्री साडे वगैर करून वाड्यात येऊन दाहा घटका रात्रीस

लक्ष्मीपूजन केले मूल दहा वर्षाची आहे किंचित काळी आहे रूपाने बहुत चांगली नाही छ २६ रोज प्रात काली स्नान देवपूजा करून प्रहर दिवसा स्वारी शेहराबाहेर जाऊन सवदागीर याणी हाती नग दहा आणले आहेत ते जाऊन पाहीले सोयरेमंडली वगैर बाग्यात भोजनास बोलावले होते छ २७ रोज स्नान केल्यावर मुत्सदी वगैर लोक याणी खाशास आहेर केले दोन प्रहरा खासे मंडळी सोयेऱ्याचे मांडवात भोजनास गेले. भोजने करून खासे मंडळीस वस्त्रे दिल्ही साईकाळी भवानी काळे व बावुराव वैद्य यासी दोन घडी खलबत जाले शेर पाचगाव येथील जंगलात वाघाची बातमी आली म्हणून मागीर च्यार घडी रात्रीस स्वारी सिकारीस गेली छ २८ रोजी तेथेच होते वाघ पाहिला परंतु सांपडला नाहीं मर्जी बहुत दिक जाली चितल सांबर व येक आखल आणले त्या आखलीने दोन माणसे जाया केले छ २९ रोजी तिसरे प्रहरी स्वारी नागपुरास आली साइकाली उपाध्याचे घरी सिमतपूजन जाले, तेथे घडीभर गेले सीमंतपूजन जाल्यावर आले छ ३० रोज प्रातःकाली स्नान देवपूजा करून स्वारी जिवाजीपंत कोल्टकर मजमदार याचे घरास गेली त्याचे घरी मुलीचे लग्न आहे लग्न सहा घटकेचे लागल्यावर आले तेथून आल्यावर हजामत केली तिसरे प्रहरी मुत्सदमंडली सुध्धा स्वारी सकरदऱ्यास गेली तेथे चालीस सेर गोल्याची तोफ वोतली ते पाहिली छ २ सवाल स्नान देवपूजा करून ज्याहडची पागा आणविली होती ते पाहिली मुराणशा गोंडराजा बाग्यात आला होता त्यास महिणाभर रोजे होते त्याचा विद आहे त्यास वस्त्रे दिल्ही तिसरे प्रहरी जिवाजीपंत मजमदार याचे घरास गेले त्याचे घरी मुलीचे लग्न आहे त्यास आहेर करून आले साइकाली भजरबागात पातुरकर देशपांडे यास मार दिल्हा सेकवाबूचे पातुर वराडप्रांती आहे तेथील देशमुख व देशपांडीये याचा कजिया आहे देशपांडीये व देशमुख हे दोघेही पातुरचे खरेच, परंतु देशमुख दाहापाच वर्षे गरीबीस आले आणि देशपांडे मातबर आहेत याजमुले देशमुखास देशपांडीये ठिकाण लागू देत नाहीत देशपांडीये म्हणतात देशपांडिये आम्ही व देशमुखी आमचीच याजवरून उभयतांचा कसिया लागून नागपुरास आले. येथे आठदहा महिणे होते उभयताची पंचाईत दोन तीन वेल येकदोघाकडे सांगितली तेथे देशपांडे आम्हीच व देशमुखीही आमचीच असे देशपांडिये म्हणत होते ते दोनतीन जागा खोटे जाले तेव्हा देशपांडे याणी मसलत केली देशमुखी त्याची खरीच, आणखी त्यास बाळाबाईच्या पक्ष पुर्ता, दोनही गोष्टी चांगल्याच याजकरितां आपण जेथे तेथे खोटे पडतो! त्यास बाळबाईस जादु करून मारावे म्हणून शहरात कोणास अबीचसे सो वेऊ करून त्याजकडून जादू करविली कागदावर चित्रे लिहून त्याचा होम केला तो देशमुखांही

खातगी लाऊन होम करीत होते ते धरले. ते देशपांडिये व जादुवाला वाड्यात आणले. त्यास पुढ तपास करून देशपांडियास गांडगुढग्या देविल्या व जादू करणाऱ्यास पुसले, तुजला काय देऊ केले? त्यागे सांगितले की अडीचसे रुो देऊ केलेत. दोन होम केले, आणखी येक होम केला असता म्हणजे बाळाबाई मेली होती असे बोलला. छ ३ रोज स्नान देवपूजा करून स्वारी येसोबा पाणतावण्या याचे घरास गेली. त्याचे पुत्राची मुंज आहे. पाच घटकेची मुंज लागली. तेथे दोन घडी बसून आले. तिसरा प्रहरी सकरदरीयास गेले. तेथे लक्ष्मीनारायेणाचे दर्शन करून आले. सोमवार होता. साइकाली स्नान करून भोजन केले. मागील प्रहर रात्री जिवाजीपंत कोलटकर याचे घरास गेले. त्याचे साडे वगैर जाले. तेथे च्यार घडी बसून आले. छ ४ रोज स्नान देवपूजा करून भवानी काळो व कुशाबा चिटणीस यासी च्यार घडी खलबत जाले. तिसरा प्रहरी स्वारी तुकोजी नलवडे याचे घरास गेली. त्याचे मुलीचे लग्न साईकाली लागले. तेथून रामजी माहाडीक याचे घरास तेथे मुलीचे लग्न लागले व घडीभर बसून आले. प्रहर रात्री बुराणशा राजे याचे पुत्र मुरासाहेब याचे लग्न बुदुखा याचे घरी लागले. त्याचे घरास स्वारी गेली. लग्न लागल्यावर आले. छ ५ रोज स्नान देवपूजा करून भवानी काळो यासी दोन घडी खलबत जाले. तिसर प्रहरी स्वारी बागात गेली. तेथे कारवान घोडी घेऊन आले आहेत ते घोडी पाहून सकरदरीयास गेले. देवदर्शन करून तोफा पाहून आले. छ ६ रोज स्नान देवपूजा करून पागेतील खासी घोडी आणून पाहिली. जिवाजीपंत कोल्टकर मजमदार याचे घरी मेजवानी जाली. भोजने करून खासे मंडळीस वस्रे दिल्ही. तिसरे प्रहर बाबुराव वैद्य लखोटे घेऊन आले ते वाचले. भवानी काळो यास बोलाऊन घडीभर खलबत केले. छ ७ रोज स्नान देवपूजा करून वितिपात होता, काम कारभार नाही म्हणून सकरदरीयास जाऊन शागीर्दपेशाचा वगैर दोन तीन हजार माणूस मेळऊन चालीस सेर गोल्याची तोफ चौदा हात लांब वोतली ते काढावयास लागले. तोफ आज बाहेर काढू तेव्हा जाऊ अशी खाशाही प्रतिज्ञा केली. तिसरे प्रहर पावेतो दोनतीन हजार माणूस झोंबले तोफ निघेना, बेजार जाले, सेवटी कंटाळून आले. दारुची लंका आणखी राक्षस दैत्य व इंग्रज वगैरे नवे करविले होते. झाडून मुछंदमंडली वगैर बोलाऊन प्रहर रात्रीस तल्याजवळ लंकादारु वगैरे सोडून तमाशा पाहिला. वेंकटराव कासी परभु राजश्री माहादजी सिंदे याजकडे वकीली जाणार होते ते कुच करून गेले. सोमलपुरास येथून कुमक पाठविली होती. त्याणी सोमलपुरास दोन महिणे मोरचे लावले होते. सेवट काही जाले नाही. जानोजी भोसले पंचवीस हजार फौज घेऊन

साहा साहा महिने बसले तेव्हा त्याच्याणे काही जाले नाही, ते अशा शंमरा दोशाच्याणे काय होणे आहे मोरच्यात येक कारकून परभु होता तो मात्र मारला गेला आता मोरचे उठविले पेशजी फितुराचे काही गोष्ट घडली होती तेव्हा त्वरा केली नाही, आता मोरचे बसविले. हे उगाच लटकाच भाय आणितात, कोणताही कारभार व मसलत करावयास स्वतः बुद्धीचा खबीर नाही व मुछदी कारभारी याजवर इतबार नाही जे करणे ते अवी च्यारच्यार वेल दरबारातून उठून बाईस पुसावे लागते बाईसी खाशासी नीट नाही. खंडोजी भोसले धारल्यापासून रात्र दिवस रडती, खंडोजी भोसले यास घरचे घरांत देखता देखता अपाय केला ते बाईस कसे देखवल आणि कसे समाधान वाटेल अवघा मुलुक त्याचे साठी रडतो साबाजी भोसले याजप्रो बुजुन भांडून मारले असते तर नावलौकिक तरी होता यास सिक्षा कोण करितो म्हणतात सिक्षा व याचे पारपत्य चांगले येयास्तीत करावे ते स्वामीच्याणे याचे काय होते, काही होत नाही कोटी रुो चा मुलुक आणि तीन हजार फौज चाकरीस पाठविली फौज अद्याप कर्नाटकात पावली नाही तोच हाका मारितात की आम्ही देणेदार कर्जदार जालो, आमची दौलत बोंढीत आली, असे आताच दिक आहेत दुसरे मजजवल दोन जोड्या आहेत त्या पौशमासी येथून रा केल्या त्यास पुण्यात रोजमऱ्याकरिता च्यार पाच महिणे लागले तेव्हा येथील पत्रे पाठवावयास जासूद जवल नाही चैा महिण्याची पत्रे तुंबली अशुरा करुन पाठवीत होतो ते पधरा रुो अशुरा घेईनात तेव्हा राजश्री गोपाळपंतमामा याची माणसे येथून गेली त्याजबराबर छ १५ रजब व छ २९ साबान व १७ रमजानची तीन पत्रे पाठविली आहेत पावतात न पावतात हे ईश्वर जाणे जासुदच मजजवल नाही, माझा उपाय काय ? मल्हारजी नाा दताजी नाा दोघे मिळून दाहा पंधरा जोड्या आहेत इतक्या जोड्या काय करितात हे चौकसी नाही. रोजमऱ्याची बरात ऐवज त्याचेच खावीन, जे करतील ते करोत ! च्यार जोड्या दताजी नाा याजवळा गेल्या आहेत घरकडजोड्या येथे वेर्थ रिकाम्या ! बाबुराव वैद्य याचे चिरंजीव बाईस पुण्यास आहेत त्याजवल दोन जोड्या नेहमी दिल्या आहेत दोन तीन जोड्या येथे खेड्यावर नाईकाचे सेताच्या कामावर आहेत माझी पत्रे पाठवावयास जासूद मिळत नाही असा प्रकार आहे नाईकाची पत्रे आज दोन वर्षे डाकेवा पुण्यास येतात पत्रे घेऊन जासूद कधी येत नाही च्यार जोड्या दताजी नाा याजवळा गेल्या व च्यार जोड्या मल्हारजी नाा याजवल ठेमून बाकी च्यार पाच जोड्या हुजूर पुण्यास चाकरीस मोकलले तर येतील जासूदच जवल नाही तेव्हा डाकेवा पत्रे पाठवीत जाईन सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना

रु. नं. ८८
फा. नं. १३
प. क्र. ३५

२९८

१० ऑगस्ट १७९१

श्री

शेवेसी श्रीराम सदाशिव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ ९ जिल्हेज मुकाम नागपूर येथास्थीत असो विशेष. राजश्री सेनासाहेब सुभे याजकडील दिनच्यर्या. छ ११ शवाल स्नान देवपूजा करून सिंगरे पागा झाडून आणून पाहिली. च्यार घडी भवानी काळो यासी खलबत केले. तिसरे प्रहरी स्वारी मालजी आहेर याचे घरास गेली. त्याचे मुलीचे लग्न आहे. तेथे दोन घडी बसून लग्न लागल्यावर आले. रात्री किल्यांत बुराणशा राजे याचे घरास गेले. त्याचे पुत्राची लग्न दोघांची जाली. तेथे त्यास आहेर करून आले. छ १२ रोज स्नान देवपूजा करून हजामत केली. दोन प्रहरी स्वारी सर्वांची तेलंगखेडी येथील बागात गेली. तेथे वेंकोजी भोसले याणी मेजवानी केली. खासे मंडळी व मानकर मंडळी व पठाण मंडळीस भोजनास बोलावले होते. भोजने करून बंगल्यात प्रहरभर निद्रा केली. साइकाली च्यार घडी कलवाताचा तमाशा जाला. दोन घडी हावया शंभर वगैर दारू सोडली. प्रहर रात्री स्वारी वाड्यात आली. छ १३ रोज स्नान करून स्वारी सकरदरीयास गेली. तेथे येक तोफ काढली. तिसरे प्रहरी भवानी काळो व बाबुराव वैद्य यास बोलाऊन च्यार घडी खलबत केले. छ १४ रोज स्नान देवपूजा करून दोन प्रहरी स्वारी उमरडास येथून पंधरा कोस सिवबाला हजारी याचे पुत्राचे लग्नास गेली. समागमे मुछद मंडळी कोणी गेले नाहीत. पांडुरंग गणेश बक्षी व जानो यशवंत पाग्या वगैर लोक होते व चिल्याच्या गाड्या सात आठ, मागील च्यार घडी दिवस राहता स्वारी उमरडास पावली. तेथे कमाविसदार वगैर गावकर मंडली याणी नजरा केल्या. गावाबाहेर डेरे देऊन राहिले. पागेस चारा दाणा वगैर मुदबखचे साहित्य कमाविसदारानी केले होते. दाहा घटका रात्रीस सिवबाला हजारी याचे घरास गेले. तेथून नवरा घेऊन नवरीचे घरास जाऊन मागील च्यार घडी रात्र राहता लग्न लागून डेऱ्यास आले. छ १५ रोज प्रातःकाली स्नाने करून उभयता बंधु तीन कोस सिकारीस गेले. दीड प्रहर दिवसा सात हरणे घेऊन आले. दोन प्रहरी देवाजी डोंगरदेऱ्याचे घरी मेजवानी जाली. खासे वगैर दाहाबारा असामी भोजनास गेले होते. विडे घेऊन डेऱ्यास येऊन निद्रा केली. साइकाली उभयता हातीवर बसून नदीवर जाऊन तेथे हाती फिरऊन पाहिले. छ १६ रोज प्रातःकाली स्नान करून किल्यात गेले, तेथे घडीभर भांडाचा तमाशा पाहिला. घडीभर तल्याचे पालीस बसले, तेथे कमाविसदारास बोलाऊन दोन हजार रुो लाऊन तले उकरावे म्हणून सांगितले. तेथून डेऱ्यास येऊन भोजने केली. तिसरे प्रहरी कुत्र्याच्या

जोड्या घेऊन सिकारीस गेले येक ससा मारून कुत्र्यास चारला, साइकाली डेन्यास आले. छ १७ रोज प्रात काली सिकारीस गेले दोन हरणे य येक फरकोची घेऊन दोन प्रहरा आले सोमवार होता साइकाली भोजन केले रात्री नवरीचे मांडवात गेले तेथे परदेसी परदेसी उभ्या पत्रावली येकास येक मारितात त्याचा तमाशा घडीगर पाहिला लालन कलयातनीचे गायन दोन प्रहर रात्र पावेतो ऐकिले छ १८ रोजी अरुणोदयी उठून सिकारीस गेले तेथे दहा बारा हरणे मारली मुकामीहून मासे रांधून नेले होते ते तेथे खाऊन साईकाली डेन्यास आले हरणे अवघी जमा करून घडीभर पाहिली नंतर लोकास धाटून दिल्ही तेथे कोल्हाट्याचा तमाशा पाहिला बरकड लोक खासे खासे शंभर दोनसे सियसिंग हजारी याचे घरी भोजनास गेले होते खासे भोजनास गेले नाहीत छ १९ रोज प्रात काली स्नान देवपूजा करून प्रहर दिवसा तल्यात जाऊन मासे मारले भोजन करून किल्यात गेले तेथे कोल्हाट्याचा तमाशा पाहिला तेथून तल्याचे कडेस बसून सिवसिंग याचे नवरानवरीस तमाशा पाहावयास आणविले. तेथे तल्याजवल बसून दारूची झाडे साइकाली सोडली डोंग्यात दारूच्या घागरी नेऊन सोडल्या प्रहरभर दारूचा तमाशा पाहिला तेथील कमाविसदार याणी खाशास वस्त्र दिल्ही महमदअली व नामदारखा वाघाचे बातमीस पाठविले होते ते आले वाघ कोठे आढलत नाही म्हणून सांगितले च्यारसे शाचे घोत्रजोडे खरीदी केले छ २० रोजी कुच करून लोक वगैर मार्गाणे लाऊन आपण च्यार गाड्या चित्याच्या घेऊन जंगलावून सिकार खेलत आले. पाच हरणे मारली तिसरे प्रहरी स्वारी नागपुरास आली छ २१ रोज स्नान देवपूजा करून कुशाबा चिटणीस व भवानी काळे यासी च्यार घडी खलबत केले तिसरे प्रहरी स्वारी सक्करदरीयास गेली तेथे तोफा पाहून लक्ष्मीनारायणाचे दर्शण करून आले. छ २२ रोज मानापा घाटगे याचे घरी मेजवानी जाली. खासे भोजनास गेले होते तिसरे प्रहरी शहराबाहेर जाऊन तुलसीबाग करावयास जागा पाहिली छ २३ रोज स्नान देवपूजा करून हाजामत केली. विसाजी उमाजी जामदारखाने याचे पुत्राचे लग्न साग रास गेले होते. लग्न करून आले. त्याचे घरी मेजवानी जाली भोजने करून खाशास वस्त्र दिल्ही तिसरे प्रहरी बाहेर जाऊन तुलसीबागाची जागा पाहिली छ २५ रोज स्नान देवपूजा करून लाली कलवातनीचा नाच प्रहरभर जाला साइकाली तुलसीबागाची जागा पाहिली छ २६ रोज स्नानदेवपूजा करून प्रहर दिवसा स्वारी सर्वांची सोणेगांव येथील बागात गेली तेथे स्वयपाक करविला होता घडीभर सोंकटी खेळून सर्वाणी भोजने केली च्यार घडी निद्रा केली बापुराव वैद्य व मुकुंद मंडली आले होते साइकाली कलवातनीचा नाच

प्रहरभर जाला. हावया दारू वगैर दोन घडी सोडली. प्रहर रात्रीस वाड्यात आले. छ २७ रोज भवानी काळो याचे घरी मेजवानी जाली. भोजने करून खाशास वस्त्रे दिल्ही. छ २९ रोज येसोबा पागेचा कारकून याचे घरी मेजवानी जाली. खाशास वस्त्र दिल्ही. तिसरे प्रहरी तुलसीबाग पाहिला व परसोजी भोसले याचा बाग पाहिला. छ ३० रोज स्नान देवपूजा करून मुछद मंडळीस बोलाऊन बाईकडे जनानेदेवढीवर च्यार घडी खलबत केले. कचेरी दरबाराचा बहुत बंदोबस्त केला. बाहेर कचेरी दरबार होत नाही. मी वाड्यात जातो, वर्तमान कलते, याजकरितां कोणतीही मसलत खलबत करणे तर येक दोन मुछदी कार्याकारण घेऊन बाईकडे जाऊन दरबार करावा, तेथे वरकडासही कोणास येऊ देऊ नये असे केले. लाली कलवातनीस निरोप जाला. आज पावेतो तीस तेरा हजार रुो दिल्हे व उंट वगैर पोशाखही दिल्हे. कोणी ब्राह्मण समर्थ सत्पात्र येतो त्यास दाहा रुो देत नाहीत. जेजोरीकर श्रीकरभट याचे म्हटल्यावर आले होते. येथे आठदाहा महिणे कर्ज खाऊन गेले, त्यास शंभर रुो द्यावयास अनकुल पडले नाही. आमची दौलत वोढीत आली असे त्यास सांगावे. सेवटी मुछद्याही आपणावर पटी करून तीनसे रुो भटजीस देऊन त्याचे कर्ज वारविले, परंतु खाशानी काहीच दिल्हे नाही, असा प्रकार. तुकोजी नलवडे याचे घरी मेजवानी जाली. भोजने करून खाशास वस्त्रे दिल्ही. तिसरे प्रहरी तुलसीबाग पाहिला. बागास भिती घालावयास काम लावले आहे तेथे तुलसी लावणार. छ १ जिल्काद स्नान देवपूजा करून घडीभर खलबत केले. तिसरे प्रहरी स्वारी इंदुलीचे बागातील माहादेवास गेले. तेथून आल्यावर साइकाली स्नान करून भोजन केले. रात्री बाबुराव वैद्य यासी प्रहरभर खलबत जाले. छ २ रोज प्रातः-काली स्नान देवपूजा करून तुलसीबाग पाहून खंडोजी भोसले याचा बाग परसोजी भोसले यास दिल्हा आहे तेथे स्वयंपाक करविला होता. तेथे जाऊन भोजने केली. कारवाणाची घोडी आली होती ते पाहिली. च्यार घडी निद्रा करून साइकाली कलवाताचा तमाशा च्यार घडी जाला. हावया दारू वगैर घडीभर सोडली. प्रहर रात्रीस वाड्यात आले. छ ४ रोज स्नान देवपूजा करून हाजामत केली. जनार्दन विश्वनाथ याचे घरी मेजवानी जाली. खासे मंडळी भोजनास गेले होते. खाशास वस्त्रे दिल्ही. साईकाली सिंगरे पागा वाड्यापुढे आणून पाहिली. बाबुराव वैद्य यास भवानी काळो याचे घरी मेजवानी जाली. त्याचे मंडळीस वस्त्रे दिल्ही. छ ५ रोज परसोजी भोसले याचे नवरीस आशाढपाटी वेंकोजी भोसले घेऊन गेले होते. तिकडून सोयेरे मंडली आले. वरील आर्से-माहालात बिछात करून मुछदमंडली व उपाधे शास्त्री मंडली वगैर लोक बसून हाती

घोडे उंट बैल चित्रे वगैरे साखरेची व मातीची लाकडाची वगैर सोयेऱ्यानी आणली होती ते मधे दुतर्फा मांडून प्रहरभर कलवाताचा नाच जाला परसोजी भोसले यास वस्त्रे दिल्ही सोयेरे मडलीस वाड्यांत भोजनास बोलाविले छ ६ रोज बिठल दिनकर याजकडे छेतीसगडचे कामकाज सांगितले पेशजी वस्त्रे दिल्ही आज सिका त्यास दिल्हा खाशास मेजवानी बाबुराव वैद्य याचे घरी जाली खासे व गुजाबा गुजर व कृष्णाजी मोहिते पाच सात मडली भोजनास गेले होते छ ७ रोज स्नान देवपूजा करून दोन घडी खलबत केले बुराणशा राजे याचे घरी दोन तीन टंम्रे जाली त्याणी मेजवानीचे साहित्य पाठऊन दिल्हे साइकाली स्वारी किल्यात त्याचे घरास गेली तेथे दोन घडी कलवाताचा तमाशा जाला खाशास वस्त्रे दिल्ही छ ९ रोज स्नान देवपूजा करून स्वारी सकरदरीयास गेली येकादसी होती लक्ष्मीनारायेणाजवल कथा जाली साइकाळ पावेतो तेथेच होते साइकाली स्नान करून ल्क्ष्मीनारायेणास पूजा करून साइकाली वाड्यात आले छ १० रोज स्नान देवपूजा भोजन करून भवानी काळो यासी घडीभर खलबत केले च्यार घडी निद्रा करून स्वारी कारखाणाची घोडी पाहावयास वागात गेले तेथे बसून घोडी फेरवून पाहिली तुलसीबाग पाहून वाड्यात आले छ ११ रोज स्नान देवपूजा करून हाजामत केली मुछदी वगैर बाईकडे नेऊन खलबत दोन घडी जाले तिसरे प्रहरी तुलसीबागात गेले. तेथे तुलसीस वावर करावयास वगैर भितीस काम चालत आहे तेथे दोन घडी वसून बलवंतराव भवानी याजकडील लस्करची पत्रे आली ती वाचली अद्याप कृष्णा उतरले नाहीत तोच लोक अडवितात धरणे बसतात लोक उठून नागपुरास जावे असे म्हणतात म्हणून लस्करचे पत्र आले होते ते वाचले छ १२ रोज स्नान देवपूजा करून च्यार घडी खलबत कुशाबा चिटणीस यासी केले बाकाबाई मोहिते याचे घरी मेजवानी जाली खासे मंडली भोजनास गेले होते. तिसरे प्रहरी तुलसीबाग जाऊन पाहिला छ १४ रोज प्रात काली भवानी काळो व बाबुराव वैद्य यासी दोन घडी खलवत केले नतर स्नान देवपूजा जाली वागेतील पशु घोड्या झाडून आणून पाहिल्या तिसरे प्रहरी स्वारी सकरद-र्‍यास गेली तोफखाना पाहून लक्ष्मीनारायणाचे दर्शण करून आले छ १५ रोज स्नान देवपूजा करून घडीभर खलबत जाले तिसरे प्रहरी स्वारी गणपतीस गेली गणपतीचे दर्शण करून नागेश्वरास गेली सोमवार व चतुर्थी होती छ १६ रोज प्रात काली मुछद मंडली बोलाऊन बाईकडे च्यार घडी खलबत केले खासे बालाबाई याचे घरी भोजनास गेले. छ १७ रोज गुज्याबा गुजर याचे घरी मेजवानी जाली खासे व मानकरी मडळी चाळीस पनास असा भोजनास बोलाविले होते तिसरे प्रहरी तुलसीबाग पाहिला बागा-

तील जागा खिजमतगार वगैर लाऊन नीट करविली. छ १८ रोज स्नान देवपूजा करून हाजामत केली. तिसरे प्रहरी बाबुराव वैद्य यासी दोन घडी खलबत करून वैद्यास बाईकडे नेऊन तिकडे बाईसी खलबत घडीभर केले. छ १९ रोज बहिरजी आहेर-राव याचे घरी मेजवानी जाली. खासे मंडली व मानकर मंडली भोजनास बोलाविले होते. तिसरे प्रहरी तुलसीबागास जाऊन हातीवरच उभे राहून बाग पाहिला. बेदाणे हाराळी लावावयास सागितले. हाराळी लाऊन तुलसीच्या कयाऱ्या करणार. छ २० रोज लक्ष्मणराव पाटणकर याचे घरी मेजवानी जाली. खासे मंडली व मानकर मंडली झाडून बोलावले होते. छ २१ रोज वेंकोजी भोसला निा पीलखाना याचे घरी मेजवानी जाली. खासे व मानकरी भोजनास बोलाविले होते. साईकाली माधोजी नाईक काले यासी दोन घडी खलबत जाले. छ २२ रोज स्नान देवपूजा करून प्रहरभर निद्रा केली. शरीर किंचित जड होते. तिसरे प्रहरी तुलसीबाग जाऊन पाहिला. तेथून येऊन सोमवारचे स्नान भोजन केले. छ २३ रोज स्नान देवपूजा करून च्यार घडी पुराण ऐकिले, चिमाबाई याजवल भागवत व कासीखंड पुराण नित्य होत असते. तिसरे प्रहरी तुलसीबाग पाहून लक्ष्मीनारायणाचे दर्शण करून आले. छ २४ रोज स्नान भोजन करून भवानी काळो यासी खलबत दोन घडी केले. तिसरे प्रहरी तुलसीबाग पाहिला. तेथे लस्करची पत्रे आली ती वाचली. छ २६ रोज स्नान देवपूजा भोजन करून स्वारी इंदुलीचे बागातील माहादेवास गेली. तेथे श्रावणमास ब्राह्मणभोजन करितात. शंभर पनास जे ब्राह्मण येतील त्यास अन्न घालावे असा बेत केला. तेथील भांड्यांचे साहित्य व जागा पाहून स्वारी कोराडीस गेली. तेथे कोराडीचे तले पाहून मागती माहादेवाजवल येऊन भोजने केली. चिमाबाई तेथे आले होते. सर्वांणी भोजने करून प्रहर रात्रीस वाड्यात आले. छ २७ रोज स्नान देवपूजा करून प्रहरभर खलबत कुशाबा चिटणीस याचे केले. तिसरे प्रहरी तुलसीबाग जाऊन पाहिला. छ २८ रोज प्रातःकाली माधोजी नाईक काले यासी घडीभर खलबत केले. नंतर स्नान देवपूजा जाली. वाड्याचे उतरेस नागेश्वर माहादेव स्थापला आहे त्याजपासी श्रावणमास पाच दिवस नागपंचमीपावेतो उत्छहा करीत असतात. लाकडे रोऊन नगारखाना मांडावा, देवलापुढे लाकडाचे तक्तपोश टाकून त्याजवर डेरा द्यावा, त्यात राधा डफगाणे करावे, कलवाताचा तमाशा करावा, पेठा-पेठांचा बाजार आणऊन देवळापुढे भरवावा, हा फुकटचा. उत्छहाकरिता काही ब्राह्मण-भोजन करावे किंवा काही ब्राह्मण आनुष्ठानास घालावे ते काही नाही. छ २९ रोज गिरजाबाई वेंकोजी भोसले याचे स्त्रीचे श्राध जाले. साइकाली स्वारी जागेश्वरास गेली,

तेथून आल्यावर सोमवारचे स्नान करून भोजन केले छ १ जिल्हेज प्रात काली स्नान देवपूजा केली श्रावणमासचा देवास वेल नित्य याहात असनात तिसरे प्रहरी खिडकीत बसून माहादेवाजवळील पोऱ्याचा व फलवाताचा तमाशा दोन घडी पाहिला तिसरे प्रहरी तुलसीबागात गेले तेथे बाबुराव वैद्य याचे चिरंजीयास बोलाऊन घडीभर खल्वत केले बाबुराव याणी आता बहुत लीनता नम्रता धरली आहे पहिले प्रो क्रूर नाहीत परंतु आणखी बोलण्यात कामाफाजात आहेत बहुता दिवसा नागपुरास येणे घडले आहे चाळीस पनास हजार रुा मेळविसील छ २ रोज स्नान देवपूजा करून सिकारी कुत्र्याचा जोड्या आणून पाहिल्या तिसरे प्रहरी माहादेवाजवळील तमाशा पोऱ्याचा व फलावाताचा पाहिला रात्री बाबुराव वैद्य यासी घडीभर खल्वत केले छ ३ रोज स्नान देवपूजा करून दोन घडी पुराण ऐकिले तिसरे प्रहरी यांच्यापुढे काल्यीट आणून शुजविले फलवाताच्या पोऱ्याचा तमाशा घडीभर पाहिला छ ४ रोज स्नान देवपूजा करून दोन घडी पुराण ऐकिले तिसरे प्रहरी फलावाताचा तमाशा पाहिला काल्यीट शुजविले माहादेवाजवळील उत्छाह पाच दिवस जाला छ ५ रोज स्नान देवपूजा जाली पुराण दोन घडी ऐकिले तिसरे प्रहरी तुलसीबाग पाहिला तेथून स्वारी भवानी काळे याचे घरास गेली बळवंतराव याचे मुलास समाधान नाही म्हणून त्याचा समाचार घेऊन आले धारराव सिंदे राजश्री माहादाजी सिंदे याजपासून रुसून आले ते उजनीस आहेत त्याचे पत्र येथे खाशास आले होते की आमची रोजगाराची सोये जाल्यास करावी त्याचे उतर याणी दिल्हे की दसरा जाल्यावर कारकून पाठऊन द्यावा कर्नाटकात टिपूवर फौजा गेल्या आहेत त्यास टिपू आहे तो काही जरब बाल्गुन आहे दरसाल खंडणी देतो त्यास अगदी मोडल्यास आणि इंग्रजाचे तिकडे प्राबल्य जाल्यास इंग्रिज कृष्णेपलीकडे पाय बाहेर देणार नाही म्हणून असी मसलत यास येथे पडली आहे दुसरे शेवकाचे वर्तमान घराची राहावयाची सोय नाही. जेष्टमासी घरावून चोराणे पांघुरणे वगैर बाहेर नेली वैशाखजेष्टपासून घर मागतो देत नाहीत पावसात पाण्यात भिजतो विपत्य भोगितो दाहावीस रुो लाऊन घर करावे तर चोराणे पांघुरणे व खर्चाचे नेले पावसात भिजतो आणि बाबुराव वैद्यासारखे वकील येथे तेही भोसल्याचे होऊन गोष्ट सांगतात मजला म्हणतात की तुमचे घराविसी आम्ही खाशास येक वेळ विचारले, परंतु खाशाची मर्जी तुम्हाविसी बहुतच उदास आहे तेव्हा आम्ही काय करावे? तुम्ही आमचे घरी येऊन राहा खाशाणी काय करावे? श्रीरामपंत, आपण येथे किती जणाने असावे? येक दोन की च्यारजणाने असावे! त्याणी काय करावे हे खरेच! कोणाकोणास घर जावे यावे आणि तुजला येथे तो कोणी म्हणत नाही की श्रीरामपंत करा

आहे मग तुझे तुजला काये बरे दिसत असेल हे न कळे. अशा गोष्टी बहुत त्याचा पक्ष धरून सांगतात. बाबुरावच अशा गोष्टी सांगतात तेव्हा घर राहावयास कसे मिळते. बाबुराव व मल्हारजी नाईक याचा कोणे गोष्टीचा बोभाटा घराविसी जाग्याविसी काही काडीमात्र नाही. माझा प्रकार असा आहे. सर्वांस माझी अडचण. तशात चोराणे पांगुरणे चीजवस्त नेली! स्वामीस तऱ्ही बोभाट वारंवार क्षुलक किती ल्यावा? कर्ज आहेच व खर्चास रोजमरा पुरेना. शेहराचा खर्च घोडी माणूस च्यार पाच वर्ष कापड आंख नाही. सबनिसासही किती ल्याहावे आणि विपत्य किती भोगावी. स्वामी कृपाळू होऊन काही मनास आणतील तर वांचतों नाही तर काही स्थीत बरी नाही. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

रु नं. ८८
फा. नं. १३
प. नं. ३६

२९९

१० सप्टेंबर १७९१

शेवेसी श्रीराम सदाशिव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ ११ मोहरम मुकाम नागपूर येथास्थित असो विशेष. राजश्री सेनासाहेब सुभा याजकडील दिनच्यर्या. छ १२ जिल्हेज श्रावणी जाली. उपाधे याणी आपले घरी श्रावणी करून पंचगव्य व यज्ञोपवीत आणली ती खाशाणी घातली. तिसरे प्रहरी कुशाबा चिटणीस व भवानी काळो यास बोलाउन साइकाल पावेतो खलबत केले. छ १३ रोज स्नान देवपूजा करून घडीभर खलबत जाले. प्रहर दिवसा स्वारी जानो येशवंत पाग्या याचे घरास गेली. त्यास समाधान वाटत नाही. नवी पोटशुळाची वेथा लागली आहे तेथे घडीभर बसून त्याचा समाचार घेऊन वाड्यात आले. गुजर मंडली वगैरे याणी राखीपौर्णिमेचे वस्त्र खाशास दिल्ही. दोन प्रहरी स्वारी बाहेर वेंकटेशाची काठी आली तेथे दर्शणास गेले. तेथून आल्यावर कलवाताचा वगैरे तमाशा राखीपोर्णिमेस होत असतो, तो हणमंत खिडकीत बाबूराव वैद्य व मुछदमंडळी वगैरे सर्वांणी पाहिला. छ १४ रोज स्नान देवपूजा जाली. च्यार घडी पुराणश्रवण करून स्वारी इंदुलीचे बागात गेली, तेथे माहादेवाचे दर्शण करून बाग वगैरे पाहिला. पांडुरंग गणेश बक्षी व मानापा घाटगे यासी च्यार घडी गंजिफा खेलले. साइकाली वाड्यात येऊन सोमवारचे स्नान पूजा करून भोजन जाले. छ १५ रोज स्नान देवपुजा जाली. पुराण दोन घडी श्रवण केले. पातुरकर देशपांडे येथे कजिया करिता होते. त्यास वस्त्रे दिल्ही. तिसरे प्रहरी स्वारी तुलसीबागा पाहिल्या. बंगला करवितात. त्याच्या मयाला उभ्या करविल्या. साईकाली केदारजी मोहिते याचे घरास गेले. केदारजी मोहिते यास समाधान नाही म्हणून तेथे घडीभर बसून त्याचा समाचार घेऊन आले. छ १७ रोज देवपुजा करून तासे

मर्फे वगैरे बोलावून परसोजी भोसले याचे नवरीची श्रावणपाटी घेऊन येंकोजी भोसले व मुत्सद्दीमंडळी कृष्णाजी मोहिते याचे घरास गेले दोन प्रहरी स्वारी वेनिगीर गोसावी याचे मठात गेली तेथे भंडारा जाला तेथे घटीभर बसून आले साइकाली स्वारी वाराणसीकर साहुकार खुपचंद आला त्याणे येथे हुंडीचे दुकान घातले म्हणून त्याचे घरास जाऊन त्यास वस्त्र दिल्ही येक शालजोडी दिल्ही त्याजपासून काही जवाहीर व दोन तीन लक्ष रुपये कर्ज घेतले आहे तेथून माधोजी नाईक काले सावकार याचे घरास गेले तेथे घडीमर बसून आले छ १८ रोजी स्नान देवपुजा करून घडीभर पुराण श्रवण केले तिसरे प्रहरी बाबूराव वैद्य यास स्वामीचे हती व फौज पाठवावयाविसी पत्र आले ते खाशास आणून दाखविले व कासीहून नागर ब्राह्मण आला आहे तो माहादेवाचे देवाल्यात वाड्याजवळ श्रावणमासचे संव्हिता पद याचे पारायण करितो ब्राह्मण बहुत समर्थ आहे तो देवाल्यात जाऊन पाहिला साइकाली स्वारी तुलसीबाग जाऊन पाहिला छ १९ स्नान देवपुजा जाली नतर हजामत केली बाबूराव वैद्य यासी घडीभर खल्वत जाले साइकाली तुलसी-बाग पाहिला पागेजवळ कारखाणाची घोडी व उंट आले आहेत ते पाहिले छ २० रोज स्नान देवपुजा करून पुराण श्रवण जाले कारखाणाची घोडी व उट वाड्यापुढे आणली होती ती पाहिली प्रहर दिवसा स्वारी तुलसीबागात गेली बाग पाहून रामचंद्रपत फडणिस याचे घरास गेले त्याचे घरी जन्मअष्टमीचा उत्साहा होत असतो तेथे देवदर्शन करून घडीभर बसून आले छ २१ रोज स्नान देवपुजा जाली घडीभर पुराणश्रवण जाले खंडोजी भोसले याचे श्राध्य जाले साइकाली स्वारी जागेश्वरास गेली देवदर्शन करून आल्यावर सोमवारचे स्नान भोजन केले छ २२ रोज स्नान देवपुजा पुराण जाल्यावर श्रीधर लक्ष्मण मुनसी व कुशाबा चिटणीस यासी दोन घडी खलबत करून स्वारी ईंदुलीचे बागात गेली तेथे श्रावणमासाचे ब्राह्मण भोजन होत असते बाग वगैरे पाहून भोजन केले तेथून स्वारी शहरात रामचद्रपंत फडणीस याचे घरास गेले तेथे ललित जाले दोन घडी बसून ललित जाल्यावर आले छ २३ रोज स्नान देवपुजा जाली भागवतपारायण समाप्त जाले तिसरे प्रहरी स्वारी सकरदरियास गेली मुत्सदमंडली वगैरे बाबुराव वैद्य यास बोलावले तेथे लक्ष्मीनारायेणाजवल ललित जाले साइकाली वाड्यात आले छ २४ रोज स्नान देव-पुजा जाली रामायण समाप्त जाले तिसरे प्रहरी स्वारी तुलसीबागात गेली तुलसीबाग पाहून कुशाबा चिटणीस याचे घरास गेले तेथे जन्म अष्टमीचा उत्साहा असतो आज ललित जाले तेथे दोन घडी बसून ललित जाल्यावर आले छ २६ रोज स्नान देवपुजा करून स्वारी वासुदेवपंत दिवाण निसबत महमद अमीखा पठाण याचे घरास गेली तेथे

घडीभर बसून ललित होऊन आले. वाड्यात खलबत भवानी काळो यासी घडीभर जाले. तिसरे प्रहरी स्वारी बागात गेली. तेथे काकड्या व मकेची कणसे भाजून सर्वांणी भक्षिली. नंतर बंगल्यात घडीभर कलवाताचा तमाशा जाला. फुलाचे हार तुरे गजरे सर्वास दिल्हे. साइकाली वाड्यात आले. छ २७ रोज स्नान देवपुजा करून कुशाबा चिटणीस यासी घडीभर खलबत जाले. तिसरे प्रहरी तुलसीबाग पाहिला. दुसरा बंगला करितात तेथे मयाला वगैरे उभ्या करविल्या. छ २८ रोज स्नान देवपुजा जाली, स्वारी जागेश्वरास गेली. महादेवाचे दर्शण करून इंदुलीचे महादेवास गेले. तेथुन सीताबरडीजवल संगमाचे माहादेवास गेले. तेथून सकरदरियास गेले. लक्ष्मीनारायेणाचे दर्शण करून तुलसीबाग पाहून वाड्यात आले. वाड्यापुढे बैलाची पुजा वगैरे तमाशा पाहिला. छ २९ रोज स्नान देवपुजा करून प्रहर दिवसा मुछदमंडली व बाबूराव वैद्य वगैरे सर्व खुले हातीवर बसऊन चांभारनालयावर गेले. तेथे जेठीच्या कुस्त्या लाऊन पाहिल्या. हाती वगैरे पिटऊन पाहिले. साइकाली नजरबागात येडके जुजविले. छ ३० रोज स्नान देवपुजा करून देवघरी श्रावणमासचे ब्राह्मण जपास घातले होते. त्याचे श्रय घेऊन त्यास दक्षिणा दिली. नजरबागात ताबूद होतो तो पाहून नंतर सर्वांची स्वारी इंदुलीचे बागात गेली. तेथे ब्राह्मणाबरोबर भोजने करून च्यार घडी गंजीफा खेलले. साइकाली वाड्यात आले. छ १ मोहरम स्नान देवपुजा करून हजामत केली. भवानी काळो व बाबूराव वैद्य यासी दोन घडी खलबत केले. नंतर भोजन करून स्वारी तेलंगखेडी येथील बागात गेली. तेथे बंगल्यात च्यार घडी निद्रा करून तल्यात नावेत बसून कलवाताचे गायण ऐकिले. पाण्यात घडीभर नाव फिरविली. नंतर वालके व मकेची कणसे भाजून सर्वांणी खाऊन साइकाली बंगल्यात कलावाताचा नाच दोन घडी जाला. फुलाचे हार तुरे गजरे सर्वास दिल्हे. दोन घडी रात्रीस वाड्यात आले. छ २ रोज स्नान देवपुजा करून स्वारी तयार करून वेंकोजी भोसले व परसोजी भोसले गणपती आणावयास विठल बलाळ सुभे याचे वाड्यात जाऊन गणपती आणून चवदावे घटकेस बसवून पुजा आर्ती जाली. तिसरे प्रहरी कलवाताचा नाच जाला. साइकाली तुलसीबाग जाऊन पाहिला. तेथून आल्यावर स्नान गणपतीची पूजा आर्ती जाली, रात्री कथा जाली. छ ३ रोज स्नान देवपुजा जाल्यावर शाल-जोड्या सावकाराच्या पाहावयास आणल्या होत्या त्या पाहिल्या. दुसरे स्नान करून गणपतीची पुजा आर्ती केली. तिसरे प्रहरी कलावाताचा तमाशा पाहिला. साइकाली तुलसीबाग पाहून आले. रात्री कथा जाली. छ ५ रोज स्नान देवपुजा करून कुशाबा चिटणीस यासी खलबत जाले. वराड प्रांती बेदडे चोऱ्या करितात व वाटा मारितात म्हणून त्यास वराडचे कमाविस-

दार याणी येथे धरून पाठविले त्यास धाट्यापुढे मारूं लागले त्यात येका धेदस्याणे पांडुरंग गणेश बक्षी याचे नाव घेतले की, त्यास दरसाल पाचसे रुपये देतों दुसऱ्या वेदस्याणे खुद खाशाचेच नाव घेतले की, साहेबाचे हुकमावरून कोणतेही कर्म करणे ते करितो महाराजास दरसाल दोन हजार रुपये रसद भरितो असे असून उगेच मारितात। असा राज्यात न्याय इनसाफ अगदीच नाही म्हणून या प्रमाणे बोल्ला। तेव्हा सर्वा वेदस्यांस पाहऱ्यात हवाला केले तिसरे प्रहरी नजरबागात ताबुदाजवळ येऊन वेंकोजी भोसले परसोजी भोसले गुजाबा गुजर व कृष्णाजी मोहिते यांस नाडे गुंडाळून फकीर केले साइकाली स्नान करून गणपतीची पुजा आर्ती जाली सोमवारचे भोजन केले रात्री कथा जाली मागील प्रहर रात्री वाड्याजवल पागेस आग लागली होती ते जाऊन विझविली छ ६ रोज स्नान देवपुजा गणपतीस आर्ती जाली भवानी काळे यासी खलबत दोन घडी केले तिसरे प्रहरी तुळसीबाग पाहिला शहरातील ताबूद नूरमा फौजदार व गुलाम अली याचा पाहून आले वाड्यात आल्यावर खाशास धाखा जाला किंचित घाम येऊन घेरी आली, काही पित जाले होते. रात्री कथा ललित जाले खासे कथेत आले नाहीत मुकुंदमहळी व वेंकोजी भोसले होते छ ७ रोज तिसरे प्रहरी गणपतीस बोलविले शुक्रवार तल्यात नेऊन पुजा आर्ती करून नावेत बसऊन पाण्यात सोडले तेथे अर्ध घटका बसून तोफाचे बाराची वगैरे सिलक पाहिली छ ८ रोज स्नान करून प्रहरभर निद्रा केली तिसरे प्रहरी नजरबागचा ताबूद पाहिला नंतर स्वारी तुळसीबागात गेली बाग पाहून सक्करदरियास गेले लक्ष्मीनारायेणाचे दर्शण करून आले छ ९ रोज स्नान देवपुजा केली पुण्याहून डाकेची पत्रे आली ती भवानी काळे यास घेऊन वाईकडे जाऊन वाचली तिसरे प्रहरी नजरबागातील ताबूद पाहिला छ १० रोज स्नान देवपुजा जाली. परसोजी भोसले याजकडून येक गजदान करविले गजास काली झूल व ब्राह्मणाची पुजा करून त्यास काली वस्त्रे, ढाल तलवार कटार चौकडा सोण्याची कंठी रुपये तोडा येक याप्रमाणे ब्राह्मणास देऊन त्या समागमे गारदी देऊन सिवेबाहेर घालविले. परसोजी भोसले याचे शरीर याचे शरीर रुक्ष व अशक्त जाले. शरीरी जीव व हुशारी काहीमात्र नाही. मुळव्याधीची वेथा बहुत मोड मोठे येतात व रक्तहि पडते. प्राणांतिक अवस्था होत असते. खाशाचे हृदयी भूदया किंवा धर्मवासणा, की आपले छायेस सेवक लोक चाकर वगैरे आहेत, याचे कल्याण असावे सर्व सुखी असावे की आपले राज्यात ब्राह्मण सत्पात्र व कमाविसदार आहेत हे सुखी असावे हे काहिमात्र नाही व धर्मवासणाहि नाहीं जानोजी भोसले याचे वेळेस च्यार पाच लक्षाचा धर्म होता तो मुधोजी भोसले

याणी अगदी मोडला. लाख पन्नास हजाराचा धर्म मुधोजी भोसले याणी ठेविला होता. त्यात हेहि मोडतात. थोर थोर ब्राह्मण सत्पात्र, त्यांची वर्षासणे बहुता दिवसाची ते अगदी मोडली. कोणास देणे तर ज्यास पाचसे रुपये वर्षासण पावत होते त्यास पनास रुपये द्यावे व कमाविसदार यास मामलत देणे तर हलीसालची रसद झाडून व पुढील रसदे-ऐवजी निमे ऐवज घ्यावा तेव्हा मामलत सांगावी अशा प्रकारची राजनीत व रीत आहे. तेव्हा सहजच आचरण तसे फल, राज्यात कोणीयेक खुशाल नाही. जो पाहावा तो उदासच. धर्म तेथे जय आहे व बहुत भाग्य समर्थ प्रज्यापालण करून आपले सेवकजण लोक वगैर यास च्याहून त्याचे कल्याण इच्छिल्यात येश व जय प्राप्त आहे. तें येथें काडीमात्र नाही. तशात अलीकडे क्रूरता धरली आहे. खंडोजी भोसले होते तेव्हा दोन गोष्टीचे भये होते, येक आपले घरातील खंडोजी भोसले याचे व त्याच्याबद्दल स्वामीकडीलहि भय होते. ते वारले तेव्हा निर्भय जाले. सहच क्रूरता धरली. हातीविसी व फौज पाठवावयाविसी स्वामीचे पत्र बाबूराव यास आले आहे, त्यास नगीना हाती चांगला काही देत नाहीत. सुंदरगज पाठवावा असे आहे. हाती पिटून चालऊन याजकरिताच पाहत असतात. फौजेचा मजकूर तर प्रस्तुत काही दिसत नाही. आणि बाबूराव याच्याणे काही निक्षून बोलवत नाही. फौजेविसी पत्र आल्यापासून मोठी मसलत पडली आहे. स्वतः बाबूराव आले तेव्हा पाच हजार फौज पाठवावी व फौजेबरोबर कोणी खाशाणे जावे असे असता बाबूराव याणी काहीच केले नाही. वेंकोजी भोसले यास पाठवावे परंतु त्याचे लग्न होणे आहे. इतक्यावरच निमित्य करून टाळले व फौज पाच हजार पाठवावी ते माहाप्रयासे अडीच तीन हजार पाठविली. बाबूराव याविसी खाशाचे चित प्रशस्त सरळ नाही. महिण्या पंधरा दिवसा वाड्यात येत जावे म्हणोन बाबूराव यास सांगितले आहे. त्याचे चिरंजीव दो चौ दिवसी जात असतात. वरकड जाबसाल व बोलणें बोलावयाचे ते बाबूराव स्वता बोलत नाही. कारभारियासी व खाशासी बोलावयास बाबूराव याणी येक मध्यस्त घातला आहे. राजश्री कृष्णराव बलवंत याजकडील फडणीस जिवाजी माहादेव त्याचा कारकून कोंडोपंत येथे आहे. तो याणी मध्यस्त घातला आहे. असा बाबूराव याणी सर्व प्रकारे दाब व जरब गमावली. बाबूराव म्हणजे काय आणि यास मध्यस्त व्हावा कशास? याची पहिली जरब कसी होती आणि आता खुशामत आर्जव करून भोसल्याचे जाले आहेत. तेव्हा फौजेविसी निक्षून बोलतील आणि फौज लवकर येईल हे कलतच आहे. × × चे व खुशामतीचे पोटांत काय घड-त्रितील ते खरे. पुण्यातीलहि कारभार प्रखर नाही. असा मलमलीत आहे हे भोसल्यास

समजलेच आहे याचा कोणीयेक खासा फौजेबराबर असावा नाहीतर पुण्यात वाडा राहावयास देऊन येक खासा नेहमी जवळ ठेवावा तेव्हा याचे ध्यानात गोष्ट येईल व फौजेविसी व हरयेक कारभारप्रकरणीचे जाबसाल बोलावयास नीट पडेल येथे राहून स्वस्थ पाटीलकी करितात हाती थोडी वागवगीचे वाडे आयाश आराम स्वस्थ × × तेव्हां स्वामीकडील लक्ष फाशास राहावे रघुनाथराव सचीव याजकडील कारकून स्वारीबरोबर आले ते येथेच आहेत प्रस्तुत पंतसचीव कैलासवासी जाले म्हणून त्याचे कारकुनास कृशाबा चिटणीस याजकडून सांगितले की तुम्ही पुण्यास जा, इतक्यावर राहाल तर येथे खर्चास मिळणार नाही असे साफ सांगितले त्याचे यजमानाचे पत्र आले आहे की तुम्ही प्रस्तुत येऊ नका आमचे संस्थानाचा बदोबस्त सरकारावून कसा होतो त्याप्रमाणे लिहू तसे करणे, प्रस्तुत न येणे × × × याणी साफ सांगितले की तुम्ही जा असा प्रकार आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. आज छ मजकूरी सायंकाळी कलकत्तेकर इंग्रज याजकडून हाती नग दोन व पोशाख व जवाहीर आले ते इंग्रजाचा वकील घेऊन सायंकाळी वाड्यात आला होता हाती व वस्त्रे घेतली सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

ऐ. सं. ८८
का सं. १३
प. क्र. ४१

३००

८ ऑक्टोबर १७९१

श्री

सेवेसी श्रीराम सदाशिव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना छ ९ सफर मुकाम नागपूर येथपावेतो असो विशेष राजश्री रघोजी भोसले याजकडील दिनचर्या छ १३ मोहरम दोन प्रहरी स्वारी सोणेगाव येथील बागात गेली तेथे दोन घडी गंजिफा खेळून मक्याची कणसे भाजून खाल्यावर भोजने केली काशीकडील कलावतीन आणली आहे तिचा तमाशा च्यार घडी जाला सायंकाळी स्वारी वाड्यात आली छ १४ रोज स्नान देवपूजा करून मुत्सदमंडळीस बोलाऊन बाईकडे प्रहरभर खलबत केले आणखी फौज पाठवावयाविशी मोठी मसलत पडली छ १५ रोज स्नान देवपूजा जाली भवानी यासी खलबत घडीभर जाले तिसरे प्रहरी स्वारी तुळसीबाग पाहावयास गेली तेथून शुक्रवारचे गणपतीस गेले चतुर्थी होती. तेथून आल्यावर स्नान केले छ १६ रोज स्नान देवपूजा करून मुत्सदीसुधा बाईकडे प्रहरभर खलबत केले. अधी खासे व मुत्सदी मिळोन काही मसलतीचा विचार करितात. नंतर बाईकडे जाऊन बाईस सांगतात, तेव्हा बाईचे याचे विचारे कांही ठराव होतो, तेव्हां पुढे कोणताही कारभार चालतो असे आहे तिसरे प्रहरी वाड्यापुढे दादा भारा हाती आणून पाहिले. छ १८ रोज स्नान देवपूजा करून बापुराव

वैद्य याचे चिरंजीवासी घडीभर बोलून तिसरे प्रहरी स्वारी ताजखान पठाण याचे घरास गेली. त्याचा बंधु छत्तीसगडाकडे भांडणात पडला म्हणून त्याचे समाधान करून आले. खाशाचे मांडीस फोड जाला होता त्याजमुळे शरीरप्रकृतीस पाचसात दिवस स्वस्थ नवते. छ २४ रोज स्नान देवपूजा करून शालजोड्या खरेदी करावयास आणल्या होत्या त्या पाहिल्या. तिसरे प्रहरी स्वारी तुलसीबागात गेली. बाग पाहून सकरदरीयास जाऊन लक्ष्मी-नारायणाचे दर्शण करून तोफखाना पाहून आले. छ २५ रोज स्नान देवपूजा द्वादशीचे भोजन करून स्वारी केदारजी मोहिते याचे घरास गेली. त्यास समाधान नाही. तेथे घडीभर बसून त्याचा समाचार घेऊन आले. तिसरे प्रहरी सिताबर्डीस जाऊन तोफखाना पाहिला. तेथून बागात गेले. मकेची कणसे भाजून खाऊन आले. वाणवले याचे गुमास्ते पैठणकर यासी पैठणी कापड आणले होते ते खरेदी करून जामदारखान्यात कापड पाहून लोकांचे मुछदी वगैर यांचे पोशाख लावले. छ ६ सफर तिसरे प्रहरी घोडी व हाती धुयास नदीस नेली. त्याज बराबर खासे गेले होते. घोडी हाती धुतल्यावर घोड्यास साज घालून वाड्यात येऊन निशाण जरीपटका याची पूजा केली व हाती घोडी यांची पूजा केली. छ ७ रोज तिसरे प्रहरी तांबडा पोशाख करून कंठी चौकडा घातला. जडावाचे बखतर व झगा घालून स्वारी सिवउलंघणास निघाली. अंबारीत खासे व परसोजी भोसले बसले. खवासीत पांडुरंग गणेश बक्षी व जानो येशवंत पाग्या उभयता बसले होते. शेहराबाहेर गेल्यावर उतरून सर्वाणी कैलासवासी मुधोजी भोसले वगैर याचे थडग्यास नमस्कार करून तेथून लोकांचे मुजरे घेत शमीपावेतो आले. शमीपूजा करून तोफाचे वगैर सिलक जाली. तेथून घोडीवर बसून वाड्यात आले. समागमे फौज अजमासे बारासे पंधरासे पावेतो होते. वाड्यात येऊन देवदर्शण करुन कचेरीस साहा घडीपावेतो बसले. शहरचे ब्राह्मण वगैर पाणी नारळ आणले होते ते घेऊन त्यांसी विडे दिल्हे. नंतर मुछदी व बाबुराव वैद्य वगैर वकीलमंडली व कारकूण व मामलतदार वगैर सर्वाणी नजरा केल्या. सर्वांस विडे दिल्हे. कर्नाटकात पाठवावयास तीन हजार फौज नेमितात. काही येथील लोक व काही नवे ठेवितात. तीन हजार नेमितात तेव्हा हजार दीड हजारपावेतो येईल. पहिली च्यार हजार फौजेचे आवाई होती ते येथून जाता अडीच हजार गेली, ते हली तुंगभद्रेवर बारासे लोक आहेत. अडचा हजारांतून लोक उठून आले. कर्नाटकात रा करितात त्यास तीन तीन रोजमरे देतात. तेव्हा लोक कितीक वराडातूनच माघारे फिरून येतात असा प्रकार आहे. कारकुनाच्याणे फौजेवर जरब ठेऊन बंदोबस्त राहून चाकरीचे उपयोगी पडेल असे घडत नाही. कोणी येक खासा बरोबर असला म्हणजे

फौजेचा बंदोबस्त असतो पहिल्याणे वेंकोजी भोसले याणी यावे ते बाबुराव याणी सत्य दाबारा हजार रुो घेतले आणि त्याणी न जावे असे केले थोडकेसे लग्नाचेहि निमित्य होते तेव्हा भयानी काळो याचे चिरंजियास पाठविले आता चिमाबाई कासीस जातात असी आवाई पाडली आहे त्यांजसमागमे कोणी येक गयावर्जन करावयास पाहिजेच वेंकोजी भोसले जातील आता फौज आणखी पाठवावयाची आहे त्याजला वेंकोजी भोसले याणी जावे असे बाबुराव कदाचित बोलतील याजमुळे कासीस जाययाचे आवाइ घातली अशी बाबुराव याच्याणे अगदी बोलअतच नाही पूर्वसमुद्रपर्यंत पाऊण कोटीचा मुलुख आणि बारासे लोक चाकरीस पाठविले आहेत। असी लाजही वाटत नाही सत्य नागपुरात बसून पाटीलकी करावीसी वाटती. येक फौज पाठविली तीस वर्षे होत आले अद्याप चाकरीस रुजु नाही. जुबाचे लढाईचे दिवसात उपयोगी नाही तेव्हा तह होऊन सला जाल्यावर फौज येईल निमित्यास भोसले याची फौज आली म्हणावयास दाहा हजार फौज व वेंकोजी भोसल्यास पाठऊन देणे म्हणून बाबुराव यास जरबेचे येक पत्र यावे तेव्हा काही घडेल शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

स मं ८८ का मं १३ प क. ४२	३०१ श्री	१४ डिसेंबर १७२१

शेवेसी श्रीराम सदाशिव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता छ १७ रा। खर मुकाम नागपूर येथास्थीत असो विशेष राजश्री रघोजी भोसले सेनासाहेब सुभा याजकडील दिनच्यर्या छ ८ सफर माधवराव आबाजी यास पत्रे दिल्ही कर्नाटकांत फौज जाणार त्याजवरावर पाठवितात छ ९ रोज स्नान देवपूजा जाल्यावर बलवंतराव याजकडील लस्करची पत्रे आली ती वाचली तिसरे प्रहरी स्वारी तुलसीबाग पाहून सक्करदरीयास गेली लक्ष्मीनारायेणाचे दर्शण करून आले छ १० रोज द्वादसीस प्रातःकाली सर्वांची स्वारी सक्करदरीयास गेली तेथे आवलीभोजन केले कल्वांताचा नाच जाला च्यार घडी कथा जाली साइंकाली वाड्यात आले छ ११ रोज स्नान देवपूजा करून स्वारी सिवराम हरी खाजगीवाले याचे घरास गेली तेथे नवरात्र वेंकोबाचा उछ्छाह असतो आज ललीत जाले. तेथे घडीभर बसून ललीत जाल्यावर आले वाड्यात आल्यावर विजयादशमीची पत्रे सरकारची बाबुराव वैद्य घेऊन अले ती खासे मडली व भवानी काळो व श्रीधर लक्ष्मण मुनसी याणी सर्वांणी घेतली तिसरे प्रहरी तुलसीबाग पाहून जगेश्वरास गेले. साइंकाळी सोमवारचे स्नान करून भोजन केले. छ १२ रोज स्नान करून स्वारी सूर्योदयी

निघोन पौर्णिमेचे ग्रहणास स्नाने करावयास कन्हा नदीचे संगमी चिमाबाईसुधा सर्वांची स्वारी गेली. मार्गात खासे सिकार खेलत गेले. तेथे स्नान दाण करून छ १३ रोज झरीस मुकाम होता. छ १४ रोज तीन कोस पाटणसांगवी येथील पागा पाहवयास खासे गेले. पागेतील घोडी सिंगरे झाडून पाहून संगमचे मुकामास आले. छ १५ रोज सिकारीस गेले, दोन प्रहरी हरणे घेऊन आले. छ १६ रोज चतुर्थी, आदाशास श्रीगणपति आहे तेथे चिमाबाई व परसोजी भोसले गेले होते. छ १७ रोज रविवारी साइकाली स्वारी नागपुरास आली. छ १८ रोज स्नान देवपूजा करून दोन घडी खलबत जाले. खंडोजी भोसले याचे बागात बाबुराव वैद्य याणी झाडून मुछदमंडळीस मेजवानी केली. रात्री वाड्यात बाईकडील जानु जासूद चोरीस धरला तो पहाऱ्यात देऊन छ १९ रोज स्नान करून जानु जासूद यास वाड्यावर नेऊन दोन प्रहरपर्यंत जेरबंदाखाले मारून चोरी केली ती सनगे काय काय नेली, कोणास दिल्ही, कोणास विकली म्हणून पुसले. त्याणे बटकीची वाण्याची वगैर नावे घेतली. त्यास आणून पाहऱ्यात दिल्हे· जानु जासुद आज पाच सात वर्षे चोरी करीत होता. चिमाबाई याणी जामदारखान्यातून जानूकडून दोन सनगे आणवावी, जानू मधे लबाडी करून च्यार आणावी, दोन बाईकडे द्यावी, दोन मधे ठेवावी. रुपयाच्या वाट्या जांब, चौफुले सोण्याचे वगैर, उंच उंच सनग यास गणतीच नाही. दोशा रुो चे सेले, दोशा रुा चे किमखाप व पितांबर भारी भारी सनगे वहुत चोरी केली. दीडलक्ष दोनलक्ष रुो चा माल पाच सात वर्षांत नेला. कचेरीस धरल्यावर वाड्यात बुरजानी व जिन्यात व सफेलीवर जागा जागा कापडाची दिंडे त्याणे ठेवली होती ते काहडली. असा भोसल्याचे घरचा कारभार भोपलसुद्धा, जामदारखान्यातही चौकसी काडीमात्र नाही असा अंधळा कारभार आहे. पंचवीस कारकून ल्याहवयास आहेत परंतु कापड खरेदी जमा किती जाले, त्याचा खर्च काय जाला, आणि सिलक काय निघाले, हा सनगझाडा काही जन्मात निघाला नाही. हाजारो सनगे चोरीस पाच सात वर्षे गेले ते कलले नाही, बोभाट जाला नाही, चोर चोरीस धरला तेव्हा कलले असा कारभार आहे. पुण्यातही कारखान्या कारखान्याची हेच गत्य आहे. महादाजी लस्करी फडणीस याचे बुधीस काही भ्रंश जाला. बोलण्यात चल पडे असे जाले होते म्हणून खाशानी त्यास राजेश्वरास पाठविले होते की राजेश्वर जागृतस्थल चांगले आहे, तेथे वर्ष सा महिणे राहून चांगला होऊन यावयास सागितले होते. त्यास राजेश्वरी अश्विन शुा १० देवआज्ञा जाल्याचे पत्र आले ते वाचले. तिसरे प्रहरी स्वारी केदारजी मोहिते याचे घरास गेली. त्यास समाधान नाही म्हणून त्याचा समाचार घेऊन आले. छ २० रोज

स्नान देवपूजा करून जामदारखान्यात बसून दोन प्रहर पावेतो कापड पाहिले तिसरे प्रहरी स्वारी तुल्सीबागात गेली बाग पाहिला तेथे बाबुराव वैद्य आले होते तेथे दोन घडी बसून आले रात्री जानू जासूद यास आणखी मार दिल्हा छ २१ रोज स्नान देव पूजा जाल्यावर हाजामत केली लस्करची पत्रे आली ती वाचली छ २२ रोज स्नान देव पूजा करून जानु जासुद व त्याचा गिलाफी शेहरचा परीट येक होता त्या उभयताचे हात तोडविले जामदारखान्यात प्रहरभर कापड पाहिले तिसरे प्रहरी नजरबागात पाच सात हाती आणून पाहून स्वारी तुल्सीबागात गेली बागान झाडे व बंगले वगैर पाहून आले. छ २४ रोज स्नान देवपूजा करून दोन घडी भवानी काळो यासी खल्वत जाले. तिसरे प्रहरी स्वारी सक्करदरीयास गेली तेथे येकादसीस लक्ष्मीनारायेणाजवल च्यार घडी कथा ऐकून आले छ २५ रोज स्नान देवपूजा करून घडीभर खल्वत जाले. तिसरे प्रहरी स्वारी जागेश्वरास गेली देवदर्शण करून आल्यावर सोमवारचे स्नान करून भोजन जाल्यावर रात्री जुवा खेळले. दिपवालीत पाच सात दिवस जुवा बहुत खेल्तात छ २७ रोज प्रात काली चतुर्दसीचे स्नान करून स्वारी केदारजी मोहिते याचे घरास गेली त्यास समाधान नवते त्याचा काल जाला त्यास बागात नेऊन अग्न दिल्हा स्नान करून वाड्यात आल्यावर च्यार घडी जुवा खेलले फराल करून आणखी तिसरे प्रहर पासून दोन प्रहर रात्रपर्येत जुवा खेलले छ २८ रोज स्नान देवपूजा करून प्रहरभर जुवा खेल्ले तिसरे प्रहरी नजरबागात हाले झुजविले रात्री दारु वगैर आतसबाजी सोडविली नतर मुछदी मंडली व साहुकार मडलीस बोलाऊन दोन प्रहर रात्रपावेतो जुवा खेलले छ २९ रोज स्नान देवपूजा करून दोन घडी भवानी काळो व बाबुराव वैद्य यासी खलवत जाले नंतर प्रहरभर जुवा खेल्ले तेथून स्वारी सर्वांची मुछदमडळीसुधा माधोजी नाईक काळे साहुकार याचे घरास गेली तेथे वहीची पूजा जाली खाशास व मुछदमडळीस व बाबुराव वैद्य याचे चिरंजिवास वस्त्रे दिल्ही रात्री मुछदमंडळीस बोलाऊन दोन प्रहर रात्रपावेतो जुवा खेलले छ १ रावल स्नान देवपूजा करून प्रहरभर निद्रा केली अवघी रात्र जुवा खेलतात दोन प्रहरा खासे मंडली व मानकर मडली वगैर कृष्णाजी मोहिते त्याही याचे घरास भोजनास गेले होते. भोजने करून आल्यावर तुल्सीबाग जाऊन पाहिला छ २ रोज स्नान देवपूजा करून स्वारी वेंकोबा पुराणिक याचे घरास गेली पुराणिकास समाधान नाही म्हणून घडीभर बसून त्याचा समाचार घेऊन आले दोन प्रहरी गुज्याबा गुजर भाचे याचे सासऱ्याचे घरी मडळीसुधा भोजनास गेले छ ४ रोज स्नान देवपूजा जाली किमखाप व मशरूचे ठाण सवदागराणी आणली होती ती पाहली तिसरे प्रहरी स्वारी

सकरदरीयास गेली. तेथे आवलीभोजनास जागा पाहिली. लक्ष्मीनारायणाचे दर्शण करून आले. छ ५ रोज स्नान देवपूजा करून हाजामत केली. भवानी काळो यासी घडीभर खलवत केले. तिसरे प्रहरी स्वारी सकरदरीयास जाऊन तेथे बागात आवलीभोजनाची जागा पाहिली. छ ६ रोज प्रातःकाली स्नान करून सर्वांची स्वारी सकरदरीयाचे बागात आवलीभोजनास गेली. दोन प्रहरी भोजने करुन च्यार घडी कलवाताचा तमाशा पाहिला. साइकाली स्वारी वाड्यात आली. छ ८ रोज स्नान करून बृहस्पती पालटतात म्हणून केशरी पोशाख सर्वांणी करून धान्य वगैर ब्राह्मणास दिल्हे. छ ११ रोज प्रातःस्नान करून सर्वांची स्वारी सकरदरीयास गेली. तेथे लक्ष्मीनारायेणास सोण्याचा जडावाचा मुगुट नवा करविला होता तो बसविला. दोन प्रहरी भोजने सर्वांची तेथेच जाली. तिसरे प्रहरी कथा जाली. साइकाली स्वारी वाड्यात आली. छ १२ रोज स्नान देवपूजा करून तरवारीचा परज ठोकून कानसून नवा बसऊन नीट करविला. तिसरा प्रहरी नजरबाग पाहिला. तेथे पागातील तान्ही सिंगरे आणून पाहिली. छ १३ रोज प्रातःकाली सर्वांची स्वारी सकरदरीयास गेली. तेथे भोजने केली. कार्तिकीचा उत्छहा लक्ष्मीनारायेणाजवल असतो. च्यार घडी कथा जाली. साइकाली वाड्यात आले. कार्तिकीची यात्रा श्रीरामक्षेत्री भरत असती तेथे बाबुराव वैद्य गेले होते. आज नागपुरास आले. छ १५ रोज स्नान देवपूजा करून स्वारी नाना घाटगे याचे घरास गेली. मशारनीले रुसले होते त्यास समजाऊन स्वारी तेलंगखेडीचे बागात गेली. तेथे वेकोजी भोसले याणी मेजवानी केली. भोजने करून कलवाताचा नाच जाला. माधवराव आबाजी फौजेबा कर्नाटकात जातात त्यास वस्त्रे देऊन त्याचे कुच करविले. च्यार घडी रात्रीस स्वारी शहरात आली. छ १७ रोज इंदुवारी प्रहर दिवसा खंडोजी भोसले याची स्त्री गंगाबाई यांस देवआज्ञा जाली. त्यांस दोन प्रहरी बागात नेऊन आग्न दिल्हा. छ १९ रोज तिसरे दिवसी रक्षा सावडावयास गेले. रक्षा भरून रामक्षत्रास पाठविली. क्रियाकर्म झाडून रघुनाथ भोसला याणे केले. अकरावे दिवसी गोदाण व शया येक दोन दाण दिल्ही. खंडोजी भोसले याचे नाव घ्यावयास काही जागा राहिलीच नाही. बहुत चिंता. योग्य गोष्ट जाली. गंगाबाई याची रांडरोटी लाख पनास हजाराची जागा होती तेही हातास आली व माहादाजी लस्करी फडणीस यास राजेश्वरी काल जाला त्याचीही लाख दोन लाख रुपैची जागा होती ती आणली. त्याच्या वाड्यात चौक्या मात्र आहेत. छ ३ राखरी प्रहर दिवसा सर्वांची स्वारी कोराडीस हुरडा खायास गेली. हुरडा खाऊन भोजने केली. कलवाताचा तमाशा दोन घडी जाला. साइकाली कासीकडील कलावातनीचा तमाशा जाला. छ ४ रोज प्रातःकाली हजामत केली स्नान

देवपूजा जाल्यावर दोन घडी खलबत जाले तिसरे प्रहरी तुलसीबाग जाऊन पाहिला छ ६ रोज प्रातःकाली शालजोड्या खरेदी करावयास आणल्या होत्या त्या पाहिल्या व गंगादास जमनादास साहुकार कासीस जातात त्यास भेटे दिल्ही तिसरे प्रहरी नजरबागात घोडी व सिंगरे आणून पाहिली छ ७ रोज स्नान देवपूजा करून स्वारी वेंकटेशाचे काठीचे दर्शणास गेली दर्शण करून आल्यावर घडीभर खलबत करून प्रहर दिवसा स्वारी तेलंगखेडीचे बागात गेली तेथे हुरडा खाऊन भोजने केली बगल्यात निद्रा केली तिसरे प्रहरी कलवाताचा तमाशा जाला, सायंकाली वाड्यात आले. छ ८ रोज स्नान करून प्रहर दिवसा स्वारी सर्भाची सोनेगाय येथील बागात गेली तेथे हुरडा खाऊन भोजने केली कलवाताचा तमाशा जाला, सायंकाली स्वारी वाड्यात आली कासीकडील कलावतीन वीस पचवीस हजार रो खर्चून आणली तीमधे गायाचे कसब वगैर काहीच चांगले नाही व स्वरूपानेही बहुत चांगली नाही याजकरिता नापसंत जाली मर्जी दिक नाखुश जाली आणि पंचवीस हजार रो देऊन कलवातीन आणावयास लखनऊकडे पो आहे कर्नाटकात पाठवावयास येथून फौज आठ दाहासे रा केली, आणखी वराडात च्यार पाचसे जमेल येकूण हजार दीड हजार जाणार असे आहे वराडातील दर्यापुर प्रो येथील मामलत साठी हजाराची बाबुराव वैद्य करीत होते. च्यार हसे करून पैका घ्यावा असा ठाहून करार होऊन निश्चये ठरला होता ते मागती वीस कटले येवढ्यासाठी काम, ऐवजाची किरकिर पडती, हे योग्य नाही असे जाणून मामलत न द्यावयाचे केले बाबुराव वैद्य फजीत पडले आपटी खाली पहिल्या प्रो कारभार करावयास पाहतात परंतु चालत नाही. पहिल्याप्रो जरब व दाब नाही खुशामत आर्जव करून आहेत, असे असता याचे चालू देत नाहीत याचे ठिकाणी भोसल्याचे चित प्रशस्त सदाशिवपंताप्रो नाही सदाशिवपंत येथे होते तेव्हा त्याचे घरास आठपंधरा दिवसा खासे जात असेत, याचे घरास कधीच जात नाहीत. नगीना हती परसोजी भोसले याजकडे आहे तो देत नाहीत म्हणून बाबुराव यांणी लिहिले होते हली नगीना हती येथून छ १२ रखरी रा केला हाती करिता खासे वगैर याणी वाईट मानले. दुसरे कार्तिकमासी ब्राह्मणाच्या मुली दोन रात्री आणल्या होत्या, त्या दिवसा शहरात जासूद व खिजमतगार पाठऊन पाळत घ्यावी, कोणाचे वाड्यात चांगल्या मुली आहेत असी बातमी ठेऊन रात्री दाहापाच माणसे व गाडी पाठऊन मूल आणावी, येक रात्र वाड्यात ठेऊन सकाली पाठऊन द्यावी असे कर्म आरंभले त्यात येक मूल अकरा वर्षाची होती तीस ऋतु प्राप्त नव्हता, ते रात्री वाड्यात आणून सकाळी त्याचे घरास पाठऊन दिल्ही ते दिवसी तिचा काळ जाला विष घेऊन प्राण दिल्हा की कसे जाले हे ईश्वर जाणे, परंतु काळ जाला

दुसरी येक मूल आणली होती ते ब्राह्मणानी वेघळी शूद्रीप्रो ठेवली. लेकोले भोसले आहेत त्यांच्या स्त्रिया बलेच आणाव्या, ज्या बटकीजवल व कलवातनीजवल मुधोजी भोसले जात होते त्यांसी हे कर्म करितात. वरकड सर्व असो, परंतु ब्राह्मणांच्या मुली आणून कर्म करावे हा अनर्थ आहे. ब्राह्मण गरीब, त्यांचा वाली कोणीच नाही. हे गोष्ट चिमाबाईस कलली. त्याणी सांगितले की तूं हे कर्म आरंभले हे चांगले नाही. हे लक्षण पुढे बुडावयाचे. तुजला आणखी कलावातनी बटकी काय उण्या जाल्यात. आणखी नाटकशाला दहावीस ठेव. परंतु हे कर्म ब्राह्मणांच्या स्त्रियांसी करावे हे ठीक नाही. बाई आधीच आपले दुखाणे श्रमी, तशात याचे आचरण ऐकून बहुतच पश्चाताप बाईस जाला. बाई बहुतच उदास जाली. आता येथे राहणे हे ठीक नाही म्हणून प्रस्तुत कासीस जाण्याचा निश्चये केला. प्रयागीं देह विसर्जन करावा, मागती नागपुरास न यावे, असे बाईचे मानस बहुत आहे, मग रुणानबंध, ईश्वर काय घडवील ते खरे. समागमे वेंकोजी भोसले जातात. बाईस पश्चाताप जाला. उदास आहेत. माघारी यावयाची इछा नाही म्हणून परसोजी भोसले यास बाईबरावर देतात. हे मूल आहे, याच्या लोभाणे ममतेने बाई उदास होणार नाहीत असें आहे. मग ईश्वर काय घडवील ते खरे. दोन तीन मजली बाईबराबर खासे वगैर झाडून मंडल जातात. आपण ब्राह्मणांचे स्त्रियांसी कर्म करावी. आपले आचरण असे असून स्वामीची निंदा करितात. पुण्यात घासीराम याणे कोंडून बेवीस ब्राह्मण मारले. स्वराज्य ब्राह्मणांचे असून न्यायनीत इनसाब काडीमात्र खरा नाही. नानाचा कारभार, घासीराम वाजवी पैका मेलऊन देत होता असे नाही. द्रुष्ट कर्माचा पैका. उगेच तुफान घ्यावे आणि पैका मेलवावा तो नानास बहुत प्रीतिकर. नानास पैका गोड लागतो, कसाही मेलऊन देवो! त्याची चौकसी न्याय इनसाब खरा पहाणे हे गोष्ट राज्यांत नाहीच. श्रावणमासचा धर्म माघून चालत आला म्हणून आताही लाख पनास हजार करितात. लौकिकासाठी धर्म करावा, नीत चांगली असावी हे काही अंतःकरणी भुनदया नाही. दुसऱ्याचे घर घ्यावे न आनयाये, हे मात्र भूतदया आहे याप्रो निंदा करितात. बाई यात्रेस जातात. म्हणून झाडून मुछदमंडली व कारभारी याजवर पटी घातली आहे. कोणावर दाहा हजार, कोणावर वीस हजार, कोणास पनास हजार लाख रुो, पाहून पाहून दाहापाच लक्ष रुो पटी सर्वांवर करतील. चिरंजीवाचे लग्न केले त्यास दाहा पंधरा हजार रुो खर्च लागला, परंतु लग्नसमंधे मिलकत च्यार लक्ष रुोची जाली. त्याप्रोच यात्रा. यात्रेस च्यार पांच लक्ष रुा खर्च लागेल, परंतु पटी दाहा लक्षाची करतील! लोकावर पट्या घालाव्या, ब्राह्मणाच्या स्त्रिया आणून कर्म करावी, ते भिक्षुक ब्राह्मण लोक वगैर श्राप देतात. तलतलितात. लोक म्हण-

तात की पुण्यातीलही कारभार असाच बुळा पडला, यांस कोणाची जरब नाही, दाब नाही, भय नाही, स्वईछ, चितास येइल ते कर्म करितात वाई यात्रेस जातात म्हणून देशाकडील वगैर इकडील यात्रा च्यार पाच हजार मिळाली त्या यात्रेस समागमे जाऊ देऊ नये समागमे नेल्यास प्रयागी कासीत वगैर हसिलाविसी वगैर खटखट कजिया पडेल आपणास खर्च पडून मागती परराज्यात छीथिक होईल ते कामाचे नाही त्यापेक्षा यात्रेस येथेच ताकीद करावी की तुम्हे पुढे जा अथवा मागे राहा, वा येऊ नका म्हणून ताकीद करितात बाळाजी गोविंद बुंधेले हे कासीस गेले होते. कमावीसदार असता दाहा हजार यात्रा होती, त्यास हसील वगैर येक पसा घेऊ दिल्हा नाही हसिलाविसी प्रयागी कज्या पडला प्रयाग लुटायास तयार जाले, परतु यांचे पासून येकसो घेऊ दिल्हा नाही. सेवटी आपण जातीने च्यार ल्क्ष रुो दिल्हे आणि भोसले सरदार मातवर याची गस्य असी बरावर येऊ नका म्हणून यात्रेस सांगतात। छ १३ राखरी पौर्णिमा मदयारी मागील प्रहर रात्री मुहुर्ते करून चिमाबाई व वेंकोजी भोसले, परसोजी भोसले, इंदुळीचे मुा डेऱ्यास गेले छ १४ रोज रविवारी प्रहर दिवसी मुहुर्ते करून खासे डेऱ्यास गेले छ १५ रोजी कुच करून संगमचे मुक्कास गेले खासे बाईसमागमे दोनच्यार मजली जाणार, माघारे फिरून किल्ले पाहात सिकार खेल्त येतील नागपुरास यावयास महिणा पधरा दिवस पाहिजेत स्वारी वा जावे तर जवळ राहुटी पडताळ नाही व जासूद जवळ नाही. पत्रास तीन महिणे जाले याजकरिता पत्र रा केले जासुद नाही तेव्हा पत्र च्यार महिण्या साहा महिण्या एकच पाठवावे, कसे कसे करावे हे मोठे सबनीसास किती लिहिल तर मनास येत नाही व स्वामीसही लिहितो स्वामीचे नाथ समर्थ व प्रताप थोर आणि सेवकास राहुटी पडताळ मिळेना लस्करात उघडे राहावे ते योग्य दिसेना। हे लिहु तऱ्ही कोणास, कोण मनास आणितो? रोजमऱ्यात राहुटी वगैर करावी तर रोजमरा येथे घोडी माणूस शेहरचे खर्चास पुरत नाही असा प्रकार आहे शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना सचिवाकडील कारकून येथे होते त्यास स्वारी जातेसमई निरोप दिल्हा, पुण्यास जाणार. बाबुराव याचे मातुश्रीसमागमे बाबुराव याचे चिरंजीव जाणार, हे विज्ञापना

रु.	नं	८८
का	नं	१३
प	क्र.	४३

३०२ — १३ फेब्रुवारी १७९२

श्री

शेवेसी श्रीराम सदासिव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता छ १९ जमादिलाखर मुक्काम नागपूर येथास्थित असो विशेष छ २० रविलाखरी रामक्षेत्र येथील

मुकामी घासदाण्याचे मामलतदार यांस वस्रे देऊन तेथूनच कूच करून डोंगरतलाव येथील मुकामास गेले. मुछदमंडली याणी चिमाबाई यांचा निरोप घेऊन नागपुरास आले. तेथून कूच करून सिवणीछेपारे येथील महमद आमीखान पठाण याची मेजवानी मुकाममजकुरी जाली. तेथून कूच करून बाई पुढे गेले. खासे माघारे फिरून देवगडास येऊन तेथे च्यार पाच मुकाम करून देवगडचा किला वगैरे पाहिला. व दोन तीन दिवस सिकारीस गेले. बुराणशा गोंड राजा बराबर होते. तेथून कूच करून कूच दरकूच येऊन छ १५ जमादिलावल मंगलवारी प्रातःकालचे च्यार घटका दिवसा इंदुलीस येऊन खारी च्यार घडी उभे राहिले. तों नागपुराहून मुछदमंडली आले त्याची भेट जाली. मुछद्याणी सर्वांणी नजरा केल्या. तेथे च्यार घडी बसून बाबूराव वैद्य वगैरे आले. यांची भेट जाल्यावर स्वारी निघोन आकरावे घटकेस राजश्री सेनासाहेब सुभा वाड्यात येऊन दाखल जाले. देवदर्शण करून बिछात केली होती तेथे येऊन मानकरी व बारगीर वगैरे पठाण लोक याचे मुजरे घेऊन तेथे क्षणभर बसून वाड्यात गेले. तिसरे प्रहरी स्वारी तुलसीबागात गेली. तेथे बाग पाहून च्यार घडी बसून आले. छ १६ रोज प्रातःकाली लस्करची पत्रे आली ती वाचली. बाबूराव वैद्य व भवानी काळो यासी खलबत करून दोन प्रहरी शुक्रवार तल्यात स्नानास गेले. स्नान करून येऊन भोजन जाल्यावर मानकरमंडली व कारकूनमंडली यानी तिलगूल आणले होते ते घेतले. साइकाली मुछंदमंडली व बाबूराव वैद्य याणी तील आणले होते ते घेतले. छ १७ रोज स्नान देवपुजा करून च्यार घडी खलबत केले. तिसरे प्रहरी गणपतीचे दर्शणास गेले. चतुर्थी होती. दर्शण करून स्वारी तुलसीबागात गेली. बाग पाहून आल्यावर स्नान केले. छ १९ रोज स्नान करून देवघरात खलबत केले. तिसरे प्रहरी स्वारी सकरदरियास गेली. लक्ष्मीनारायेणाचे दर्शण करून तल्याचे काठी बसून बंदुखिणे निशाण लावून पाहिली. तेथून वाड्यात येऊन पांडुरंग गणेश व सिवबाला हजारी यासी सोकटी खेलले. छ २० रोज स्नान देवपुजा जाल्यावर च्यार घडी दरबार जाला. बारगीर व पठाण लोक याचे मुजरे जाले. भवानी काळो याचे घरी मेजवानी जाली. खासे दोन प्रहरी भोजनास गेले होते. तिसरे प्रहरी स्वारी सकरदरियास गेली. लक्ष्मीनारायेणाचे दर्शण करून तल्याचे काठी बसून सिवबाला हजारी वगैरे याजकडून बंदुखीणे निशाण लावून पाहिले. मेंढराचे निशाण केले होते. छ २१ रोज स्नान देवपुजा जाल्यावर चिमणाजी निराजी दिमत पंतसचिव यास निरोप दिल्हा. त्यास वस्र दिल्ही. रघुनाथ-राव सचीव कैलासवासी जाल्यावर चिमणाजी निराजी यास मुछद्यांकडून दोनच्यार वेळ सांगविले की तुम्ही येथून जा. इतक्यावर राहाल तर येथे खर्चास मिलनार नाही म्हणून, याप्रमाणे

सांगविलें आणि पुण्याहून त्याचे यजमानाची पत्रे येकदोन आली की तुम्ही न येणे. येथे तो याणी साफ सांगितले आणि खर्चासहि मिळेना पहिले च्यारपाचसे रुपये कर्ज होते अलीकडे दोन तीनसे जाले, येकूण पाच सातसे कर्ज जाले त्याजमुळे नित्य धरणे कर्जदार यसत होते व पुढेहि खर्चास मिळेनासे जाले तेव्हा निरोप घेऊन उठून गेले तिसरे प्रहरी स्वारी जागेश्वरास गेली माहादेवाचे दर्शण करून आल्यावर सोमवारचे स्नान भोजन जाल्यावर सलाबतखा याजकडील वकील तिमाराव आले होते त्यासी च्यार घडी बोलणे जाले छ २२ रोज स्नान देवपुजा करून प्रहर दिवसा स्वारी तयार करऊन घोड्यावर स्वार होऊन सलाबतखा याचे भेटीस गेले बाहेर सितावर्डीजवळ गेले तो सलाबतखाची स्वारी तिकडून तयार होऊन आली तेथे घोड्यावरून उतरून त्याच्या याच्या भेटी होऊन वाड्यात आले घडीभर बसून त्यास विडे देऊन सलाबतखा आपले राहुटीस गेले छ २४ रोज स्नान देवपुजा जाल्यावर हाजामत केली तिसरे प्रहरी स्वारी तुलसीबागात गेली तेथे मुत्सद्दी मंडळी व सलाबतखा याचे वकील व बाबूराव वैद्य आले होते तेथे क्षणभर बसून बाग पाहून आले छ २५ रोज स्नान देवपुजा केली, तेथे देवघरात कुशाबा व मुनसी यासी घडीभर खलबत केले तिसरे प्रहरी स्वारी सक्करदरियास गेली येकादसी होती तेथे लक्ष्मी-नारायणाजवळ कथा च्यार घडी ऐकिली छ २६ रोज स्नान करून प्रहर दिवसा स्वारी बाहेर कारवाण उट घेऊन आले आहेत तेथे जाऊन उट पाहून खरीदी केले शनिप्रदोश खाशास असतो साइंकाळी स्नान भोजन जाले छ २७ रोज स्नान करून देवघरांत कुशाबा चिटणीस यासी दोन घडी खल्बत जाले तिसरे प्रहरी तुलसीबाग पाहिला तेथे लस्करची पत्रे आली ती वाचली तेथून भवानी काळो याचे घरास जाऊन मागती पत्रे वाचली दोन घडी खलबत केले धारण दोन सेर आहे लोकांची धरणीं होतात येथून दोन हजार फौज गेली होती त्यात पाच सातसे लोक वराडातूनच उठोन माघारे आले हजार बारासे लोक तुंगभद्रा उतरून गेल्यावर त्यातून दोन चारसे फिरून आले बळवंतराव याजवळ पाचसे लोक आहेत व दुसरी फौज येथून च्यारसे पाचसे रवाना जाली त्यास च्यार महिणे होत आले अद्याप कृष्णातीरपर्यंत पावली नाही म्हणून लस्करची पत्रे आली होती छ २८ रोज स्नान करून देवघरात कुशाबासी खल्बत घडीभर जाले सोमवार होता म्हणून दोन प्रहरी तुळसीबागात जाऊन प्रहरभर गंजिफा खेल्ले तेथून जागेश्वरास दर्शण करून आल्यावर स्नान भोजन केले छ २९ रोज स्नान करून सलाबतखा आले त्यासी प्रहरभर खल्बत जाले तुकोजी नलवाडे याचे घरी मेजवानी जाली दोन प्रहरी भोजने करून स्वारी सक्करदरियास गेली. तेथे लक्ष्मीनारायणाजवळ वसंत पचमीचा उत्छाह पाच सात दिवस

आहे. शहरचे वाणी बकाल वगैरे झाडून दुकाणे बाजार तेथे नेऊन यात्रा भरविली. छ ३० रोज स्नान देवपुजा करून हाजामत केली. तिसरे प्रहरी सकरदरियास गेले. तेथे लक्ष्मीनारायेणाचे दर्शण करून गारोडी याचा खेल दोन घडी पाहिला. कलवाताचा तमाशा घडीभर पाहून आर्ती जाल्यावर शहरात आले. छ १ जमादिलाखर स्नान करून स्वारी सकरदरियास गेली. तेथे मुदबख गेले होते. भोजने करून कथा कलवाताचा नाच पाहून आर्ती जाल्यावर शहरात आले. छ ३ रोज स्नान करून प्रहर दिवसा सकरदरियास गेले. तेथे लक्ष्मीनारायेणाची पुजा करून दोन प्रहरी वाड्यात येऊन भोजन केले. तिसरे प्रहरी सकरदरियास जाऊन पंचमीस बागातील बंगल्यात कलवाताचा तमाशा प्रहरभर जाला. मुछद मंडली वगैर बाबूराव वैद्य आले होते. तेथून शहरात आल्यावर तुलसीबागात जाऊन दोन प्रहर रात्र पावेतो कलवाताचा तमाशा पाहिला. छ ६ रोज अरुणोदई स्वारी सोणेगावचे बागात गेली. तेथे सलाबतखा याची मेजवानी जाली. दोन प्रहरी भोजने करून कलवाताचा तमाशा च्यार घडी जाला. साइकाली शहरात आले. छ ७ रोज स्नान देवपुजा करून हाजामत केली. तिसरे प्रहरी सकरदरियास गेले. तेथे गोपालकाला जाला. छ ८ रोज प्रातःकाली सलाबतखा आले त्यासी प्रहरभर खलबत केले. तिसरे प्रहरी तुलसीबाग पाहिला. तुलसीबाग नवा केला. अद्याप काम चालत आहे. च्यार बंगले केलेत. मुदबखचे घर केले व जनानखान्याचे घर व खोल्या केल्या. बाग चांगला जाला. शहरास लगता जवल आहे. तेथे सकाली साइकाली बहुत करून तेथेच बसतात. वाड्यापासून जवलच आहे. छ ९ रोज स्नान देवपुजा करून भवानी काळो यासी खलबत केले. तिसरे प्रहरी तुलसीबाग पाहून सकरदरियास गेले. लक्ष्मीनारायेणाचे दर्शण करून कलवाताचा तमाशा घडीभर पाहून आले. छ १० रोज प्रातःकाली स्नान करून भोजन द्वादसीचे जाल्यावर प्रहर दिवसा स्वारी तयार करऊन बागात जात होते तो निंबाजी सिंदे व उघडे फलटणकर सिलेदार या उभयताहि मंडलीसुद्धा येऊन तलबेकरिता अडऊन धरणे बसले. तेव्हां भवानी काळो वगैरे मुछ्दी येऊन उभयता मंडलीस सांगितले की येका दो दिवसा फडशा होईल. धरणे काशास बसतात म्हणून बोलले. ते आयकेनात. भवानी काळोस वगैरे बोलले की तुम्ही लबाड आहात, तुम्ही तलबा नित्य देतात आणि आम्ही घेतच आहोत. याप्रमाणे जाले. अडऊनच बसले. रात्री लोकांचे धरणे तसेच होते. आखर कांही निकाल जाला नाही. देतो म्हणून सांगितले तेव्हां दुसरे दिवसी लोक उठून गेले. लोकानी काय करावे? लबाडी कोठवर? जन्मपर्यंत लबाडीच. लबाडीची काही संख्या मर्यादा नाही. आम्ही मातबर, लबाडी किती करावी हा संकोच काडीमात्र नाही. सिंदे व उघडे मंडली तीनसे लोकांचे पथक

सुधा गुदस्ता छतीसगडास गेले होते तेथे छेतीसगडचे पाणी हाना लागून तमाम घोडी मेली तेव्हां तिकडून लोक वैलावर बसून आले त्यास आठ महिणे जाले तसे सरतरफ आहेत असे असून त्याची तल्ब मिलत नाही सर्वांची हेच गत्य आहे लोकांचा हिसेब करून तलबा पावल्याचे कबज लिहून घ्यावे तेव्हां चिठी जामदारखान्यावर धावी ते चिठी आठ महिणे दाहा महिणे फिरत असावी सेवटी चिलीकास ऐवज मिलतच नाही असी गत्य आहे रणसिंगराव मोहिते याचे बंधु जयसिंगराव हे येक वर्ष सरतरफ आहे पन्नास हजार रुपये तलब निघाली कबज लिहून घेतले ऐवज तो मिलत नाही, असी गत्य आहे तेव्हां पाणी येका दोघानी मजकूर केला की याची स्वारी पुण्यास गेली म्हणजे तेथे श्रीमन नानास सांगून येथे अडकून पैका घ्यावा असे ध्यान लोकांचे आहे छ १४ रोज प्रयागाहून चिमाबाई याजकडून तिलगूल व पत्रें आली ती वाचली प्रयागाहून कासीस जाणार होते. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

क. नं. ८८
का. नं १३
प क. ४०

३०३

१४ एप्रिल १७९२

श्रीकृष्ण

शेवेसी श्रीराम सदाशिव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता छ २१ साबान मुकाम नागपूर येथास्थीत असो विशेष राजश्री रघोजी भोसले सेनासाहेब सुभा याची स्वारी सैंगमचे मुकामीहून छ १२ रजब मगलवारी साईकाली नागपुरास आली छ १३ रोज स्नान देवपूजा करून भवानी काळो व कुशाबा यासी खलबत केले नंतर हजामत केली तिसरे प्रहरी तुलसीबाग पाहिला छ १४ रोज स्नान देवपूजा करून घडीभर खलबत केले साइकाली बाहेरील चौकात हुताशनी केली तेथे मुछदमडली व बाबुराव वैद्य आले होते. हुताशनीची पूजा त्याद्यानी केली तमाशा घडीभर पाहिला छ १५ रोज स्नान देवपूजा करून नजरबागात पोऱ्याचा तमाशा घडीभर पाहिला तिसरे प्रहरी स्वारी व बाबुराव वैद्य व मुछदमडलीसुधा शहरून खुले हातीवर बसून शेहराबाहेर गळाजवल गेले तेथे मणुश गळी लागत असतात दोन च्यार मणुशे गळी लागली. त्याचा तमाशा हातीवर बसून घडीभर पाहून आले. छ १६ रोज स्नान देवपूजा जाल्यावर भवानी काळो यासी खलबत घडीभर जाले सलाबतखा यास भोजनास बोलावले होते दोन प्रहरी मुछद मंडली व सिवबाला हजारी वगैर मडळीसी घडीभर रंग खेळले. तिसर प्रहरी स्वारी तुलसीबागात गेले तेथे बाबुराव वैद्य आले होते त्यास बागातील बंगले, जिणे व खोल्या कारंजी दाखविली तेथे लस्करची पत्रें आली ती वाचली छ १७ रोज स्नान देवपूजा

करून पोऱ्याचा तमाशा घडीभर जाला. नंतर सिव्रबाला हजारी वगैर मंडली यांसी दोन घडी रंग खेलले. च्यार घटका रात्री स्वारी बाबुराव वैद्य याचे घरास गेली. मुछदमंडली आले होते. च्यार घडी कलवाताचा तमाशा पाहून आले. छ १८ रोज स्नान देवपूजा करून देवघरात माधोजी नाईक काले व कुशाबा चिटणीस यासी खलबत केले. चिमाबाई अयोधेस गेले होते ते कासीस आले म्हणून पत्रे आली ती वाचली. तिसरे प्रहरी तुलसीबाग पाहून जागेश्वरास गेले. जागेश्वराचे दर्शण करून गणपतीस गेले. तेथून बालाजी यादव रामक्षेत्रकर कमावीसदार याचे घरास गेले. तेथे लग्न मुलीचे होते. लग्न लागल्यावर वाड्यात येऊन स्नान केले. चतुर्थी सोमवार होता. छ १९ रोज स्नान देवपूजा करून भवानी काळो यासी खलबत घडीभर जाले. पंचमीस मानकर मंडली लोक वगैर भोजनास बोलावले. तिसरे प्रहरी स्वारी तुलसीबागात गेली. मुछदमंडली वगैर बाबुराव वैद्य आले होते. कलवाताचा नाच च्यार घडी जाला. नंतर साइकाली हावदात रंग केला होता तेथे च्यार घडी झाडून मंडलीसुधा रंग खेलले. छ २० रोज स्नान देवपूजा करून हजामत केली. तिसरे प्रहरी बाळाबाई याचे घरी कृष्णाजी मोहिते याणी रंग केला होता तेथे जाऊन घडीभर पोऱ्याचा तमाशा पाहिला. नंतर च्यार घडी कलावताचा तमाशा पाहिला व रंग घडीभर खेलले. रात्री महिपत दिनकर छतीसगडचे सुभे याचे घरास स्वारी गेली. तेथे च्यार घडी कलावताचा तमाशा पाहिला. खाशास वस्त्र दिल्ही. छ २१ रोज स्नान देवपूजा करून महिपत दिनकर याचे तैनातीस हाती होता तो आणून पाहिला. झोल नाही म्हणून चालऊन पाहिला. बुजार नाही म्हणून पुढे फटाके सोडून पाहिले. दोन प्रहरा कृष्णाजी मोहिते व्याही याचे घरास भोजनास गेले होते. भोजने करून आल्यावर वाड्यात सलावतखा व मानकरी व मुछद मंडली यासी च्यार घडी रंग खेलले. कलवाताचा तमाशा प्रहररात्रपावेतो जाला. छ २२ रोज स्नान देवपूजा करून प्रहर दिवसा स्वारीस सिव्राम हरी खाजगीवाले याचे घरास गेली. त्यास शरीरी समाधान आठ पंधरा दिवस नाही म्हणून त्याचा समाचार घेऊन दोन प्रहरी बागात भोजनास गेले. तेथे मानकरी मंडली व सलाबतखा यास भोजनास बोलावले होते. सर्वांणी भोजने करून च्यार घडी कलवाताचा तमाशा पाहिला. नंतर च्यार घडी रंग खेलले. छ २३ रोज स्नान देवपूजा करून प्रहरभर खलबत जाले. दोन प्रहरी स्वारी सेकसला पीरजादे बाळापूरकर आले आहेत. त्याचे बिराडास हासापुरीवर गेले. त्याची भेट जाली. पीरजादे याणी खाशास वस्त्रें दिल्ही. तिसरे प्रहरी स्वारी वेंकटराव कासी परभु राजश्री माहादजी सिंदे याजकडे वकीलीस गेले होते त्याचे घरास गेली. तेथे बालाजीपंत छतीसगडकर आहे. त्याची मूल भवानी काळो याचे चिरंजीव माधवराव याचे दुसरे लग्न वैशाखमासी करितात. तेथे सर्व मंडली जाऊन वाग-




Photo by] [*Aerofilms*

